Impact Factor
2019 – 5.604
www.sjifactor.com

ISSN 2454-7409
Vol. 4   Issue 1  Jan. 2019


वर्ष चौथे    अंक पहिला    जानेवारी २०१९


Peer Reviewed Annual National
Research Journal in Marathi As Per UGC Guidelines
URL: http://www.indiramahavidyalaya.com/pdf_show.php?unum=97

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

मराठी भाषा, संस्कृती व अस्मिता जोपासणारे
मराठी विषयाचे प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासक यांच्या
संशोधनकार्याला चालना देणारे वार्षिक







Impact Factor 2019 – 5.604 ISSN 2454-7409

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

Peer Reviewed Annual National Research Journal As Per UGC Guidelines
VOL 4 ISSUE 1
वर्ष चौथे, अंक पहिला, जानेवारी २०१९
URL: http://www.indiramahavidyalaya.com/pdf_show.php?unum=97

**मुख्य संपादक**

डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब

**प्रकाशक**

प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

**मुद्रक**

सेवा प्रकाशन
विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६

**मुखपृष्ठ**

डॉ. पवन मांडवकर

Communication

Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401
e mail – **marathipradhyapak@gmail.com**
Alternate mail id – **imvkalamb@yahoo.co.in**
Tele. 07201-226170, 226147, 226129 Mob. 9422867658. 9403014885
**Website: www.indiramahavidyalaya.com**

जानेवारी, २०१९

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका


## निमंत्रित संपादक मंडळ

विक्रम राजे, 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, United Kingdom
डॉ. अनिता गुप्ते पाटील, Auckland, New Zealand
रणजीत राजे, 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourn, VIC-3006, Australia
विशाल डहाळकर, 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद कार्यकारिणीचे सर्व सदस्य

अध्यक्ष – डॉ. पवन मांडवकर
उपाध्यक्ष – प्रा. अनुप नांदगावकर
सचिव – प्रा. रा.तु. आदे
कोषाध्यक्ष – डॉ. गजानन हेरोळे
सहसचिव – प्रा. अतुलकुमार सारडे
सदस्य – प्रा. अनिल काळबांडे
सदस्य – प्रा.डॉ. ममता इंगोले
महिला प्रतिनिधी – प्रा.डॉ. मीना जुनघरे, प्रा. डॉ. शुभांगी कोंडोलीकर
अमरावती जिल्हा प्रतिनिधी – प्रा.डॉ. रमाकांत इटेवाड, प्रा.डॉ. दिनेशचंद्र राऊत
अकोला जिल्हा प्रतिनिधी – प्रा. विनय पैकिने, प्रा. प्रकाश वानखडे
बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी – प्रा.डॉ. शोभा नाफडे, प्रा. आनंद धुंदाळे
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी – प्रा. सिद्धार्थ भगत, प्रा.डॉ. युवराज मानकर
वाशिम जिल्हा प्रतिनिधी – प्रा.डॉ. विजय जाधव, प्रा.डॉ. शरद वाघोळे

## सल्लागार मंडळ

सोनाली डहाळकर, 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
डॉ. शशिकांत सावंत, विक्रम विश्वविद्यालय, उज्जैन, मध्यप्रदेश
डॉ. अनिल गजभिये, माजी प्राचार्य, शासकीय महाविद्यालय, सरदारपूर, जि. धार, मध्यप्रदेश
डॉ. धनाजी गुरव, प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, महाड, जि. रायगड
डॉ. लीला मोरे, सेवानिवृत्त प्राध्यापक, शासकीय कला वाणिज्य महाविद्यालय, इंदौर, मध्यप्रदेश
डॉ. सिंधू मांडवकर, सेवानिवृत्त प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
डॉ. किसन पाटील, एम.जे. कॉलेज, जळगाव, खान्देश



या अंकाचे नियमित मूल्य – २०० रुपये
– सरळ खात्यात वर्गणी पाठविण्याकरिता बँकेची माहिती –
A/c Name - Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre
Bank - Bank Of Maharashtra Branch - Azad Maidan Road, Yavatmal
A/c No. – 60175373000 IFSC code - MAHB0000047



(या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या लेखांचे किंवा शोधनिबंधांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे असले तरी इतरत्र प्रकाशनार्थ संपादक मंडळाची परवानगी घेणे गरजेचे आहे. मात्र या लेखांमधून अथवा शोधनिबंधांतून प्रकाशित मतांशी संपादक मंडळ, सल्लागार मंडळ किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. मूळ संदर्भ तपासून घेण्याची विनंती वाचकांना करण्यात येत आहे. मुद्रणदोषासह कोणत्याही चुकांबद्दल दिलगिरी व्यक्त केली जाईल; मात्र कायदेशीर बाबी कळंब येथील न्यायालयांतर्गतच सोडविता येतील.)

मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका
डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ 445401 (महा. स्थापना १९८३, नॅक ब श्रेणी प्राप्त)
कार्यालय (07201) 226147, 226129, 226170, निवास (07232) 252975, 9422867658
E mail : marathipradhyapak@gmail.com

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्रातर्फे व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या संपादनाखाली **मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका** या राष्ट्रीय पातळीवरील ISSN जर्नलकरिता मराठी विषयाच्या प्राचार्य, प्राध्यापक, संशोधक छात्र व अभ्यासकांकडून शोधनिबंध मागविले जातात. मराठी साहित्य, संशोधन, संस्कृती, कला तसेच मराठी अध्ययन—अध्यापनाशी संबंधित कोणत्याही विषयावर शोधनिबंध स्वीकारले जातात. हे जर्नल जानेवारी महिन्यात प्रकाशित होते. शोधनिबंधलेखकांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशांचे पालन करावे.

१. शोधनिबंध मायक्रोसॉफ्ट वर्डमध्ये ए ४ आकारात चारही बाजूंनी सव्वा इंच मार्जीन सोडून सिंगल स्पेसिंगसह कृतीदेव ५० फॉन्टमध्ये संपूर्ण बोल्ड करून वरील आयडीवर ई—मेलने पाठवावा. पीडीएफ चालणार नाही.
२. अक्षरांचा आकार १४, निबंध शीर्षकाचा आकार २६, शीर्षकाखाली मध्यभागीच लेखकाच्या नावाचा आकार १६, त्याखाली लेखकाचे पद, महाविद्यालयाचे नाव, पत्ता, स्वत:चा मेल आयडी व भ्रमणध्वनी १४ आकारात असावे. अंतर्गत उपशीर्षकांचा आकार १८ असावा व ती डावीकडे असावीत. त्यापुढे कुठलेही चिन्ह नसावे. नाव व पत्त्याखाली लेखकाचा साहित्य, संशोधन इ. संदर्भात जास्तीत जास्त चार ओळीत परिचय पाठवावा.
३. शब्दमर्यादा २५०० किंवा अधिकतम ५ पेजेस. निबंध प्रकाशित करण्यासंदर्भात निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.
४. शोधनिबंध लेखनाच्या आंतरराष्ट्रीय पद्धती पाळून त्याचा मूल्यात्मक व वाङ्मयीन दर्जा सांभाळला जावा. त्यात सारांश, बीजशब्द, प्रस्तावना, निष्कर्ष, संदर्भ यांचा समावेश करण्याचा प्रयत्न करावा. शुद्धलेखनाच्या चुका नसाव्यात.
५. शोधनिबंध इ मेलने पाठविण्याची अंतिम तारीख १ डिसेंबर. मेल व्यवस्थित मिळाल्याची फोनवर खात्री करावी.

# Research Journal of India

Research Journal of India is a Peer Reviewed Annual National Research Journal for Multi-disciplinary studies of various faculties.

Vision and Mission of Research Journal is to provide momentum to research in the all areas like analytical, competitive, survey, contemporary issues and quality control.

**Call for Research Paper**

1. Paper on all subjects and areas will be accepted in English, Hindi or Marathi.
2. Paper should be **A 4** size with 1.25 inch margin on each side.
3. No header & footer should be given.
4. Text should be in **Times New Roman** type with font size **11** in English and **Krutidev 50** type with **14** font size for Hindi/Marathi and should be computed in MS word only. PDF files will not be accepted.
5. Font size for Title of Paper 22 bold for English and 26 bold for Hindi/Marathi, Name of Author in 12 bold for English, 16 bold for Hindi/Marathi, address in 11 for English, 14 bold for Hindi/Marathi & Subtitles in 14 bold for English and 18 bold for Hindi/Marathi. For Marathi and Hindi articles Krutidev 50 font should be tatally bold for all matter.
6. Spacing should be **single**. Alignment for paper & headings should be justified & centered for title of paper & name of writer with address.
7. The first page should consist of title, name(s) of author(s) with designation, department or college with full address, contact numbers and mail id at the centre below title.
8. Introduction, review of literature, background of study, methodology, objectives, purpose, hypothesis, significance, findings and discussion, analysis, conclusion, recommendations may be given wherever required.
9. References list should be alphabetized at the end of research paper.

10. Tables & figures should be cited in the text in consecutive numerical order. Each figure should have concise and informative caption.
11. Maximum limit is 2500 words or 5 pages. Abstract should be up to 150 words followed by 4-5 key words. Paper less than 3 pages or without references will not be accepted.
12. Authors have to send research paper by e mail at: **marathipradhyapak@gmail.com**
11. Editorial Board's Decision will be final.
13. The copyright of all accepted papers will vest with **Research Journal of India.**
14. International Guidelines and UGC Guidelines for writing of research paper are to be strictly followed.
15. Date of Publishing is 1rst October each year and papers will be accepted up to 1rst September.

Subscription for one year and single issue price for individual, institutional Rs. 500/- to be deposited in A/c No. – 60175373000 of Bank of Maharashtra, Azad Maidan Road, Yavatmal, IFSC code - MAHB0000047 in favour of Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre.

❖❖❖

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | लग्नासाठी कफल्लक का व्हावे? | प्रा. प्रल्हाद दत्तराव भोपे | ५ |
| २ | महेश केळुसकर यांची अखंड निद्रानाशाची कविता | डॉ. मधु सुरेश सावंत | ८ |
| ३ | स्त्रीची वास्तविकता | डॉ. विजया राऊत | १२ |
| ४ | बाबाराव मुसळे यांच्या कथेतील स्त्रीचित्रण | डॉ. शरद देवराव उमाटे | १५ |
| ५ | 'कर्णपर्व' कर्णाच्या जीवननाट्याचा शोध घेणारी कादंबरी | प्रा.डॉ. विनोद राठोड | २० |
| ६ | पटकथा लेखन प्रक्रिया | श्री.सुरेश विठ्ठल मेहेर | २५ |
| ७ | लोकमान्य टिळकांच्या विचारसरणीचा मराठी साहित्यावर प्रभाव | डॉ. बालाजी व्ही. डिगोळे | २८ |
| ८ | मराठी एकांकिका : एक दृष्टीक्षेप | प्रा. प्रकाश भरणे | ३१ |
| ९ | कवी विठ्ठल वाघ यांच्या कवितेतील कृषी संस्कृतीचे दर्शन | प्रा.डॉ. श्याम मु. जाधव | ३५ |
| १० | संत बहिणाबाई | प्रा.डॉ. व्यंकटेश पोटफोडे | ३८ |
| ११ | सतीश तराळांचे कथाविश्व | डॉ. वर्षा चिखले | ४२ |
| १२ | कृषिविषयक ओवीगीतांमधून अभिव्यक्त होणारे स्त्रीमन | डॉ. अलका गायकवाड | ४५ |
| १३ | १९९० नंतरच्या नवकवींची ग्रमीण कविता | प्रा. डॉ. अतुल चौरे | ४९ |
| १४ | संत तुकारामांचा सामाजिक कार्यात्मक दृष्टिकोन | प्रा. विलास गांजरे | ५४ |
| १५ | नव्वदोत्तरी कवितेतील सद्ययुगीन वास्तव : एक शोध प्रतिमा आणि प्रतिकांच्या अनुषंगाने | प्रा.डॉ. शोभा रोकडे | ५८ |
| १६ | ग्रामीण भागातील विद्यार्थी व भाषाविषयाच्या अध्यापनातील समस्या | प्रा.रा.तु. आदे | ६३ |
| १७ | गझलसम्राट सुरेश भट | प्रा.डॉ. वीरा मांडवकर | ६६ |
| १८ | देशीवाद : प्रेरणा, स्वरूप आणि वैशिष्ट्ये | डॉ. पवन मांडवकर | ७२ |
| १९ | मथुरा लभाण बोलीतील 'प्रभाती गीते' : एक आकलन | प्रा.डॉ. भगवान साबळे | ७६ |
| २० | स्त्रीवादी साहित्य | डॉ. राखी मं. जाधव | ८० |
| २१ | वृत्तपत्रीय मथळ्यांची भाषा–एक चिकित्सा | डॉ. संजय पाटील | ८४ |

# लग्नासाठी कफल्लक का व्हावे?

**प्रल्हाद दत्तराव भोपे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी
भ्रमणध्वनी 9922794164, इ मेल pralhadbhope@gmail.com

मानवतेचे महान पुजारी, जगाला विश्वशांतीचा व सर्वधर्मसमतेचा संदेश देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सामान्य माणसाला आपले दैनंदिन आयुष्य जगत असताना वेगवेगळ्या अंगाने ग्रामगीतेच्या माध्यमातून मार्गदर्शन केले आहे. भारतीय समाजामध्ये लग्नात दिला घेतला जाणारा हुंडा ही कुप्रथा प्रतिष्ठेची बनलेली आहे. या प्रथेमध्ये व्यक्तीचा स्वार्थ दडलेला आहे. ही प्रथा समूळ संपुष्टात यावयास बराच काळ लागणार आहे. तरी पण हुंडाबंदी या विषयावरील ही परिषद नक्कीच हुंडाबंदीच्या इतिहासातील पाऊल ठरेल हे निश्चित. भारतीय समाजातील हुंडा देणे–घेणे, बालविवाह, बालकामगार, भ्रुणहत्या यासारख्या कुप्रथा कायदयाने सामाजिक गुन्हा ठरतात. त्यासाठी शिक्षेचीही तरतूद आहे. परंतु तरीही समाजात हे गुन्हे घडत नाहीत असे नाही. त्यासाठी समाज शिक्षित, सुजाण, प्रगत म. फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यासारख्या महापुरूषांच्या प्रत्यक्ष विचारांचा होणे गरजेचे आहे. प्रस्तुत शोधनिबंधात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेत आदर्श विवाह व हुंडा कुप्रथेविषयीचे जे विचार मांडले आहेत ते आजही किती महत्त्वाचे आहेत ते सांगण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला आहे.

हुंडयाची प्रथा ही विवाहसंस्था व कुटुंबसंस्था स्थिर झाल्यापासून या ना त्या स्वरूपात चालत आलेली आहे. ही देवघेवीची प्रथा सुरू होण्यासाठी आणखी दोन गोष्टींची गरज होती. एक म्हणजे माणसाच्या मनात सौंदर्याविषयीच्या कल्पना विकसित होणे व दुसरे जगणे स्थिर होऊन संपत्तीवरचा मालकी हक्क प्रस्थापित होणे. श्रीमंत व प्रतिष्ठेच्या घरात मुलगी देण्याच्या चढाओढीतूनही मोबदल हुंडा, वरदक्षिणा देण्याची प्रथा सुरू झाली असावी. या प्रथेमुळे अनेक निरापराध मुलींना आपला प्राण गमवावा लागत आहे. स्त्रीच्या अत्याचाराचे प्रबळ कारणही हुंडा ही प्रथा ठरलेली दिसते. विवाहाच्या आदर्शतेबाबत राष्ट्रसंत म्हणतात,

**चालावा जगाचा प्रवाह। व्हावा निसर्ग गुणाचा निर्वाह।**
**यासाठीच योजिला विवाह। धर्मज्ञांनी तयाचा।।**
**स्त्री–पुरूष ही दोन चाके। जरी परस्पर सहायके।**
**तरीच संसार रथ चाले कौतुके। ग्राम होई आदर्श।।**

(ग्रामगीता अध्याय 21 वा, ओवी 2, 3)

जगाचा प्रवाह म्हणजेच मनुष्य मात्राची वंशवृद्धी व नैसर्गिक प्रवृतीचा निर्वाह व्हावा यासाठी विवाहसंस्था आहे. स्त्री–पुरूष ही संसाररूपी दोन चाके आहेत. परस्पर सहाय्यानेच ती चालली तर संसार अत्यंत सुखाचा होईल. भारतीय समाजामध्ये विवाह हा एक संस्कार व प्रतिष्ठेचा भाग आहे; परंतु लग्नातील देवघेवीमध्ये महत्त्वाची समस्या होऊ घातलेली आहे ती म्हणजे हुंडा. त्यामुळे कित्येक सुंदर मुली अविवाहित राहतात. तसेच अनेक जन वर वधूचे घराणे, पैसा, प्रतिष्ठा ऐवढेच पाहून लग्न लावून देतात. वर–वधूला वडिलधाऱ्यांचा मान राखण्यासाठी वरवधूने लग्न करू नये म्हणूनच राष्ट्रसंत म्हणतात,

**विवाहाआधी परस्पराने। पहावे दोघांनाही निश्चयाने।**
**विचार स्वातंत्र्य दोघासही देणे। अगत्याचे।।**
**एरव्ही दोघांच्याही मते। लग्न जुळवूनही आणावे।**
**नांदोत दोघेही एकसुर्ते। संसार सुखी करावयाचा।।**

(ग्रामगीता अध्याय 21 वा, ओवी 11, 13)

विवाह ही दोन घरांची जवळीक असते. नवराबायको एकमेकांचे जीवनसाथी व्हायचे तर एकमेकांस किमान अनुरूप आणि पसंद हवेत. याबद्दल आधी नीटपणे विचार उभय पालक मंडळीनी नाही केला तर पुढे अनेक घोटाळे होतात. याबाबत राष्ट्रसंत म्हणतात,

**कांही लपवालपवी करिती। मुली नांदायासि न धाडिती।**
**कांही मुलींना ओढूनि नेती। तमाशा करिती जीवनाचा।।**
**कांही लग्नाआधी लपविती उणीव। त्याची पुढें होतां जाणीव।**
**जन्मभरि भोगावा लागे उपद्रव। सकळांसि मग।।**

(ग्रामगीता अध्याय 21 वा, ओवी 70, 71)

काही जनांस उगाच बढाया मारण्याची, श्रींमती, वैभवाचा आव आणण्याची सवय असते. कुणी देवघेवीवरून भलतेच ताणतात. जणू बाजारच जणावरांच्या बोलीचा. 'सोयरे' म्हणवितात तरीही एकमेकांची 'सोय' पाहत नाहीत तर 'वाट लावतात' व दोन्ही कुटुंबास— वधूवरास दुःखीकष्टी बनवितात. कुणास दागदागिन्याची हाव फार असते. सद्‌गुणाची असावयास पाहिजे. नकली वैभवाने फसविणारे लोक मुलांमुलींचे जीवनच बरबाद करतात. राष्ट्रसंतांना खरे दुःख या प्रकाराबाबत आहे.

**मूलीमूलांचा लग्नबाजार। शिक्षण, सौंदर्य, नोकरीवर।**
**भाव न्युनाधिक ठरविती साचार। जीवनमूल्यें न जानतां।।**

(ग्रामगीता अध्याय 21 वा, ओवी 74)

मुलगा—मुलगी सद्‌गुणी, कर्तृत्ववान, सुंदर, देखणी — व्यक्तिमत्त्वसंपन्न अनुरूप असावेत. नोकरी कुठे, कशी, किती मिळकतीची हेही पाहायला हवे; पण याचा बाजार मांडू नये. जीवनमूल्यांचा विसर पडता कामा नये. काहींना लग्न व्यवहारामध्येही दलाली करण्याची हौस असते. अशा स्वार्थपरायण माणसांपासून दोन्हीही घरच्या माणसांनी सावध राहावे अन्यथा,

**काहीं लग्नाचे दलाल। उधळीत जाती रंग गुलाल।**
**मुलामुलींचे जीवन हलाल। करिती स्वार्थास्तव।।**

(ग्रामगीता अध्याय 21 वा, ओवी 75)

काही मुलींचे आईबाप मुलींना खपविण्याच्या मागे असतात. नीती—अनीती ध्यानात घेत नाहीत. लग्नपत्रिका पाहणे, छत्तीस गुण जुळावेत अशी अपेक्षा ठेवणे, त्यासाठी देवघेव चालते. युक्त्याक्लृप्त्या केल्या जातात. हा सारा लबाडीचा उद्योग असतो. आज हुंडा देणे घेणे कायद्यानुसार गुन्हा ठरतो. तरीही तो राजरोसपणे दिला घेतला जातो. हुंडा देणे ज्यास शक्य आहे त्याचे ठीक; परंतु जी कुटुंबे आपला उदरनिर्वाह जेमतेम करू शकतात त्यांनी काय करावे? कारण हुंडा देणारा हा सुद्धा मुलांसाठी अपेक्षा ठेवून असतो या संदर्भाने कर्णिका पाठक म्हणतात,

**रूपये पैसों के मोल गूंजी शहनाई।**
**व्यापारीने मनचाही, बोली लगाई,**
**देनदारने खुशीसे गर्दन झुकाई।**
**मोलभाव था यह किसी के सपनों का।**
**अरमानो का हुआ कुछ ऐसा व्यापार,**
**वस्तु का कोई नहीं था उसमे विचार**
**जब ऐसा ही देना था जीवन संसार,**
**तो सही है कन्या भ्रुणहत्या का विचार।**

आज शासन व कायदा मुलींच्या पाठीशी उभा आहे. कारण मुलीच्या जन्माचे स्वागत करा, तिला उच्च शिक्षित करा हे सांगते; पण वस्तुस्थिती अशी आहे की, मुलीस संस्कार, शिक्षण देवूनही जेव्हा तिच्या लग्नाची वेळ येते तेव्हा मात्र तिला हुंडा हा द्यावाच लागतो. नाही तरी आपल्या मुलीचे चांगले व्हावे, तिला चांगले घर मिळावे अशी अपेक्षा कोणत्याही माता—पित्याची असते तेव्हा स्वतः प्रसंगी कर्जबाजारी होवून ते पालक तिचे लग्न करतात. यासाठी पालकाचा मनोनिग्रह खुप महत्वाचा आहे. मी माझ्या मुलांसाठी हुंडा घेणार नाही व मुलीसाठी देणार नाही. याचे प्रत्यक्ष अनुकरण महत्वाचे ठरेल. हुंडयाची प्रथा जेव्हा कमी कमी होत जावून जेव्हा संपुष्टात येईल तेव्हाच मुलीच्या जन्माचे स्वागत मनापासून होईल व महिला सन्मानाने व निर्भयपणे जीवन

व्यतीत करतील यात शंका नाही. महात्मा जोतीराव फुले यांनी सुरू केलेली हुंडाविरहित सत्यशोधक विवाह पद्धती महिलांच्या शोषणअंतासाठीच होती. या विवाह पद्धतीचा पुरस्कार प्रत्येक पालकांनी केला तर हुंडा पद्धती हळूहळू नष्ट होत जाईल. विवाह ही आनंद वाढविणारी गोष्ट व्हायला हवी. वेड्यासारखा पैसा उधळणे ही विवाहाची रीत नव्हे. अपार सोहळा, थाटमाट, विहीण– मामे – नातेवाईक यांचा वऱ्हाडाचा सावळा गोंधळ म्हणजे विवाह नाही. अस्ताव्यस्त कारभार, सगळ्यांची त्रेधातिरपिट, तारांबळ, धावपळ, उधळमाधळ म्हणजे विवाह नाही. राष्ट्रसंत ग्रामगीतेत विचारतात की,

**लग्नाकरीतां कर्ज करावें। जन्मभरि व्याज भरीत जावें।**
**लग्नासाठी कफल्लक व्हावे। कोण्या देवें सांगितले?**
**चार पाच दिवस लग्न। लग्नांत होती नाना विघ्नं।**
**मोठेपणाचे विडंबन। कासयासी करावें?**
**प्रसन्न हवा, पाणी ऋतु। हाच विवाहाचा मुहूर्त।**
**बाकीचे झंझट फालतु। समजतो आम्ही**
**खर्च नको भव्य मंडपाचा। देखावा असावा निसर्गाचा।**
**अथवा सभामंडप मंदिराचा। योजनाचा या कार्यासि।।**

(ग्रामगीता अध्याय 21 वा, ओवी 87, 89)

समाज सुंदर, तणावमुक्त करावयाचा असेल तर विवाहादी संस्कार परस्पर सन्मानाने, साधेपणाने होणे अत्यावश्यक आहे. शेवटी म्हणावेसे वाटते,

**आरमानो का मोल लगाना बंद करो।**
**दहेज के लिए लडका–लडकी बेचना बंद करो।**

## निष्कर्ष

1. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे आदर्श विवाह व हुंडाबंदीबाबतचे विचार आज ही अत्यंत महत्त्वाचे आहेत.
2. विवाहसंस्था ही अत्यंत महत्त्वपूर्ण संस्था असून ती मधील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा सोडून द्याव्यात.
3. हुंडा या कुप्रथेमुळे स्त्रियांचे शोषण व अत्याचार होत आलेला आहे. तेव्हा ही प्रथा प्रत्येकाने सोडून द्यावी.
4. लग्नाचा बाजार करू नये. थाटमाट टाळून ते करावेत. त्यासाठी कर्जबाजारी होऊ नये व कुणास कर्जबाजारी करू नये.
5. लग्न करताना मुहूर्त, ग्रह, तारे यावर विसंबून न राहता आपापल्या सोईनुसार लग्नविधी करावा.

## संदर्भग्रंथ


1. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित ग्रामगीता
2. डॉ. सतीश तराळ– संपादक, श्री गुरूदेव मराठी–हिंदी मासिक पत्रिका वर्ष 71, अंक 2रा, मे 2014
3. प्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत तुळणकर – संपादक, वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारदर्शन, आर. बी. प्रकाशन, नागपूर – 9
4. ज्ञानेश्वरदादा रक्षक – संपादक, 'जनक्रांती' (स्मरणिका) 11वे राष्ट्रसंत तुकडोजी विचार साहित्य संमेलन, वर्धा.
5. Google search हुंडाबंदी


❖❖❖

# महेश केळुसकर यांची अखंड निद्रानाशाची कविता

डॉ. मधु सुरेश सावंत
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
पीपल्स कॉलेज, नांदेड
भ्रमणध्वनी ८३९००९००४५

'काळीज चिरत जावं शब्दांच्या कर्वतीनं मनापासून अशी कविता तरी कुठे आहे आता?' असा प्रश्न कवी महेश केळुसकर यांनी उपस्थित केला असला, तरी त्यांची 'निद्रानाश'मधील कविता नक्कीच काळीज चिरत जाणारी आहे.

'मोर', 'पहारा', 'झिनझिनाट', 'मस्करिका', 'कवडसे', 'दूर डोंगरात लागतो दिवा' नंतरचा महेश केळुसकर यांचा 'निद्रानाश' हा सातवा कवितासंग्रह मौज प्रकाशनातर्फे अलीकडेच प्रकाशित झाला आहे.

समकाळाची सगळी तल्खली ह्या कवितेत उतरली आहे. अस्तित्वप्रश्नांचा पंखा कवीच्या डोक्यावर गरगरतो आहे. 'आपले जगाशी का जुळत नाही? लोक भ्रष्ट होऊन झोपतात कसे सुखाने? मला आता कविताच सुचणार नाही, असे तर होणार नाही ना?' यांसारख्या असंख्य प्रश्नांनी कवीचा अखंड निद्रानाश झालेला आहे.

सामान्यत: माणूस उद्याचा दिवस चांगला येईल, या वेड्या आशेवर आजचे जगणे सुसह्य करत असतो, पण कवीला तसे वाटत नाही. 'पुढे पुढे दिवस आणखी कठीण येत जातील!' अशी भीती कवीला वाटते. 'लेखक–लेखिका ठेवू लागतील वाङ्मयाशी वाङ्मयबाह्य संबंध' (निद्रानाश पृ. ६) असे भाकीत कवीने वर्तविले आहे. समकालीन परिस्थिती पाहिली असता त्याची सुरुवात झाली आहे, असे दिसते.

'राजकारण पडलेलं असेल
एड्सचा पेशंट होऊन
लोकशाहीच्या जनरल वार्डात.
मद्यालयांची देवालयं,
न्यायालयांची प्रतीक्षालयं होतील.
विज्ञानाला प्रायोजक मिळवावे लागतील अज्ञानाचे,
मरणाऱ्याला 'सुटलात!' म्हणून जगणारे शुभेच्छा देतील.'

यांसारख्या ओळी वाचकांच्या अंगावर येतात.

'हे आमचं व्याकरण, ती तुमची भाषा' अशाप्रकारे समाजजीवनाचे दुभंगलेपण दर्शविल्यावर 'काहीच उरत नाही आशा' असा निराशेचा सूरही ही कविता आळविते.

पक्षापक्षांच्या नावाखाली, धर्माधर्माच्या नवाखाली आज माणूस विभागला गेला आहे. प्रत्येकाच्या मनात दुसऱ्याविषयी संशय आहे. सगळीकडे जहरी संवादफेक सुरू आहे, अशा परिस्थितीवर भाष्य करताना कवी लिहितो,

'का दुभंगली जातात मनं?
का पेटवली जातात रणं?
आपलेच लोक आपल्याच लोकांना फोडून
घडवून आणतात दंगल,
माणुसकी होते हिंस्र जंगल!' (निद्रानाश पृ. ८)

या कवितेवर अधिक भाष्य करण्याची गरज नाही.

समकालीन जगण्याला आलेले बाजारू स्वरूप आणि त्यातील कोलाहल कवीने मोठ्या बारकाईने टिपला आहे.

वाहिन्यांच्या माध्यमांतून हिंस्रता घराघरात रोज ओतली जात आहे. परिणामी बालक–बालिका भातुकलीतही दंगलीचाच खेळ खेळताहेत. भावलीला भोसकतात. तिचा गळा दाबतात. डोळ्यांत पिना खुपसतात. त्यांना रक्तपाताची रंगपंचमी आवडू लागली आहे. कवितागत चिमुरडे म्हणताहेत,

'मग दंगल दंगल खेळायचं ?
खेळूया ना खेळूया.
सगळं आपण जाळायचं ?

जाळू या ना जाळूया !' (पृ. १०)

भावी पिढीला आपण कोणता वारसा संक्रमित करतो आहोत, याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. कवीला कवितेच्या रूपाने उपहास–उपरोधाचे साधन गवसले आहे. अशा स्फोटक परिस्थितीतील अलिप्तवृत्ती अधोरेखित करताना कवी सहजपणे लिहून जातो.

'डोळ्यांदेखत गाडले जाताना इमान...
दाढीचे सामान शोधत राहिलो.' (पृ. १०)

'मला काय त्याचे!' असे म्हणत आज माणूस निर्ढावला आहे. या निर्ढावलेपणावर कवीने शब्दांचे आसूड ओढले आहेत. 'कालपर्यंत सर्वकाही ठीक होते. आज असे कसे झाले? बघताबघता असे कसे झाले?' हा प्रश्न कवीला अस्वस्थ करतो आहे. आज सर्वत्र मरणगंधाची फुले फुलली आहेत. अशा परिस्थितीतून सावरायला प्रेषित किंवा खुद्द देवही येणार नाही, याची कवीला जाणीव आहे.

'हे एक कवितेचे शेवटचे पाखरू फडफडते आहे माझ्या हिंस्र मुठीत!' अशा अगतिक शब्दांत कवीने 'असे कसे झाले' (पृ. १२) या कवितेचा समारोप केला आहे.

'आता एवढी वर्ष अशुद्धीत। आयुष्य वाया गेल्यावर। पुन्हा शुद्धीत यायला। आपण इतके बेशुद्ध का आहोत।' (पृ. १३) ह्या ओळींतून समकालीन बेसुमार जगण्यातील निगरगट्टपणा अभिव्यक्त झाला आहे.

वर्तमानात सगळे गंडखोर, थंडखोर, षंढखोर एक झाले आहेत. अशा परिस्थितीत संवेदनशील माणसाला तिरंगी झेंड्यासारखं एकटं एकटं वाटत असल्यास नवल नाही. परिणामी 'नुसताच तडफडू लागलो सुजलाम् सुफलाम् वाळवंटात' अशा वक्रोक्तीपूर्ण शब्दांत कडवट भाष्य केले आहे. या ओळीत राष्ट्रगीताचा ओझरता संदर्भ डोकावून जातो. ज्या भूमीचा उल्लेख 'सुजलाम् सुफलाम्' असा गौरवपूर्वक केला जातो, तिथे प्रत्यक्षात रखरखीत वाळवंट आहे, हे कडवट सत्य कवीने मोठ्या धीटपणे मांडले आहे.

'देश रिटायर झाल्यावर' ह्या कवितेत कवीने 'प्रिय्य माझा देश जाईल अखंड कोमात आणि पुन्हा एकदा देशभक्ती उसळून येईल जोमात!' अशा शब्दांत भविष्याचे नेमके सूचन केले आहे.

पिढ्यांमागून पिढ्या वांझ निपजत असतील, तर यापेक्षा वेगळी अपेक्षा कशी करता येईल? माधुर्य फक्त भाषणांत उरले आहे. प्रत्यक्षात बहुजनांचे सरण पेटले आहे. त्यावर भाष्य करताना कवीने मनाच्या श्लोकाचा आधार घेतला आहे.

'जयजयजय हे जे भाग्य भंगून गेले। सकळ विधातेही भोगी रंगून गेले।
भळभळ जखमा या मायभूच्या ललाटी। भूक तहानलेले लोक कोट्यानुकोटी.'

विधातेच भोगात रंगून गेल्यावर मायभूमीच्या जखमा वाहणार नाहीत, तर आणखी काय होईल ?
रे. ना.वा. टिळक यांच्या 'केवढे हे क्रौर्य' या कवितेच्या धर्तीवर महेश केळुसकरांनी भारतीय लोकशाहीचे दैन्य उजागर केले आहे.

'मातीत ते पसरले हौतात्म्य रम्य। नाही कुणास आता इतिहास गम्य।
घटना तशीच उघडी जय संसदंगा। निष्प्राण देश पडला... प्रिय हा तिरंगा।'

ना.वा. टिळकांच्या कवितेत जखमी पक्षिणीचे अतिरम्य पंख मातीत पसरले होते. इथे देशासाठी केलेले हौतात्म्य मातीत मिसळले आहे. देशासाठी रक्त सांडणाऱ्यांच्या आठवणी आता पुसट झाल्या आहेत. टिळकांच्या कवितेत आक्रोषी चिमणीची चोच उघडी पडली होती, इथे राज्यघटना उघडी पडली आहे. टिळकांच्या कवितेत चिमणीचा देह निष्प्राण पडला होता, इथे अख्खा देशच निष्प्राण पडला आहे. संसदेत रोज जो गोंधळ चालतो, त्याला पाहून कवीने 'संसदंगा' हा फार छान आणि अन्वर्थक असा सामासिक शब्द घडविला आहे. महेश केळुसकरांचे भाषाप्रभुत्व इथे अधोरेखित होते.

'कवी आणि जादूची कांडी' या कवितेत कवीने देशात जे चांगले घडावे असे वाटते, त्यांची मोठी जंत्रीच दिली आहे. कवीच्या हातात जादूची कांडी आली तरच हे शक्य होईल, याची उदात्त जाणीव अस्वस्थ करून जाते. 'प्रार्थना' ह्या कवितेत कवी म्हणतो, 'झुरळ जसं पाठीवर पडल्यावर हातपाय झाडत राहतं, जिवाच्या आकांतानं, मनाला पाडून घेतलंय मी पाठीवर तसंच' (पृ. २४) या ओळीतून कवीची सगळी अगतिकता, असमर्थता आणि हतबलता व्यक्त झाली आहे.

यांत्रिकीकरणाच्या महानगरी जीवनात रोज किड्यामुंग्यांसारखी माणसे मरून पडतात. काही घाताने काही अपघाताने. अशा माणसांची अवस्था 'चिमणी मेली इवलीशी' अशीच झाली आहे. महानगरांचं हे लोण आता गावशिवारापर्यंत पोहचलं आहे. हे पाहून कवी कमालीचा व्यथित होतो.

'हा लेझीम खेळत बाहेर येतोय बारमधून', 'माझं आवार माझं शिवार माळ्यावर पडलय रेडीओचं', 'सुनेनं कच्चीच भाकरी भाजली आहे. कारण तिला भीती आहे 'सास भी कभी बहू थी' या मालिकेचा २०६ वा भाग चुकेल याची.' आता गावाची प्रगतीच मोजायची असेल, तर व्हिडीओ पार्लर्स, बार, पुढारी, चायनीज गाड्या, रिक्षा यांच्या संख्येत मोजावी लागेल. या फसव्या प्रगतीच्या रेट्यात एकतर भाकरी कच्ची राहील किंवा करपेल तरी!

'कोऱ्या करकरीत कर्मठ उन्हात सत्य चालत असते तळव्यांना सोलून, अनवाणी सूर्य अधिकच हिंस्र होत चालला आहे' अशा परिस्थितीत,

'नाही सवड सुखाला दुखाशी बोलाया
नाही आवड दुखास आनंद झेलाया'
'आता रूजली मुळे शहरी तुझ्यातही
आणि बदल झाला कळतो माझ्यातही'

परिवर्तनाच्या अपरिहार्य रेट्यात गाव आणि शहराच्या सीमा मिटून गेल्याचे हे साक्षात चिन्ह आहे. 'ठेवू जपून आपण राख गणगोताची' हा कोरडा दिलासा आहे.

ॲग्रो ॲडव्हांटेजच्या नावाखाली 'पैसा अडवा पैसा जिरवा' हे शासकीय धोरण आहे. 'तुम्ही शेतकऱ्याची अवलाद आहात, हे सिद्ध करायचे असेल, तर मोफत विजेचे शॉक घेऊन आत्महत्या करण्याशिवाय कास्तकरांना पर्याय नाही. 'उडे धूळ, रंगांध बेभान वारा। फुफाटसावली आग गावाकडे' (पृ. ४४) ह्या ओळीही यासंदर्भात पुरेशा बोलक्या आहेत. 'बळीराजाच्या जीवनातून पावसाळे पांगले आहेत. त्यामुळे त्याच्या चितेवर आता दव शिंपडण्याशिवाय गत्यंतर नाही,' अशी सगळी गावशिवाराची शोकांतिका झाली आहे. ही शोकांतिका महेश केळुसकर यांनी अतिशय धीटपणे सत्याच्या डोळ्याला डोळा भिडवून शब्दांकित केली आहे.

कोणत्याही इझमच्या वादात न पडता ही कविता माणूस आणि मानवतेच्या बाजूने ठामपणे उभी असल्याचे जाणवते.

कवी महेश केळुसकर हे उजव्या विचारसरणीच्या विरोधात ठामपणे उभे आहेत, हे 'पुनर्जन्म' या कवितेत तीव्रतेने जाणवते. नथुराम गोडसे आणि गांधीहत्या ही ठसठसणारी अंतरीची सल उजागर करताना कवी लिहितो,

'आपण एवढं अस्वस्थ व्हायचं कारण नाही.
आपला गांधीवर आणि स्वतवर मात्र विश्वास हवा
पुनर्जन्मावर असो वा नसो!'

विद्यमान सांस्कृतिक दहशतवादाविरुद्ध कवीचा हा संयमित सूर मोठा आश्वासक आणि दिलासादायक आहे.

'जळते आहे ज्योत एकटी
वात एकटी तिच्याहुनी
कुणीच नाही आसपास
अन् उदास संध्याकाळ सुनी' (पृ. ४१)

हे एकटेपण ज्योतीचे किंवा वातीचे उरत नाही. समग्र मानवी जीवनातील संध्यासमयीचे हे औदासिन्य वाचकालाही व्याकूळ बनवून जाते.

शेवटचा माणूस सुखी व्हावा, असे शीतळ स्वप्न गांधीजींनी पाहिले होते. त्या शापित महात्म्याच्या हत्येनंतरची शोकांतिका कवीने फार नेमकेपणी पकडली आहे.

'तो मानव वंचित शेवटचा रे अजुनी। निवडुंगच आले स्वप्नभूमितुनी रूजुनी' (पृ. ४२)

हा मूठभर विकास आणि जगणे झाले भकास ही त्याचीच परिणती होय. म्हणून कवीने,

'प्राजक्ताच्या देहावरती रक्त कुणाचे,
रक्त शोषुनी उभे राहते तख्त कुणाचे ?'

असा रोकडा सवाल उपस्थित केला आहे.

'मित्रबित्र कोणी नसतात कुणाचे'

यासारख्या साध्या ओळींतून कवी जीवनातील कटुसत्य सांगून जातो.

'कोजागिरीचं दूध अजून नाचतं हसून चांदणं मात्र नासून' (पृ. ५०)

ह्या ओळींतून कवीने सामाजिक जीवनातील असंगती, विसंगती आणि विरोधाभास चपखलपणे टिपला आहे. वर्तमानातील विसंगत आणि मूल्यभ्रष्ट जगण्याचे अक्षरश पोस्टमार्टेम केले आहे.

'मुंबईच्या कविता' ह्या दीर्घकवितेत कवीने मोहमयी मायानगरी मुंबईची विविध रूपे चितारली आहेत. ही कविता म्हणजे स्वभावोक्ती अलंकाराचे उत्तम उदाहरण आहे.

'ती बसली त्यातली एक, एकाच कुल्ल्यावर जशी की मुंबईच जणू !
ती हसली त्यातली दुसरी, गोंदलेली दंडावर जशी की मुंबईच जणू !' (पृ. ६३)

'कुठे चाललेत रूटीनलेले सांगाडे हे' या ओळींत 'रूटीनलेले' हा कवीने घडविलेला वेगळा शब्द आहे. 'बसमधील कुठल्या बाकड्याखाली बॉंब ठेवलेली पिशवी असेल।' (पृ. ६७) असेही एक मुंबईचे भयकारी रुप कवीने अनुभवले आहे. भयकंपित करणाऱ्या कठोर वास्तवाची ही कविता आहे. या कवितेच्या शेवटी साक्षात गणपतीच मुंबईकरांना प्रार्थना करताहेत,

'देवा महाराजांनो,
काही चुकलं माकलं असेल, तर पोटात घाला. आम्हाला विसरलात तरी चालेल,
विसरू नका तुमच्या मुंबई आईला। पुढच्या वर्षी येतो लवकर
शक्यतो जगून वाचून राहा, तोवर या मुंबईत !'

इतकी मुंबई कवीच्या मनीमानसी रूजली आहे. महानगरी जीवनातील क्षणभंगूरता, स्फोटकता आणि अनिश्चितता कवीने शब्दांकित केली आहे.

धाडसी आजोबांचे स्मरण कवीसाठी मोठे प्रेरणादायी आहे. 'भाषा' या कवितेत आपण कवी आहोत, याचे कवीला फारसे अप्रूप वाटत नाही. त्यापेक्षा मशालीच्या उजेडात वाघाला पळवून लावणाऱ्या शूर आजोबांविषयी मात्र नितांत अभिमान वाटतो. कवी म्हणतो,

'कविता लिहिता येते, ही काही फार मोठी बाब नाही. मी विचार करीत राहतो
मला वाघाला धरून ठेवता येईल का रात्रभर?
मजजवळ नाही मळणी घालण्याची कला मशाल कशी पेटवावी, याचंही साधं ज्ञान नाही मला.'

'तुम्ही आंघोळ्यामागून आंघोळ्या करताय, याचा काही उपयोग नाही. कारण आत्म्यावर बुरशी आलीय', याची जाणीव कवी करून देतो आहे.

'माणसं मारणं फार सोपं आहे. भूक आणि तहान मारणं महाकठीण !' (पृ. ७४)

अशा ओळी कवितेला वैचारिक उंची प्रदान करतात. 'चापट' (पृ. ३४/३५) या कवितेत कवीने समजुतीपेक्षा हिंसेचाच वारसा आपण आपल्या नवीन पिढीकडे संक्रमित करत असल्याबद्दलची खंत व्यक्त केली आहे. वसंत सावंत आणि निसर्गकवी नलेश पाटील यांच्यावरील कविता म्हणजे महेश केळुसकरांनी कविकुळातील ह्या दोन आप्तांना केलेले काव्यमय अभिवादन आहे. 'निद्रानाश' या संग्रहातील कवितेत कवीने महानगरी आणि एकूण मानवी जगण्यातील रूपे आणि विरूपे अक्षरांच्या चिमटीत पकडली आहेत. 'दाढेखाली चिमूट ठेवून निमूट होऊन' यासारख्या प्रासयुक्त ओळी हे या कवितेचे एक भाषिक वैशिष्ट्य आहे. समकालीन जगण्याला थेटपणे भिडणारी, शोषणव्यवस्थेला आव्हान देणारी आणि दंभावर प्रहार करणारी ही विचारकविता वाचकाला आत्यंतिक अस्वस्थ करून सोडते.

❖❖❖

# स्त्रीची वास्तविकता

## (प्रतिमा इंगोले हयांच्या 'बाईची कहाणी' ह्या पुस्तकाची समीक्षा)

**डॉ. विजया राऊत**
(मराठी विभाग प्रमुख)
विमेन्स कॉलेज ऑफ ऑर्ट्स ॲन्ड कॉमर्स,
नंदनवन, नागपूर, भ्रमणध्वनी 9850053414

## प्रस्तावना

प्रतिमा इंगोले हे नाव आता मराठी साहित्याच्या क्षेत्रामध्ये सर्वदूर चांगलेच रुजलेले आहे. वऱ्हाडी बोली आणि प्रतिमा इंगोले असे एक समीकरणही झाले आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये. कारण सर्वप्रथम त्यांचे नाव झाले ते वऱ्हाडी कथाकथनकार म्हणून. प्रतिमा इंगोले एवढया गाजल्या की, त्यानंतर त्यांना परत मागे वळून पाहाण्याची आवश्यकताच पडली नाही.

कथा, कादंबरी, वैचारिक लेखन, कविता, बालवाङ्मय इत्यादी वैविध्यपूर्ण वाङ्मयप्रकार त्यांनी समर्थपणे हाताळलेले आहेत. स्त्री हा त्यांच्या विशेष अभ्यासाचा व उत्सुकतेचा विषय असल्याने त्यांच्या सर्वच लेखनात स्त्री केंद्रस्थानी आहे. स्त्री ही उपभोग्य वस्तू नसून ती पुरूषासारखीच एक स्वतंत्र व्यक्ती आहे आणि व्यक्ती म्हणून आपला पूर्ण विकास घडवून आणण्याचा हक्क स्त्रीलाही आहे. स्त्रीवादाची ही वैचारिक बैठक एकदा मान्य केल्यावर स्त्रीवर होणारे अन्याय, अत्याचार, स्त्रीची होणारी अवहेलना, गळचेपी, स्त्रीवर केले जाणारे बलात्कार, स्त्रीचे शोषण या समाजात अवतीभवती वित्यनेमाने घडणाऱ्या घटना संवेदनशील व्यक्तीच्या काळजीचे विषय होतात. प्रतिमा इंगोले यांच्या अनेक कवितेतून स्त्रीच्या घरातील आणि समाजातील सुरक्षिततेबद्‌दलची चिंता सहृदयपणे व्यक्त झालेली आहे.

ह्यांची 'बाईची कहाणी' या पुस्तकात पुरुषसत्ताक पद्धतीमध्ये स्त्रीला कसे दुय्यम स्थान प्राप्त होत गेलेले आहे. आदिम काळात स्त्री ही पुरुषासारखीच कार्य करणारी त्याच्या खांद्याला खांदा जोडून काम करणारी स्त्री कालांतराने पुरुषाची गुलाम व दासी झाली. ती एक उपभोगाची वस्तू झाली. फक्त तिच्या पोटी आलेल्या मातृत्वामुळे हे सर्व परिवर्तन तिला सहन करावे लागले. आणि चार भिंतीच्या आत स्वतःचे अस्तित्व लपवून ठेवावे लागले. सामाजिक संकेत आणि नीतिनियमांच्या चौकटीत स्त्रीला ठेवण्यात आले. सर्व भौतिक सुख–सोईंनी युक्त अशा या चौकटबद्ध सोनेरी पिंजऱ्यात व्यक्ती म्हणून स्वतःचे स्थान ती गमवून बसली. आणि मुक्ती व स्वच्छंदपणा तिच्या वाटेतून दूर दूर निघून गेला. अशीच बाईबद्दलच्या आंतरिक कळवळ्यातून ही 'बाईची कहाणी' लेखिकेने लिहिलेली आहे. आज बाई ही सुशिक्षित झाली नाहीतर आजही ती पुरुषाच्या बुद्धीनेच विचार करायला लागली असती. पुरुषसत्ताक व्यवस्थेत पुरुषाने जशी घडवली तशी ती घडली असती. पण शिक्षण मिळवूनही आज तिच्याकडे समाज उपभोगाची, त्यागाची साधन व्यवस्था म्हणूनच स्त्रीकडे पाहिले जाते. काम, मद, मत्सर, राग, लोभ अशा षड्‌विकारांनी युक्त अशी ही कठपुतली पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत भोगासाठी, त्यागासाठी, साधन म्हणून सोयीने वापरली जाणारी वस्तूच बनली. सर्व भौतिक सुख – सोईंनी युक्त अशा या चौकटबद्ध सोनेरी पिंजऱ्यात व्यक्ती म्हणून स्वतःच स्थान शोधता शोधता 'मुक्तीच्या वाटे' चा शोध घेणारी, ही बाईंची कहाणी प्रतिमा इंगोले हिने रेखाटलेली आहे. ही कहाणी वाचतांना जीवंतपणा दिसून येते.

कहाणीची सुरुवातच डॉ. प्रतिमा इंगोले ह्यांनी आटपाट ह्या शब्दापासून केलेली दिसते. हा शब्द जणू आपुलकीचा व मनाला आल्हाद देणारा असाच आहे. ''जंगलात एक जोडपं राहत होते.

**गुण्यागोविंदानं राहत होतं**
**शिकार करून आणत होतं**
**तो म्हणायचा, तू माझी देवी**

**ती म्हणायची, तू माझा देव**

एकमेकांना देव मानणारी, एकमेकांच्या सुखदुःखात एकमेकांची सेवा करणारे हे जोडपे दिवसेंदिवस फुलू लागले होते. दिवसामागून दिवस जात असताना एके दिवशी पुरुषाला प्रश्न पडला ''तिला हे काय झालं?''

**पळ गेले, घटिका गेल्या,**

**अन् नव्या पिढीचा जन्म झाला।**

एका गोजिरवाण्या बाळाला त्या स्त्रीने जन्म दिला. आपलेच रूप या बाळात दिसत आहे हे बघून हा पुरुष तिच्यापुढे नतमस्तक झाला. स्त्री ही आपल्या बाळाचे संगोपन करीत असताना त्याला मायेने वाढवू लागली. त्याचे इवलेसे रूप पाहताना ती हरवून जायची. दिवसामागून दिवस जात होते.

**इडा टळो! पिडा टळो!**

**माझं बाळ सुखात वाढो!**

बाळाविषयी तिला आपूलकी वाटू लागली. आपल्या जीवाचा जिवलग ह्याला जीवापाड जपून त्याला मायेची ऊब देऊ लागली. इकडे पती सुद्धा तिची इतकी काळजी घेऊ लागला की आपली ह्याला किती काळजी!

**किती कौतुक! किती माया!**

**या भावनेनं दबली होती.**

नवऱ्याच्या मनाप्रमाणे स्त्रीने वागणे सुरू केले. तिला आपला मुलगा अधिक प्रिय वाटू लागला. त्या बाळासाठी तिने स्वतःला चार भिंतीमध्ये बंदिस्त करून घेतले. बाळासारखं नवनवीन शोधायचं, नवीन घडवायचं यासाठी ती धडपड करू लागली. असे दिवसामागून दिवस गेले. आठवडे गेले, अनेक नक्षत्र गेले तसतसा पुरुषी अहंकारामध्ये बदल होऊ लागला. तोही बाहेर रमू लागला. नवे शोध होऊ लागला. त्या शोधामध्ये प्रावीण्य मिळवू लागला. त्याच्यामध्ये अधिकार मिळवू लागला. प्रत्येक मिळविलेल्या गोष्टीवर माझा अधिकार आहे, हक्क आहे ही जाणीव पुरुषामध्ये निर्माण झाली व माझी पत्नीसुद्धा माझीच आहे. त्यामुळे तिच्यावरसुद्धा तो हक्क गाजवू लागला.

**'स्त्रीलासुद्धा 'स्वतःचीच'**

**मानू लागला**

**त्यासाठी तिच्यावर**

**बंधनं लादू लागला**

**तिला स्वतःच्या मालकीची समजू लागला.'**

कालांतराने आता पुरुषी अहंकार अधिक वाढल्यामुळे तोच ती कशी दिसावी? कशी असावी? कशी रहावी? तिनं काय करावं? आणि काय करू नये? सगळेच तो ठरवू लागला. स्त्री ही सर्वस्वी त्याच्या बंधनात अडकली तिला स्वतःचे नवे काहीच करता येत नव्हते. संसाररूपी पिंजऱ्यात ती अडकून पडलेली होती. बाळाच्या नावाखाली ती घरात राहू लागली. चार भिंतीच्या आत तिचा जीव गुदमरू लागला. त्याचवेळी पुरुष हा तिकडे .........

**मात्र बाहेर रमू लागला**

**स्वतःचे पौरूष कसे असावे**

**हे स्वतःच ठरवू लागला**

**तिचे स्त्रीत्व कसे असावे**

**हेही स्वतःच ठरवू लागला**

**तिला पुरते लुटू लागला**

**बंदिस्त करू लागला**

पत्नीच्या संपूर्ण देह व मनावर तो स्वतःचीच हुकमत गाजवू लागला. स्वतःच्या मतलबी वारसा हक्कामुळे पत्नीला राबवू लागला. तिच्या संपूर्ण जीवनातच उंच उंच तटबंदी उभारून

पिंजऱ्यातील बंदिस्त पोपटाप्रमाणे तिची अवस्था होऊन बसली. पुरुषाने संस्कृतीच्या नावाखाली स्त्रीची संपूर्ण धूळधाणच केली. बाळासाठीच तुचे अस्तित्व आहे. ह्या शब्दानेच तिचा गौरव करून तिचे जीवन संपविले.

**ती मात्र ......................**

**तो आहे!**

**हेच विसरली ..................**

**बाळासाठी ती तिचे मीपणही विसरली.**

स्त्रीमधली वास्तविक सृजनशक्ती संपली, नवनवीन शोध लावण्याची जी सृजनता तिच्यात होती. ती संपली. तिचा गौरव होण्याऐवजी ती पुरुषाच्या पायाखालची धूळ झाली. ती पुरेपुर पौरुषत्वामध्ये जखडली गेली. प्राचीन काळापासून स्त्रीची अवहेलनाच सुरू झाली. वंशामागून वंशज गेले. जसे वाकाटक गले, यादव गेले, मोगल गेले. आता तर स्त्री ही पुरुषाची मालमत्ताच झालेली होती. स्त्री ही सौंदर्याची खाण आहे. ती विशिष्ट पुरुषाची मालमता आहे. त्यामुळे दुसऱ्याची नजर तिच्याकडे जाऊ नये. म्हणून तिला पडद्यामध्ये झाकण्यात आले आणि ती फक्त पुरुषाची उपभोगाची महत्त्वाची वस्तू झाली. वासनाहीनता स्त्रीच्या सौंदर्यामुळे पुरुषामध्ये निर्माण झाली. कालांतराने स्त्रीसुद्धा तशीच घडत गेली. पुरुषाच्या पुरुषीपणालाच तिने जवळ केले होते. स्वतःला त्याच्या आनंदातच आपला आनंद ती मानू लागली. तिची अवस्था कालांतराने कठपुतली प्रमाणे झाली. जसे

**सूड उगवायला तीच सापडायची**

**मत्सराचे साधन तीच असायची**

**मद फुलवायला तीच लागायची**

**व कामासाठी तर नेहमीच**

**बळी पडायची ..................**

स्त्रीला एकप्रकारे पुरुषी दासत्व प्राप्त झाले. तिला बंदी बनवल्या जाऊ लागले. तिची बोली लागली गेली, बोली जागली की ती पुरूषाच्या उपभोगाकरिता तयार व्हायची. जागोजागी तिचा अपमान होत होता. त्या अपमानात तिचे अश्रू डोळयातून निघाले तरी त्या अश्रूची कुणालाही पर्वा नव्हती. आपली गरज पूर्ण झाली की तिला कचऱ्यासारखे उकिरडयावर फेकल्या जाऊ लागले. तिची अवस्था एखादया गारोडीने बंदर नाचवावा अशी झालेली असते.

**ती घुमसत होती**

**आकाशात वेधू होऊ पहात होती**

**अपमानाने खदखदत होती**

**बलात्काराने जीव देत होती**

पण तिची काळजी समाजातील पुरुषप्रधान संस्कृतीला मुळीच नव्हती. या पुरुषाच्या गुलामीवृत्तीचा तिला कंटाळा आला. त्यासाठी त्याच्या बंधनातून सुटण्याचा प्रयत्न करीत असताना स्वतःच रक्तबंबाळ होत होती. मुक्तीसाठी घडपडत होती. आपला स्वतंत्रतेचा हक्क मागत होती, समाजात ताठ मानाने उभी राहण्याची शक्ती मागत होती पण तिचा हा हुंकार पुरुषप्रधान समाजाने कधीही ऐकला नाही. स्त्रीने शिक्षणाने कितीही समोर जाऊन उच्चांक गाठला तरीही तिच्या स्त्रीत्वामुळे तिला बंधनेच बंधने आली. एखादी स्त्री बंधने तोडून समाजात वावरू लागली की ती कुलटा आहे, अविवेकी आहे, व्यभिचारी आहे असे विशेषणे लावून तिचा गौरव केला जातो व समाजात राहणे तिला अशक्य केले जाते.

अशीच स्त्रीविषयीची जाणीव, स्त्रीविषयीचा कळवळा स्त्रीच्या जीवनातील कटुता तसेच पुरुषसत्ताक व्यवस्थेत पुरुषाने जशी घडवली तशी स्त्री घडण्याचे सामर्थ्य तिला मिळाले याचे जिवंतवर्णन डॉ. प्रतिमा इंगोले ह्यांनी 'बाईची कहाणी' यात मांडलेले दिसते.

❖❖❖

# बाबाराव मुसळे यांच्या कथेतील स्त्रीचित्रण

डॉ. शरद देवराव उमाटे
(सहायक प्राध्यापक)मराठी विभाग
कला व विज्ञान महाविद्यालय कामरगाव,
ता. कारंजा (लाड), जि.वाशीम
भ्रमणध्वनी ९८२२४७२२३७, इ मेल sharadumate74@gmail.com

भारतीय कुटुंबव्यवस्थेत अर्धा भाग स्त्रियांनी व्यापलेला आहे. स्त्री आणि पुरुष यांची संख्या समान असताना, पुरुषप्रधान असलेल्या भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले. त्यांना कुटुंबात, समाजात सन्मानाने वागवले जात नाही. स्त्री अबला किंवा दासी म्हणून तिच्यावर सतत होणारे अन्याय, अत्याचार, कुटुंबातील लोकांकडून होणारे शोषण, नवोदित स्त्रियांच्या वाट्याला आलेला सासरचा छळ, पैशाच्या लालसेमुळे उद्ध्वस्त होणारे स्त्रीजीवन हा धागा पकडून मुसळ्यांनी आपल्या कथेमध्ये व स्त्रीला केंद्रवर्ती मानून कथांची गुंफण केली आहे. स्त्रियांच्या भावविश्वाचे, बाह्य व अंतर्मनाचे सूक्ष्म आकलन करून त्यांच्यापुढे उभ्या ठाकलेल्या आव्हानांचे, कुटुंबजीवनात नवविवाहित स्त्रियांच्या घुसमटीचे व छळाचे, त्यासाठी कारणीभूत ठरणाऱ्या सासरच्या जाचाचे चित्रण त्यांची कथा करते. त्यांच्या बहुसंख्य कथा नायिकाप्रधान आहेत. त्यातून त्यांनी बदलत्या ग्रामजीवनाचा वेध घेताना, ग्रामीण स्त्रियांच्या विभिन्न पैलूंचे सूक्ष्म पदर उलगडलेले आहेत.

'मोहरलेला चंद्र' या कथासंग्रहातील 'ऊत' या कथेत विक्षिप्त व नेभळट नवरा नशिबी आल्यामुळे तिर्विनाच्या मनाच्या ससेहोलपट होते. तिचे लहान वयातच लग्न होते. वयात आल्यानंतरही तिची विधवा सासू मुलाला पत्नीच्या सहवासात येऊ देत नाही. त्यामुळे तिच्या मनाची तगमग वाढते. काही दिवसांनी तिला पाळी आल्यानंतर ती तांब्या उबडा ठेवते. मात्र सासूला तिच्या उतावीळपणाचा राग येतो. ती लोकांजवळ सूनेचीच बदनामी करते. त्यामुळे निर्विनाला वाटते की, “आपण लयच सेसावलो व्हतो, मनूनच असं झालं. आपण थोडा दम धरला असता तर बरे झाले असते.”[१] त्यानंतर लोकलज्जेमुळे तिला चार दिवस घराच्या बाहेर पडता येत नाही. एके दिवशी तिची गावातील चुलत मावशीसोबत भेट होऊन तिने समजूत काढल्यानंतर ती आपल्या मनावर ताबा मिळवते. तिर्विनाच्या मनाची तारुण्यसुलभ भावनेमुळे होणारी घुसमट, असह्य होणारा पतीचा दुरावा, सासूचा अडसर आणि जाच सहन करत आत्मसंयम मिळवते.

'घमड्या' या कथेची नायिका सरी मांगीन स्वाभिमानी असून, ती संकटांना न घाबरता शर्थीने लढा देते. पतीचे संघटनेवाल्यांशी झालेले भांडण, जातीतील लोकांनी टाकलेला बहिष्कार व नवऱ्याच्या त्यांच्या अपघातामध्ये पाठीशी खंबीरपणे उभी राहते. नवरा अंथरुणावर असल्यामुळे ती स्वतः गावकीची कामे करते. पतीचा अपघात झाल्यावर तिचे भाऊ भेटायला येत नाही. त्यानंतर ती आपल्या भावाला दारात पायही टाकू देत नाही. नवऱ्याचा मृत्यू झाल्यावरही ती हार मानत नाही. संघटनेवाले नवऱ्याचे प्रेत मातंगाच्या स्मशानभूमीत येऊ देत नाही. तेव्हा ती न घाबरता धैर्याने पुढे सरसावते. तिच्या या बाणेदार, संघर्षशील व्यक्तिमत्त्वाचे दर्शन आधुनिक काळातील दलित समाजातील स्त्रीच्या, लढावू वृत्तीची जाणीव करून देणारे ठरते.

'निंदण' मधील कौतिक शेतमजुरी करून जीवन जगते. ती नऊ महिन्याची गर्भवती असल्याने घरीच राहते. पण नवऱ्याची गावातील मावसबहीण जबरीने तिला शेतावर निदंण करण्यासाठी घेऊन जाते. तिला चिखलात निंदताना उठण्याबसण्याचा त्रास होतो. ती तशीच चिखलात बसते. लीलाचे लक्ष तिच्याकडे गेल्यावर निंदण बंद करून कौतिकला घेऊन घराकडे जायला निघते. चिखल, नदीचे पाणी, चालताना होत असलेला त्रास सहन करत सुखरूप गावात आल्यावर तिच्यावरचे संकट टळते.

'हार–जीत' या कथेतील सोमित्राचे मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाल्यामुळे तिच्यापेक्षा जास्त शिकलेला आणि नोकरीवाला नवरा हवा, अशी तिची अपेक्षा असते. परंतु ती पूर्ण होत नाही. शेवटी मनाच्या विरुद्ध निरक्षर व दुसरपण्या मामेभावासोबत लग्न करावे लागते. सुखी–संपन्न जीवन जगण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन असते. परंतु तेच शिक्षण सोमित्राच्या विवाहात अडचणी निर्माण करतात.

'चौघडा' या कथेतून पांडूच्या पत्नीच्या भांडकुदळ स्वभावाचे दर्शन घडते. तिचे नवऱ्यापेक्षा पैशावर अधिक प्रेम असते. पांडूला जेव्हा शेठजी चौघडा वाजवण्याची सुपारी देतो. तेव्हा ती पतीवर रागावते, शिव्या देते. चौघडा दुरुस्त करण्यासाठी पांडू तिचे घरात लपवून ठेवलेले पैसे घेऊन जातो. तेव्हा ती त्याच्या अंगावर धावून जाते.

'गुलाल' मधील नजमा ही मुस्लीम स्त्री लीलाचा जीव वाचवण्यासाठी धडपड करते. लीला नवऱ्यासोबत गणपती उत्सव पाहण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी गेल्यावर, नजमाकडे राहते. तेव्हा तिथे जातीय दंगल उसळल्यामुळे त्यांची जीव वाचवण्यासाठी धडपड सुरू होते. त्यावेळी नजमा लीलाला धीर देत सुरक्षित ठिकाणी मावशीच्या घरी नेते. ती मावशीला म्हणते की, "मौसी, देकना, मेरा कुचबी क्यों ना हो, मगर इसके बाल को धक्का ना पहुंचे!"[२] असे म्हणत नजमा स्वत:च्या प्राणापेक्षाही लीलाच्या जिवाची जपणूक करत धर्मातीत प्रेमाचे नाते जपते.

'अल्पभूधारक' या कथेत शेवंता आणि तिची मुलगी नंदा यांचे चित्रण येते. नंदाचा विवाह गरिबीच्या परिस्थितीमुळे दुसरपण्या माणसाशी होतो. सासरी गेल्यानंतर तिने माहेरावरून लोखंडी गाडी आणावी म्हणून तिचा सासरी शारीरिक व मानसिक छळ होतो. आणि शेवटी हुंड्यमुळे नंदाचा बळी जातो. 'शेवंता' ही आपल्या सासरी गेलेल्या एकुलत्या एक मुलीच्या काळजीने अस्वस्थ होते. मुलगी सासरी गेल्यानंतर निदान तिचा चेहरा तरी दिसावा म्हणून तिच्या गावाला राहायला जाते. परंतु सासरी मुलीचा लोखंडी गाडीसाठी छळ होत असल्यामुळे ती दु:खी होते. 'नाहाक मोठेपणात पडले तुम्ही वावराच्या अन् पोरीच्या जल्माचं वाटूळ करून घेयाले."[३] असे ती नवऱ्याला म्हणते. शेवटी मुलीच्या मृत्यूने व्यथीत होते.

'पांद' या कथेतील बायजा नवऱ्याच्या मृत्यूनंतर एकाकी पडते. घरातील व शेतातील सर्व कामे तिला करावी लागतात. वैधव्यानंतर शेतीवाडीचा हिस्सा सोडाच, पण दोन वेळचे जेवणही बरोबर मिळत नाही. शिवाय मुलगी वयात येण्यापूर्वीच तिच्या लग्नाची काळजी करते. कारण कामावरचा गडी वाघजीची तिच्याकडे वाईट नजर असते. तिच्या विवाहानंतर मुलीच्या सासरी हुंड्यासाठी होत असलेल्या छळाबद्दल बायजा अस्वस्थ होते. परंतु पंचफुला व वाघजीच्या भीतीमुळे तिला माहेरी आणू शकत नाही.

पंचफुला नवऱ्याच्या साधेपणाचा गैरफायदा घेऊन कामावरच्या गड्यासोबत व्यभिचार करते. तिचा दीर भिकाने तिला व्यभिचार करताना पाहिल्यावर, उलट ती त्याच्यावरच खोटा आळ घेते. बदनामीमुळे तो आत्महत्या करतो. त्यानंतरही ती व्यभिचार करतच राहते. तिच्या अशा वागण्यामुळे संपूर्ण कुटुंबाची हानी होते.

'झिंगू लुखू लुखू' या कथासंग्रहातील 'दावणीचा बैल' या कथेतील यशोदा ही पतीवर, मुलीवर व गोठ्यातील बैलांवर मनोभावे प्रेम करते. नवऱ्याच्या सुख:दुखात सहभागी होते. हंगामाच्या दिवसात पेढी भेटायची असल्याने आषाढ सणासाठी माहेरी आलेल्या मुलीच्या गळ्यतील एकदाणी गहाण ठेवून तात्पुरती नड भागवण्यास नवऱ्याला सांगते. परंतु सासरा लगेच सईला न्यायला आल्यावर ती आजारी असल्याचे कारण सांगते. पण नाईलाज झाल्यावर नवरा जेव्हा बार्शाला विकून एकदाणी सोडवून आणतो, तेव्हा दावणीचा बैलाला, बार्शाला विकू नये म्हणून नवऱ्याला अडवते. कारण हंगामाचे दिवस, कुणबीक कशी करणार? या जाणिवेने ती व्यथीत होते. बैल विकताना तिचा प्रतिकार दुबळा ठरतो. तेव्हा तिच्या डोळ्यंत अश्रू तरतळतात. ती बैलाच्या विरहाने हंबरडा फोडते.

'तंबाखू' या कथेतील जनाई तंबाखू खाण्याच्या निमित्ताने दुसऱ्याच्या घरी जाऊन, सासूला कानगोष्टी सांगून, नवोदित सुनांचा संसार उद्ध्वस्त करते. ती राधाबाईच्या घरी जाऊन तिच्या सूनेविषची भलते सलते बोलून भांडण लावण्याचे काम करते. राधाबाई मात्र शांतपणे तिचे म्हणणे ऐकून घेते. परंतु सुनेचा छळ करायचा विचारही तिच्या मनात येत नाही. शिवाय ती आपल्या सुनेला समजावताना "अशा टवळ्याह्यचं ऐकून चालतो मनलं त करता येते सुदा संसार."[४] असे सहानुभूतीपूर्वक बोलून, सुखी संसाराचा मूलमंत्र देते. आपले कुटुंब संघटित ठेवते. 'रूखवत' या कथेत विवाहप्रसंगी करवलीला हलके लुगडे नेसवल्यामुळे देवकीला सासरी सासूचा जाच सहन करावा लागतो. एवढेच नव्हे, तर देवकीला कायमचे माहेरी पाठवते. नवरा अधून–मधून तिला भेटायला माहेरी येतो. सासऱ्याला कॅन्सर झाल्यावर त्याच्या भेटीसाठी पती देवकीला सासरी नेतो. तेव्हा तिला तिथे दिवस जाऊन अपत्य होते. काही दिवसांनी सासऱ्याचे निधन झाल्यावर तिला काही दिवस कामधंदा करण्यासाठी नवरा सासरी नेतो. तेव्हाही दिवस जावून तिला मुलगा होतो. नवऱ्यापासून विभक्त झाल्यावरही मुले झाली त्यामुळे लोकांना काय वाटेल? याची भीती वाटते. त्यानंतर नवरा तिला कायमचे सासरी न्यायला येतो. तेव्हा ती सासूचे काळेपांढरे झाल्यावरच येईल', असे बोलते. त्यानंतर तिच्या मनात विचार येते की, "आपण आपलाच इचार केला, त्याच्या मनाचा कधी विचारच केला नाही आपण? किती आप्पलपोटे आपण? त्याच्या आपल्यावर जीव होता म्हणूनच तो आपल्याला भेटायला येतो ना? दोनदा आपल्याला दिवस गेले तरी त्यानं आपल्याविषयी भलतीसलती शंका घेतली नाही....त्यानं मनात आणलं असतं तर पटकन् दुसरी बायको केली असती. का केलं नाही तसं त्यानं? आपल्यावर जीव होता म्हणूनच ना! अन् आपण काय दिलं त्याला? नुसता मन:स्ताप!"[५] तिला उलटून

बोलण्याचा पश्चात्ताप होतो. त्यानंतर काही दिवसातच नवरा आईचा खून करतो. त्यामुळे तिचे मन बधीर होते. शेवटी तिच्याही पदरी काहीच पडत नाही. तिचे आयुष्य अधांतरी लटकत असते.

'बांगड्या' या कथेतील सखूचा लहान वयात विवाह होतो. नवराही वयाने लहान असल्यामुळे सासरची मंडळी तिला माहेरी राहायची परवानगी देते. परंतु दिवाळसण झाल्यावर सासरचे बोलावणे येते. तेव्हा तिची बोळवण करण्यासाठी आई–वडिलाकडे पैसे राहत नाही. कारण तिच्या माहेरची गरिबीची परिस्थिती आणि सासरही तसेच मिळते. सखू जेव्हा बांगड्या भरण्यासाठी कासाराकडे जाते, तेव्हा मैत्रिणीच्या अंगावरील दागिने पाहून दु:खी होते. सखूच्या बांगड्यासाठी तिची आई घरात थोडीच शिल्लक असलेली सर्व ज्वारी देण्याचे कबूल करते. तेव्हा 'ज्वारी संपल्यानंतर आपण काय खायचं?' या विचाराने तिच्या डोळ्यात अश्रू येतात. तिला हातातील बांगड्या कासाराला परत कराव्याशा वाटते.

सखूची आई पार्वती अपंग असल्याने कष्ट करून कुटुंबाला आधार देऊ शकत नाही. घरची गरिबीची परिस्थिती असल्याने मुलीच्या सुखासाठी ती धडपड करते. मुलीला लग्नात दागिने नसल्यामुळे ती रुसते. तेव्हा "सगळ्यात मोठा दागिना म्हणजे नवरा. त्यो चांगला असला त जलभर काहीच कमी पडणार नाही. मंग घरात संध्याकाळची सोय का नसेना."[६] असे बोलून तिची समजूत काढते. विवाहित मुलीची बोळवण करण्यासाठी पैसे नसल्याने निदान बांगड्य भराव्या म्हणून धडपड करते. पैशाअभावी घरात दोन दिवसापुरतीच उरलेली ज्वारी देते.

'कॅन्सर' या कथेत विधवा आंजुबयच्या मनाचे चित्रण येते. तिच्या मुलीचा सासरी पैशासाठी छळ होतो. त्यामुळे ती दु:खी होते. तिचा जावई बायकोला कॅन्सर झाल्याचे सांगून उपचारासाठी सहा हजार रुपयाची मागणी करतो. तेव्हा मुलीच्या उपचारासाठी स्वत:च्या नावावरचे शेत गहाण ठेवून आजुंबय पैसे देते. पण जेव्हा तिला जावयाने फसवणूक केल्याचे कळते, तेव्हा ती दु:खी होते. क्षणभर तिला वाटते की, मुलीला कॅन्सर झाला असता तर पैसे कामात आले असते. विरोध केला असता तरी, मुलाला सांगता आले असते. परंतु जावयाने केलेल्या फसवणुकीमुळे मुलीला कॅन्सर झाला नाही, याचेच तिला दु:ख होते.

'खेळवण' कथेमधील विधवेचे जीवन जगणारी गजराबाई सुनेचा छळ करते. अतिरेकी पुत्रप्रेमामुळे मुलांच्या दोषावर सतत पांघरून घालून कुटुंबाच्या नाशासाठी स्वत:च कारणीभूत ठरते. जेव्हा ती मुलाला समजावण्याचा प्रयत्न करते, तेव्हा वेळ निघून गेलेली असते. प्रारंभी मुलगा चोरी करतो, यावर तिचा विश्वासच बसत नाही आणि जेलमध्ये गेल्यावरही तो निर्दोष आहे, असेच तिला वाटते. गजराबाईच्या बोलण्यात आणि वागण्यात कमालीचे अंतर दिसते. बाहेर सूनेवर खूप माया करतो असे दाखवते, आणि घरात मात्र तिला छळते. यावरून तिच्या निर्दयी मानसिकतेचे दर्शन घडते.

'पखाल' मधील गिरजा कोळी नवऱ्याच्या विरोधात जाऊन नळयोजनेसाठी वर्गणी देते आणि साहेबाला व सरपंचाला भेटून मुलाला नळाचे पाणी सोडण्याच्या कामावर ठेवून घेते. तिचे पाण्याच्या कारणावरून नवऱ्यासोबत भांडण, मारामारी होते. परंतु ती दणकट असल्याने नवऱ्याबरोबर वाद करण्यात कमी पडत नाही. गिरजा बदलत्या काळाला आधुनिकीकरणाला सामोरी जाऊन स्वत:च्या विचारात बदल घडवून आणते.

'पुतळ्या' या कथेत जानकीच्या स्वभावाचे दर्शन घडते. सासूचा मृत्यूनंतर तिच्या गळ्यातील सोन्याच्या पुतळ्यांची माळ दिसत नाही, तेव्हा भाऊबंदकीत कलह माजतो. जानकी जेव्हा सासूसाठी लुगडे आणते, तेव्हा त्यातून पुतळ्याची माळ पडते. तेव्हा नातलगांसमोर झालेल्या बदनामीने ती दु:खी होते. ती नवऱ्याला चोरी केली नसल्याचे सांगते. तिच्या बोलण्यावर नवरा विश्वास ठवतो. कारण ती माळ त्याने स्वत:च लपून ठेवलेली असते. त्याबद्दलचे खरे कारण सांगितल्यावर आपल्या माळकरी, सज्जन पतीची बदनामी होऊ नये म्हणून स्वत:च चोरी केल्याचे कबूल करते.

'आकडा' या कथेतील बायजा सुतारीन एक हाताने अपंग आहे. तिचा नवरा केरबा व्यसनी व बायकोच्या जिवावर जगणारा. त्याला रगतापिती झाल्याने विळे लावण्याची चाकी गहाण ठेवून कायमचा घर सोडून निघून जातो. तेव्हा ती मात्र चाकी सोडवून त्याचे पैसे हप्त्याने देते. तिला बाहेरगावी, बाजारात विळे लावण्यासाठी जावे लागते. पैशाअभावी बाजारात लहानग्या मुलाला खाऊही घेऊन देऊ शकत नाही. तर नवऱ्याचा शोध कसा घेणार? आठवडाभर कसे जगणार? या चिंतेत ती हरवून जाते .अशातच पतीचा मित्र बाजारात भेटून तो बायजाला गंमतीने 'मटक्याचा आकडा घेणार का?' असे विचारतो, तेव्हा ती जवळ असलेले पन्नास पैशाचे नाणे देऊन जबरीने त्याला आकड्याची चिठ्ठी काढायला लावते. कारण त्यातून येणाऱ्या पैशातून पतीचा शोध घेण्याचा निश्चय करते. याबद्दल डॉ. वर्षा चिखले यांचे मत महत्त्वाचे वाटते, "ग्रामीण भागातील ही स्त्री नवऱ्याच्या आधाराने हिंमतीने जगते पण त्याचे अस्तित्व नसले की, तिला संसारात रस वाटत नाही. ही तिची मन:स्थिती मुसळे गांभीर्याने रेखाटतात."[७]

'बनाव' मध्ये मजूरवर्गातील सीताच्या दु:खी जीवनाचे चित्रण येते. नवऱ्याला दारूचे व्यसन असल्यामुळे तिची व मुलाबाळांची आबाळ होते. नवरा मजुरीच्या पैशासाठी छळतो. शिवाय एक दिवस तो दारूच्या दुकानदाराकडे तिला रात्रभर ठेवून दारू मागतो. सीतेला हा अपमान सहन होत नाही. त्यानंतर ती गावातील पाटलीनच्या मदतीने स्वत:च दारू प्याल्याचा बनाव करते. नवरा आपली लोकांसमोर इज्जत गेली म्हणून हादरतो. आणि यापुढे दारून न पिण्याची शपथ घेतो. पाटलीनचा गावात दरारा असल्याने ती सीतेची पतीच्या त्रासातून कायमची मुक्तता करते.

'झिंगू लुखू लुखू' या कथेत नवविवाहित मीराचा सासरी हुंड्यासाठी छळ सुरू होतो. तिच्या वडिलाने हॉटेल टाकण्यासाठी पाचशे रुपये न दिल्याने सासू व नवरा तिला छळतात. बाहेर तिच्या चारित्र्याची बदनामी आणि घरात खाण्यापिण्याचा त्रास तिला सहन करावा लागतो. माहेरच्या गरिबीमुळे ती मूकपणे दिवस काढते.

'नगरभोजन' या कथासंग्रहातील 'कारभारी' या कथेतील नर्बदी घरकामे करून शेतात राबते. परंतु सासऱ्याच्या मृत्यूनंतर मोठा दीर कारभारी होतो. त्यामुळे तो व त्याची पत्नी कोणतेही काम करत नाही. सर्व कामे नर्बदी व तिच्या नवऱ्याला करावी लागतात. शिवाय त्यांच्याशी व त्यांच्या नातेवाईकांशी केलेली भेदभावपूर्ण वागणूक तिला सहन न झाल्याने बंड करते. जावेने तिला उद्धटपणे बोलल्यावर हंगामाच्या दिवसात शेतात न जाण्याचा निर्णय घेते. तिच्या कणखर स्वभावामुळे शेवटी दीर माफी मागून पत्नीला घेऊन शेतात कामाला जातो.

'इहीर' या कथेत सोमीच्या दु:खी जीवनाचे चित्रण येते. तिचा भाऊ आणि वहिनी दुष्काळी परिस्थितीमुळे कामाच्या शोधात मुंबईला जातात. त्यामुळे ती आणि तिचा म्हातारा बाप दोघेच गावातील घरात असतात. गावात पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने तहानेने व्याकूळ झालेल्या बापासाठी पाण्याच्या शोधात रानोमाळ फिरते, परंतु पाणी मिळत नाही. प्रल्हादच्या शेतात पाणी असते, पण त्याला पाण्यासाठी अंगाशी चाळे करू द्यायला ती तयार नसते. परंतु घरी तहानेने कासावीस झालेला बाप विहिरीत जीव देण्याचे बोलतो. तेव्हा मात्र तिला स्वत:च्या चारित्र्यापेक्षा बापाच्या जिवासाठी प्रल्हादच्या घराकडे जायला निघते. ती पराभूत होते.

'जाळं' या कथेत पाटलीनच्या स्वभावाचे दर्शन घडते. संतोबाच्या सूनेचा विहिरीत पडून मृत्यू झाल्यावर ती नवऱ्याच्या म्हणण्यानुसार सासऱ्याने तिच्यासोबत जबरदस्तीने तोंड काळे केले, असे लोकांना खोटे सांगते. मात्र त्यामागे नवऱ्याचा कावा ओळखल्यावर त्याला उपहासाने म्हणते की, "किती हलकटपणा करायले तुम्ही ते कळते तुम्हाले? त्याच्या नासक्या चार एकराच्या तुकड्यसाठी त्याले तुम्ही हद्दीतून उठवता? कुठी फेडसाल हे पाप आपण त करतात, पण मलेबी कराय लावता. आदुगरच तुमच्या ह्ये कावा मले कळलं असता त जीव गेला तरी त्या दिवशी मी खोटं बोलली नसती...."[८] शेवटी तिला खोटे बोलण्याचा पश्चाताप होऊन संतोबाबद्दल दयेची भावना तिच्या मनात जागृत होते.

'कठाळ्या' या कथेतील सरस्वती ही देवभोळी, अंधश्रद्धाळू आहे. कारण मुलगा आजारी पडल्यावर वारकीणीला बोलावून ती शकून पाहते. नवऱ्याने महादेवाचा कठाळ्या मारला म्हणून त्याची वाकडी नजर आपल्या पोरावर पडली. तेव्हा त्याच्या नावाने दुसरा कठाळ्या सोडण्याचा आग्रह नवऱ्याला करते. तो प्रतिसाद देत नाही, तेव्हा ती स्वत:च दुसरा कठाळ्या घेऊन देवाला सोडते. मुलगा रात्रभर आजाराने फणफणत असताना नवऱ्याचा राग आल्यामुळे त्याच्याशी बोलत नाही. सकाळी नवऱ्याने मुलाला तालुक्याला उपचारासाठी दवाखान्यात नेल्यावरही ती त्याच्यासोबत जात नाही. शेवटी मुलाच्या मृत्यूनंतर मात्र रडत बसते.

'नगरभोजन' या कथेत सखूचे आणि तिची वहिनी पऱ्यागीचे चित्रण येते. सखूच्या स्वभावातील सरळपणा, वेडी माया, तसेच भावाचा संसार, सुखी व्हावा असे तिला मनोमन वाटते. भावजने द्वेष करूनही, तिच्या अंत:करणात भाऊ, वहिनी व भाच्याबद्दल जिव्हाळा आहे. तिला आलेल्या अकाली वैधव्यामुळे भावाच्या आश्रयाने ती माहेरी राहायला येते. मात्र पऱ्यागीच्या अंधश्रद्धाळू वृत्तीमुळे सखूला माहेरच्या जिवाभावाच्या लोकांपासून दूर राहावे लागते.

सारांश, बाबाराव मुसळ्यांनी विभिन्न पातळ्यंवर वावरणाऱ्या स्त्रियांचे चित्रण करतात. त्यांचे स्वभावदर्शन, घुसमट, सद्‌गुण, दुर्गुण व भावभावनांचे पदर अलवारपणे उलगडून दाखवले आहे. ह्या स्त्रिया समाजात आणि कुटुंबात विविध भूमिकांमध्ये वावरतात. शेजारीण, सून, पत्नी, आई, सासू, मुलगी, नणंद या विभिन्न नात्यांसोबतच दलित, सवर्ण, बलुतेदार, शेतकरी, शेतमजूर, विधवा अशा वेगवेगळ्य भूमिकेतून अभिव्यक्त होत असताना त्यांच्या स्वभावगुणांचे, संस्कार, श्रद्धा –अंधश्रद्धा, दिलदारपणा, मोठेपणा सुख–दु:ख, तसेच विविध घटना–प्रसंगांच्या व संवादांच्या माध्यमातून सूक्ष्म बारकाव्यांसोबत अंतर्बाह्य मनाचे सूक्ष्म दर्शन घडवतात.

## संदर्भ

१) मुसळे, बाबाराव, 'मोहरलेला चंद्र', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृती, १९९२ पृ. २५
२) तत्रैव, पृ. १३२
३) तत्रैव, पृ. १४६
४) मुसळे, बाबाराव, 'झिंगू लुखू लुखू', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृती, १९९५ पृ. १५
५) तत्रैव, पृ. ३०
६) तत्रैव, पृ. ३५
७) चिखले, वर्षा, 'वैदर्भीय ग्रामीण कथात्म साहित्य : रूप आणि स्वरूप', स्वरूप प्रकाशन , औरंगाबाद, प्र. आ. २०१३,पृ.१०२
८) मुसळे, बाबाराव, 'नगरभोजन', जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, प्रथमावृती, २००९ पृ. ६५

❖❖❖

# ‘कर्णपर्व’ कर्णाच्या जीवननाट्याचा शोध घेणारी कादंबरी

प्रा.डॉ. विनोद राठोड
बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड, जि.सांगली
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
भ्रमणध्वनी ९४२३२७२४०४

महाभारत हे भारतीय संस्कृतीचा अनमोल ठेवा असून भारतीय मनावर त्याचा विलक्षण प्रभाव आहे. महाभारताचा आवाका, त्याची विस्तृतता फार मोठी आहे. व्यासांनी रचलेल्या मूळ संहितेत मोठी भर पडत गेल्याने त्याचा आवाका विस्तृत झाला आहे. व्यासांनी सबंध युगाचे चित्र उभे केले आहे. त्यामुळे त्याला एखाद्या कादंबरी, नाटकामध्ये बंदिस्त करणे अशक्यप्राय आहे. महाभारतातील प्रमुख कथासूत्र जरी हस्तिनापूरच्या राजघराण्यातील संघर्षाचे असले तरी त्यामध्ये अनेक विषय व उपाख्याने आली आहेत. भगवद्‌गीतेसारखे तत्त्वज्ञान त्यात समाविष्ट झाल्याने त्याचा आवाका अधिक विस्तारला आहे.

खांडेकरांच्या ‘ययाती’ या पौराणिक कादंबरीला लाभलेल्या यशामुळे अनेक लेखक पौराणिक विषयांकडे वळले. पौराणिक विषयांमध्ये लेखकाला भरपूर मोकळीक असल्यामुळे लेखक या विषयांकडे अधिक आकर्षित होतांना दिसतात. ‘ययाती’मध्ये वर्तमान संदर्भाचा आभास निर्माण करण्यात आला असला तरी सर्वच पौराणिक कादंबऱ्यांमध्ये वर्तमान संदर्भ नसलेल्या आणि एका स्वतंत्र कालखंडात जाऊन गोष्ट सांगण्यात रमलेल्या आहेत. चरित्रनायकाचे उदात्तीकरण करणे, त्याची बाजू मांडणे अशा प्रवृत्ती त्यात आढळतात.

महाभारतात येणारे विषय विविध प्रकारचे आणि विपुल आहेत. या अनुषंगाने येणाऱ्या व्यक्तिरेखा आदर्श पण सामान्यत्त्वाचा स्पर्श झालेल्या आहेत. केवळ आदर्श अशा असामान्य व्यक्तिरेखा त्या नाहीत. मानवी सुष्ट—दुष्ट भावनांचे स्पंदन रेखाटणाऱ्या आहेत. यातील जवळपास सर्वच व्यक्तिरेखा कोणत्या ना कोणत्या कारणाने वैफल्यग्रस्त आहेत. या सर्वामध्ये अतिवैफल्यग्रस्त कुणी असेल तर तो कर्ण आहे. वेगवेगळ्या दृष्टिकोनातून लेखकांनी त्याच्या चरित्राकडे पाहिले. कुणाला तो दैवहत उत्तुंग पुरुष वाटला, कुणाला अहंकारी, स्वार्थी, दुष्ट वाटला. कुणाला तो, ज्याच्यावर सतत अन्याय झाला आहे, असा पददलितांचा प्रतिनिधी वाटला. तर कुणी मृत्युंजय महापुरुष म्हटले. याच कारणाने त्याच्या चरित्राकडे अनेक ललित लेखक आकर्षित झाले. त्यांनी त्याला कथा, कविता, कादंबरी, नाटकांमध्ये गुंफण्याचा प्रयत्न केला. मूळ संहितेतील कर्णाची व्यक्तिरेखा आपापल्या दृष्टिकोनातून साकारण्याचा प्रयत्न केला. डॉ. रवींद्र ठाकूर यांची ‘कर्णपर्व’ ही याच धर्तीवरची कादंबरी.

महाभारतातील कर्ण या व्यक्तिरेखेबद्दल लेखकांना सदैव आकर्षण वाटत आले आहे. कर्ण उदार आहे, शूर आहे, पराक्रमी आहे, पण आपण कोणत्या कुळातील आहोत, आपली परंपरा कोणती, अशा प्रश्नांनी तो अस्वस्थ आहे. आयुष्यभर तो ‘स्व’चा शोध घेतो. कर्णाचे आयुष्य रेखाटताना लेखकांसमोर हे संदर्भ असतात आणि त्या संदर्भाच्या आधारे एक सुसंगत अर्थ शोधण्याचा प्रयत्न लेखक करीत असतात. मराठी साहित्यात कर्णजीवनावर अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. मराठीतील पौराणिक कादंबऱ्यांमध्ये कर्णाची व्यक्तिरेखा साकारण्यासाठी ज्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या त्यामध्ये शिवाजी सावंत यांची ‘मृत्युंजय’, रणजित देसाई यांची ‘राधेय’, आनंद साधले यांची ‘महापुरुष’, गो.नि.दांडेकर यांची ‘कर्णायन’ या कादंबऱ्यांचा उल्लेख करावा लागेल. या कादंबऱ्या कर्णाच्या प्रेमात पडून सदर लेखकांनी लिहिल्याचे जाणवते. ठाकूरांनी तत्कालीन समाजवास्तवाच्या पार्श्वभूमीवर कर्णाच्या जीवननाट्याचा शोध घेण्याचा प्रयत्न ‘कर्णपर्व’ मधून केला आहे.

कर्णपर्व कादंबरीविषयीची भूमिका व्यक्त करताना ठाकूर लिहितात, ‘‘महाभारत कथेतील ज्या अनेक व्यक्तिरेखा भारतीय जनमानसात खोलवर रुतून बसल्या आहेत त्यामध्ये कर्ण ही एक प्रमुख व्यक्तिरेखा आहे. कर्णकथेला कवचकुंडलांची पुटं चढवण्यात आली असली तरी त्यापलीकडे उभा असलेला आणि तत्कालीन वर्णव्यवस्थेशी संघर्ष देत आपली योग्यता सिद्ध करणारा कर्ण सतत आपले लक्ष वेधून घेत राहतो. त्याच्या व्यक्तिरेखेला असलेले कारुण्याचे हेच गडदगहिरे परिमाण कलावंतांना आकर्षित करत असावे. योग्यता असूनही पावलोपावली अवमानित झालेला, डावलला गेलेला कर्ण हे तेजोभंगाचे जिवंत प्रतीक आहे. भोवतालच्या विषम सामाजिक वातावरणात कर्णाची वेदना आजही तेवढ्याच तिव्रपणे सामोरी येत राहते. आज आधुनिक काळात जगणाऱ्या माणसालाही कर्ण आपला जिवलग सखा वाटतो तो यामुळेच. एकंदरीत कर्णाची जीवनकथा ही एक भळभळती जखम असून ती कुठवर भळभळत राहणार आहे हाच प्रश्न आहे. पारंपारिक दृष्टिकोन निग्रहाने

अव्हेरून एका अभिनव भूमिकेतून कर्णकथेचा शोध घेण्याचा एक लक्षणीय प्रयत्न म्हणजे कर्णपर्व.''[१] या कादंबरीतील भीष्म, दुर्योधन, युधिष्ठिर या व्यक्तिरेखांपेक्षा कर्णाची व्यक्तिरेखा वेगळ्या धाटणीची आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. कर्णाची व्यक्तिरेखा मानवाच्या सुष्ट–दुष्ट भावांची सांगड घालणारी, पराकोटीचे दानशूरत्त्व, बाणेदारपणा, तत्त्वनिष्ठा यामुळे उदात्त आणि तेजस्वी झाली आहे. रहस्यमय जन्मापासून तो थेट मरणापर्यंत कर्ण इतरांपेक्षा वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण जाणवतो. व्यासांनी संविधानकाच्या दृष्टीने कर्णाची व्यक्तिरेखा गौणच ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र 'कर्णपर्व' या कादंबरीत पारंपारिक दृष्टिकोन झुगारून एका नव्या मानवी मूल्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न डॉ. रवींद्र ठाकूर यांनी केला आहे.

महाभारतातील पात्रांचा दैवीपणा नाकारून मानवीकरणाच्या पातळीवर या घटना प्रसंगांचा हा शोध आहे. या कादंबरीत कर्णजीवनातल्या काही महत्त्वाच्या घटना विस्ताराने साकारल्या आहेत. कादंबरीतून समोर आलेला कर्ण वाचकाला त्याच्याबद्दल सहानुभूती वाटावी असा आहे. बालपणापासूनच हीन जातीवरून कमी लेखल्याची शल्ये त्याच्या मनाला बोचत आहेत.

कर्णाचे बालपण चंपानगरीत गेले. तो तेथे सूतात वाढला, सूतांच्या संस्कारांनी मोठा झाला. त्यानंतर अध्ययनासाठी हस्तिनापुरास आला. द्रोणाचार्यांकडे अस्त्रविद्या शिकण्यासाठी राहिला. त्यावेळी त्याची दुर्योधनाशी मैत्री जडली. प्रेक्षणगृह प्रसंगाने ठाकूरांनी कादंबरीची सुरुवात केली आहे. शिक्षणक्रम संपताना घडलेला हा प्रेक्षणगृहप्रसंग म्हणजे कर्णाच्या जीवनातील एक महत्त्वाची घटना आहे. प्रेक्षणगृह प्रसंगी अर्जुनाच्या बरोबरीने कर्ण युद्धकौशल्य सादर करतो. दुर्योधन त्याचे स्वागत करून त्याला प्रोत्साहन देतो. मात्र कर्ण हा सारथीपुत्र आणि हीन कुळातला असल्याने त्याने अर्जुनाशी स्पर्धा करावी हे धर्मविरोधी मानले जाते. महाभारत काळात कानीन संतती म्हणजे विवाहपूर्व मुले स्वीकारण्याची प्रथा होती. मग कुंतीने कर्णाचा त्याग का केला तर आर्य जमातीतल्या लोकांनी कुंतीचे मूल स्वीकारले नसते. असा तर्क लावला जातो. मात्र याठिकाणी खरा संघर्ष हा धर्मसंस्कृतीचा आहे. कारण त्या काळात सूत राजे होते. सूतकन्या होत्या. नियोग, बहुपत्नीकत्त्व, प्रतिलोम विवाह किंवा मातृवंश या प्रथा आर्यांमध्ये पूर्वापार होत्या, तरी कर्णाचीच लवहेलना का करण्यात आली हा लेखकाचा मूलभूत प्रश्न आहे.

प्रेक्षणगृहप्रसंगाने कर्णाच्या जीवनला एक वेगळे वळण प्राप्त झाले. तो अर्जुनाच्या बरोबरीचा आहे हे सर्वासमक्ष सिद्ध झाले. क्षत्रियाचा दर्जाही त्याला मिळाला. पण त्याचबरोबर तो 'सूतपुत्र' आहे याचीही निर्भत्सना झाली. समाजात सूतांना उच्चवर्णीयांच्या बरोबरीचे स्थान नव्हते. त्यांची कर्तव्येही क्षत्रिय कुलातील लोकांपेक्षा वेगळी होती. यामुळे कर्णावर सतत होत जाणारा अन्याय कादंबरीचे मूलसूत्र आहे. महाभारतातील सर्वच पात्रे त्याला शेवटपर्यंत 'सूतपुत्र' म्हणूनच संबोधतात. सूतपुत्र म्हणूनच त्याला दुर्योधनाचा अंकित म्हणून राहावे लागले. त्याची योग्यता असतांनाही द्रौणाचार्यांनी त्याला सूतपुत्र म्हणून ब्रह्मास्त्र दिले नाही. सूत हे ब्राह्मण आणि क्षत्रियांपेक्षा कनिष्ठ मानले जात असल्याने कर्णाला समाजात प्रतिष्ठा मिळू शकली नाही.

'कर्णपर्व' कादंबरीतील तत्कालीन समाजात जातीव्यवस्था व वर्णव्यवस्था कशी अस्तित्त्वात होती हे कर्णजीवनाच्या संघर्षातून व्यक्त होत जाते. या वर्णव्यवस्थेची चर्चा ठाकूरांनी कादंबरीत पदोपदी केली आहे. या जातीयतेच्या निर्मितीबाबत अधिरथ कर्णाला सांगतो, 'पंचनद आणि गांधार देशाच्या पलिकडे असलेल्या प्रदेशातून गाईगुरांची खिल्लारे घेऊन प्रवास करत आलेले पूर्वज कित्येक वर्षे नांदत होते.' इथल्या लोकांनाही त्यांनी आपल्यात सामावून घेतले होते. तत्कालीन समाज व्यवस्था ही जातीव्यवस्थेत जन्माने जखडली गेली होती. त्यामुळेच सूतपुत्र म्हणून कर्णाच्या अंगी कर्तृत्त्व असूनही त्याला समाजात स्थान प्राप्त होत नाही. सूतपुत्र म्हणून त्याला शिक्षणापासून वंचित राहावे लागले. या जातीव्यवस्थेविरूद्ध शिक्षण घेऊन क्षत्रिय होण्यासाठी तो संघर्ष करतो. तरीही त्याच्या वाट्याला सूतहीनताच येते. तत्कालीन जातीसंस्था जातीव्यवस्थेखाली भरडली जात होती. उच्चनिच्च या भेदभावाने समाज पछाडलेला दिसून येत होता. कर्ण संघर्ष करतो पण त्याच्या जीवनाची शेवटी शोकांतिकाच होते.

कर्णाच्या जीवनात त्याने दुर्योधनाला दिलेल्या मैत्रीचे वचन फार महत्त्वाचे आहे. ते वचन मोडण्याचे अनेक प्रसंग कर्णावर आले. पण कर्णाने अखेरपर्यंत ते पाळले. दुर्योधनाच्या दृष्टीने या मैत्रीचा विचार करता ती निर्हेतुकच होती असे म्हणता येणार नाही. हस्तिनापूरच्या लोकांनाही दुर्योधनाच्या कृतीत त्याचा स्वार्थच जाणवत होता. पांडवांनाही असेच वाटले की, कर्णाला जवळ करून दुर्योधनाने स्वत:चे बळ वाढवून आपणासोबत पक्षबल केले. अर्जुनाने कर्णाचा अपमान केला तेव्हापासून कर्णाच्या मनात विषाची बीजे रोवली गेली होतीच. दुर्योधनाने त्यात खतपाणी घातले आणि कर्णावर उपकाराची चादर पांघरली. त्याला सूतपुत्र असूनही अंगदेशाचा राजा केला आणि आपला अंकित करून घेतला. कादंबरीतील कर्णाची मैत्री आणि कर्णाचे वचन यांचा विचार करतांना असे

जाणवते की, दिलेला शब्द पाळण्याची कर्णाची निष्ठा दुर्योधनाला माहित असावी, म्हणूनच त्याने कर्णाला अंकित करून घेतले असावे. कर्णाने मात्र आपले जीवन दुर्योधनाच्या मैत्रीसाठीच वाहून घेतले, असे कादंबरीतील अनेक प्रसंगावरून दिसते. कृष्णाने कर्णाला त्याच्या जन्मासंबंधीचे रहस्य सांगून विविध प्रलोभने दाखविली. पांडवाच्या पक्षात सहभागी होण्याचे आवाहन केले. दुर्योधनासारख्या दुष्ट व कपटी राजाचा मित्र बनल्याने सगळेच त्यालाही कपटी मानू लागले होते. असे असूनही दुर्योधनाचा विश्वासघात करण्याचा विचार त्याच्या मनातही कधी आला नाही. याला कारण दुर्योधनाला दिलेले मैत्रीचे वचन आहे.

कर्णाविषयी दुर्योधनाच्या मनात स्वार्थी हेतू होता, याचा कर्णाने कधी विचारही केला नाही. दुर्योधनाच्या स्वार्थाची जाणीव कर्णाला झालीही असती तरी कर्ण वेगळा वागला असता असे कादंबरीवरून वाटत नाही. दुर्योधनासाठी त्याने अर्जुनाशी निकराचे युद्ध केले आणि प्राणांची आहुती दिली. लेखकाने कर्णाची प्रतिमा साकारताना त्याचा हा उदात्तपणा समर्थपणे साकारला आहे. कर्णाची ही प्रतिमा साकारण्यासाठी ठाकूरांनी महाभारतातील मूळ प्रसंगात अनेक बदल केले आहेत. सर्वसामान्य माणसाला चमत्कारकथा भारावून टाकतात. हीच मानसिकता हेरून महाभारतात अनेक चमत्कारकथा सांगितल्या गेल्या. ठाकूरांनी या चमत्कार कथांना बगल देऊन कर्णाचे वास्तव चित्रण रेखाटले आहे. कर्णाला या कादंबरीत कवचकुंडले नाहीत. वर्णव्यवस्थेच्या संघर्षात कर्णाचा बळी जातो. स्वत: कर्ण म्हणतो, 'उगवत्या सूर्याच्या साक्षीनं घरी आलो म्हणून बाबा कधी सूर्यपुत्र म्हणतात तर कधी सुवर्णासारख्या वर्णाचा दिसतो म्हणून वसुषेण म्हणतात. इतर अवयवांच्या मानानं कान थोडे मोठे आहेत म्हणून कधी कधी कर्णही म्हणतात. म्हणतात, कर्णराज हेच नाव तुला शोभून दिसतं.' (पृ. १२)

दुर्योधनाला जरी त्याच्या क्षात्रतेजाविषयी अभिमान वाटला तरी तो सूतपुत्र नसावा, असे त्याने म्हटले असले तरी तत्कालीन समाजात सूतांना ब्राह्मण–क्षत्रियांचे सेवक असेच स्थान होते. म्हणूनच भीमाला कर्णाने राजा झालेले अत्यंत विपरीत वाटते. अश्वथामा, द्रोण, यांनाही कर्णासारख्या एका सूताजवळ क्षात्रतेज असू शकेल असे वाटत नाही. कारण तो जन्माने क्षत्रिय होता हे कोणालाच माहित नाही. दुर्योधनाने त्याला अंगराजपद दिले असले तरी इतर राजांनी त्याला एक सूतपुत्र म्हणूनच दर्जा दिला. आपला हा दर्जा ओळखून दुर्योधनाच्या कोणत्याही योजनांविषयी, कार्याविषयी आणि विचारांविषयी कर्णाने आपले मत व्यक्त केले नाही. प्रत्येक वेळी दुर्योधनाची बाजू उचलून धरावी हेच त्याने आपले अंतिम कर्तव्य मानले.

कुंतीची मुले ही महाभारतकारांनी दैवी चमत्कारांची देणगी दाखविली आहे. ठाकूरांच्या कादंबरीत दुर्योधन याबाबतीत कुंतीची मुलं आर्य नाहीत, कारण त्यांचा जन्म कोणापासून झाला हे फक्त त्यांच्या मातेलाच माहीत आहे, असा आरोप करतो. कर्णाच्या जन्माविषयीचे रहस्य जन्मभर गुप्तच राहिले आहे. वाचकांना कर्ण हा क्षत्रिय आहे हे माहित असले तरी, तो सूतपुत्रच म्हणून जगला आहे. कुंतीचा मोठा मुलगा म्हणून सिंहासनाचा तोच उत्तराधिकारी असला तरी तो कौरवही नाही, पांडवही नाही आणि क्षत्रिय असून क्षत्रियही नाही. त्यामुळे त्याच्या अंगी असलेल्या श्रेष्ठ गुणांचा त्याला उपयोगही होऊ शकला नाही. आयुष्यभर हीन कुलावरून अपमानीत होऊन जेव्हा त्याला आपले जन्मरहस्य कळते, तेव्हा त्याचा स्वीकारही करता येत नाही. हीच कर्णाची खरी शोकांतिका आहे. सामाजिक प्रतिष्ठेसाठी, समाजात आपले स्थान निर्माण करण्यासाठी कर्णाला जो संघर्ष करावा लागला त्याचे चित्रण ठाकूरांनी केले आहे.

कर्णाला कादंबरीतील संघर्षाच्या केंद्रस्थानी आणून त्याच्या चरित्राला साकारण्याचा प्रयत्न ठाकूरांनी केला आहे. कर्णाच्या मनोगतातून त्याच्या मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न ठाकूरांनी केला आहे. कर्ण पराक्रमी आहे, सर्वश्रेष्ठ धनुर्धर आहे, परंतु केवळ सूतकुळाचे दुर्दैव त्याला प्राप्त झाल्याने उपेक्षा, अपमान, हेटाळणी यांना आयुष्यभर तोंड द्यावे लागले. सामाजिक प्रतिष्ठेपासून त्याला वंचित राहावे लागले म्हणून त्याची उदात्तता कोठेही ढासळलेली नाही. या गुणांमुळेच ठाकूरांनी त्याच्या श्रेष्ठतेला उजाळा दिला. लेखकाने कर्णाला दुर्योधनाच्या कपटी, पाताळयंत्री कटात सहभागी करून घेतले नाही. कर्णाला नेहमीच दोषमुक्त ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. यावरून असेच जाणवते की लेखकाला आपला चरित्रनायक अधिक उज्ज्वल करावयाचा आहे. एकंदरीत मुळातल्यापेक्षा कर्णचरित्र अधिक उज्ज्वल करण्याचा प्रयत्न संपूर्ण कादंबरीत जाणवतो.

कर्णाच्या अंगी असणाऱ्या चांगल्याच गुणांच्या आहारी न जाता ठाकूर कर्णाचे अवगुणही लक्षात घेतात. कर्णाच्या अंगी असणारा सर्वात महत्त्वाचा अवगुण म्हणजे त्याचा क्रोध. अनेक प्रसंगी क्रोधाच्या आहारी जाऊन त्याच्याकडून अतिरेक घडतो. कर्णाचा क्रोधामुळे अनेक ठिकाणी तोल सुटलेला आहे. अनेक ठिकाणी त्याच्या हातून वृद्धांचा अपमान करण्याचा प्रमाद घडला आहे. पांडवांचा पराक्रम कमी लेखताना कर्णाची घमेंडखोर, अहंकारी वृत्तीही व्यक्त होत जाते. द्रौपदी विषयीचा क्रोध व्यक्त करताना तो म्हणतो, 'एका स्त्रीला एकच पती असावा हा आर्यधर्म आहे; परंतु तिला पाच पती आहेत. का कुठला धर्म आहे? अरे, एकापेक्षा अधिक पुरुषांशी

रममाण होणारी स्त्री वारांगनाच असते. अशी स्त्री सवस्त्र असली काय आणि विवस्त्र असली काय? त्याचं कोणालाच आश्चर्य वाटायला नको.' (१७१) कर्णाचा हा क्रोध द्रौपदी स्वयंवराच्या वेळी झालेल्या अपमानाचा किंवा भीमाने प्रेक्षगृहप्रसंगी केलेल्या अपमानाचा सूड असावा. म्हणून ठाकूरांनी कर्णाच्या या बेताल वक्तव्याकडे दुर्लक्ष केले असावे.

महाभारतकालीन स्त्रीविषयक दृष्टिकोन कादंबरीत अनेक ठिकाणी व्यक्त होत जातो. आर्य ब्राह्मण आणि आर्य क्षत्रिय यांनी इतर वर्णातील स्त्रियांना उपभोग्य मानलं. क्षत्रिय पुरुष आणि ब्राह्मण कुलोत्पन्न स्त्री यांच्या संबंधातून निर्माण झालेली संतती पुढे सूत म्हणून ओळखली गेली. सूत स्त्रीने राजाची दासी किंवा भोगदासी होण्यातच धन्यता मानायची असा रिवाज होता. राजकन्या काय किंवा इतर कुठलीही स्त्री जिंकली गेल्यावर जिंकणाऱ्याची दासीच होती. त्यामुळेच द्रौपदीला पाचही भावांशी विवाह करून त्यांना उपभोग द्यावा लागला. बहुपतिकत्वाविषयी द्रौपदीला विचारलेही गेले नाही. तिची संमती गृहीतच धरली गेली. आर्य जमाती सप्तसिंधूंच्या पलीकडे राहत होत्या तेव्हा त्यांच्यात बहुपतिकत्त्वाची पद्धत होती, असा त्याला दुजोरा दिला गेला. स्त्री ही पुरुषांच्या सेवेसाठी निर्माण झालेली आहे, तिच्या मताला अवाजवी महत्त्व देणं हा पुरुषांचा अपमान मानला जात होता. द्यूतप्रसंगी द्रौपदी पटावर लावली जाते. दुर्योधन डाव जिंकतो. द्रौपदीला ओढत दु:शासन सभा मंडपात आणतो. त्यावेळी आपण दासी नसल्याचे द्रौपदी सिद्ध करण्याचा प्रयत्न करते. युधिष्ठिराने स्वत: दास झाल्यानंतर मला पणाला लावले. तेव्हा पितामह भीष्म सांगतात की, युधिष्ठिर दास झाला तरी दासभार्या या नात्याने पत्नीवरील त्याचा अधिकार अबाधितच राहतो. म्हणून तो तिला पणाला लावू शकतो. स्त्रीकडे दासी म्हणून पाहण्याचा महाभारतकालीन दृष्टिकोन कादंबरीत व्यक्त होतो.

कर्णाच्या आत्मीयतेने भरलेल्या कौटुंबिक जीवनाचे मनोज्ञ दर्शन ठाकूरांनी घडविले आहे. जन्मत:च नदीत सोडून दिलेल्या एका बाळजीवाला राधाईने आयुष्याचं दान दिलं. कर्णाला जन्म न देताही ती त्याची आई झाली. या आईची माया कर्णाच्या वाट्याला अधिक आली. ज्या मुलांना तिने जन्म दिला त्या शत्रुंजय आणि संग्रामजित या दोघांवर रागावणारी आई कर्णाचं मन दुखावू नये म्हणून कधी रागावली नाही. एका अश्राप मुलाकडे कणवेनं पाहण्याचा हा दयाभाव कर्णाला तिच्या प्रेमातून मिळाला. कर्णाचे वैवाहिक जीवन अतिशय सुखी दाखविले आहे. वृषालीसारखी प्रेमळ, विचारी आणि जबाबदार पत्नी मिळाली याचे कौटुंबिक समाधान कर्णाला आहे. कर्ण—वृषालीचा अनेक विषयांवर संवाद दाखविला आहे. अनेक प्रसंगी कर्ण तिचा सल्लाही महत्त्वाचा मानतो. वृषालीचे निरतिशय प्रेम हा त्याचा आधार आहे. कर्णाचे कौटुंबिक चित्रण साकारताना एक प्रेमळ पती, आदर्श पिता, आज्ञाधारक पुत्र, प्रांजळ मित्र अशा विविध भूमिकेतून वठविलेला कर्ण लेखकाच्या जिव्हाळ्याचा विषय आहे.

कादंबरीत ठाकूरांनी अनेक ठिकाणी दांभिक तत्त्वज्ञानातील फोलपणा उघड करण्याचा प्रयत्न केला. एकीकडे पौरुष हेच क्षत्रियत्त्वाचं लक्षण सांगितल्या जायचं आणि दुसरीकडे क्षत्रियत्त्व आणि ब्राह्मण्य जन्माजात गुणांवर अवलंबून आहे असंही सांगितल्या जायचं, यातील गूढ काय तर, 'त्यात गूढ काहीच नाही. ब्राह्मणातील काही स्वार्थी लोकांनी रचलेलं ते एक स्वार्थी कारस्थान आहे. आणि या सर्व अनर्थाचं मूळ आत्मविचारात आहे. आत्मा अविनाशी, अमर्त्य आहे या मताच्या पुष्टीसाठी वैदिकांनी कर्मविपाकाचा सिद्धांत मांडला आणि माणसाचा वर्ण अर्जित गुणांवरून न ठरता तो जन्मजात गुणांवरून ठरतो असा दिशाभूल करणारा मतप्रवाह त्यांनी प्रसृत केला. कर्मविपाक, यज्ञयाग, मूर्तिपूजा, पुनर्जन्म, पापपुण्य, स्वर्गनरक अशा अनेक भ्रामक कल्पना त्यांनीच निर्माण केल्या आणि समाजाच्या माथी मारल्या.' (पृ.११०) आत्मानात्म, देव—दैववाद आणि कर्मविपाकावर आधारित वर्णाश्रम धर्माच्या भ्रामक कल्पनांना मनुष्य बळी का पडला तर, 'या जन्मी केलेल्या पापांची फळं पुढच्या जन्मी भोगावी लागू नयेत या भीतीपोटीच माणूस कर्मविपाकाच्या भ्रामक सिद्धांताला बळी पडला आहे. मुळात आत्मा किंवा ज्याला आत्मतत्त्व म्हणावं असं काही अस्तित्त्वातच नाही. मानवी देहात आत्मा असतो आणि तो पुनर्जन्म घेतो हे आजवर कोणीही सिद्ध करू शकलेलं नाही. जन्माच्या आधी किंवा मृत्यूच्या नंतर काहीच नाही. जे आहे ते सगळं इथचं आहे; परंतु आत्मानात्म विचारांचा व्यर्थ काथ्याकूट करणाऱ्या लोकांनीच माणसाच्या सुखात विष कालवलं आहे. दुधात लवणाचा खडा टाकावा त्याप्रमाणे पारलौकिकाच्या भीतीनं त्यांचा इहलोक नासवून टाकला आहे. एका अर्थानं त्याला निष्क्रिय, दैववादी बनवून टाकलं आहे.' (पृ. १११) यातून ठाकूरांनी समाजातील आजच्या अनिष्ठ रूढी, प्रथा—परंपरांना उजाळा दिला आहे.

ठाकूरांनी महाभारत मूळ कथेचा आवाका लक्षात घेऊन शेकडो व्यक्तिरेखा, त्यांची नावे, तत्कालीन धर्म, चालीरीती, प्रथा, परंपरा, खानपान, आचारविचार, नीती, अनीती, कोण कोणाचा मित्र, कोण कोणाचा शत्रू, राज्ये, त्या राज्यांच्या सीमा, अरण्ये, तेथील विविध वनस्पती, त्यांचे उपयोग, अश्वांची नावे, त्यांच्या जाती, रथांचे

प्रकार, त्यावरील ध्वजचिन्हे, त्या ध्वजचिन्हांचे अर्थ अशा अनेक सूक्ष्म संदर्भासह कादंबरीत एक भव्य पट उलगडत नेला आहे. संस्कृतीत जे नवे विचार येऊ पाहतात ते चार्वाकाच्या विचारातून स्पष्ट होत जातात. कादंबरीतील युद्धवर्णने प्रत्यक्षात वास्तव साकारतात. प्रेक्षणगृह प्रसंग, द्यूतप्रसंग, घोषयात्रा, कर्णदिग्विजय, कृष्ण–कर्ण भेट, कर्ण–कुंती भेट, कृष्णशिष्टाई, युद्ध अशा अनेक प्रसंगांना साकार करत 'कर्णपर्व' आकारत जाते.

## संदर्भ

१. डॉ. रवींद्र ठाकूर, कर्णपर्व, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, २०१६, पृ.मलपृष्ठ

❖❖❖

# पटकथा लेखन प्रक्रिया

श्री. सुरेश विठ्ठल मेहेर
एम.ए. मराठी (नेट), संशोधक विद्यार्थी
उपशिक्षक, न.प. प्राथ. शाळा (आळंदी देवाची) क्र. १, आळंदी, ता. खेड, जि. पुणे ४१२ १०५
निवास – डी२/७०४, वुड्सविल फेज १, बोऱ्हाडेवाडी, मोशी, ता. हवेली, जि. पुणे ४१२ १०५
भ्रमणध्वनी ७५८८०७१२५७, इ मेल suresh.meher7891@gmail.com

सिनेमा वा मालिका म्हटलं की तीन शब्द हटकून आठवतात. लाईट्स, कॅमेरा व ॲक्शन. या तीन शब्दांवर सारेच फिदा असतात. मात्र या तीन शब्दांच्या आधी तो संपूर्ण चित्रपट किंवा ती मालिका शब्दबद्ध करण्याचं काम पटकथाकार करीत असतात. जसं एखादी इमारत किती सुंदर वा किती मजबूत होईल हे त्याच्या पायाच्या कामावर ठरत असतं, त्याचप्रमाणे ती कलाकृती किती चांगली व रसिकमान्य होईल हे ठरत असतं ते पटकथेवर पटकथा लिहणं हे. एक मोठ कौशल्याचं व भरपूर थकवणारं अस काम असतं. आज अनेक पटकथाकार म्हणून नावाजलेले आहेत. सिनेनिर्मिती क्षेत्रातला हा महत्त्वाचा पैलू आहे. पटकथा म्हणजे चित्रपट कसा दिसणार हे लिहून ठेवणे. आज विविध पद्धतीने पटकथा लिहल्या जातात. काहीजण चित्ररूपातही पटकथा लिहितात. आपल्याकडे 'अजिंठा' या मराठी चित्रपटाच्या निर्मितीत अशा प्रकारे चित्र काढून पटकथा लिहली होती. त्याचप्रमाणे सत्यजित रे हे अशा प्रकारे पटकथा लिहीत असत. असं असलं तरी पटकथा लिहण्याची पद्धत ही लिखित स्वरूपातच असते.

पटकथा म्हणजे संपूर्ण प्रसंग पटकथेच्या आधी येते ती कथा. त्याला चित्रपट भाषेत 'वनलाईनर' असेही म्हणतात. ही कथा सुचावी लागते. त्यासाठी हे काम करू इच्छिणाराचे चांगले वाचन असावे लागते. त्याचबरोबर इतरही अनेक गोष्टींचा व्यासंग असावा लागतो. कथा ही वैशिष्ट्यपूर्ण नवीन असावी लागते. कधी कधी एखाद्या गाजलेल्या कलाकृतीवरून, साहित्यकृतीवरून किंवा मग एखाद्या दुसऱ्या भाषेतल्या चित्रपटावरूनही पटकथा लिहिली जाते. उदा 'जब जब फुल खिले' या चित्रपटाच्या कथेवरून नव्याने पटकथा लिहून 'राजा हिंदुस्थानी' हा चित्रपट तयार करण्यात आला. ही कथाच फार महत्त्वाची आहे.

सहसा वनलाईन सुचत असतानाच पात्रं ही लेखकाच्या अवतीभवती नाचत असतात. त्यांना धरून त्यांची बांधणी करावी लागते. त्यांचे स्वभाव निश्चित करावे लागतात. त्यानंतर त्यांचा परस्पर संबंध ठरवावा लागतो. त्याची कथेच्या अनुषंगाने कारणं शोधावी लागतात. म्हणजे 'अ' जर 'ब' च्या प्रेमात असेल तर तो का? कशासाठी? कशामुळे? याचा विचार पटकथा लेखनात महत्त्वाचा ठरतो. प्रत्येक पात्राची एक पार्श्वभूमी ठरवावी लागते. त्यातून त्याची जडणघडण कशा प्रकारे होईल, याचा विचार करावा लागतो. त्यानंतर या विविध पात्रांमध्ये परस्पर संबंध निश्चित करावे लागतात. हे निश्चित झाल्यानंतर मग त्य पटकथेचा प्रवाह ठरतो किंवा लेखकाच्या डोळ्यासमोर येऊ लागतो.

यापुढची पायरी असते ती या पटकथेतल्या प्रसंगाच्या मांडणीची. ही मांडणी फार प्रभावी असावी लागते. त्यात दोन प्रसंगांमधले संबंध हेही ठरवावे लागत असतात. आता प्रत्यक्ष प्रसंग कसा लिहायचा हे आपण पाहू. त्यासाठी आपण एक उदा. घेतल्यास हा विषय आपल्याला व्यवस्थित समजू शकेल. शोले मधल्या ''कितने आदमी थे?'' या प्रसंगाची पटकथा लिहायची असल्यास ती साधारणपणे खालीलप्रमाणे लिहिता येते.

एका डाकूचा अड्डा. त्यात एका दगडाच्या कोपऱ्यात सांबा बसलेला आहे. सांबा वय साधारण तीस ते पस्तीस, दाढी, त्या सरदाराचा अगदी जवळचा असा डाकू. कॅमेरा येतो तेव्हा ट्रॉलीवरून डाकूंचा संपूर्ण अड्डा दिसून येतो. सांबा वर बसलेला आहे. एका कोपऱ्यात एका चुलीसारख्या गोष्टीवर मांस शिजतंय. दुसरीकडे काही बंदुका पडल्यात. काही डाकू एका कोपऱ्यात आपापसात गप्पा मारत आहेत. कॅमेरा तीन डाकूंवर. गब्बर पाठमोरा उभा आहे. ''कितने आदमी थे?'' या प्रश्नावर एका डाकूचा क्लोज. 'तीन सरदार' या उत्तरावर सरदार गब्बरचा ओव्हर द शोल्डर शॉट. पुढे त्याचं उत्तर 'और तुम तीन!'

अशा प्रकारे संपूर्ण वातावरण, संवाद व कॅमेऱ्याच्या काही मुव्हमेंट यांच्या साहाय्याने पटकथा लिहिली जाते. ज्या पटकथेच्या लेखनात दिग्दर्शकाचाही समावेश असतो, ती पटकथा अधिक विस्ताराने लिहिली जात असते.

चित्रपटाच्या सर्वच गोष्टींचा पाया पटकथा असते. चित्रपट निर्मितीत सहभागी असलेल्यांसाठी ती 'बायबल' असते. सर्वच डिपार्टमेंट साठी त्यातूनच इनपुट मिळत असते. म्हणजे वेशभुषाकार या पटकथेचा

अभ्यास करूनच पात्रांची एकंदरीत व प्रसंगानुरूप अशी वेशभुषा ठरवत असतो. कला दिग्दर्शक यासाठी कोणती जागा व लोकेशन लागणार आहे, ती जागा कोणकोणत्या गोष्टींनी अधिक सजवायची वा वास्तव वाटावी अशी करायची, याचा विचार करत असतो. कॅमेरामन या पटकथेच्या आधारे प्रसंग, त्याची वेळ, त्याचा परिणाम याचा विचार करून त्यानुसार मग आपली लाइटिंग करत ठरवत असतो. त्याच पटकथेचा विचार करून साहाय्यक दिग्दर्शक हे पुढे जाऊन शॉट डिव्हिजन करत असतात. अगदी कलाकारांच्या कोणकोणत्या तारखा घ्यायच्या याचाही विचार याच पटकथेच्या अनुषंगाने केला जातो. अशी ही पटकथा साऱ्याच गोष्टींचा मार्गदर्शन करीत असते.

पटकथाकार हा बहुश्रुत असावा. त्याचे वाचन दांडगे असले पाहिजे. संगीताचाही चांगला कान या पटकथाकाराला असला पाहिजे. इतिहास, भूगोल, सामान्यज्ञान यांचे तर ज्ञान असावेच, त्याचबरोबर सभोवतालच्या परिस्थितीत घडत असलेल्या विविध घटनांची त्याला जाणीव असली पाहिजे. पटकथकाराचा जीवनाविषयीचा दृष्टिकोन हा सकारात्मक असला पाहिजे. कोणत्याही गोष्टींच्या कार्यकारण भावाचा विचार त्याने करायला हवा. त्याला घटनांचेही विश्लेषण करण्याची कला असली पाहिजे. चित्रपटनिर्मितीच्या सर्वच अंगाची माहिती असली पाहिजे. पटकथा म्हणजे चांगल्या कथेचं चांगल्या चित्रपटात रूपांतर करण्याची कला आहे. त्यामुळे ज्याला आपली भाषा व चित्रपटाची भाषा व तिचे व्याकरण समजले तोच चांगला पटकथाकार होऊ शकतो. पटकथाकाराचा जनसंपर्क चांगला पाहिजे. माणसाविषयीची त्याला जिज्ञासा हवी. अधिक वेगवेगळ्या प्रकारच्या माणसांमध्ये वावरणारा पटकथाकार आपल्या पात्रांच्या निर्मितीत जिवंतपणा सहज आणू शकतो. माणासांचे स्वभाव, त्यांची वागण्याची पद्धत, कोणत्या परिस्थितीत ते कशाप्रकारे प्रतिक्रिया देऊ शकतात याचाही त्याचा अभ्यास चांगला असला पाहिजे. विविध सामाजिक चालीरीतींचा अभ्यासही त्याला असायला हवा. एका गोष्टीबरोबर दुसऱ्या गोष्टीला कशी जुळवून घेता येईल याचा विचार करावा लागतो. दिवसरात्र सतत कथा लिहीत राहावं लागतं. अगदी मान मोडून जावी अशा पद्धतीचं काम करण्याची तयारी असावी लागते. कोणतीही कल्पना अचानक सुचत नाही. त्यासाठीची पार्श्वभूमी तर असावीच लागते, त्याचबरोबर पटकथाकाराकडे एक प्रकारचा संयमही असायला हवा. इतरांच्या सूचना स्वीकारण्याची तयारी हवी. आपली कल्पना समजावून सांगण्याची त्याची क्षमताही पाहिजे. भाषेवर प्रभुत्व हवे.

मूळ कथा आणि पटकथा यात खूप फरक असतो. मूळकथा ही थेट वाचकांना उद्देशून तयार केलेली असते. पण पटकथा किंवा स्क्रिप्ट ही फक्त प्रोजेक्टमध्ये काम करणाऱ्यांसाठी असते, प्रेक्षकांसाठी नाही. आपल्या मनातील संकल्पना एखाद्या माध्यमातून आपल्या प्रेक्षकांपर्यंत कशी पोचवायची, याची अगदी बारकाईने आणि काळजीपूर्वक केलेली लेखी मांडणी म्हणजे स्क्रिप्ट असं माध्यम जसं फिल्म असू शकतं. आपल्या संकल्पनेला त्या त्या माध्यमातून प्रेक्षकापर्यंत जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे कसं नेता येईल, याचा अभ्यास करून स्क्रिप्ट लिहिली जाते. पटकथा ही चित्रपटाची दृश्यसंहिता असते. एक पटकथा सोडली तर उर्वरित सर्व चित्रपट ही तंत्रज्ञानाची किमया आहे. तथापि या लिखित दृश्य संहितेशिवाय चित्रपट बनणे केवळ अशक्य आहे. चित्रपटाच्या संदर्भात पटकथेच्या या अनन्यसाधारण स्थानाबाबत भाष्य करताना हिंदी चित्रपटाचे अभ्यासक कमलेश्वर म्हणतात, ''कुछ अनुभव शब्दोंसे भरे होते है, कुछ दृश्य से भरा हुआ सन्नाटा कभी कभी जो बात कह देता है वो शब्दों से नही कही जा सकती।'' चित्रपटाच्या दृष्टीने असणारे पटकथेचे महत्त्व कमलेश्वर यांच्या वरील अवतरणातून स्पष्ट होते.

कॅमेरा आणि इतर तांत्रिक घटकांच्या द्वारा साधलेली चमत्कृतीजन्य किमया, असे जरी चित्रपटाचे स्वरूप असले तरी नेमक्या प्रभावी आणि परिणामकारक अशा कथानकाशिवाय तो बनणेही शक्य नसते. म्हणून चित्रपटाची कथा आणि तिची पटकथा यांचे असणारे स्थान अत्यंत महत्त्वाचे असे आहे. १९ व्या शतकाने मानवास दिलेला सर्वोत्तम पुरस्कार म्हणून चित्रपटाकडे पाहिले जाते. रंजन आणि उद्बोधन ही कलेची दोन्ही उद्दिष्टे अन्य कोणत्याही ललित कला प्रकारापेक्षा अधिक व्यापक स्वरूपात साधण्याची चित्रपट माध्यमाची असणारी क्षमता सर्वसामान्य अशीच आहे. चित्रपटाच्या उदयासोबतच पटकथेचाही जन्म झाल्याचे आपल्याला दिसते. अगदी सुरुवातीच्या काळात पटकथा लेखनाकडे फारसे गांभीर्याने पाहिले गेले नसले तरी विकासाच्या ओघात या क्षेत्रातील जाणकारांच्या हे लक्षात आले की कॅमेऱ्याइतकेच महत्त्व पटकथेचेही आहे. किंबहुना चित्रपट आधी कागदावर उभा राहतो व नंतर पडद्यावर! त्यामुळे पटकथेच्या लेखनाबाबत एक जागरुकता नंतरच्या काळात आलेली दिसते.

विशिष्ट अशा कथेवर अथवा कादंबरीवर किंवा नाट्यसंहितेवर आधारित चित्रपटाची पटकथा लिहिताना विशेष अशी काळजी पटकथाकारास घ्यावी लागते. तेथे त्यास कथानक तयार स्वरूपात उपलब्ध असते; तथापि

दोन्ही माध्यमे पूर्णतः भिन्न असल्यामुळे स्वाभाविकच पटकथेत खूप बदल होताना दिसतात. कथा, कादंबरीचा आकृतीबंध आणि चित्रपट माध्यमाचा आकृतीबंध पूर्णतः भिन्न असा आहे. कथात्म साहित्य शब्दप्रधान असते. त्याचे आकलन आस्वादन वाचकसापेक्ष असते. तुलनेने चित्रपट हे दृश्यप्रधान माध्यम आहे. येथे शब्द गौण व दृश्यप्रधान असतात. बऱ्याचवेळा निशब्द दृश्यातून जो परिणाम चित्रपट साधतो, तो खूपच परिणामकारक असतो. अशावेळी पटकथाकार समोर चित्रपटाची पटकथा रचताना कथा, कादंबरीमधील आशय दृश्यात्म करण्यासाठी आवश्यक असणारी शब्दयोजना संवादासाठी करावी लागते. मूळ कथा अथवा कादंबरीमधील विस्तृत वर्णने अथवा निवेदने, पटकथेच्या दृष्टीने निरुपयोगी असतात, म्हणून त्यांची काटछाट करणे क्रमप्राप्त असते. नाटक आणि चित्रपट या दोन्ही अभिनयप्रधान मिश्र कला असल्या तरी उभयतांत असणारा फरक यापूर्वी उल्लेखिलेला आहेच. नाटक ही प्रत्यक्ष तर चित्रपट हा प्रत्यक्षाचा आभास निर्माण करणारी कला आहे. नाटकातील प्रत्यक्षता आताची क्षणमात्र आणि समोर जिवंतपणे घडणारी असते, त्यामुळे स्वभाविकच नाटकाच्या सादरीकरणावर खूप बंधने येतात. चित्रपटातील आभासात्मक प्रत्यक्षतेवर ही बंधने नसल्यामुळे कथागत विषयाला समग्रतेने आणि विविधतेने भिडणे त्यास शक्य होणारे असते. यशस्वी ठरलेल्या प्रभावी व परिणामकारक नाटकांवर आधारित चित्रपट तयार करण्याकडे निर्मात्यांचा कल अधिक दिसतो. असे होण्यामागे नाटकाच्या यशस्वीतेचा किंवा नाटयसंहितेचा सशक्ततेचा चित्रपटाच्या व्यवसायिक हितासाठी अधिक उपयोग होऊ शकेल, हा हेतू असू शकतो.

पटकथेची रचना करताना पटकथाकारास कथेतील नायकाच्या व इतर पात्रांच्या विकसनाचा सूक्ष्म विचार करावा लागतो. विशेषतः कथेचा नायक पटकथेत सतत केंद्रस्थानी राहील याच पद्धतीने दृश्यांची उभारणी करणे गरजेचे असते. कारण कथानकाच्या दृष्टीने नायक हाच केंद्रस्थानी असतो. कथेवर त्याचेच नियंत्रण असते. तोच कथेला पेलत असतो प्रेक्षकांची गुंतवणूकही नायकातच अधिक असते. हा नायक कथेच्या स्वरूपानुसार स्त्री पुरुष, तरुण वृद्ध एखादा प्राणी किंवा कधी एखादे यंत्र असा कोणीही असू शकतो. त्यामुळे पटकथेतील प्रसंग वा दृश्याची आखणी करताना फोकस नायकावर अधिक कसा राहील याचा कल्पकतापूर्ण विचार पटकथाकाराने करणे चित्रपटाच्या यशाच्या दृष्टीने अत्यावश्यक असते.

## संदर्भ


१) उपयोजित मराठी – लेखन संवाद कौशल्याचा परिचय – डॉ.प्रभाकर ज.जोशी किशोर एम.पाटील

२) संवाद – विजया राजाध्याक्ष

३) माझी चित्तरकथा – रविंद्र जोशी

४) मराठी चित्रपटाची पटकथा – अनिल सपकाळ


❖❖❖

# लोकमान्य टिळकांच्या विचारसरणीचा मराठी साहित्यावर प्रभाव

डॉ. बालाजी व्ही. डिगोळे
मराठी विभाग प्रमुख, शिवजागृती महाविद्यालय,
नळेगाव, ता. चाकूर, जि. लातूर
भ्रमणध्वनी ८६९८५५४४०३, इ मेल bdigole007@gmail.com

## प्रस्तावना

लोकमान्य टिळकांचा जन्म कोकणात पण शिक्षण पुण्याला झाले. १८७६ मध्ये ते बी.ए. व १८७९ मध्ये वकिली उत्तीर्ण झाले. १८८० मध्ये ते न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये शिक्षक झाले. १८८५ मध्ये फर्ग्यूसन कॉलेजमध्ये ते प्राध्यापकही झाले. पण शेवटी त्यांनी मतभेद झाल्यामुळे प्राध्यापकपदाचा राजीनामा दिला. १८८२ मध्ये त्यांनी 'केसरी' व 'मराठा' ही पत्रे चालविली. त्यांना डोंगरी येथे तुरुंगवास भोगावा लागला.

कै. चिपळूणकर व त्यांची निबंधमाला यापासून स्फूर्ती घेऊन टिळक व आगरकर यांनीही लेखनास सुरुवात केली. हे दोघेही प्रथमत: परस्पर मित्र असून समवयस्क होते. दोघेही प्रखर ध्येयवादी, नि:स्पृह, त्यागी मात्र दोघांचेही व्यक्तिमत्त्व परस्पराहून भिन्न होते. लोकमान्य टिळक हे चिपळूणकरांसारखे प्रखर देशभक्त, धर्मनिष्ठ, जहालमतवादी, राजकीय क्षेत्रात जिज्ञासू वृत्तीने भाग घेणारे, स्वत्वाभिमानी होते. त्यांचे मुख्य कार्यक्षेत्र राजकारण होते.

लोकमान्य हे झुंजार व स्वतंत्र बाण्याचे लेखक होते. त्यांनी सरकारी जुलमावर कठोर टीका केली. ते राजकारणात असले तरी त्यांचा मूळ पिंड व्यासंगी पंडिताचा होता. सन १८९३ मध्ये त्यांनी ओरायन हा ग्रंथ लिहिला. ते उत्कृष्ट राजकारणी व लोकसंग्राहक होते. प्लेग व दुष्काळात त्यांनी लोकांना मदत केली. लोकजागृती करण्यासाठी गणेशोत्सव व शिवजयंती सुरू करून जनतेत धर्मप्रेम व देशप्रेम जागृत केले. सरकारी रोषाला बळी पडले. आत्यंतिक लोकप्रियतेमुळे ते काही काळ पुण्याच्या नगरपालिकेत व मुंबईच्या कायदेमंडळात निवडून आले. अनेकदा राजकीय चळवळी केल्यामुळे त्यांना सरकारी तुरुंगवास भोगावा लागला. रॅंडच्या खुनात हात असल्याच्या संशयावरून त्यांना एक वर्षाची शिक्षा झाली. ताई महाराजांच्या प्रकरणात त्यांना बराच त्रास सहन करावा लागला. त्यांनी वनभंगाच्या आंदोलनास पाठिंबा दिला. सन १९०१ मध्ये 'द आर्क्टिक होम इन द वेदाज' हा ग्रंथ लिहिला. जनतेत राजकीय असंतोष निर्माण केला म्हटले जाते. लोकमान्य टिळक हे कठोर राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते, राजकीय कार्यकर्ते. त्यांनी राजकारणात ब्रिटीश सत्तेविरुद्ध स्वदेश, स्वराज, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीची घोषणा केली. शेवटी सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून १९०८ मध्ये त्यांना सहा वर्षाची शिक्षा दिली व मंडालेच्या तुरुंगात ठेवले. त्या तुरुंगवासात त्यांनी आपला जगभर गाजलेला गीतारहस्य १९१५ हा ग्रंथ लिहिला.

टिळक ही अष्टपैलू कर्तृत्वाची व्यक्ती होती. ते उत्कृष्ट लेखक, वक्ते व झुंजार राजकारणी होते. स्वभावाने उदार व स्वाभिमानी राजकारणी होते. तसेच ते केवळ राजकीय पुढारी नसून 'गीतारहस्य', 'ओरायन', 'द आर्क्टिक होत इन द वेदाज' या जगप्रसिद्ध ग्रंथांना जन्म दिला. केसरीतून विविध विषयावर शेकडो लेख लिहिले. या लेखामुळेच त्यांना राष्ट्रजनक अशी पदवी मिळाली. त्यांच्या लेखांचे एकूण चार भाग आहेत. त्यात अनेक विषय आहेत. त्यात प्रामुख्याने राजकारण, देशभक्ती, धर्मकारण यांचा समावेश होतो.

टिळक इंग्रजधार्जिणे किंवा इंग्रजी विचारांचे नव्हते. त्यांनी इतर सुधारकांप्रमाणे राष्ट्राचा तेजोभंग न करता धर्माभिमान व देशाभिमान जागृत केला. समाजसुधारणा व्हावी असे त्यांनाही वाटे. पण ही सुधारणा म्हणजे इंग्रजांची नक्कल नको. सुधारणेपूर्वी प्रथम स्वराज्य निर्माण करणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. टिळकांवर मिल व स्पेन्सर या विचारवंताचा प्रभाव पडला होता. न्यायमूर्ती रानडे व दादाभाई नौरोजी यांच्या विचारकार्यामुळे टिळक व आगरकरांच्या ध्येयवादी कल्पना आकार घेत होत्या. टिळकांची स्वराज्य, बहिष्कार, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्री कार्यक्रमावर आधारित स्वराज्याची चळवळ होती.

## विषय विवेचन

लोकमान्य टिळक आणि सुधारकाग्रणी आगरकर हे दोघेही विष्णुशास्त्री यांचे अनुयायी होते. चिपळूणकरांकडूनच सार्वजनिक कार्याची दीक्षा घेतलेले; पण दोघेही भिन्न प्रवृत्तीचे. यामुळे त्यांच्या कार्याच्या व

विचाराच्या दिशाही पुढे भिन्न झाल्या. लोकमान्य टिळक हे कट्टर राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते, राजकीय कार्यकर्ते, भारतीय असंतोषाचे जनक या नात्याने पुढे आले. मराठी मनावर लोकमान्य टिळकांच्या व्यक्तित्वाचा व कर्तृत्वाचा विलक्षण प्रभाव आहे. ते दैवतरूप बनले आहेत. मराठीतील राष्ट्रवादी प्रवाहाला त्यांच्यामुळे विशेष चालना मिळाली. मराठीतील ऐतिहासिक नाटके, कादंबऱ्या, राष्ट्रीय कविता, इतिहासविचार या आक्रमक राष्ट्रवादाचा ठसा उमटलेला आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या आक्रमक इतिहासनिष्ठ राष्ट्रवादाचा वसा लोकमान्य टिळकांनी घेतला.

१९२० ते १९५० हा कालखंड जरी गांधीयुग म्हणून ओळखला जात असला तरी या कालखंडाच्या पूर्वार्धावर मानसिक अधिपत्य आहे ते लोकमान्य टिळकांचे. लोकमान्य टिळक हेच या कालातील बहुसंख्य मराठी सुशिक्षितांचे आराध्यदैवत होते. लोकमान्य टिळक हे स्वकीय आणि स्वजातीय तर होतेच, शिवाय आपल्या संशोधनामुळे दिगंतकीर्तही झाले होते. त्यांच्या आधुनिकत्वातही परंपरेचा एक कडवा अभिमान होता. वृत्ती जाज्ज्वल्य होत्या. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांची परकीय सत्तेशी दीर्घकालपर्यंत धैर्याने आणि एकाकीपणे लढत चाललेली होती. त्यांनी स्वतःच प्रतिपादलेले निष्काम कर्मयोगाचे तत्त्वज्ञान त्यांच्या रोमारोमांत भिनलेले होते. यामुळे ते महाराष्ट्राच्या परंपरेचे आणि पराक्रमाचे या काळातील एकमेव जाज्ज्वल्य प्रतिनिधी ठरले.

नाट्याचार्य खाडीलकरांच्या सत्त्वपरीक्षा, भाउबंदकी, कीचकवध यांसारख्या नाटकातील नायकाचे पहाडी व्यक्तिमत्त्व टिळकप्रतिभेतूनच जन्माला आलेले आहे. पण याचबरोबर टिळकांच्या उत्तरकालात त्यांच्या तोलामोलाचा किंवा त्यांना वृत्तीतः जवळ जाणारा कोणी नेता महाराष्ट्रात उरला नव्हता. लोकमान्यांचे अनुयायी या दृष्टीने थिटे होते. पण प्राप्त झालेले पुढारीपण सोडण्याची त्यांची तयारी नव्हती. ते टिकविण्यासाठी यातील बहुसंख्य मंडळी गांधीविरोधात उभी राहिली. तडजोडीचे, व्यवहारवादाचे गोडवे गाऊ लागली. कर्तृत्वासाठी राजकारणाच्या बोहरची क्षेत्रे शोधू लागली. अधिकतर प्रमाणात साहित्योपजीवी बनली.

न.चिं. केळकर हे याचे प्रतिनिधिक उदाहरण. त्यांनी राजकारणाकडून साहित्याकडे आपला चेहरा वळविला. संघर्षाऐवजी सुवर्णमध्याचे तत्त्वज्ञान स्वीकारले. इतर प्रांतातील दुसऱ्या रांगेच्या सर्व पुढाऱ्यांची कमी अधिक प्रमाणात हीच स्थिती होती. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर जी राजकीय पोकळी येथे निर्माण झाली ती भरून काढण्यासाठी लोकमान्य टिळकांचे प्रत्यक्षात अनुसरण करण्याऐवजी लोकमान्य टिळकांच्या आठवणी, आख्यायिकांवरच अधिक भर दिला जाऊ लागला.

तव स्मरण संतत स्फुरणदायि आम्हा घडो
स्वदेशहित चिंतनाविण दुजी कथा नावडो

ही टिळक अनुयायांची मनापासूनची प्रार्थना होती. पण टिळकप्रणीत मार्गाने धैर्यशीलपणाने पाऊल उचलणे, या वर्गातील बहुसंख्य मंडळींना जमण्या, झेपण्यासारखे नव्हते. खुद्द टिळकांच्या हयातीतही कमीजास्त प्रमाणात हीच स्थिती होती. लोकमान्य टिळकांच्या तुरुंगवासाच्या काळात महाराष्ट्रातील राजकीय आघाडी थंडावलेली आढळते. त्यांची अनुयायी मंडळी ज्या वर्गातून आलेली होती, त्या वर्गाच्या एकंदर कोष्टकात मागे निर्दिष्ट केल्याप्रमाणे खटले, तुरूंग, शिक्षा, जहाल लेखनावर फिरणारा जातीचा वरवंटा हे प्रकार बसण्यासारखे नव्हते. या मंडळीना आपल्या मर्यादांची चांगली जाणीव होती. टिळकांच्या हयातीतच टिळक या नावाचा उच्चार करण्यास भिणारा एक वर्ग होता. खासगी संभाषणातही टिळकांचा उल्लेख बी.जी. या संक्षेपाने केला जाई. यामुळे सरकारी रोष न होईल, अशा मर्यादेत राहूनच जे कार्य करता येईल, ते करण्याकडे या काळातील संवेदनशील सुशिक्षित मने वळू लागली.

अशा स्थितीत लोकमान्य टिळकांचा आधार एका वेगळया पद्धतीने घ्यावा, असे एकंदरीने या कालखंडातील सुशिक्षित महाराष्ट्रीय मनाला वाटत राहिले. लोकमान्य टिळकांनी आपल्या गीतारहस्यात मांडलेले निष्काम कर्मयोगाचे आणि स्वधर्माचे तत्त्वज्ञान या मंडळींना या परिस्थितीत तात्त्विकदृष्ट्या जवळचे वाटले. यात भगवद्गीता आणि लोकमान्य टिळकांबद्दल वाटणाऱ्या आदरबुद्धीचा जसा अंश आहे तसा या काळातील सुशिक्षित मनाच्या बौद्धिक गरजेचाही एक भाग आहे. किंबहुना तोच अधिक महत्त्वाचा आहे. त्यात मराठी मनाला प्रिय वाटणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या व्यक्तिवादी आचारविचारांचे स्वधर्माचे संभरणही स्वाभाविक स्वरूपात झालेले आढळते.

ईश्वरावर श्रद्धा ठेवून प्राप्तकर्म निष्काम बुद्धीने करणे हे लोकमान्य टिळकांच्या कर्मयोगाचे केंद्रवर्ती सूत्र आहे. गीता या ग्रंथाने तात्त्विकदृष्टया भारतीय मनाची जडणघडण फार मोठ्या प्रमाणात केली आहे. महाराष्ट्रीय मनाची तात्त्विक बैठक सिद्ध होण्यास ज्ञानेश्वरांपासून आजतागायत भगवद्गीताच मुख्यतः कारणीभूत झाली आहे. टिळकांच्या 'गीतारहस्या'मुळे भगवद्गीता या ग्रंथाला आणखीनच महत्त्व प्राप्त झाले. 'गीतारहस्य' या ग्रंथाच्या

लोकप्रियतेच्या संदर्भात दा.न. शिखरे यांनी केलेले पुढील वर्णन लक्षणीय आहे. '१९१५ साली तो ग्रंथराज जेंव्हा प्रसिद्ध झाला तेंव्हापासून पुढील निदान पाच वर्ष तरी त्यातील विचारांच्या साद पडसादांनी महाराष्ट्रातील सारे वातावरण दुमदुमून गेले होते. लोकमान्यांच्या राजकीय पुण्यप्रभावामुळे त्यांच्या असंख्य भक्तांनी आपल्या गुरूचे नवे तत्त्वज्ञान, नवे दर्शन, नवी स्मृती आपल्या संग्रही असावी म्हणून हा ग्रंथ भक्तिभावाने विकत घेतला असेल. व त्यापैकी काहींनी तो न वाचताच पुजून जपून ठेवला असेल. पण त्याचे अक्षर न अक्षर चिकित्सेने वाचणारे आणि त्या ग्रंथाची २०—२०, ३०—३० पारायणे करून तो जवळजवळ मुखोद्गत करणारे शेकडो विद्वान त्या वेळी होते. एवढेच नव्हे तर गीतारहस्यातील तत्त्वज्ञानाचा प्रसार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातही व्हावा म्हणून कैक अभ्यासकांनी व शास्त्रीपंडितांनी प्रचाराचे दौरेही काढले. महाराष्ट्राच्या धार्मिक जीवनात नवचैतन्याची इतकी प्रचंड लाट क्वचितच उठली असेल.'

गीतेच्या या तत्त्वज्ञानाचेच आधुनिक ज्ञानसंदर्भात तटस्थपणे, शांतपणे, सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांचा आधार घेऊन या काळाच्या आरंभापासूनच वा.म. जोशी यांनी प्रांजळ चिंतन चालविले होते. ते स्वत:ला आगरकरी संप्रदायाचे मानीत. या काळातील जिज्ञासूंना या मंडळाचे तत्त्वज्ञान मार्गदर्शक ठरले. याचे कारण वामन मल्हारांची प्रतिपादनपद्धती तर आहेच, पण त्याचबरोबरच या काळात स्थिर झालेल्या व्यक्तिवादी प्रवृत्तींना ते मानवणारेही होते. वा.म. जोशी हे केवळ विचारवंतच नव्हते तर या काळातील एक कार्यशील शिक्षक व मान्यताप्राप्त ललितलेखकही होते. या काळाला विशेष प्रिय वाटणाऱ्या विदग्ध काव्यशास्त्र विनोदाचा फार मोठा ठेवा वा.म. जोशी यांच्याकडे होता, यामुळे या काळातील प्रगल्भ चिंतकाचे ते अग्रणी बनले. तत्कालीन सुशिक्षितांना आपली स्वधर्म कल्पना निश्चित करण्यास वा.म. जोशींच्या विचारविलासांनी बरेच साह्य केले. हे स्वधर्मदर्शन वा.म. जोशींच्या ललित आणि ललितेत्तर अशा दोन्ही प्रकारच्या लेखनात सातत्याने आढळते. गीताप्रणीत तत्वज्ञानाचा गाभा वा.म. जोशींच्या सर्व कादंबऱ्यातून या ना त्या स्वरूपात सातत्याने प्रकट होतो. भगवद्गीता हा त्यांचाही आवडता ग्रंथ होता. या ग्रंथाच्या चौथऱ्यावर त्यांनी बदलत्या काळाच्या संदर्भातील वेदान्त मांडलेला आहे. भाषेचा डौल, विचारप्रवर्तक लेखन, मुद्देसुद असे गांभीर्यपूर्ण विवेचन, प्रतिपक्षावरील प्रखर टीका, भोवतीच्या वावटळीने न डगमगणारे खंबीर मनोवृत्ती, तेथून रूजलेला व वाढलेला स्वाभिमान, विषयाची मुलगामी सखोल चर्चा, पानापानातून व्यक्त होणारे पांडित्य असे कितीतरी टिळकांच्या निबंधाचे विशेष दिसतात.

## निष्कर्ष

१. टिळकांनी आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी तसेच लोकजागृती करण्यासाठी 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांचा माध्यम म्हणून वापर केला.

२. टिळक एक कुशल संघटक व महान कर्मयोगी निष्णात भाषातज्ज्ञ व गणिततज्ज्ञ थोर संशोधक होते.

३. गांधीनी स्वीकारलेल्या बहिष्कार स्वराज्य स्वदेशी आणि राष्ट्रीय आंदोलन धोरणांचा उगम लोकमान्य टिळकांच्या याच विचारसरणीचा प्रभाव तत्कालीन मराठी साहित्यिकांवर पडला.

४. खाडीलकरांच्या नाटकातील नायकाचे पहाडी व्यक्तिमत्व लोकमान्य टिळक प्रतिभेतूनच जन्माला आलेले आहे.

५. गीताप्रणित तत्वज्ञानाचा गाभा वा.म. जोशी यांच्या सर्व कादंबऱ्यातून प्रकट होतो.

## संदर्भग्रंथ

१. डॉ. आनंद पाटील, तौलनिक साहित्य : नवे सिध्दांत आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद १९९८

२. डॉ. आनंद पाटील, तरवा, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, २००७

३. भालचंद्र नेमाडे, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद द्वितीयावृत्ती २००१

४. अ.ना. देशपांडे, आधुनिक मराठी वाडमयाचा इतिहास, व्हिनस प्रकाशन, पुणे पुर्नमुद्रण १९७०

५. अनिल कठारे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद प्रथमावृत्ती २००९.

❖❖❖

# मराठी एकांकिका : एक दृष्टीक्षेप

प्रा. प्रकाश भरणे
जनता अध्यापक महाविद्यालय, नांदेड
भ्रमणध्वनी ९६५७०८२३८२ इ मेल prakashbharne22@gmail.com

## प्रास्ताविक

नाटक हा मराठी माणसाच्या जीवनाचे एक अविभाज्य अंग आणि आवडीचा विषय आहे. नाटक करणे आणि नाटक पहाणे हे दोन्ही कार्य मराठी माणूस जीवापाड करातो, यास मराठी माणसाचे नाटकाचे चिरंतन वेड कारणीभूत आहे.

मराठी एकांकिका अभ्यासाशिवाय मराठी नाट्यवाङ्मय आणि मराठी रंगभूमी यांचा अभ्यास परिपूर्ण होऊच शकत नाही. असे असले तरी मराठी एकांकिकेच्या अभ्यासाची उपलब्ध साधने हवी तेवढी नाहीत व जी आहेत ती थोडीफार आणि विखुरलेल्या स्थितीत आहेत.

गत काही वर्षांत मराठी एकांकिकेने गाठलेली उंची, व्यापलेले अनुभव विश्व, घेतलेला कलात्मक आकार आणि मराठी रंगभूमीवर होणारे तिचे प्रयोग यामुळे आता एकांकिका आता ही मराठी नाट्यवाङ्मय आणि रंगभूमी यांचे एक महत्त्वपूर्ण, अविभाज्य आणि विलोभनीय अंग बनली आहे.

## मराठी एकांकिकेची परंपरा

नाटक आणि एकांकिका हे नाट्यलेखन प्रकार एका मर्यादेपर्यंत समान तत्त्वांशी बांधलेले आहेत त्यासोबतच ते स्वतंत्र आणि स्वयंपूर्णही आहेत. तसे पाहता मराठी नाटक लेखनाला दीड–पावणे दोनशे वर्षांची लिखित परंपरा आहे. एवढी दीर्घ परंपरा मराठी एकांकिका लेखनाला नाही हे पाहता एकांकिका लेखन प्रकाराच्या आरंभापर्यंत जाणे आवश्यक ठरते.

एकांकिका लेखनाची परंपरा पाहता स्वातंत्र्यपूर्व काळात एकांकिका लेखनाला सुरुवात झालेली आहे. असे असली तरी एकांकिका लेखनाला नेमकी दिशा नव्हती. तत्कालीन जे एकांकिका लेखने झाली ती संस्कृत आणि इंग्रजी नाट्यवाङ्मयाशी निगडित होती. गत कालात डोकावून पाहिले तर 'दश–रुपक' या नाट्यसंकल्पनेमध्ये 'उत्सृष्टिकांक' नावाची अंकसदृश्य रचना आहे. रूपकाच्या भाण, वीथी, व्यायोग आणि उत्सृष्टिकांक हे चार रूपक प्रकार एकांकी असून प्रहसन एकांकी तसेच दोन अंकी असते. संस्कृत नाटकाच्या काळातील एकांकिकेमध्ये मुख संधी–कथाबीजाचे रोपन–प्रतिमुखसंधी–अंकूरदशा प्राप्त होणे, निर्वाहसंधी–फलप्राप्ती अशा त्रिफलासंधीमुळे एकांकिकेचे गतीमानता हे महत्त्वपूर्ण लक्षण स्पष्ट होते. या संस्कृत दशरूपकातील 'उत्सृष्टिकांक' नावाची अंकसदृश्य रचना देखील एकांकीच आहे. नंतरच्या काळात तंजावर नाटक निर्माण झाले. त्यामध्ये एकांकिका रचना, तिचे दीर्घ नाटकाहून असलेले वेगळेपण, तिची प्रयोगक्षमता याची जाणीव होती हे 'पार्वतीकल्याणम्' या एकांकिका लेखनावरून समजते. असे असले तरीही तंजावरी एकांकिका लेखनाची परंपरा मराठीत आली नाही.

इंग्रजी सत्ता आणि पाश्चिमात्य शिक्षणामुळे त्यांच्या अन्य वाङ्मयसह नाटकाचादेखील भारतीयांना परिचय झाला. यामध्ये एकांकी नाट्यलेखनाचा देखील अंतर्भाव होता. सुरुवातीच्या काळात नाट्यवाङ्मयाकडे तितकेसे गांभीर्याने पाहिले गेले नाही. त्यामुळे सहाजिकच एकांकिका लेखनाकडे देखील दुर्लक्ष झाले. मराठीत एकांकिका निर्मिती ही इंग्रजीतील 'फार्स' च्या धर्तीवर पूर्वावस्थेतील एकांकिका म्हणण्याऐवजी एकांकी नाटक असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

## एकांकिका लेखनाचा पूर्वरंग

मराठी एकांकिका लेखनाच्या बाबतीत प्रारंभीच्या काळात अनुवाद–रूपांतर स्तरावर काही प्रयत्न झाले ते एकांकिकेच्या जवळपास जाणारे होते. काहींनी अनुवादाची कास न धरता स्वतंत्रपणे एकांकिका लेखन केले. त्यामध्ये राम गणेश गडकऱ्यांचे 'दीड पानी नाटक' आणि 'सकाळचा अभ्यास' हे लेखन अनुवादित नव्हते. पुढे संस्कृत नाट्यपरंपरेशी नाट्यलेखनाची तुटलेली नाळ आणि आंग्ल आणि परभाषीय नाट्यलेखनाचा प्रभाव, परिणाम

मराठी नाटकांवर झाला. यापासून प्रेरित होऊन आणि मराठी रंगभूमीची गरज ओळखून वरेरकर, रांगणेकर यांनी काही प्रमाणात एकांकिका लेखन केले. त्यांच्या बरोबरीने व्यंकटेश वकील, दत्तू बांदेकर, शं.बा. शास्त्री, गद्रे आदींनी देखील या प्रकारात लेखन केले  असले तरीही एक स्वतंत्र नाट्यलेखन प्रवृत्ती निर्माण व्हायला हवी होती, तिचे जोपासन व्हायला हवे होते तसे स्वातंत्र्यपूर्वकाळात मात्र घडले नाही. एक विशेष बाब म्हणजे पूर्वीचे पाच–सहा अंकाचे नाटक तीन अंकावर आले. नंतर तीन अंकाऐवजी तीन स्वतंत्र अंक लिहून–प्रयोग करून पाहुया, एवढ्यापुरत्या प्रयोगांची मर्यादा होती. यावरून स्वातंत्र्यपूर्व काळात एकांकिका वाङ्मयप्रकार किंवा कला प्रकार हाताळण्याची दृष्टी क्षीण होती.

'वन ॲक्ट प्ले' ही संकल्पना आंग्ल भाषेतून मराठीत आली. एकांकिका या नाट्यातील 'अंक' या शब्दाचे नाते संस्कृत नाट्यलेखनातील अंकाशी नसून इंग्रजीतील 'वन ॲक्ट प्ले'शी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात वाङ्मयीन प्रेरणा आणि रंगभूमी प्रेरणा असे विभाजन होत गेले आणि रंगभूमी प्रेरणेची जाण यायला काही काळ जावा लागला. १९५१ च्या 'मुंबई भारतीय विद्याभवन' संस्थेच्या एकांकिका स्पर्धा नाट्यलेखक मंडळींना आव्हान आणि आवाहन करणाऱ्या ठरल्याने एकांकिका लेखनाला स्वत:ची दिशा सापडली, आकार सापडला तेव्हा एकांकिका लेखनाचे अंर्तबाह्य रूप पालटले. यातून एकांकिका लेखनाला एक सूत्र सापडले; ज्यातून एकांकिका लेखनाला उत्तम प्रयोगरूप मिळून योग्य ती मान्यता मिळते हेदेखील स्पष्ट होत गेले. याला अनुसरून वाङ्मयमूल्यांचा आणि रंगभूमीमूल्यांचा परस्पर संबंध अधिकाधिक स्पष्ट होत गेला. पुढे याच सूत्र लेखनातून वीस–पंचवीस वर्षातले एककेंद्री, एकरसात्मक, एकसंस्कारित होत गेले आणि स्वतंत्र नाट्यकृती म्हणून एकांकिकेचे अस्तित्वात मान्य झाले. याच काळात एकांकिकेचा प्रवासही स्थूलाकडून सूक्ष्माकडे होऊ लागला. आपल्या अनुभवाविष्काराचे माध्यम म्हणून लेखकाने एकांकिकेला आपलेसे केले यातून अनुभवाशी व स्वत्वाशी इमान राखून एकांकिका व्यक्त होऊ लागली.

## स्वातंत्र्योत्तर काळातील एकांकिका

स्वातंत्र्योत्तर काळात नवकथा, नवकविता, नवकादंबरी आदी समकालीन वाङमयप्रकारात घडत असलेली प्रयोगशिलता, नवतेची जाण, त्यांना लाभत असलेला स्वागतशील प्रतिसाद आदी सकारात्मक बाबी एकांकिका लेखनाला प्रेरित करणाऱ्या ठरल्या. तात्कालीन आर्थिक स्थितीची भेसूरता, सामाजिक आणि कौटुंबिक प्रश्नांची वाढती गुंतागुंत, यातून निर्माण होत गेलेला मूल्यसंघर्ष या सर्वांमुळे जीवनाला येऊ घातलेले अस्थिरतेचे स्वरूप आदी परिस्थिती लेखकाला अंतर्मुख व्हायला भाग पाडीत होती. एकंदरीत मराठी वाङ्मय चेहरा बदलू पहात होती. तात्कालीन कालखंडातील प्रकारांना मिळणारा प्रतिसाद हा एकांकिका लेखनाच्या पृथगात्मक आणि स्वत्त्व जाणिवेस कारण ठरला.

मराठी एकांकिका लेखनाला खऱ्या अर्थाने पृथगात्मतेची जाणीव विजय तेंडुलकरांच्या एकांकिका लेखनापासून आली. याच काळात वि.वा. शिरवाडकर, वसंत कानेटकर, जयवंत दळवी यांच्या बरोबरीने गंगाधर गाडगीळ, पु.ल. देशपांडे आदींचे एकांकिका लेखन एक चांगले परिमाण देणारे ठरले. सोबतच बा.सी. मर्ढेकर, पु. शी. रेगे, चिं.त्र्यं. खानोलकर यांच्या एकांकिका लेखनाने एकांकिका प्रवाहाच्या सशक्तपणात आणखी भर घातली. एकांकिका नाट्य प्रकाराचा लेखन विस्तार मर्यादित वेळेचा असल्याने त्यातल्या संवादाची, अंत:शक्ती, ताकदीची आणि सशक्त असावी लागते. असे असले तरी याकडे एकांकिका लेखकांचे थोडे दुर्लक्ष झाले. अधिकाधिक संवादातून गोष्ट सांगण्याच्या आवर्तात तात्कालीन लेखक अडकून राहिले. त्यामुळे समग्र नाट्यातील सूक्ष्मता, व्यक्तींच्या मनोव्यापारचे विश्लेषण, आशयातील घनता–व्यामिश्रता मूळ लेखनबिंदूपासून दूर राहिली.

१९६० ते १९८० या काळात नव्या जाणिवेने आणि एकांकिका लेखनाची अंर्तबाह्य स्वरूप बदलण्याचे यशस्वी प्रयत्न महेश एलकुंचवार, अनंत काणेकर, सतीश आळेकर, वृंदा दंडवते, गो. पु. देशपांडे, सुहास तांबे आदींनी मराठीएकांकिका विषय – आशय, आविष्कार तंत्र यांच्या जोखडातून मुक्त केले. एकांकिका हा केवळ वाङ्मयप्रकार नसून आपला अनुभव नाट्यमाध्यमातून अगदी थोड्या अवकाशात व्यक्त करण्याचे साधन आणि साध्य आहे याची जाणीव पुन्हा एकदा यायला लागली. या काळातील एकांकिका जीवनातील वास्तवांना सामोरे जाण्याचा प्रयत्न करते. यासाठी शब्द–संवादाची अलंकारिक भाषेची चाकोरी सोडून भावलेले शब्द आणि तंत्रात ती व्यक्त होते. विशेष म्हणजे आळेकरांनी रंगभाषेतून नाट्यलेखन करायला आरंभ केल्याने एकूण मराठी एकांकिकेला एक नवे परिमाण लाभले.

## दलित एकांकिका

गत काही वर्षापासून दलित जीवनविषक प्रश्न घेऊन एकांकिका लेखन बऱ्याच प्रमाणात झाले. इतर वाङ्मय प्रकारांच्या तुलनेत एकांकिका लेखनाचे प्रमाण जरी कमी असले तरी मानवमुक्तीचा लढा जोरकसपणे नाट्यलेखनातून मांडताना नाट्यलेखक दिसतात. यामध्ये दया पवार, गंगाधर पानतावणे, इ.मो. नारनवरे, रामनाथ चव्हाण, भि.सि. शिंदे, प्रेमानंद गज्वी, दत्ता भगत, कमलाकर डहाट, प्रा. अविनाश डोळस, प्रभाकर दुपारे, अमर रामटेके, टेक्सास गायकवाड आदींनी एकांकिका लेखनाचा सशक्त प्रवाह निर्माण केला.

## मराठवाडा – विदर्भातील एकांकिका लेखन

नव्वदच्या दशकात मराठी एकांकिका लेखनाचा विचार करता एक गोष्ट ध्यानात घ्यावी लागते ती म्हणजे विविध स्पर्धांच्या निमित्ताने एकांकिका लेखन केले जाऊ लागले. विविध विषय, आशय, यामध्ये दलित, ग्रामीण, स्त्रियांचे प्रश्न, भटके विमुक्त जाती–जमाती यांचे प्रश्न एकांकिकेच्या माध्यमातून मांडले जाऊ लागले. यामध्ये डॉ. रुस्तुम अचलखांब, प्रा.रा.रं. बोराडे, यादव गायकवाड, बलभीम तरकसे, डॉ. ऋषीकेश कांबळे , डॉ. विलास भद्रे, प्रा. दिलीप महालिंगे, प्रा.डॉ. लक्ष्मण देशपांडे, बाळकृष्ण धायगुडे, नाथा चितळे, बसू कानडे, रेखा बैजल, अरविंद जगताप, डॉ. सुधीर निकम, डॉ. सतीश पावडे, शैलेश गोजमगुंडे, डॉ. प्रकाश त्रिभुवन, शिल्पा मुंब्रीकर, भगवान हिरे, प्रेषित रुद्रावार, प्रा. विलास पाटील, प्रा.डॉ. हरीशचंद्र बोरकर, डॉ. हिरामन लांजे, प्रा. विलास भवरे, संजय जीवने, अनुपमा नगरकर, आनंद गायकवाड, वंदना जीवने, प्रा. एकनाथ आबुज, महेंद्र खिल्लारे, प्रा.डॉ. अंबादास कांबळे, प्रा.डॉ. अनिल साळवे, असिफ अन्सारी, प्रा. डॉ. सिध्दार्थ तायडे, अमोल पानगुडे, संतोष गायकवाड, दिनेश मोरे, रावबा गजमल, राजीव वाघमारे, मदन मिमरोह, अशिष इथापे, महेंद्र सुके, डॉ. सिद्धार्थ तांबे, जॉनी मेश्राम, सिद्धार्थ मोरे आदी नाट्यलेखक व रंगकर्मींनी एकांकिका प्रवाह अविश्रांत प्रवाहित ठेवलेला आहे.

## सारांश

एकांकिका लेखनाचे मूळ संस्कृत साहित्यात सापडत असले तरी इंग्रजी भाषेतील 'वन अ‍ॅक्ट प्ले' ही संकल्पना आधुनिक मराठी एकांकिका लेखनाचा मूळ स्त्रोत आहे.

मराठी एकांकिका ही अनेक पश्चिमात्य भाषा आणि अन्य परभाषिय नाट्यलेखनांचा प्रभाव घेऊन सिद्ध झाली आहे.

एकांकिका लेखनाला ख–या अर्थाने पृथगात्मतेची, स्वत्वाची जाणीव आणण्याचे कार्य विजय तेंडूलकरांच्या एकांकिका लेखनाला द्यावे लागते.

१९५०–६० या काळात बा.सी. मर्ढेकर, पु.शी. रेगे, चिं.त्र्यं. खानोलकर यांचे लेखन एकांकिका प्रवाहाला सशक्त करणारे आहे.

१९६० –७० च्याकाळात एकांकिका लेखनात महेश एलकुंचवार, सतीश आळेकर, आदींनी नव्या जाणिवेचा आविष्कार केला.

१९७० च्या पुढे दलित रंगभूमीचा प्रवाह जाोरकसपणे आला. लेखक आपल्या अनुभवाविष्कारातून दलितांचे प्रश्न घेउन एकांकिका लेखन करू लागले.

नव्वदच्या दशकात मराठी एकांकिका लेखनाचा विचार करता विविध स्पर्धा आणि चळवळीच्या अनुषंगाने जोमदार एकांकिका लेखनाचा प्रवाह जोरकसपणे निर्माण झाला.

आज विविध एकांकिका स्पर्धाच्या निमित्ताने एकांकिका लेखन विविध विषयांवर आपले अनुभवाविष्कारण करण्यासाठी एकांकिका लेखनाकडे समाजरंजनातून प्रबोधनाचे एक सशक्त माध्यम म्हणून या वाङ्मयप्रकाराकडे पाहत आसल्याचे दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ

१. धूर आणि इतर एकांकिका – अनंत काणेकर, व्हिनस प्रकाशन, पुणे, १९७०
२. एकांकिका वाटचाल – संपादक प्रा.श्री.र. भिडे, प्रा.व.दि. कुलकर्णी, प्रा. भालबा केळकर, सौमैया पब्लिकेशन, प्रा. लि. मुंबई, १९९६.

३. मराठी नाट्यसृष्टी– गो.म. कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९३.
४. मराठी रंगभूमीचा पूर्वरंग– कृ.बा. मराठे श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९३
५. प्रदक्षिणा खंड २ भाग दुसरा कान्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
६. दलित साहित्य आणि चळवळ डॉ. कृष्णा किरवले प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००६
७. नाट्यवैभव– संपादक प्रा. यादव गायकवाड, प्रा. पृथ्वीराज तौर, संस्कारभारती प्रकाशन, लातूर, २००९
८. अखिल भारतीय दलित नाट्यसंमेलन पाच अध्यक्षीय भाषणे – संपादक प्रा. त्र्यंबक महाजन, डॉ. कमलाकर गंगावणे, प्रा. साहेबराव गायकवाड, अनुपमा नगरकर, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५.

❖❖❖

# कवी विठ्ठल वाघ यांच्या कवितेतील कृषी संस्कृतीचे दर्शन

प्रा.डॉ. श्याम मु. जाधव
सहयोगी प्राध्यापक तथा मराठी विभाग प्रमुख
कला, वाणिज्य महाविद्यालय, जरूड
भ्रमणध्वनी ९१५८७०१९८७, इ मेल shyamjadhao3@gmail.com

वैदर्भीय कवी विठ्ठल वाघ यांची कविता पारंपरिक कवितेपेक्षा अत्यंत वेगळी अन आधुनिक परिस्थितीवर आधारलेली आहे. बहिणाबाईच्या कवितेनंतर जी प्रादेशिक प्रतीके निर्माण झालीत ती विठ्ठल वाघांच्या कवितेतून आढळून येते. हेच विशेष इथे लक्षात घ्यावे लागते. त्यांच्या कवितेत लोकगीताचे यर्थार्थ (जीवनसत्त्वाचे) आकर्षण, आदिम जीवन धारणाचे आणि लोकमानसांचे मनोज्ञ दर्शन ग्रामीण बोलीतील कवितेने घडविले आहे. वऱ्हाडी भाषेचे अंत:करण ते खुल्या दिलाने गाऊ लागलेत. शेतकऱ्याच्या जीवनावरची सर्वच स्थरांतील चित्रे विठ्ठल वाघांच्या कवितेतून, स्वाभाविक बोलीतून सहजपणे सजग झालेली आपणांस दिसून येतात. हे मातीचं सांगणं आहे. त्यातील अणूरेणूतून सच्चेपणे प्रगट होतो. लोकगीत व लोकगायक यांना सांधणारी त्यांची कविता आहे. सामान्य शेतकऱ्यांच्या जीवनातील सामाजिक वास्तवाचे भान कवितेने राखलेले आहे. ग्रामीण जीवनाचे वास्तुनिष्ठ दर्शनही घडविले आहे. त्यांच्या कवितेतून त्यांची प्रखर सामाजिक जाणिवांची, कृषीविषयक संवेदनाची आणि राजकीय भाष्यांची कविता संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या अतिशय मोठी आहे. सौदर्यानुभव आणि दु:खाच्या जाणिवांचे सम्यक आकलन या दोन सामर्थ्यांचा पट त्यांच्या कवितेने पेलला आहे. कृषी संस्कृतीचे रसज्ञ दर्शन भावेत्कटरीतीने विठठल वाघ यांच्या कवितेतून घडते. भांडवली अर्थव्यवस्थेत सामान्य शेतकरी कसा भरडला जातो –

''पास लाऊन कुणाचा चाले वखर
ढेकल्यावाणी आम्ही होतो चुरचुर''

अशी अवस्था शेतकऱ्यांची आहे. काळ्या मातीत जन्मलेला अन त्याच काळ्या मातीत वर्षोगणती सतत मेहनत करणाऱ्या शेतकऱ्याच्या जीवनात गरिबीचा अंधकार अन अज्ञानाचं साम्राज्य अजून संपलेलं नाही.

''आम्ही जन्मलो मातीत, किती होणार गा माती
खापऱ्यांच्या दिव्यामंधी कधी पेटणार वाती।''

शेतातील कृषी उत्पादन घेऊनही अंगभर वस्त्र अन् पोटभर भाकर त्याला मिळत नाही. अशा वेळी पोटातील आग अंगभर होते अन् अणकुचिदार फलकट डोळ्यासमोर येतात. क्रान्तीची भावना उफाळून येते. म्हणून कवी म्हणतात,

''कोण सांगावं तिले रगत लागणार किती।''

शेतकऱ्यांचे राज्य कधी येईल. त्यासाठी शेतकऱ्यांना आपल्या रक्ताचे किती बलिदान करावे लागेल हे त्याला कळून येत नाही. म्हणून समग्र शेतकरी क्रान्तीशिवाय परिवर्तन होणे शक्य नाही हे ते आर्वजून सांगतात. त्यासाठी माणसांतील माणूसपण जागे होणे हे अत्यंत आवश्यक आहे. परंतु आज माणसांचे माणूसपणच हरवलेले आहे म्हणून आजच्या माणसाविषयी अवगुणासंबंधी विठ्ठल वाघ म्हणतात,

''बोरी बाभुईचा काटा असा वाढला माणूस
मानुस्कीचा ना दाणा कानी पडलं काणूस''

त्यांच्या अंत:करणांत माणसाविषयीचा जिव्हाळा उरला नाही. रानांतील विहीर जशी कोरडी व्हावी तसं माणसांचं अंत:करण झालं आहे. त्यांने माणूस होण्याचा कधी प्रयत्नच केला नाही.

''याच मन वारूयाचं उदयीन पोखरंल
फनकटीच आखरं जल्मात ना वखरल ''

पुढे तो त्या माणसाविषयी म्हणतात की,

''यांच्या आंगा आंगावर उभे साणकीचे काटे
पापऱ्याईच्या केसात बन चिलाटीच दाटे''

असे माणसांच रूप पाहून वागणं वाहून आभाळालाही दु:ख होतं.

''याच्यासाठी अभायही लळे ढगाच्या डोयानं
उरं धरनीच फाटे याचे अगून पाहून''

आजचा माणूस कसा बदलता झाला हयाविषयी बोलतांना अतिव दु:खाने कवी म्हणतात.

''कसा झाला हा मानूस कळू निंबाचा रे पाला
येल काकळीचा होता बार कारल्यांचा आला''

अशा ओळींतून कवीच्या वेदना ढसढसताना जाणवते. त्यांची 'म्हैस' कविता खेड्यातल्या आजच्या अनेक समस्यांचे प्रतिनिधित्व करते. आजचे खेडे बदलले आहेत. कवी विठ्ठल वाघ यांनी आपल्या कवितेतून स्त्रियांच्यावरील अन्यायाला त्यांनी वाचा फोडली आहे. राजकर्त्यांवरील बेभरवसा नामर्दपणा, कोणावर निष्ठा ठेवावा असा निष्ठावान माणसाचा अभाव याचे विदारक चित्र विठ्ठल वाघ यांनी कवितेतून स्पष्टे केले आहे.

कवी विठ्ठल वाघ यांची कविता ग्रामीण जीवन अभिव्यक्त करण्यांत यशस्वी झाली आहे. 'साय' आणि 'काया मातीत' या संग्रहातील कविता विनोद अथवा चमत्कृतीपासून अलिप्त असून हळूवारपणे ग्रामीण जीवनांचा प्रत्यय घडविते. प्रेम आणि ग्रामीण निसर्गात त्यांची कविता रमलेली असली तरी त्यांची कविता 'तिफन' मात्र लोकप्रिय आहे.

''काया मातीत मातीत तिफन चालते, तिफन चालते
ईज नाचते थयथय, ढग ढोल वाजवते
तिफन चालते
नंदी बैलाच्या जोडीले सदाशीव हकालते
वटी बांधून पोटाले पारावती उनारते
वटी पोटाले टांगते त्यात तानुले लळते
त्यात तानुंल लळते ढग बरसते
तिफन चालते''

त्याच पमाणे त्यांच्या 'खळवायी' या कवितामध्ये शेतकऱ्यांचा अत्यंत भेदक प्रश्न उभा केला आहे.

''खंडीनं पळती जवारीचा रासा
अंगाले झोंबते जीवघेणा भूसा
वर्सातून पोया काय त्या गोळी?
मरमर मरा दिवस न रांत
मातीतला जीव जानार मातीत
काय म्हणाव ही रीतभात झाली?''

असं मातीविषयीचं, शेताविषयीचं त्यांचं प्रेमच अपारतेच आहे. त्याच शेतच हेच त्यांच तीर्थ आहे. पंढरपूर आहे.

''अखांळीले जारे तुम्ही माहावावर पंढरी
हल्ले भळाच्या पानांत झेंडी इठोबांची खरी''

कवी विठ्ठल वाघ म्हणतात की चंद्रभागेची आंघोळ माझ्या नशिबांत नाही अशी त्यांची आस्था आहे. पण ते म्हणतात की एकवेळा कां रूक्मीनी मोटेखाली जर आंघोळीला बसली तर तिला चंद्रभागेची आंघोळ आवडणार नाही. त्यांच्या मातीचं मोठेपण किती मोठं आहे हे सांगतांना म्हणतात की,

''अशी कायी माती माही साता जलमाची माय
तुका तसा पांडुरंग रंगवून घे कपाय''

आभाळ बरसत नाही त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. त्याला त्याची चिंता आहे.

''ढग आले, गरजले, कोन्या सटवाईले बुजावले
चज वाद्यावानाचे आले तसेच पलटले''

आभाळावर त्यांची सारी भिस्त आहे. शेती पिकावी, चांगला कापूस पिकावा कारण पैसा देणार पिक आहे. परंतू कापूस वेचताना,

''पऱ्हाटीच्या नख्खीतून । आला कापूस फुलून
पाची बोटावर किस्न। लोनी राहीला झेलून''

त्यांच्या खळवायी या कवितेत शेवटी क्रान्तीची भाषाच चांगल्याप्रकारे दिसून येते.

''कोनं जाने कधी फुटनार वाचा
वेदात येतील नव्या नव्या ऋचा
त्याचसाठी शाई रगताची लाल.....''

वऱ्हाडी बोलीमध्ये काव्यरचना करणाऱ्या कवी विठ्ठल वाघ यांच्या कवितेतून निसर्ग ग्रामजीवन अधिक वास्तव स्वरूपात चित्रित होते. त्यांच्या कवितेला लोकगीताची लय लाभलेली आहे. लोकसाहित्याचा अभिजात संस्कार प्राप्त असलेली त्यांची कविता लोकसमूहाचे आकलन मांडण्याचा यशस्वी प्रयत्न करते. कवी विठ्ठल वाघ यांची कविता खरी माणसाची कविता आहे. त्यांच्या कवितेतून शेतीच्या ग्रामीण समस्यांचे वास्तवाचे प्रगटीकरण करणारी आहे. साहेबराव पाटील ही कवी विठ्ठल वाघ यांची महत्वाची कविता आहे. या कवितेतून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या दु:खाचे भाव प्रगट करणारी ही कविता आहे. या कवितेतून शिकलेल्या मित्राने आपल्या मृत शेतकऱ्यांशी अपराधी भावनेने केलेला संवाद या कवितेतून आहे. शिकल्यामुळे व शेती करण्यामुळे दोघात पडलेल्या अंतराची जाणीव आहे. विहिरीचे आटणे, दुष्काळ आणि पाऊस पाण्यापासून निराश झालेला शेतकरी शेतात रगत ओकून हाताशी काहीही येत नाही तेव्हा ईख पचवून तो आत्महत्या करतो. परंतु “भारत हा कृषिप्रधान देश आहे, कृषि तुहया जीनगानीची एकमेव खुशी, वंदे मातरम, सुजलाम सुफलाम, मलयज शितलाम अशी असतानाही साहेबराव पाटील असं काहून होत असीन, काहून माहे हात मलेच वाघाच्या पंजावानी दिसत असतीन?’’ अशी ही शेतक—याची दिनवानी अवस्था कवी विठ्ठल वाघ यांनी साहेबराव पाटील या कवितेतून मांडली आहे. कवी एवढ्यावरच थांबत नाही तर, शेतकऱ्याला आव्हान करतात की,

“आता कापूसजवारी पेरसान त लेकहो हराममौतीन मरसान
आता पेरा तासातासान लोखंडी दगळी गोटे
चारी मेरीन बाभुईचे खमंग काटे......”

अशाप्रकारे कवी विठ्ठल वाघ यांच्या कवितेतून ग्रामीण शेतकऱ्यांच्या कृषीविषयक समस्यांचे प्रगटीकरण आपल्या कवितेतून केले आहे.

❖❖❖

# संत बहिणाबाई

प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे
मराठी विभाग प्रमुख,
श्रीमती राजकमल बा. तिडके महाविद्यालय, मौदा, जि. नागपूर 441 104
निवास – 'Progressive Heritage', Flat No. 201, Plot No. 46,
A/ Ramana Maroti Nagar, Nagpur- 440 024
भ्रमणध्वनी 9422816697, इ मेल vyankateshpotfode28@gmail.com

संत बहिणाबाईचे चरित्र अनेक बाबतीत अद्वितीय आहे. तिच्या जीवनात ज्या विविध प्रकारच्या गोष्टी घडल्या तशा प्रकारच्या गोष्टी इतर कोणत्याही स्त्री–संतांच्या चरित्रात घडलेल्या नाहीत. त्या वाचकाला चिंतन करायला लावतात.

## जन्म व बालपण

बहिणाबाईंचा जन्म शके १५५१ मध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील वेरूळच्या पश्चिमेस असलेल्या देवगाव (रंगारी) येथे झाला. तिच्या वडिलांचे नाव आऊदेव आणि आईचे नाव जानकी असे होते. ते देशस्थ ब्राह्मण होते. तिचे सासर शिऊर ता. वैजापूर येथील होते. वीरेश्वर नावाच्या ज्योतिषाने तिची पत्रिका करून सांगितले की या मुलीच्या योगाने तुमचे कल्याण होईल.

## विवाह व संसार

बहिणाबाई सात आठ वर्षे वयाची म्हणजे तत्कालीन रिवाजाप्रमाणे लग्नाची झाली. तिला रत्नाकर पाठक या तीस वर्षे वयाच्या माणसाने लग्नाची मागणी घातली. त्याची पहिली बायको वारली होती. त्यांचा विवाह संपन्न झाला. रत्नाकर ज्योतिष कथनाचा व्यवसाय करीत असे.

'कन्यादान घडो हा अर्थ पाहोन। करावया लग्न व्दिज आले ।।१।।
तव अकस्मात प्राक्तनासारिखा । सिऊराचा सखा येक आला ।।२।।
पूर्विल सोयरा लग्नाचा इच्छक। विवके (की) पाठक रत्न नामी ।।३।।
लाऊनी मागणे केले वाक्प्रदान । नेमुनिया लग्न संपादिले ।।४।।

यानंतर चार वर्षांनी तिचे वडील व त्यांचे एक गोत्रज यांच्यात इस्टेटीबाबत तंटा उत्पन्न झाला. आऊदेवांनी आपल्या जावयाला, रत्नाकरला कळवले. त्या गोत्रजाने आऊदेवांना कैद केले होते. रत्नाकरने त्यांना सोडवले. मग मध्यरात्री ते सर्व घर व गाव सोडून गोदा–प्रवरा संगमावर आले. तेथून महादेव वनात जाऊन नरसिंह दर्शन घेतले. तेथून पंढरपूरला गेले. तेथे पाच दिवस मुक्काम केला. नंतर ते शिंगणापूर व तेथून रहिमतपूरला आले. हे कुटुंब भिक्षेवर आपला चरितार्थ चालवत असे. रहिमतपूरच्या उपाध्यांना काशीला जायचे असल्यामुळे त्यांनी आपली वृत्ती चालविण्याची जबाबदारी रत्नाकरवर सोपवली. एक वर्षानंतर उपाध्येबुवा काशीहून परतले. त्यांनी आणखी एक वर्ष या कुटुंबाचा निर्वाह चालवला. यावेळी बहिणाबाई अकरा वर्षांची झाली होती. रहिमतपूर सोडून हे कुटुंब कोल्हापूरला आले. तेथे बहिरंभट ब्राह्मणाच्या घरी बिऱ्हाड करून राहिले.

## गोवत्स चमत्कार

एकदा बहिरंभटाला एक सवत्स गाय दान मिळाली. पण अकराव्या दिवशी रात्री स्वप्नात त्याला दृष्टांत झाला की ती गाय व वासरू तुझ्या बिऱ्हाडी राहणाऱ्या कुटुंबाला तू देऊन टाक. त्याप्रमाणे त्याने गाय–वासरू बहिणाबाईच्या कुटुंबाला देऊन टाकले. त्या वासराला बहिणाबाईचा इतका लळा लागला की क्षणभरही ते तिला सोडेना. एकदा बहिणाबाई जयराम गोसाव्यांच्या कीर्तनास गेली होती. तेथेही ते वासरू तिच्याजवळ जाऊन बसले. लोकांनी त्याला तिथून बाहेर हाकलले. बहिणाबाई रडू लागली आणि वासरू आर्त टाहो फोडू लागले. जयरामांनी त्याला परत आणून बहिणाबाईजवळ बसवले. बहिणाबाईंनी त्यांच्या पायावर डोके ठेवले. ते पाहून वासरानेही त्यांच्या पायावर डोके ठेवले. हा प्रकार रात्री रत्नाकरच्या कानावर पडला. तो संतापला व त्याने बहिणाबाईस बेदम मारले. रत्नाकरचा हा क्रूरपणा पाहून घरमालक हिरंभटाने त्यांना 'ताबडतोब घर खाली करून निघून जाण्याची

आज्ञा दिली. पण यांच्या विनवणीवरून त्यांना त्या रात्री राहण्याची अनुमती दिली. यानंतर बहिणाबाई, गाय व वासरू यांनी निर्जल उपवास सुरू केला. लोकांनी ही हकिकत जयराज स्वामींच्या कानावर घातली. ते हिरंभटाच्या घरी आले. त्यांनी रत्नाकरची समजूत काढली. हिरंभटांनीही यांना आपल्या घरी राहण्याची अनुमती दिली. त्यानंतर एक दिवस हिरंभटाने 'मूकं करोति वाचालम्' हा श्लोक म्हटला तर त्या वत्साने 'यत्कृपा त्वमहं वंदे' हा त्या श्लोकाचा उत्तरार्ध मनुष्यवाणीने स्पष्ट उच्चारला ''ही गोष्ट लोकांनी प्रत्यक्ष पाहली व ते आपापसात त्या संबंधाने बोलत असता वत्साने अकस्मात प्राण सोडला.''[१] बहिणाबाई लिहितात की भ्र्ताराने मला माझी मोट बांधून मारले त्याचे दु:ख त्या वत्सात होऊन त्याने हा प्राणत्याग केला.

## बहिणाबाईला संत तुकोबांचा ध्यास

ते वासरू मेल्यावर त्या दु:खाने बहिणाबाई चार दिवस मुर्च्छित पडून होत्या. चौथ्या दिवशी एक ब्राह्मण स्वप्नात येऊन त्यांना म्हणाला, ''बाई, सावध व्हा' हे शब्द ऐकताच शुद्धीवर येऊन त्यांनी डोळे उघडले आणि त्या तुकारामबुवांचे गोड अभंग गाऊ लागल्या. आता त्यांना तुकोबांच्या दर्शनाचा ध्यास लागला. हा ध्यास इतका उत्कट होता की जणू पाण्याविना मासळीच तडफडावी.

''मत्स्य जैसा जळावाचुनी तरफडी । तैसी ते आवडी तुकोबाची ।।
अंतरीचा साक्षी असेल जो प्राणी । अनुभवे मनी जाणेल तो ।।
तृषितांसी जैसे आवडे जीवन । तैसा पिंड प्राणावीण तया ।।
बहिणी म्हणे हेत तुकोबाचे पायी । ऐकोनिया देही पदें त्याची ।।

बहिणाबाईने तुकारामांना मनोमन सद्गुरू मानले. ध्यानी, मनी, स्वप्नी तिला तुकोबाच दिसू लागले. तुकोबांनी तिला मनोमय दर्शन दिले आणि 'तुम्ही आता येथे राहू नका' असा आदेश दिला.

## भ्रताराचा पत्नीच्या त्यागाचा निश्चय

तुकोबांनी दिलेले दर्शन व आदेश याची गावभर चर्चा पसरली व बहिणाबाईच्या दर्शनासाठी लोकांच्या झुंडी लोटू लागल्या. ते पाहून बाईच्या भ्रताराचे मस्तक अगदी भणाणून गेले, तिच्याविषयीचा तिरस्कार विकोपाला गेला. कारण त्याला वाटले की आपण वेदपठण करणारे ब्राह्मण आणि तुकाराम हा तर शूद्र. त्याने माझ्या बायकोस स्वप्नात दर्शन दिले, त्यामुळे ती बिघडली. त्याला असेही वाटले की लोक आता तिला नमस्कार करणार आणि ती मला तृणवत लेखतील. लोक तिला उच्च व मला नीच मानतील. जमलेले लोक हिचीच विचारपूस करत आहेत आणि मला मात्र कुणी ढुंकून देखील विचारत नाही. तिला गोसावीबाईण या प्रतिष्ठित नावाने संबोधतात आणि माझे कुणी नावही घेत नाही. या सर्व प्रकारामुळे त्याला इतके वाईट वाटले की त्याने तिचा त्याग करून वनात जाण्याचा निश्चय केला.

मग सासूसासऱ्यास नमस्कार करून तो त्यांना म्हणाला, ''माझी पत्नी तीन महिन्यांची गरोदर आहे. हिला देवपिसे लागले आहे. म्हणून हिची चांगली काळजी घ्या व हिचे वेड घालवण्याचा प्रयत्न करा. मजविषयी म्हणाल तर आता हिचे तोंड पाहण्याची माझी इच्छा नाही.

''न पाहे मी मुख सर्वथा इयेचे । हीनत्व आमुचे कोण फेडी ।।
भंडिमा सोसून कोण राहे येथे । ऐसिया स्त्रियते कोण पाळी ।।
बहिणी म्हणे ऐसे बोलिला भ्रतार । मज पडे विचार मनामाजी ।।

भ्रताराचे हे बोल ऐकून बहिणाबाई अत्यंत व्यथित झाली. तिने आपल्या मनाच्या वेदना व्यक्त करणारे चार अभंग लिहिले. त्या प्रत्येक अभंगातील एक एकचरण खाली उद्धृत केले आहे.

अभंग १ – भ्रताराची सेवा तोचि आम्हा देव । भ्र्तार स्वयमेव परब्रह्म ।।
अभंग २ – भ्रतार गेलिया वैराग्य घेऊनी । पांडुरंगा जगी जिणे काय ।।
अभंग ३ – भ्रताराची सेवा पतिव्रता करी । तरी ते उद्धरी उभय कुळे ।।
अभंग ४ – भ्रतारे वैराग्य घेतलीया वरी । जीव हा निर्धारी देईन मी ।।

## भ्रताराला पश्चाताप

भ्रतार जर तिला सोडून गेला तर आत्महत्या करण्याचा तिचा निर्धार पक्का होता. पण ती वेळच झाली नाही. कारण त्याच्या शरीरास अकस्मात काही व्यथा जडली. शरीराचा दाह होऊ लागला. बहिणाबाई

त्यांच्याजवळ अहोरात्र बसून होती. त्याच्या पोटात सात दिवस अन्नाचा एक कणही गेला नाही. वेदना इतक्या असह्य होत्या की आपण मेलो तर बरे असे त्याला वाटू लागले. त्याच्या मनात विचार आला, आपण तुकोबांची निंदा केली त्याचे तर हे फळ नसेल ना? त्याने तुकोबांची मनापासून प्रार्थना केली आणि क्षमा मागितली आणि एक चमत्कार झाला. कुणीतरी एक ब्राह्मण त्याच्या घरी जाऊन त्याला म्हणाला, ''तिने अपराध काय केला आहे, याचा विचार कर. अपराधी असेल तर खुशाल तिला सोडून जा. पण ती निरपराधी असेल तर तिच्या सोबतच राहण्यात तुझे कल्याण आहे.'' भ्रताराने त्याच्या पायावर डोके ठेवले. बहिणाबाईंनीही त्या ब्राह्मणाला लोटांगण घातले. तो ब्राह्मण तात्काळ अदृश्य झाला आणि त्याच क्षणी तिच्या भ्रताराची व्यथा दूर झाली. तो आता बहिणाबाईशी चांगला वागू लागला. त्याने बहिणाबाईंच्या आईवडिलांना सांगितले की, त्या ब्राह्मणाने मला सांगितल्याप्रमाणे तुम्ही आता तुमच्या देवगावी जाऊन राहा. आम्ही दोघं अरण्यात जाऊन आमचे आयुष्य भगवद् भक्तीत घालवणार आहोत.

## दुष्ट मंबाजीचे कारस्थान

ही सर्व मंडळी तुकोबांच्या दर्शनार्थ देहू गावाकडे निघाली. मृत वासराची आई कपिला त्यांच्यासोबतच होती. सर्वांनी (इंद्रायणीत) आंघोळ करून देवळात पांडुरंगाचे दर्शन घेतले. त्यावेळी देवळात तुकोबा पांडुरंगाची आरती करत होते. त्यांच्याकडे बहिणाबाईने पाहले तर त्यांनी स्वप्नात जशी तुकोबांची मूर्ती पाहिली होती तसेच प्रत्यक्ष तुकोबा हुबेहूब दिसत होते. कोंडाजी नावाच्या एका ब्राम्हणाने त्या सर्वांना आपल्या घरी दुपारी जेवायला बोलावले. देहूला मंबाजी नावाचा एक गोसावी राहत होता. त्याचा वाडा प्रशस्त होता. म्हणून बहिणाबाईच्या भ्रताराने त्याला राहण्यासाठी जागा मागितली. त्याचा क्रोध येऊन मंबाजी त्याला मारावयास धावला व घराबाहेर हाकलून दिले.

येत्या अमावस्येला देवळात तुकोबांचे कीर्तन होते. त्याचा लाभ घ्यावा म्हणून या मंडळीने देहूलाच मुक्काम केला. तेव्हा एक दिवस मंबाजी बहिणाबाईच्या भ्रतारास म्हणाला, ''तुम्ही व तुमची पत्नी विरक्त दिसता तर तुम्ही माझे शिष्यत्व का पत्करत नाही?'' तेव्हा रत्नाकर म्हणाला, ''आम्ही आमच्या स्वप्नात आलेल्या तुकारामबाबांचे शिष्यत्व आधीच पत्करले. तुकारामांचे नाव ऐकताच मंबाजीच्या अंगाची लाही लाही झाली. तो म्हणाला, 'तुकाराम तर बोलून चालून शुद्र. त्याला ज्ञानप्राप्ती कशी होणार? तुम्ही त्या शूद्राचे शिष्य म्हणवता? ही गोष्ट ब्राह्मणांस कळवून तुम्हास वाळीत टाकीन तरच मी नावाचा मंबाजी!' आणि नंतर त्याने या मंडळीचा उघड उघड द्वेष सुरू केला.

मंबाजीने बहिणाबाईची ती गाय चोरून नेली. तिला आपल्या घरात कोंडून ठेवली आणि तिला तो सोट्याने बडवू लागला. गाय दिसेना म्हणून बहिणाबाई कष्टी झाल्या आणि तुकोबांनाही दु:ख झाले. मंबाजीने तीन दिवस गाय बांधून ठेवली होती. तिला गवत, पाणी वगैरे काही न मिळाल्यामुळे ती पार सुकून गेली. इतक्यात एक असा चमत्कार झाला की मंबाजीच्या घराला अकस्मात आग लागली. चोहोकडून लोक धावून आले आणि त्यांनी ती आग विझवली. बहिणाबाईची गाय मंबाजीने आपल्या घरात लपवून ठेवली हे पाहून लोक संतप्त झाले. त्यांनी गाय बाहेर काढली आणि ती बहिणाबाईंच्या स्वाधीन केली. याच संदर्भात आणखी एक चमत्कार घडला तो असा की तुकोबा निजून उठले तेव्हा त्यांची पाठ सुजली होती. सोट्याच्या आघाताचे वळ त्यांच्या पाठीवर स्पष्ट दिसत होते. ते बहिणाबाईंनीच नव्हे तर सर्वांनीच पाहिले.

''बहेणी म्हणे लोक बोलती सकळ । तुकोबा केवळ पांडुरंग ।।''

येथपर्यंतच्या सर्व घटना बहिणाबाईंनी अभंगातून सांगितल्या आहेत. यानंतर रत्नाकरला काही कामासाठी पुण्याला जावे लागले. बहिणाबाईंनी ओसरीत आसन ठोकले व त्या स्थितीत तीन अहोरात्र राहिल्या. त्यानंतर तुकोबा प्रसन्न होऊन त्यांनी तिला तीन मंत्र सांगितले. हा तुझा तेरावा जन्म होय असेही बोलले. बहिणाबाईंना ते जन्म आता आठवू लागले.

विवेकाने वळे वैराग्य साधले । तरी तुझे केले कास चाले ।।१।।
म्हणोनी आपुल्या ठायी तू आपण । पाहे विचारून मनामाजी ।।२।।
काम क्रोध लोभ मद हा मत्सर । तुजसवे वैर चालविती ।।३।।
बहेणी म्हणे मंत्री विवेकासारखा । जोडिला हा निका निश्चयाचा ।।४।।

वरील अभंगातून आपण विवेकाने कसे वागावे हे बहिणाबाईने सांगितले.

बहिणाबाईंच्या वयाची आता ७२ वर्षे पूर्ण झाली होती. यावेळी त्यांना सिद्धी प्राप्त झाल्या असाव्यात. कारण आपला मृत्यू याच वर्षी आश्विन शुद्ध १ शके १६२२ रोजी होणार आहे हे त्यांना १५ दिवस आधीच कळले होते. आपल्या मृत्युसमयी आपला पुत्र विठोबा आपल्याजवळ असावा असे वाटून त्यांनी त्याला पत्र पाठवून बोलावून घेतले होते. बाईंनी त्याला आपण शिवगाव इथे समाधी घेणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी बरोबर आश्विन शुद्ध १ रोजी आपला देह ठेवला.

## विवेचन

बहिणाबाईचे अभंग म्हणजे भावकविताच आहे. ''तिच्या वाणीतील मूळचा गोडवा विठ्ठलप्रेमामुळे अधिकच उत्कट झाला असल्यामुळे तिचे सारे अभंग भावमधुर बनले आहेत.''[२] असा अभिप्राय ल.रा. नसिराबादकर यांनी संत जनाबाईंच्या अभंगांच्या संदर्भात दिला आहे, तोच बहिणाबाईच्याही अभंगांना लागू पडतो.

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।१।।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।२।।
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले आवार ।।३।।
जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ।।४।।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।५।।
बहिणी म्हणे फडकली ध्वजा । निरूपण केले वोजा ।।६।।

हा भागवत धर्माचा इतिहास कथन करणारा अभंग बहिणाबाईनी रचिला आहे.

भा.ग. सुर्वे लिहितात, ''बहिणाबाईंची काव्यशैली साधी परंतु हृदयस्पर्शी अशी आहे. 'संतकृपा झाली। इमारत फळा आली। हा तिचा अभंग सुविख्यात आहे. कारण अभंगातील 'ज्ञानदेवे रचिला पाया' आणि 'तुका झालासे कळस' ह्या तिच्या ओळी चिरस्थायी झालेल्या आहेत. तिच्या आत्मकथेतून प्रांजळपणा आणि आत्मपरीक्षण ह्यांचा विलोभनीय प्रत्यय येतो.''[३]

बहिणाबाईंचे अभंग तत्कालीन स्त्रियांची मानसिकता दर्शविणारे आहेत. 'भ्रताराची सेवा पतिव्रता करी । तरी ते उद्धरी उभय कुळे।।' असे बहिणाबाई आपल्या अभंगातच म्हणतात, यावर भाष्य करताना संत कवयित्रीच्या स्त्री संवेदना या लेखात डॉ. शोभा पाटील म्हणतात, ''आपला कोणताही अपराध नसताना पती आपला त्याग करत आहे हे मनोमन माहीत असताना पतिचरणाविना दुसरा मोक्ष नाही, असे म्हणत त्याच्यासाठी आपल्या मनाची ओढ मारून टाकायची सहज तयारी करणारी बहिणाबाई पारंपारिक आंधळ्या समजुतींना परोपरीने ठेचाळत होती. क्षमा आणि सोशिकता या स्त्रीत्वाच्या बळावरच स्वत:वरच्या अन्यायाला तोंड देत होती.''[४]

एकूण बहिणाबाईचे अभंग म्हणजे प्राचीन भारतीय स्त्री–संस्कृतीचा आलेखच होय.

## संदर्भ टिपा

१. ज.र. आजगावकर – महाराष्ट्र संत कवयित्री, भारत गौरव ग्रंथमाळा मुंबई १९३९ (पृ. १०६)

२. ल. रा. नसिराबादकर – प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके बुकसेलर्स कोल्हापूर दुसरी आवृत्ती १९९६ (पृ. ८५)

३. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (प्र.संपा.)– मराठी विश्वकोश खंड ११, म.रा. विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई १९८२ (पृ. १४३)

४. डॉ. स्नेहल तावरे (संपा.)– भारतीय संतांचे योगदान, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे २०१५ (पृ. ७५)

❖❖❖

# सतीश तराळांचे कथाविश्व

डॉ. वर्षा चिखले
सहयोगी प्राध्यापक
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती
भ्रमणध्वनी ८८०६०९६६९९

## प्रस्तावना

कथा हा प्राचीनतम वाङ्मयप्रकार आहे. मराठीतील परंपरागत कथेला नीटनेटके वळण दिले ते हरी नारायण आपटे यांनी. नंतर कथेचे पात्र विस्तारत गेले. त्यात विविधता आली. ग्रामीण कथा, प्रादेशिक कथा, दलित कथा, आदिवासी कथा इ. कथा आपल्या वेगवेगळ्या वैशिष्ट्यांनी पुढे आल्या. ना.सी. फडके, वि.स. खांडेकर, श्री.म. माटे, द.ता. भोसले, रा.रं. बोराडे, अण्णाभाऊ साठे, वामन चोरघडे, उद्धव शेळके, मनोहर तल्हार, भाऊ मांडवकर, बाजीराव पाटील इत्यादी कथाकारांनी ग्रामीण जीवन ग्रामीण वास्तव एकूणच ग्रामीण संस्कृती आपल्या कथांमधून दृगोचर केली.

१९७५ च्या काळात उदयाला आलेले महत्त्वाचे ग्रामीण कथाकार म्हणून सतीश तराळ यांच्याकडे पाहिले जाते. ग्रामीण कथाविश्वात त्यांच्या एकूण तीन कथासंग्रहांनी मोलाची भर घातली. ग्रामजीवनाशी त्यांची नाळ जुळलेली असल्यामुळेच ग्रामजीवन त्यांच्या कथेतून अभिव्यक्त होताना अनुभवाचे अस्सलपण वाचकांना प्रतीत होते.

सतीश तराळ यांनी आपल्या ग्रामीण कथांमधून ग्रामीण जीवनाचा प्रामाणिकपणे धांडोळा घेतला आहे. शेवटी ग्रामजीवनाची अस्सल अनुभूतीच ग्रामीण कथेतून अभिव्यक्त होत असते; म्हणूनच ग्रामीण कथेसंदर्भात ग्रामीण साहित्याचे अभ्यासक डॉ. आनंद यादव असे लिहितात की, "ग्रामीण कथेचा कलेच्या दृष्टीने वेगळा असा काही प्रकार नाही. इतर कथांप्रमाणेच ती एक कथा आहे. 'ग्रामीण' हे तिचे विशेषण आहे. अर्थातच ते वैशिष्ट्यप्रदर्शक आहे. खेड्यातील म्हणजे ग्रामातील जीवनाची अनुभूती ग्रामीण कथेतून व्यक्त होते. मानवी जीवनाची अनुभूती म्हणून ती काही खास वेगळी नाही असे असले तरी खेडेगाव, तेथील जीवन पद्धती, तेथील अशा रीती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी असलेला मानवी पण प्रदेशानिष्ठ वैशिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न आणि समस्या इत्यादी गोष्टीनुसार अनुभूतीला लाभलेली वैशिष्ट्ये या कथेत येतात. ती त्या खास ग्रामीण अनुभूतीतून जन्माला येते. तिचे ग्रामीणात्व या व इतर अनेक कारणांनी डोळयांत भरते. तो अनुभूतीचा अपरिहार्य घटक म्हणून येऊ लागतो व ती कथा 'ग्रामीण' होते. कथेचा कलाप्रकार म्हणून ती वेगळी नसली तरी, वैशिष्ट्यपूर्णतेमुळे प्रकार म्हणून ती लक्षात येते. (ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या, पृ. क्र.९)

डॉ. सतीश तराळांच्या 'आळ', 'आग' आणि 'लढा' या कथासंग्रहातील कथांमधून त्यांनी ग्रामीण मानसिकता, कृषिनिष्ठ जीवन, कृषकांची होणारी अडवणूक, शोषण, अस्मानी सुलतानी संकटात सापडलेला शेतकरी, ग्रामीण जीवनातील रूढी, परंपरा, सण, उत्सव याचा सूक्ष्म निरीक्षण दृष्टीने वेध घेऊन कथा निर्मिती केली आहे.

कृषिकेंद्रितता हा ग्रामीण जीवनाचा स्थायीभाव असतो. कृषीशी निगडित असणारे शेतकरी, शेतमजूर, शेतीचे व्यवहार या सगळया गोष्टी जवळून अनुभवल्यामुळे ग्रामीण भागातील प्रतिष्ठित सधन शेतकरी, सर्वसामान्य शेतकरी व शेतमजुरांचे कसे शोषण करतो याचे चित्रण 'मोजणी' सारख्या कथेतून येते.

'बळी' मधील कर्जाचा डोंगर माथ्यावर आहे म्हणून पैशासाठी जानरावने स्वत: वांझोट राहण्याचा निर्णय घेऊन स्वत:चाच बळी दिला हे चित्रण सुन्न करणारे आहे. 'दैना' या कथेत सर्वसामान्य शेतकऱ्याची व्यथा चित्रित केली आहे. शेतकऱ्यासोबत अहोरात्र कष्टाला जुंपून घेणारे जित्राब शेतकऱ्यासाठी जीव की प्राण असतात. असाच आपल्या बैलांवरती प्रेम करणारा बाबाराव याच्याजवळचा एक बैल मरण पावतो. पैशाची चणचण असूनही कर्ज घेऊन बैलजोडी शाबूत ठेवतो. पीक आले की कर्जाची परतफेड करू असे त्याने मनाशी ठरवले असते. पीक दगा देतो, तो कर्ज फेडू शकत नाही म्हणून पाटलाचा माणूस खुंट्यावरचा बैल सोडून घेऊन जातो यावेळी

बाबारावच्या मनाची होणारी घालमेल तराळांनी या कथेत चित्रित केली आहे. मजुरी करणारा बाळू अत्यंत प्रामाणिकपणे कष्ट करीत असतो. कुणाच्या भानगडीत न पडता स्वत:चे काम चोख करणाऱ्या बाळूवर सावजी १५१ ची केस टाकतात त्याने तो कसा हतबल होतो याचे चित्रण करताना श्रीमंतांच्या दिमाखापुढे प्रामाणिक माणसाच्या कष्टाचे मोल कसे नगण्य ठरते हेच तराळ दाखवून देतात. 'हार' मध्येही कर्जाची परतफेड करू शकत नाही म्हणून एन्ड्रिन घेऊन आत्महत्या करणारा नामदेव समोर येतो.

'वाघ्या' या कथेमध्ये वाघ्या नावाच्या बैलावर घरातला एक सदस्य म्हणून अतोनात प्रेम करणारा कृष्णा याच बैलाला दुष्काळामुळे जंगलात सोडावे लागते म्हणून कसा सुन्न होतो याचे चित्रण येते.

ग्रामीण भागात राहणाऱ्या कष्टाळू पण सामान्य माणसांच्या सुख—दु:खाचा वेध सतीश तराळांची कथा घेताना दिसते. गावात काम मिळत नाही म्हणून शहरात जाऊन भाडयाने रिक्षा घेऊन मजुरी मिळविण्याचे स्वप्न पाहणारा 'सवारी' या कथेतील रिक्षावाल्याची कशी फटफजिती होते किंवा 'आळ' या कथेत नामदेवचा पाय तुटला म्हणून तो घरी असतो. कामधंदा बंद असल्यामुळे घरात खाणार काय? हा प्रश्न उभा राहतो. त्यावेळी त्याची बायको नर्मदा ओली बाळंतीण असूनही लहानग्या मुलीला घरी ठेवून पहाटे गवत कापायला जाते. तिथला सोकारी व मालक एक दिवस तिच्यावर कापूस चोरीचा आळ घेतो. मी चोर नाही हे तान्हया पोरीची आण घेऊन त्यांना सांगत असते पण त्यांच्या दगडी मनाला पाझर फुटत नाही. परिस्थितीने गांजलेली नर्मदा यावेळेस कशी सैरभैर होते हे तराळांनी उत्तमपणे चित्रित केले आहे. दुसऱ्याच्या वेदनांशी ते खूप सहजपणे नातं जोडतात याचा प्रत्यय अनेक कथांमधून येतो.

शेतकऱ्यांचे जीवन हे निसर्गावर अवलंबून असते. पाऊस वेळच्या वेळी आला तर शेतकऱ्याला कसा आनंद होतो आणि न आल्यास त्याची कशी आफत होते हे 'आफत' या कथेमधून लेखकाने परिणामकारकरितीने अभिव्यक्त केले आहे. 'बळी' या कथेत ओल्या दुष्काळाचे वर्णन येते. पाऊस यावा म्हणून देवाला साकडे घालण्यासाठी पावसासाठी धोंडी काढणारे ग्रामीण माणसाचे श्रद्धाशील मन तराळांनी टिपले आहे.

ग्रामजीवन हे शहरी जीवनापेक्षा सर्वस्वी वेगळे असते. अज्ञान, दारिद्रय, ग्रामीण जीवनाला वेढून असते. त्यातून ग्रामीण माणसाची एक वैशिष्ट्यपूर्ण मानसिकता निर्माण झालेली असते. अज्ञानामुळे हे मन अंधश्रद्धाळू आणि संकुचित होऊ शकते. 'नातं' या कथेत लग्न होऊन बरीच वर्ष झाली तरी सुमनला मूल होत नाही म्हणून तिची सासू तिला वांझोटी म्हणून हिनवत राहते. तिच्या नवऱ्याला त्याचे मित्र 'तू फोसा आहेस', असे चिडवित असतात. त्याचा रागही तो सुमनवर काढीत असतो. या सर्व मानसिक दडपणातून तावून—खुलाखून निघालेल्या सुमनला जेव्हा मुलगा होतो आणि त्याचवेळी वामनला कुष्ठरोग झाल्याचे निदान होते. डॉक्टराने गोविंदला त्याच्यापासून दूर ठेवायला सांगितले असते म्हणून सुमन गोविंदाला कुष्ठधामात ठेऊन येते. नवऱ्यासाठी पोटच्या गोळ्याला ती दूर ढकलते. कुंकवाचे नाते तिला मुलापेक्षाही मोठे वाटते.

ग्रामीण भागातील शाळेची अवस्था किती गंभीर असते याचे चित्रण 'अशीच एक शाया होती' या कथेत येते. निरक्षर स्त्रियांना कसे नागवले जाते हे 'जुलूम' या कथेत पहायला मिळते. 'मोयी' कथेत मोळी विकणाऱ्या म्हाताऱ्याला अंधारात न चालणारी नोट देऊन त्याची कशी फसवणूक केली जाते, तर 'वाखा' मध्ये एकाधिकार पद्धतीमुळे अल्पभूधारक सर्वसामान्य शेतकऱ्याचा कापूस विकताना कसा वाखा होतो याचे हृदयद्रावक चित्रण येते.

'बांडी' या कथेत महारोग झालेली सुशीला कुष्ठधामात जाते. तिथे तिचा रोग बरा झाल्यावरही ती घरी जायला तयार नसते. कारण तेथील माणसांच्या नजरा तिला जगणे असह्य करतात याचे अस्वस्थ करणारे वर्णन येते.

तराळांच्या कथेतील निवेदन व संवाद मनाचा ठाव घेणाऱ्या वऱ्हाडी बोलीतील आहेत. वऱ्हाडी बोलीतून वैदर्भीय जीवन अभिव्यक्त झाल्यामुळे भाषा आणि जीवन एकरूप झालेले दिसते. साधी, सोपी पण परिणामकारक अशी त्यांची निवेदन शैली आहे. ग्रामीण माणसाच्या तोंडी असणाऱ्या म्हणी, वाक्प्रचार यांचा कथेमध्ये त्यांनी केलेला वापर आशय विषयाला उठावदार करणारा ठरतो. 'वयलं तर सूत नाही त निरा भूत', 'मिळत नसेल भीक तर मास्तरकी शिक', 'कसचे काय अन् फाटक्यात पाय', 'बारा बैल खुटला अन ताल नाही पटला', अशासारख्या म्हणी 'आटा कम फकीर ज्यादा', 'तोंडचं पाणी पळणे', 'फुटाणे खाणं आणि पुंगी वाजवणं', 'ना धड जगता येत ना मरता येत' अशासारखे वाक्प्रचार 'सायाची आपली जिंदगीचा सडक्या वांग्यावानी झाली', 'दगडावर नारळ फोडावं तसं त्याचं डोकं डांबरी सडकेवर आदळलं होतं', 'बापानं लेकरू अलगद उचलून घ्याव तसं तो पोतं उचलायचा', 'दिसभर लडणाऱ्या लेकरावाणी पाणी दमावर दम येत होतं', 'अभायाले भोक

पडल्यावाणी पाणी एकसारखं पडून राहयलं होतं' अशी प्रतिमा प्रतीकांनीयुक्त भाषाशैली ही तराळांच्या कथांचे वैशिष्ट्य ठरते. त्याद्वारे ते ग्रामीण वास्तवाचा अत्यंत ताकदीने वेध घेतात.

ग्रामजीवनाचे सूक्ष्म निरीक्षण असल्यामुळे ग्रामीण परिसर, तिथला ग्रामीण व्यवहार, लोकजीवन यांचे प्रत्ययकारी चित्रण त्यांच्या कथेत आहे. व्यक्तिचित्रण उठावदारपणे रंगविले आहे. वऱ्हाडी माणूस त्याच्या लकबींसह उभा करण्याचे सामर्थ्य असलेली चित्रमय शैली हे त्यांचे खास वैशिष्टय म्हणावे लागेल.

## निष्कर्ष

सतीश तराळांची कथा एकूणच ग्रामीण वास्तवाचा संवेदनशीलतेने वेध घेते. त्यांच्या कथांमधून वैदर्भीय लोकजीवन, लोकसंस्कृती, वैदर्भीय स्त्री–पुरुष त्यांचे वागणे, जगणे, भोगणे यांचे प्रत्ययकारी चित्रण करते. ग्रामीण भागाशी, शेतीमातीशी त्यांची नाळ जुळलेली आहे. ग्रामीण विश्व जवळून अनुभवल्यामुळे ग्रामीण जीवनाचे अस्सल दर्शन, त्यातून घडते. अस्सल ग्रामीण भाषेतील वाक्प्रचार, म्हणी, प्रतिमा, प्रतीकांनी त्यांच्या कथेला वेगळे परिमाण लाभले आहे. आशय, विषयाची विविधता अनुभवविश्वाशी असलेली प्रामाणिकता यातून ग्रामजीवनाची सहज अभिव्यक्ती त्यांच्या कथेला कथाविश्वात मानाचे स्थान मिळवून देते.

## संदर्भ ग्रंथ

१. ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या – डॉ. आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृ.आ. जुलै १९९३.

२. मराठी कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह – डॉ. रा.गो. चवरे, मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती.

३. आळ – सतीश तराळ, अभिजीत प्रकाशन, नागपूर, आवृत्ती पहिली, १९८६.

४. आग – सतीश तराळ, वंदन प्रकाशन, अमरावती, प्रथम आवृत्ती, १९९३

५. लढा – सतीश तराळ, बजाज पब्लिकेशन्स, अमरावती, प्रथम आवृत्ती, १९ नोव्हें.२००३.

❖❖❖

# कृषिविषयक ओवीगीतांमधून अभिव्यक्त होणारे स्त्रीमन

डॉ. अलका गायकवाड
मराठी विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, अमरावती
भ्रमणध्वनी ९९२२६२६२९७

## प्रस्तावना

ओवी हा सर्वस्वी स्त्रियांचा प्रांत! स्त्री मनाच्या संवेदनशीलतेमुळे ओवीमधून भावभावनांची तरलता आणि उत्कटता व्यक्त होताना दिसते; म्हणूनच ओवी म्हणजे 'ओवणे' अर्थात भावभावना ओवणे असे म्हटले जाते. दैनंदिन जीवनातील दळण—कांडण, शेतीकाम अशी परिश्रमाची कामे करताना स्त्रियांनी ओव्यांमधून आपले मन मोकळे केलेले दिसते. यासंदर्भात डॉ. प्रभाकर मांडे यांनी असे म्हटले आहे की, "स्त्रियांची मौखिक ओवीगीते हे परंपरेने चालत आलेल्या एकूण मौखिक वाङ्.मयाचे एक अत्यंत समृद्ध दालन आहे. समाजाच्या जीवनाची ती गाथा आहे. स्त्रीमनाच्या अनेक भावभावनांनी आणि अंतरीच्या उमाळयाने ओथंबलेली आहे. स्त्रियांच्या हृदयाचे स्पंदन जाणकाराला त्यांनी गायिलेल्या मौखिक ओव्यांतून ऐकू येते. जीवनातून या गाण्याची निर्मिती झालेली असल्यामुळे त्यातून समाजजीवन अभिव्यक्त झाले आहे. जीवनाला सौंदर्यसंपन्न करून जगण्याची भारतीय लोकमानसातील प्रवृत्ती महाराष्ट्रातील स्त्रियांच्या मौखिक ओवीगीतांतून प्रकट होते." (मौखिक वाङ्मयाची परंपरा (स्वरूप आणि भवितव्य), पृ.क्र.३१)

कृषी हा ज्या संस्कृतीचा गाभा आहे. अशा संस्कृतीशी निगडित असणाऱ्या स्त्रियांनी कृषिजीवनाबद्दलच्या आपल्या भावभावनाही ओवीगीतांमधून व्यक्त केलेल्या आहेत त्यातून एका वेगळ्या स्त्री जीवनाचे दर्शन घडते.
कृषिकर्म हे एकट्यादुकट्याचे काम नाही, हे कार्य करणाऱ्या अनेकांसोबत शेतकऱ्याची पत्नीही त्याच्यासोबत शेतात राबत असते. पहाटेपासून ती शेतीच्या विविध कामात आपल्या पतीला साथ देते. त्याची पाठराखण करते. कृषिव्यवहार जवळून अनुभवणारी कृषक स्त्री शेतीशी एकरूप होते, तादात्म्य पावते आणि हे भावविश्व ओव्यांमधून व्यक्त करते.

पेरणी गीतांमधून पेरणीचा मुहूर्त साधला जावा म्हणून धडपडणाऱ्या स्त्रियांचे दर्शन घडते.

करा पेरणी चला व चौग्या जणी ।
मोत्यावानी मिरगाचं पडलं पानी ।।

मृगाचे पाणी पडले की, पेरणीला सुरुवात करण्याचा संकेत कृषकांच्या हाडिमासी रुजला आहे. या संकेताची आठवण करून पेरणीसाठी सोबतीणींना साद घालणारी कृषक स्त्री इथे दिसते.

चाल चाल जनाबाई, बाया गेल्या झरझर ।
तुही अरध्यावर पात, नेऊ दोघी मेरीवर ।।

एकमेकींना साथ देत निंदण करणाऱ्या स्त्री रूपाचा परिचय यातून घडतो.

कृषिव्यवसाय सर्वस्वी पावसावर अवलंबून असतो. पाणी हे कृषीचे जीवनस्त्रोत. पावसाशिवाय पेरणी साधणे अशक्य म्हणून पाऊस न पडल्यास व्याकूळ होणारी आणि पाऊस आला की आनंदून जाणारी स्त्री पाऊसविषयक ओवीगीतांमधून प्रकट होतो.

पड पड पावसा, होऊ दे जमीन भरदार ।
माहया कुणब्याची वटी भर ।।
पड पड पावसा, जसा मोत्याचा शिरवा ।
मळा सटवाचा हिरवा ।।

पावसाच्या धारा म्हणजे तिच्या दृष्टीने मोत्यांचा शिरवा. पावसामुळे तिचा मळा हिरवागार होऊन फुलणार आहे याची तिला खात्री असते; म्हणून माझी जमीन भरदार कर आणि माझ्या जोडीदाराला भरभराटीचा आशीर्वाद दे अशी प्रार्थना ती करते.

पड पड पावसा, माझा पिकू दे मुगराळा ।
बंधू घरात लेकुरवाळा ।।
पड पड रे पाण्या, माहया बंधुच्या वावरी ।

माह्या भावजयीचा खर्च भारी ।।

भावाबद्दल या स्त्रीच्या मनात नितांत प्रेम असल्यामुळे ही स्त्री स्वत:च्या समृद्धीची स्वप्न पाहताना भावाच्या घरादारालाही विसरत नाही. लेकुरवाळ्या भावाच्या समृद्धीसाठी तिला त्याचा मळा पिकणे आवश्यक वाटते. त्यात भावजयीचा खर्च भारी असल्यामुळे तिला भावाची काळजी आहे.

पड पड पावसा, माळा मुरड्याच्या झाल्या वाती ।
कुणबिनी आल्याती काकुयती ।।

पावसाचे येणे जसजसे लांबत जाते तशी तिच्या मनाची अस्वस्थता, घालमेल वाढत जाते. नवरा, भाऊ यांच्यासोबत आजूबाजूच्या कुणबिणींचा विचार तिला स्वस्थ बसू देत नाही. पावसाअभावी शुष्क, भकास झालेले शेत तिला तेलाविणा असलेल्या वातीसारखे निष्प्रभ भासते. एकूणच कुणब्यांच्या जीवनाची काळजी वाहणारे स्त्रीमन यातून व्यक्त होते.

कृषी संस्कृतीत 'पोळा' या सणाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. पोळ्याच्या दिवशी बैलांसाठी काय करू नि काय नको असे कृषकांना होऊन जाते. कृषक स्त्रीसुद्धा यात मागे नसते.

पुरणाची पोळी, लाटते घाईघाई ।
पोळयाचा सण, बैलामागे भाऊ येई ।।

असे म्हणत पोळ्याच्या दिवशी बैलांसाठी पुरणाची पोळी करते. दिवसभर तिची धावपळ सुरू असते. बैलांसोबत आपला भाऊही दाराशी येईल हे लक्षात येताच तिची उडणारी तारांबळ ही त्यातून व्यक्त करते.

कृषिविषयी कृषक स्त्रीला नितांत आदर असतो. शेताच्या बांधावर उभी राहून ती जेव्हा कृषिव्यवहार पाहते, शेतात राबणारा पती, भाऊ किंवा शेतातील धनधान्य पाहते तेव्हा तिच्या मनात संमिश्र भावभावना दाटून येतात.

काय निंघाली धामन
मारू नको दादा, तुह्या पाठची बहीन
काया वावरात, निंघाला डोम्या नाग।
मारू नको दादा, दुरून पाया लाग।।

नाग हा उंदीर, घुशींपासून शेतीचे रक्षण करतो म्हणून तिच्या लेखी तो क्षेत्रपाळ असतो. इथे कृषक स्त्रीचे सुसंस्कृत मन दिसून येते. संस्कृतीच्या आरंभकाळापासून भारताने नागाला पूज्य मानले आहे. नागाच्या अनाकलनीय शक्तीमुळे जगभर नागाची श्रद्धेने पूजा केली जाते. शेतामध्ये अहोरात्र काम करणाऱ्या पतीला, भावाला नागाने दंश करू नये या भीतीसोबतच शेताचा रक्षण करणारा नाग तिला पूजनीय वाटतो. शेतामध्ये निघालेल्या नागिणीला मारू नको. ती तुझ्या पाठची बहीण आहे, नाग मारू नको त्याच्या पाया लाग अशी जाणीव ती भावाला करून देते. शेतीचे रक्षण करणाऱ्या नागाशी, नागिणीशी नात्याचा अनुबंध जोडण्याची कृषक स्त्रीची संवेदनशीलता यातून व्यक्त होते.

काया वावरत, तिफन चाले गतीगती।
शेल्याची केली वटी, बंधु उनारते मोती।।

तिफणीच्या मागे शेल्याची ओटी करून दाणे पेरत जाणाऱ्या भावाला पाहून येणाऱ्या समृद्धीचे सुंदर चित्र रेखाटणारी स्त्री इथे दिसते. धान्याच्या दाण्यांना मोत्याची उपमा ती बहाल करते. भावी समृध्दी दडलेली असलेले धान्याचे टपोरे दाणे तिला मोत्यांसारखे भासतात. ही तिची भावना अपूर्व अशीच आहे.

काया वावरात, तिफन टाके वोला।
आगुल्या झोपी गेला, बंधू बैलांशी बोला।।

शेतात आपल्या पतीच्या, भावाच्या साथीने राबताना अतिशय दक्ष राहून ती त्यांना वेळोवेळी सावध करताना दिसते. शेतात वावरताना श्रमाच्या भाराने दमलेला, निद्रेच्या अधीन होत जाणारा बैल तिच्या चाणाक्ष नजरेतून सुटत नाही; म्हणून ही कारभारीन बैलांना जागे ठेवण्यासाठी त्यांच्याशी बोला असे सूचविते. बैलांच्या श्रमाची जाणीव ठेवून त्याला कुटुंबातील सभासद मानल्यामुळेच खरे तर ती हा भाव व्यक्त करू शकली.

काया वावरात, काया बैलाचं औत।
शेतात माया आली, लक्ष्मी धावत।।

सर्वांच्या सहकार्याने शेतात पिकणारे धनधान्य तिच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे असते. धान्य घरात येईपर्यंत कृषकांच्या जीवात जीव नसतो. शेतात उभे असणारे धान्य शेतकरी पोटाच्या पोरासारखा जपतो. हीच भावना

कृषक स्त्रीदेखील व्यक्त करते. शेतातली ही समृद्धी राखणे तिला महत्त्वाची वाटते. त्यामुळे डोळयात तेल घालून शेताचे रक्षण करताना,

वाटच्या वाटसरा, शेतातून नको जाऊ।
माझ्या शेतात, पोटरी आला गहू।।

अशी दक्षता घ्यायला भाग पाडते.

शेतातील धनधान्य ती साक्षात लक्ष्मी मानते. त्यामुळे सायंकाळच्या वेळी घरात येणाऱ्या लक्ष्मीचे स्वागत मनोभावे करण्यासाठी –

भरल्या तिनी सांजा लक्ष्मी आली वाडया।
हळद–कुंकवाच्या घाल पायघड्या।।

अशी सूचना करताना दिसते.

'मोट' अलीकडे दुर्मिळ झाली असली तरी पूर्वी जीवनात मोटेला अनन्यसाधारण महत्त्व होते. जीवनाचा स्त्रोत असल्यामुळे मोट लोकमानसासाठी उपयुक्त साधन होते. शेतकरी शेतीला पाणी देण्यासाठी शेतातील विहिरीवर मोट धरत असत. मोटेच्या पाण्याने धरित्रीला न्हाऊ माखू घालणारा पती पाहून कृषक स्त्री भरून पावते.

मोट चालते एका वानाचं चारी बैल।
मोटकऱ्याला दीट व्हईल ।।
पायटेच्या पारामंधी, चाक वाजते भिरीभिरी।
माहे देव अर्जुन हाये मोटेवरी।।

असे शब्द सहजपणे तिच्या ओठावर येतात. पतिनिष्ठा हा स्त्रीचा स्थायीभाव आहे. पहाटेच्या प्रहारामध्ये शेतीच्या कामाशी स्वत:ला जुंपून घेणाऱ्या नवऱ्याच्या कर्तृत्वाबद्दल कृषक स्त्रीला अभिमान वाटतो.

'माहे देव अर्जुन हाये मोटेवरी' यातून कृषक स्त्रीने पतीच्या सामर्थ्याबद्दलची कल्पना, भावना, 'देव अर्जुन' या उपमेतून प्रकट केली आहे. पती हा तिचे सर्वस्व असल्यामुळे या जीवनसाथीवर तिचे जीवापाड प्रेम आहे. त्याच्या सोबत सोबत शेतीत राबताना सहजीवनाचा आनंद आणि तोलामोलाच्या कामाचा तिचा हुरूप ओसंडून वाहत असतो. अनेक ओव्यांमधून त्याचा प्रत्यय येतो.

पती इतकाच पाठीराखा कृषक भाऊ तिच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो त्यामुळे बारा बारा मोटा चालणाऱ्या तिच्या भावाच्या शेतीचा तिला वाटणारा अभिमान –

मायाच्या मायांमधी केळी, पेरूले काय तोटा ।
माह्या बंधुच्या इहिरीले, बारा बारा मोटा ।।

बारा मोटांची विहीर म्हणजे तिच्या दृष्टीने शेतीची समृद्धी असते. ज्या विहिरीवर मोट चालते त्या विहिरीबद्दलही तिच्या मनात नितांत आदर दिसतो.

नवस करू गेले, ईहिरीबाई तू सुंदरी ।
जतन कर माहे, चार बैल मोटकरी ।।

विहिरीबद्दलची तिची ही भावना आगळीवेगळी अशीच आहे. आपल्या पाण्याने शेतीला समृद्धीचा स्त्रोत पुरविणारी विहीर तिच्यासाठी निर्जिव राहत नाही. विहिरीच्या रूपाने एक सुंदर, निर्मळ, पूजनीय स्त्रीशक्तीची प्रतिमा तिच्या डोळ्यासमोर उभी राहते. ती तिला 'विहिरीबाई' असे संबोधते आणि श्रद्धेने आपला नवस व आपले मागणे तिच्यापुढे मांडते. आपल्या चार बैलाचे व कुटुंबाचे तू रक्षण कर अशी याचना करते. स्त्रीरूप देवता आणि स्त्री यांच्यात एक श्रद्धेचे नाते दिसून येते. विहिरीत स्त्रीरूप पाहिल्यामुळे आपल्या जीवनातील सुख–दु:ख, इच्छा–आकांक्षा तिला तिच्याजवळ व्यक्त करणे सोपे जाते. विहिरीला लोकमाणसाने तारक–मारक, रक्षक–भक्षक अशा दोन्ही शक्तीरूपात पाहिल्यामुळे ही भावना ती व्यक्त करते; तेव्हा जाणवते की, कृषक स्त्री स्वत:साठी काही मागत नाही, पतीच्या जीवनात ती आपले सौख्य शोधते. तिचे सौभाग्य तिच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे आहे.

'तिफण' हे पेरणीचे महत्त्वाचे अवजार. आपल्या घरधन्यासोबत राबराब राबून पेरणी करणारी तिफण पाहून या स्त्रीच्या मनात कौतुकाचे भरते येते –

शेताले जाते कुरी, सव्वा मनाचा पेरा झाला ।
बैल वेशीला उकरला, धनी मनात हरकला ।।

कुरीच्या सहाय्याने पेरणी पूर्ण झाल्यामुळे आनंदीत झालेला पती पाहून तर तिला तिफणीबद्दल अधिकच जवळीक वाटते.

शेताले नेली कुरी, शेत काजयाची वडी ।
माहया व बंधुची, बारा बैलाची हाय जोडी ।।

ज्या शेतात ही तिफण चालते ते किती काळेभोर आहे हा भाव व्यक्त करताना ती त्याचे वर्णन काजळाची वडी असे करते.

कृषिकर्म हे सामूहिकरित्या केले जाते. अनेकांचा त्याला हातभार लागत असतो. त्या सर्वांबद्दल कृषक स्त्रीच्या मनात खूप आदर दिसतो. उपयोगी पडणाऱ्या घटकांविषयीचा तिचा कृतज्ञता भाव ओवीगीतामधून प्रकट होतो. तिफण घडविणारा सुतार किंवा कृषी अवजारांची, वस्तूंची निर्मिती करणारा मांग असो तिने व्यक्त केलेला भाव अपूर्व असाच म्हणावा लागेल.

सुताराच्या बाळा, तुहया कपाळी गंद ।
तिफणीबाईचा झाला शिवारी आनंद ।।

किंवा

शेताला नेली कुरी, आडवा आला मांग ।
सावळया बंधुराया, त्याले हरीचा दे मान ।।

कळसाच्या पाण्यावर तीन तीन खंड्या शाळू पिकणाऱ्या काळ्याशार वावराचा, पोटरीला आलेल्या हिरव्याकंच पीकाचा, धष्टपुष्ट खिल्लारी बैलाच्या जोडीचा, बारा बारा मोटा चालणाऱ्या विहिरीचा तिला सार्थ अभिमान वाटतो. मात्र भराला आलेले हे वैभव पाहून तिथेच रेंगाळून डोळे विस्फारून वावराकडे पाहणाऱ्या वाटसरूची नजर तर या समृद्धीला लागणार नाही ना? ही शंकाही तिच्या मनाला चाटून जाते म्हणून ती त्याला हटकताना दिसते.

वाटच्या वाटसरा, तुह्या डोयात पडो माती ।
माया नंदी, वावराले दीट व्हती ।।

नजर लावणाऱ्याला हटकले तर नजर लागत नाही या श्रद्धेपोटी 'तुहया डोयात माती पडो', असे म्हटल्याशिवाय तिला राहवत नाही. कृषक स्त्रीचे मन पारंपरिक व सश्रद्ध असल्यामुळे अनेक शंका—कुशंका तिच्या मनात येतात. शेवटी सुखातही स्त्रीचा जीव हुरहुरत असतो याचे दर्शन यातून घडते.

## निष्कर्ष

कृषिविषयक ओवीगीतांमधून अभिव्यक्त होणारे स्त्री जीवन वैशिष्ट्यपूर्ण आहे. कृषक स्त्री ही निसर्गकन्या आहे. मातीची अनिवार ओढ तिच्या रक्तामासात भिनलेली असल्यामुळे मातीबद्दलचा जिव्हाळा तिच्या मनात तुडुंब भरलेला आहे. कृषक पतीची, भावाची साथसंगत करणारी, कृषिकामात त्यांना मदत करणारी, सतत सावधनतेचा इशारा देणारी, पशुधनाविषयी काळजी बाळगणारी, शेतीला उपयुक्त ठरणाऱ्या घटकांविषयी कृतज्ञता भाव ठेवून त्यांना पूजणारी, कृषकांच्या सौख्यासाठी कामना करणारी, शेतातल्या समृद्धीसाठी परमेश्वराची करुणा भाकणारी, धनधान्याला लक्ष्मी मानून तिचे पूजन करणारी स्त्री या ओवीगीतांमधून प्रकट होताना दिसते.

## संदर्भ ग्रंथ


१. मौखिक वाङ्मयाची परंपरा (स्वरूप आणि भवितव्य) — डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, प्र. आ. २०१०.

२. भूमी आणि स्त्री — डॉ. शैला लोहिया, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, प्र.आ. जुलै २०००.

३. लोकसाहित्य लोकसंस्कृती — डॉ. विद्या व्यवहारे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००२.

४. लोकसाहित्याचे अंत:प्रवाह — डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, तृ.आ. २००८.

५. लोकसंस्कृती : स्वरूप आणि विशेष — डॉ. द.ता. भोसले, पदमगंध प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००४.


❖❖❖

# १९९० नंतरच्या नवकवींची ग्रामीण कविता

**प्रा.डॉ. अतुल नारायण चौरे**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंध, पुणे**
**भ्रमणध्वनी ८१६९४२४५१७ / ८६९२०८०२१०, इ-मेल :**choureatul.paru@gmail.com

## प्रास्ताविक

ग्रामीण साहित्याला पुन्हा नवे बळ देण्याचे कार्य संपादक प्रा. बाळासाहेब घोंगडे हे अक्षरपेरणी मासिकाच्या माध्यमातून करीत आहेत. त्यांनी दिवाळीच्या मुहर्तावर सप्टेंबर २०१५ साली 'कविता विशेषांक' प्रकाशित केला. त्यामधून जवळपास ६७ कवींच्या कविता प्रकाशित केल्या आहेत. हा 'कविता विशेषांक' म्हणजे ग्रामीण कवितेचा दस्तऐवज आहे. ह्या कविता विशेषांकामधील सर्वच कवी नवकवी आहेत. नवकवींचे साहित्य क्रित्रितपणे प्रकाशित करता येणे ही आजच्या काळातील मोठी समस्या आहे. काही नवकवींच्या कविता साप्ताहिक, मासिके, त्रैमासिके आणि दिवाळी अंकांमधून प्रकाशित होतात आणि काहींच्या कवितांना प्रकाशनाची संधीच मिळत नाही. परंतु ग्रामीण साहित्याचे अभ्यासक, संशोधक आणि संपादक प्रा. बाळासाहेब घोंगडे यांचे मला विशेष कौतुक करावेसे वाटते की, त्यांनी ग्रामीण साहित्याची पुन्हा पायाभरणी केली. संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण कवी, लेखकांना क्रित्रित आणण्याचे कार्य अक्षरपेरणी मासिकाच्या माध्यमातून केल्यामुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याला उभारी मिळाली आहे, असे मला वाटते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अक्षरपेरणी मासिकाच्या 'कविता विशेषांकामधील' निवडक कवींच्या कवितांचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे.

## १९९० नंतरच्या नवकवींची ग्रामीण कविता

'अक्षरपेरणी' मासिकातील कविता विशेषांकाचा विचार करता असे दिसते की, १९९० नंतर आलेल्या जागतिकीकरणाचा शहरीकरणाबरोबरच ग्रामाजीवानावरसुद्धा परिणाम झाला आहे. अनेक नवकवींच्या कवितेमधून याचे चित्रण आलेले आहे. ह्या अंकामधील कविता महानगर, ग्रामजीवन आणि स्त्रीजीवन व्यक्त करताना दिसतात. चंद्रकांत पोतदार म्हणतात की, 'कविता ही आतली सल असते' आपल्या कवितेमधून गावाचे, शेतीचे–मातीचे चित्रण करताना म्हणतात की, 'मातीची मुळच बोलू पाहातायत'

" बांधामेढीवरली करपलेली घर
आणि लगीनघाईसारखे सुगीचे दिवस
अवजारान आणि बैलांच्या संगतीने
शिवार फुलवाव, गाळावा घाम
भाकरी सुगंधावी कष्टान"[१]

शेतीचे वर्णन करताना चंद्रकांत पोतदार म्हणतात की, सुगीच्या दिवसांत शेतकऱ्याच्या घरामध्ये लगीन घाई असते. सुगीच्या दिवसात शेतामधील पीक घरामध्ये आणेपर्यंत शेतकऱ्याला चैन नसते. कारण दिवसात अवकाळी वादळ-वारा येण्याची दाट शक्यता असते. अशावेळी हाता तोंडाशी आलेला घास जाण्याची शक्यता असते. त्यामुळे अवकाळी पावसाच्या अगोदर शेतातील पीक घरात आणण्याची लगीनघाई असते. शेतकरीराजा बैलांच्या सहायाने आपली शेती फुलवतो. ती फुलवताना वर्षभर शेतात घाम गाळतो आणि कष्टाने कमावलेली भाकरी खातो. क्रिंदरीतच चंद्रकांत पोतदार यांची कविता शेतकऱ्याच्या मनातील आतली सल व्यक्त करताना दिसते. शेतीमातीत जन्माला आलेले कवी जनार्धन देवरे म्हणतात की, 'व्यक्त होण्यासाठी कविता मला गरजेची वाटू लागली'. आपल्या आई – वडिलांचा, आजी आजोबांचा शेतीशी चाललेला झगडा लेखकाने बालपणापासून पाहिलेला आहे. त्यामुळे आपल्या कवितेमधून ही सल व्यक्त करताना ते 'संचिताचे भांडवल' या कवितेत म्हणतात की,

"रुसलेल्या पावसानं औंदा जाळलं स्वप्नांना
दुष्काळाची साडेसाती थि संपता संपेना
आद्रपुनर्वसू पुष्प गेले कोरडे ठणान

आषाढातच अंकुर मेले टाकुनिया मान
शेतामधी पेरलेला गेला गाभडून दाणा"[२]

कवी जनार्धन देवरे आपल्या कवितेमधून दुष्काळाच्या परिस्थितीचे चित्रण करताना दिसतात. पावसाअभावी शेतीची झालेली विदारक अवस्था चित्रित केली आहे. शेतकरी आपल्या मानाशी असंख्य स्वप्न घेऊन जगत असतो. बऱ्याचदा निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्याची असंख्य स्वप्ने भंग पावतात. पावसाच्या पाण्याअभावी मातीमधून उगवलेल्या अंकुराने माना टाकल्या आहेत. एवढेच नव्हे तर नुकताच शेतामध्ये पेरलेला दाणा पाण्याअभावी गाभाडून गेला आहे. गुरे ढोरे परागंदा झाली आहेत. शेती व्यवसाय हा जुगाराप्रमाणे झाला आहे. कुटुंबाला आणि संपूर्ण समाजाला जगवण्यासाठी हा जुगार प्रत्येक शेतकरी दरवर्षी खेळत आहे. त्यामुळे नाती गोती, देणे घेणे कसे टाळावे हे शेतकऱ्याला कळत नाही. त्यामुळे ह्या कवितेमधून कवीने शेतकऱ्याने उराशी बाळगलेली असंख्य स्वप्ने धुळीला मिळाल्याची खंत व्यक्त केली आहे. फुला बागुल म्हणतात की, 'बळ बुद्धी वेचूनिया शक्ती ! उदक चालवावे युक्ती' संत तुकारामांनी सांगितलेल्या पर्यावरणाबाबतच्या संदेशाची आठवण करून देतात. पाश्चात्यांकडून आपण ओरबाडण्याची वृत्ती आत्मसात केली आहे. त्यामुळे आपल्या स्वार्थासाठी आपण निसर्गातील प्रत्येक गोष्ट ओरबाडून घेतली. जागतिकीकरणाच्या रेट्यात माणूस स्वतःच्या भावविश्वात हरवत चालला आहे. माणसाने चंगळवादी जीवनैलीचा पुरस्कार केल्यामुळे स्वतःच्या स्वार्थासाठीमागेपुढे न पहाता निसर्गातील प्रत्येक गोष्ट ओरबडून घेतली. त्यामुळे निसर्गसुद्धा लहरीपणे वागायला लागला आहे. फुला बागुल यांची कविता मानवाचा स्वार्थीपणा आणि निसर्गाचा लहरीपणा व्यक्त करताना दिसते.

'दर्यावर्दी कोलंबसानं गर्विष्ठ सागरपाण्यावर
हुकुमत गाजवीत किनारा दाखवीत
अनंत धेयशक्ती दाखवली हे खरं !
वास्को द गामानं सागरपाण्यावरून
चालत येत भूखंडाचे शोध लावले हे हि खरं !
तेव्हापासून रे पाण्या ! तू
जागतिकीकरणाचा विषय झालास"[३]

फुला बागुल म्हणतात की, भारतामध्ये जागतिकीकरण आल्यावर पाण्यावर माणसाने स्वतःची हुकुमत गाजवायला सुरुवात केली. तेव्हापासून पाणी हा जागतिकीकरणाचा विषय झाला. समुद्राचे नामकरण करण्यात आले. समुद्राची वाटणी करण्यात आली. वेगवेगळ्या कारखान्यांसाठी वॉटर प्लान्ट, वॉटर पार्क ह्यासाठी पाण्याचे वाटप करण्यात आले. माणसाने चंगळवादी जीवनशैलीचा पुरस्कार केल्यामुळे निसर्गसुद्धा लहरी वागायला लागला. जागतिकीकरणात कारखान्यांसाठी, वॉटर प्लान्ट, वॉटर पार्कसाठी पाणी उपलब्ध होते. पण जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्याच्या शेतीला पाणी उपलब्ध होत नाही, अशी खंत फुला बागुल व्यक्त करतात. शेतकरीराजा पावसाची आतुरतेने वाट पहात बसतो. पण वेळेवर पाऊस पडत नाही. यांची खंत ते पुढील कवितेमधून व्यक्त करतात.

"वरचा बाबा कवा मुतल याचा भरवसा नाही.
पूर्वी खोदेल तेथे झरे असायचे
अशी लाथ मारून पाणी काढायची मानसं !
अन आता
कर्जाच्या पैशाने बोर करून पाण्याचा थेंबही
दाद देत नाही म्हंटल्यावर
तांब्याभर पाण्यात 'ठायमेट' कालवून
पितात मानसं !"[४]

फुला बागुल आपल्या कवितेमधून पाण्याचे भीषण वास्तव मांडताना दिसतात. पूर्वीच्या काळी धो-धो पाऊस पडत असे. त्यामुळे कोणत्याही ठिकाणी खोदले की पाणी लागायचे एवढेच नव्हे तर लाथ मारेल तिथे पाणी काढण्याची ताकद होती. परंतु जागतिकीकरणाच्या युगात माणसाने स्वत:च्या फायद्यासाठी निसर्गातील प्रत्येक गोष्ट ओरबाडून घेतली आहे. कारखान्यांसाठी पाणी, वॉटर प्लान्ट आणि वॉटर पार्कसाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर केल्यामुळे

आता जमिनीत पाणीच राहिले नाही. गावाकडील विहिरी भर पावसाळ्यात कोरड्या पडल्या आहेत. म्हणून अनेक शेतकऱ्यांनी सावकाराकडून कर्ज काढून आपल्या जमिनीत बोर मारले आहे. पण पाण्याचा एक थेंबही लागला नाही. अशावेळी घेतलेले कर्ज कसे फेडायचे असा प्रश्न शेतकऱ्यासमोर उभा राहतो. त्यामुळे तांब्याभर पाण्यात थायमेट कालउन तो स्वतःला संपवण्याचा प्रयत्न करताना दिसतो. मानवाने निसर्गाला ओरबाडल्यामुळे निसर्गाने मानवाकडे पाठ फिरवलेली दिसते. पूर्वी रस्त्यावर जागो-जागी पाणपोया होत्या. आता मात्र गावोगाव टॅन्करने पाणी पुरवावे लागते. अशाप्रकारचे दाहक वास्तव फुला बागुल मांडताना दिसतात. "कविता हा माझ्या जगण्याचा श्वास आहे." असे स्वाती शिंदे-पवार म्हणतात. स्वतःला मोकळे करण्यासाठी मी कविता लिहिते. मी मातीशी इमान राखते, स्वतःच गाऱ्हान,रडगान गात बसण्यापेक्षा अखंड मानवजातीची मी प्रेरणाश्रोत, मार्गदर्शक होते. अशाप्रकारचा आशावाद त्या व्यक्त करताना दिसतात. 'लेक भुईची' या कवितेमधे त्या म्हणतात की,

"पोर कुणब्याची, लिंबू वेचायची
शेती भांगलन, ओचा खोचायची
मोट धरताना, बांध काटायचा
पळ पळताना, घाम सांडायचा"[५]

ग्रामजीवनाचे नेमक्या शब्दात वर्णन केले आहे. शेतकऱ्याच्या मुलीला शेतात काम करावेच लागते.लिंबू वेचन्यापासून शेतात खुरपण्यापर्यंत काम करावेच लागते.पूर्वी विहिरीमधील पाणी काढण्यासाठी मोटेचा वापर केला जात असे. तेव्हा घामाच्या धारा सांडायच्या शेतातील कामे करताना अनेकांना बैलांची गरज लागत असे. अनेक शेतकऱ्यानकडे बैल घेण्याइतपतसुद्धा पैसे नसायचे. अशावेळी शेतकरी स्वतःच बैल व्हायचा. एकंदरीतच शेतकऱ्याच्या कस्टमय जीवनाचा आलेख व्यक्त करणारी त्याची कविता आहे. 'गावगाड्यातल दुखः मांडून व्यवस्थेला जाग आणण' ही भूमिका घेऊन रावसाहेब कुवर लेखन करताना दिसतात. लहानपनापासून शेती-माती, गुरे-ढोरे,उन-वारा, शेतीपासून रोजगार हमीच्या कामापर्येंत राबलेला हा कवी आहे. त्यामुळे सहाजिकच त्यांच्या कवितेमधून ग्रामजीवनाचे आणि कृषी जीवनाचे दाहक वास्तव मांडताना दिसतात. 'पुन्हा एक शेतकरी संपला' ह्या कवितेच्या माध्यमातून रावसाहेब कुवर म्हणता की,

"सततच्या दुष्काळाला वैतागून
धरला त्याने सुरतेचा रस्ता
आणि जाऊन बसला
दूरच्या नातेवाईकांच्या आसऱ्याला
घरदार नसलेल्या डोंबाऱ्याने
करावा रात्रीपुरता मुक्काम
ग्रामपंचायतीच्या ओट्यावर तसा"[६]

महाराष्ट्रातील अनेक भागात सातत्याने पडणाऱ्या दुष्काळाचे दाहक वास्तव कवीने व्यक्त केले आहे. सततच्या दुष्काळाला कंटाळून शेतकरी कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी घर-दार सोडून शहरात नोकरीसाठी जातो. त्यामुळे गावाकडील शेती-वाडी, घर-दार उध्वस्त होते. शहरातीत कारखान्यात स्वतःला आठ-आठ तास अडकवून घेतो. चार-चार तास ओव्हरटाईम करतो. गावाकडील घर-दार, शेती-वाडी विकून शहरात जाऊन रहातो. बायकोच्या डोळ्यात झगमगणारे शहर बसलेले असते, मुलांना रेल्वेच्या डब्यात बसल्याचा मनोमन आनंद होतो. परंतु गाव सोडलेल्या शेतकऱ्याच्या मनात वेगळ्याच वादळ-लाटा उठलेल्या असतात. सुटत चाललेली भाऊबंदकी, घरदार, बैलघोटा, शेतशिवार ह्यामुळे तो मनातून अस्वस्थ आहे. त्यामुळे लेखक म्हणतो की, त्या दिवशी पुन्हा एक शेतकरी संपला. तो शेतकरी अस्वस्थतेमुळे संपला की, आपल्या व्यवस्थेमुळे संपला असा प्रश्न समाजव्यवस्थेला विचारला आहे. शेतकऱ्याच्या दाहक वास्तवाबरोबर, शेतकऱ्याच्या मुलांचा प्रश्नालाही वाचा फोडली आहे. 'खेड्यातील पोर बसली आहेत येड्यासारखी' ह्या कवितेमधून कवी सांगतो की,

"डीएड, बीएड होऊन
सरकारी जावई होण्याच्या नादात
निघून गेल त्याच्या अंगातून शेतीकाम

आणि लागेलच नोकरी खात्रीनं
असंही कुणी सांगत नाही ठाम"[७]

फुले-शाहू-आंबेडकरांच्या प्रेरणेने १९६० नंतर ग्रामीण भागापर्यंत शिक्षण पोहचल्यामुळे शेतकऱ्याची मुले-मुली शिकली. परंतु १९९० नंतरच्या जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे समाजात प्रचंड स्पर्धा निर्माण झाल्यामुळे नोकऱ्याच शिल्लक राहिल्या नाहीत. तरीसुद्धा खेड्यातील शेतकऱ्याची मुले शिक्षण घेत आहेत. परंतु त्यांचे अर्धे अधिक आयुष्य शिक्षण घेण्यातच जात आहे. परिणामी शेतीकाम करण्याची सवय अंगातून निघून जाते. शिक्षण घेतल्यामुळे नोकरी मिळेलच असे खात्रीने सांगता येत नाही. नोकरी न मिळाल्यामुळे काळ्या-काळ्या, नकट्या-नुकट्या पोरींचा बापसुद्धा आपली मुलगी लग्नासाठी देत नाही. आपल्या दारावरून एखाद्या कुत्र्याला हाकलून लावावे त्याप्रमाणे नवऱ्यामुलाला दारावरून हाकलून लावले जाते. वयाची तिशी उलटली तरी लग्न जमत नाही. बापाच्या नावावरील सात-बारासुद्धा मुलाच्या नावावर होत नाही. अशावेळी खेड्यातील मुले येड्यासारखी शाळेच्या ओट्यावर निरर्थक गप्पा मारत बसली आहेत. रमेश पवार यांनी बापावरती अनेक कविता लिहिल्या आहेत. त्यांनी आपल घर-दार, आसपासची माणसे, त्यांची सुखः-दुखः त्यांचा जगण्याचा संघर्ष, मानापमान, यशापयश,आशा-आकांक्षा सार्व काही पाहिलेले, अनुभवलेलं आणि अनुभवातून कळालेलं कवितेच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. रमेश पवार म्हणतात की,

"वावराच्या बांधावरून फेरफटका मारताना
बाप सांगत राहायचा
गोष्टी गावाकडल्या...
पंचायतिचं राजकारण मंदिरात
मारुतीच्या व्हरांड्यावर जुगाराचा डाव
जि.प.ची बंद पडत जाणारी शाळा
मास्तर विचारतात मडक्याचा भाव"[८]

जागतिकीकरणाचा परिणाम शहराबरोबरच गावावरसुद्धा झाला आहे. खेड्यातील मुले शिकली आणि नोकरीनिमित्त शहरात गेली. सुट्टीच्यावेळी गावाकडे आल्यावर बाप गावाकडील गोष्टी सांगताना म्हणायचा की, एकेकाळी ज्या मंदिरात कीर्तन सुरू असायचे तेथे पंचायतीच्या राजकारणाच्या गप्पा व्हायला लागल्या आहेत. मंदिराच्या व्हरांड्यात पत्त्यांचा डाव सुरू असतो. विद्यार्थ्यांच्या अभावी बंद पडत चाललेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांबद्दल बाप सांगत रहातो. याबरोबरच बाप गावातील वास्तव सांगतो की,

"लग्न समारंभात गावठीचा मारून ग्लास
भगवान बाप्पाचा वेडा मुरल्या
कपाशीवर पडलेल्या लाल्या
ऐन पेरणीत डोंगर धनगराचा
मारून पडलेला बैल
नि एका पावसासाठी वाया गेलेला हंगाम
अस काहीबाही
नि संपत जायची सुट्टी..."[९]

बाप गावाच विदारक वास्तव मुलाला सांगत आहे. एकेकाळी सुजलाम सुफलाम असणारा गाव आता पहिल्यासारखा राहिलेला नाही. व्यसनाधीन झालेल्या तरुण पिढीचे वास्तव चित्रण कवीने रेखाटलेले आहे. सुगीच्या दिवसात शेतकऱ्याची लगीनघाई असते. अशावेळीच डोंगर धनगराचा बैल मरून पडला आहे. त्यामुळे शेतीमधील कामे ठप्प झाली आहेत. पावसाअभावी पिकांचा हंगाम वाया गेला आहे. नांगरणी, कोळपणी, आणि बी बियाणांसाठी केलेला खर्च वाया गेला आहे.त्यामुळे सावकाराकडून घेतलेल्या कर्जाचा बोजा वाढला आहे. अशा अनेक गोष्टी बाप सांगायचा... अशातच सुट्टी संपत यायची तेव्हा गावाबाहेरील बस थांब्यापर्यंत बाप निरोपासाठी यायचा. अशावेळी बापाने निरोपासाठी उंचावलेला फाटक्या बाहीचा हात पाहून मुलगा मनातून तळमळत रहातो. बापसुद्धा पुढच्या सुट्टीची वाट पहात तळमळत घराकडे जातो. बापाने गरिबी पहिली, पण बाप कधी खचला नाही. बापाचा कष्टाच्या भाकरीवर दृढ विश्वास असल्याने बापाने कधी बेईमानी केली नाही. मनाने हळवा असणारा बाप गावाबद्दल, शेतीबद्दल,

नात्यांबद्दल आत्मियतेने आणि तळमळीने बोलत रहातो. कैलास दौंड नावाचे कवी म्हणतात की, 'कविता ठरवून नव्हे तर आतून यायला पाहिजे'. ते गावबीव नावाच्या कवितेत म्हणतात की,

"शेतीचं अनुदान बॅकेत जमा झाल्याची
मानसं होत राहतात गावजमा
दगडा-दगडांवर बसतात टेकउन बूड
त्याच्याशीही आदिम नात सांगत
अंधार वाढत जातो खोल-खोल
मानस जातात अंधारात झोपी-बिपी
उद्याच्या मृगजळी पुराची स्वप्ने पहात"[१०]

१९९० नंतर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दुष्काळ पडला. दुष्काळाच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कर्जमाफी योजना जाहीर केली. काहींना कर्जमाफी मिळाली, तर काहींना फक्त आश्वासने, काहींच्या बँक खात्यात शेतीचे अनुदान तर काहींची खाती अनुदानाची वाट पाहत आहेत. अशावेळी सगळा गाव एकत्र जमतो. शेतीच्या अनुदानावर तासन-तास चर्चा केली जाते. उद्याची भावी स्वप्ने मनाशी घेऊन माणसे अंधारात झोपी जातात. कमरे इतक्या मृगजळाने बनली आहेत इथली शेती आणि बागाईते. अशा स्वरूपाचे विदारक वास्तव कवी मांडताना दिसतो. रावसाहेब जाधव आपल्या कवितेबद्दल म्हणातात की, 'केंद्रापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करणारी माझी कविता आहे.' ज्या परिसरात रंगलो, रमलो, तरंगलो, जगलो, वाढलो ती माती, शिवार, शिवार, माणसे, जनावरे, जीवजंतू, ऋतू, आकाळ-अवकाश, आशा-निराशेचा सगळा परीघ पेलताना त्याच्या केंद्रापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करणारी कविता रावसाहेब जाधवांची आहे. 'जगवा राव' नावाच्या कवितेत कवी म्हणतो की,

"स्मार्ट सिटी बनवताना स्मार्ट शेती बी बनवा राव
उगवण्यापुरती जागा अन पेर्ता माणूस
जगवा राव
वाफस्याला वाप्यावाप्यात वाय-फाय पेरू आम्ही
दबला दाणा कोंबाळण्याला थोडे खत
पुरवा राव"[११]

१९९० नंतरच्या जागतिकीकरणात स्मार्ट सिटी बनवली जात आहे. त्याच धर्तीवर स्मार्ट शेती बनवा राव असे म्हणून कवीने समाजाचे लक्ष वेधले आहे. संपूर्ण जगाचा पोशिंदा बळीराजाला जागवण्याचा संदेश प्रस्तुत कविता देताना दिसते. शेती पिकवण्याचे धडे शिकवून झाले आहेत. आता तरी शेतीतील माल विकण्याची अक्कल शिकवा राव, नको तिथे बरसणाऱ्या पावसाला अडवून जिथे गरज आहे तिथे बरसावा राव असा अंतरीचा कळवला व्यक्त केला आहे. अशाप्रकारे १९९० नंतरच्या नव ग्रामीण कवींच्या कवितेमधून वास्तव अनुभव प्रकटला आहे.

## संदर्भग्रंथ

१) घोंगडे बाळासाहेब, (संपा.) 'अक्षरपेरणी कविता विशेषांक' (दिवाळी) प्रकाशन- अक्षरवाड्मय, पुणे. प्र.आ. सप्टेंबर-ऑक्टोंबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१५, वर्ष दुसरे अंक-५, पृ.क्र.०९.
२) तत्रैव, पृ.क्र.१७.
३) तत्रैव, पृ.क्र. २१.
४) तत्रैव, पृ.क्र. २३.
५) तत्रैव, पृ.क्र. ३६.
६) तत्रैव, पृ.क्र. ३९.
७) तत्रैव, पृ.क्र. ४१.
८) तत्रैव, पृ.क्र. ४३.
९) तत्रैव, पृ.क्र. ४३.
१०) तत्रैव, पृ.क्र. ४७.
११) तत्रैव, पृ.क्र. ५०.

❖❖❖

# संत तुकारामांचा सामाजिक कार्यात्मक दृष्टिकोन

प्रा. विलास शालिग्रामजी गांजरे
मातोश्री सुभद्राबाई पाटील महाविद्यालय,
मानोरा जि. वाशिम
भ्रमणध्वनी ९४२३६११०४८ इ मेल vilasganjare@gmail.com

## प्रस्तावना

महाराष्ट्र ही संताची भूमी. संत हा शब्द ऐकताच सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यापुढे काही कल्पना उभ्या राहतात त्या म्हणजे देव, देऊळ, भक्ती, नामस्मरण, पूजाअर्चा, टाळ, वीणा इत्यादी. परंतु संत हा शब्द येथे बंदिस्त होत नाही. कारण त्याच्यात व्यापकता आहे. भक्ती आणि भगवंत हे जरी संत या शब्दात अनुस्युत असले तरी त्यांच्या सीमा एवढ्यापुरत्या मर्यादित नाही. तो सर्व मर्यादा ओलांडून मानवी उत्थांनाच्या सर्वोच्च ध्येयाप्रत पोहचलेला आहे. समाजातील सत्यशोधन व समाज विकास हयाकरिता संतांनी आपला देह व जीवन झिजविले आहे.

मध्ययुगीन कालखंडात अनेक संत होऊन गेलेत या साऱ्या संतांनी संस्कृती आणि समाज घडविण्याचं महान कार्य केलं आहे. ह्याच कालखंडातील एक श्रेष्ठ संतकवी म्हणून संत तुकारामांचा उल्लेख होतो. मराठी माणूस आणि तुकाराम यांच एक अतूट नातं आहे. 'ज्ञानोबा माऊली – तुकाराम' असा गजर अजूनही खेडोपाडी ऐकू येतो. संत तुकाराम महाराज हे मराठी माणसाच्या मनावर अधिराज्य गाजविणारे थोर संत आहेत. भागवत धर्माचा खऱ्या अर्थाने संत तुकाराम हेच कळस आहे. 'बुडती हे जन न देखवे डोळा । म्हणोनीया कळवळा येत असे ।।' असे समाजाप्रती कणव आणि प्रेम असणाऱ्या तुकारामांचा सामाजिक दृष्टिकोन फार व्यापक आणि महान आहे.

## विषय विवेचन

संत वाङ्मय आणि त्यांचा मानवतावादी विचार यातील परस्पर संबंधाचा विचार जेव्हा पुढे येतो तेव्हा प्रामुख्याने संतपंचक डोळ्यापुढे येतं. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम आणि समर्थ रामदास स्वामी हेच ते संत पंचक. ह्याच पंचकापैकी एक असणाऱ्या संत तुकारामांनी वेदना आणि विद्रोह आपल्या उरी न बाळगता त्याचा पदपरिस्फोट करून अखिल मानव जातीला सत्य उलगडून दाखविले. संत तुकारामांचे सामाजिक कार्य किंवा त्यांचा सामाजिक कार्यात्मक दृष्टिकोन पाहणे महत्त्वाचे आहे.

संत तुकारामांनी आपला समाज एकतेच्या भावनेने नांदला पाहिजे, समानता नांदली पाहिजे ह्या दृष्टीने आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून व आपल्या अभंगातून महान कार्य केले.

वर्ण धर्म कोणी धरी न विटाळ ।

वर्णधर्म आणि स्पृश्यास्पृश्यता कुणी ही पाळू नये असे तुकाराम महाराज म्हणतात. एवढेच नव्हे तर तुकारामांना हाही आशावाद होता की एक दिवस जातिभेद स्पृश्यास्पृश्य भावना नष्ट होईल आणि खरा एकसंघ मानव समाज निर्माण होईल म्हणूनच ते म्हणतात –

चारी वर्ण अठरा जाती । कवळ करिती एके पंक्ती ।

वर्ण विषमता किंवा जात विषमता दूर करण्यासाठी तुकाराम मोठ्या पोटतिडकीने कार्य करत राहिले.

१३ व्या शतकात जरी भागवत धर्माची स्थापना झाली असली आणि भगवंत एक आहे अशी घोषणा केली असली तरी ब्राम्हणांच्या अनिष्ठ जप–तप–व्रत या क्रियेमुळे कर्मकांड १७ व्या शतकातही टिकून होते. त्यावर ताशेरे ओढण्याचे काम संत तुकारामांनी केले.

तीर्थी धोंडापाणी । देव रोकडा सज्जनी ।

असे मत तुकारामानी मांडले, पुढे तुकाराम महाराज म्हणतात,

नाही निर्मळ जीवन । काय करील साबन ।।

तुम्ही अंत:करणाने, भावनेने शुद्ध नसाल तर वरून अंगाला कितीही साबण लावला तरी सारे व्यर्थ आहे. आपले मन प्रसन्न असले पाहिजे तरच आपल्या कार्यात पावित्र्य होईल आणि आपले काम तडीस जाईल म्हणून तुकाराम म्हणतात –

मन करारे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण ।।

व्रतवैकल्य, कर्मकांडाच्या मागे न लागता प्रसन्न मनाने ईश्वर प्राप्ती होऊ शकते हा मूलमंत्र देऊन तुकाराम महाराज कर्मकांडाला नाकारतात.

संत तुकाराम महाराजांनी आपल्या समाजात चाललेली अंधश्रद्धा, बुवाबाजी पाहिली आणि ही बुवाबाजी लोकांच्या शोषणास कारणीभूत ठरत आहे हे त्यांना जाणवले. बुवाबाजी, दांभिकपणा समाजात वाढत असताना महाराज म्हणतात,

मुखे सांगे ब्रम्हज्ञान । जन लोकांची कापितो मान ।
ज्ञान सांगतो जनासी । नाही अनुभव आपणासी ।।
कथा करिती देवाची । अंतरी आशा बहुलोभाची ।।
तुका म्हणे तोचि वेडा । त्याचे हाणुनि थोबाड फोडा ।।

असा प्रहार ढोंगी बुवाबाजी वर तुकाराम करतात. सोबतच त्यांनी पाखंडी वृत्ती, दांभिकपणा, बुवाबाजी ह्याचा धिक्कार केला आहे.

ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनी म्हणती साधू ।।
अंगा लावूनिया राख । डोळे झाकुनि करिती पाप ।।
दावुनी वैराग्याची कळा । भोगी विषयाचा सोहळा ।।
तुका म्हणे सांगो किती । जळो तयांची संगती ।।

सातत्याने आपल्या अभंगाच्या माध्यमातून तुकारामांनी ढोंगी बुवाबाजी, दांभिकप्रवृत्ती, अहंकारी प्रवृत्ती ह्यावर टीका केली आहे.

संत तुकारामांनी आपल्याला आलेल्या अनुभवातून प्रत्येक बाब पोटतिडकीने समाजासमोर मांडली आहे.

पुण्य ते परउपकार । पाप ते परपीडा ।।

एवढा उदात्त विचार संत तुकाराम माणसाला देतात. अतिशय प्रांजळपणे ते पाप पुण्याची संकल्पना करून टाकतात आणि देव आणि साधू कोणाला संबोधायचे याचेही ते विश्लेषण मांडतात.

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।।
तोची साधू ओळखावा । देव तेथेची जाणावा ।।

भक्ती म्हणजे केवळ परमेश्वराचे नाम:स्मरणच नव्हे तर आपल्याला जीवन जगताना ज्या अडचणी, समस्या येतात त्यावर मात करणे म्हणजे सुध्दा भक्ती होय. आध्यात्मिकतेच्या बाहेर काढून जनतेला पराक्रमी करण्याचे कार्य तुकारामांनी केले.

दुर्जनाचा मान । सुखे करावा खंडण ।।
लाथ हाणोनिया वारी । गुंडा वाट शुध्द करी ।।
बहुत पीडा खळ । त्याचा धरावा विटाळ ।।
तुका म्हणजे नखे काढुणी । टाकीजेती तुखे ।।

दुर्जनांचा मानभंग, अपमान जरूर केला पाहिजे. लाथांनी मारून गुंडांना रस्त्यातून दूर करणे व रस्ता मोकळा करणे आवश्यक आहे. जो दुष्ट बहुजन समाजाला पीडा देतो त्याचा स्पर्शही पाप आहे. ज्याप्रमाणे आम्ही नखे काढून फेकतो त्याप्रमाणे दुष्टांनाही समाजातून वेगळे काढून टाकले पाहिजे. असे रोखठोक मत संत तुकाराम व्यक्त करतात.

संत तुकारामांनी नेहमीच जनतेच्या रूपात ईश्वर सेवा साधण्याचा प्रयत्न केला. परोपकार करणे, अर्थात कोणत्या ना कोणत्या रुपाने जनतेची सेवा करणे हेच तुकारामांचे मुख्य कार्य बनले होते. ईश्वराचे ते परमभक्त झाले पण त्यांचा ईश्वर केवळ तीर्थक्षेत्रात पाषाणरुपाने बसणारा नव्हता. त्याचे दर्शन त्यांना जनतेच्या रुपात होत होते.

'प्राणिमात्रात ईश्वर आहे' या भावनेने मी लोकांना भेटतो सर्व जनता आता माझ्यासाठी ईश्वर बनली प्राण्यांचे पालन करणे ही ईश्वरपूजा आहे असे तुकाराम मानायचे.

भुती देव म्हणोनि भेटतो या जना।
नाही हे भावना नरनारी ।।
देव जाले अवघे जन । माझे गुणदोष हारपले ।।

हा पवित्र आणि उदात्त विचार तुकारामांचा होता. जनता जनार्दनाच्या सेवेतच तुकाराम लीन राहिले. त्यातच त्यांना आपल्या जीवनाचे जणू सार्थकच वाटायचे, त्यांना सुख लाभायचे.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारे ।।

भुतांची दया हे भांडवल संता । आपुली ममता नाही देही ।।
तुका म्हणे सुख पराचिया सुखे । अमृत हे मुखे स्त्रवतसे ।।

प्राणिमात्रावर, समाजावर प्रेम करणे हेच संताचे भांडवल असल्याचं तुकाराम नमुद करताना हे सुद्धा सांगतात की, इतरांच्या सुखामध्येच आमचे सुख सामावले आहे.

संत तुकारामानी सतत समतेचा पुरस्कार करुन भेदाभेद किंवा विषमता ह्याला विरोध केला. सर्वांनाच मानव म्हणून समान अधिकार आहे. स्त्री पुरुष यात भेद नाहीत हे त्यांनी जनतेला निक्षून सांगीतले. उच्चनीचता त्यांना मान्य नव्हती. आपण सर्व एक आहोत, आपण सर्वांचा आदर केला पाहिजे ही तुकारमांची भावना होती.

परावीया नारी । माऊली समान ।

हा त्यांचा विचार होता आपण सर्व एक आहोत हे तुकारामांचे स्पष्ट सांगणे होते हेच त्यांच्या पुढील अभंगातून स्पष्ट होते ते म्हणतात –

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।
कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पुजनाचे ।।

ह्या प्रकारची वैश्विक भावना तुकारामांनी विशद केली. आपण शरीराने जरी वेगळे असलो तरी आपण एकाच परमेश्वराची लेकरे आहोत, त्यामुळे भेदाभेद असता कामा नये असा विचार तुकारामांनी दिला.

जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।।

असा भावही तुकाराम महाराज मांडतात. संत तुकाराम समाजाला स्वाभिमान युक्त जीवनाचा आदर्श सुद्धा देतात. संसारात माणसाने अभिमानाने जीवन जगले पाहिजे दुर्बलतेने नाही, भयभीत होऊन जीवन जगायचे नाही, अपमानीत जीवन कधी जगायचे नाही, तसेच लज्जास्पद जीवनाचा धिक्कार असो असे तुकाराम महाराज मत व्यक्त करतानांच पुरुषाने का म्हणुन हीन जीवन जगावे असा प्रश्नही करतात. संसार प्रारब्धाधीन असून आपण कधीही हिंमत हारू नये असे विचार तुकाराम महाराज व्यक्त करतात.

तुका म्हणे जिणे । शर्तीविणे लाजीरवाणे ।।

अशा प्रकारच्या ओळीतून संत तुकारामांचा जीवनाचा आदर्शच स्पष्ट होतो.

संत तुकारामांनी फक्त विठ्ठलाचेच नामस्मरण केले नाही तर समाजातील सर्व स्तरांचा विचार केला. पाईक किंवा सैनिक कसा असला पाहिजे ह्यावर सुद्धा तुकारामांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून भाष्य केले.

पाईक तो प्रजा राखोनिया कुळ
पारखिया मुळ छेदी दुष्टा ।।

पाईक किंवा सैनिक प्रजेचे पालन सरंक्षण करुन दुष्ट शत्रुला समुळ नष्ट करतो. त्याशिवाय प्रजेचे दु:ख नष्ट होऊ शकत नाही. पाईकांनी आपल्या प्राणांचे बलिदान करण्यासाठी सदैव तत्पर असले पाहीजे.

पाईकांवाचून नव्हे कधी सुख ।
प्रजांमध्ये दु:ख न सरे पीडा ।।
तरी व्हावे पाईक जीवाचा उदार ।
सकळ त्यांचा भार स्वामी वाहे ।।

कर्तव्यदक्ष पाईकांची काळजी स्वत: स्वामी करत असतो असे तुकाराम महाराज सांगतात. त्याचप्रमाणे व्यवहारामध्ये आपण कसे असलो पाहीजे हयासाठी ते व्यवहार निती, गृहस्थ मार्ग सांगतात. 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे असा मार्ग सांगताना 'उदास विचारे वेच करी' अशी सूचनाही करायला ते विसरत नाहीत. लोभ न धरता कुठलीही आसक्ती न ठेवता धनसंपत्तीचा योग्य विनीयोग करावा असा मंत्र तुकाराम महाराज देतात.

अभ्यासाची आवश्यकता व प्रयत्नवाद यावरसुद्धा तुकारामांनी अतिशय मार्मिकपणे आपले विचार व्यक्त करून योग्य संदेश समाजाला दिला आहे.

ओले मुळ भेदी खडकाचे अंग ।
अभ्यासासी सांग कार्यसिद्धी ।।

अशाप्रकारे प्रयत्नातून सहज यश साध्य होते हे सांगताना पुढे तुकाराम म्हणतात.

असाध्य ते साध्य करिता सायास ।
कारण अभ्यास तुका म्हणे ।

प्रयत्नातुन असाध्य ते साध्य करण्यासाठी समाजाला प्रयत्नवाद शिकवितात आणि समाजाला अभ्यासाचे महत्त्व दाखवितात.

संत तुकारामंनी नम्रता, लीनता जीवनामध्ये फार महत्त्वाचे आहे असे सांगितले आहे.

महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे वाचती ।।

ह्याप्रमाणे नम्रता ज्याठायी असते तो नित्य जीवनात स्थिर राहतो. हा विचार तुकारामांनी मांडला आहे एवढेच नव्हेतर संत तुकारामांनी पर्यावरणाचे महत्त्व जाणून वृक्षवेलींवर आपण प्रेम करून आपण ती जतन केली पाहीजे म्हणून संत तुकाराम म्हणतात —

वृक्षवल्ली आम्हा सोयरी । वनचरी
पक्षी ही सुस्वरे । आळवीती ।।

ह्याप्रमाणे पर्यावरणसंतुलन महत्व तुकाराम समाजाला सांगताना ते निसर्गप्रेम सुद्धा दाखवितात.

संत तुकारामांचे सामाजिक कार्य जेवढे मोलाचे होते त्याचप्रमाणे त्यांचे आध्यात्मिक कार्य महत्त्वाचे होते परंतु सामाजिक, कार्यापेक्षा त्यांच आध्यात्मिक कार्य हे गौण होतं. त्यांच्या असामान्य व्यक्तित्वाची ही एक झलक आहे. स्वत: ईश्वराची आराधना करणे आणि जनतेलाही ईश्वररूपात लीन करणे हे आपले प्रमुख कार्य ते मानत असत. ईश्वराचा, ईश्वराच्या नामस्मरणाचा, कथा, कीर्तनाचा महिमा संत तुकारामांनी जितक्या उत्कटतेने वर्णन केला तितका कोणत्याही संताने वर्णन केला नसावा. प्रपंचात किंवा घर संसारात राहूनही नामस्मरणाने ईश्वर प्राप्ती होते हे त्यांच्या आध्यात्मिक उपदेशाचे सार आहे.

चित्त शुद्ध तरी शत्रू मित्र होती ।
व्याघ्र हे नरवाती सर्प तया ।।
विष ते अमृत आघात ते हित ।
अकर्तव्य नीत होय त्यासी ।।

तुकाराम महाराज म्हणतात जर आपले मन शुद्ध असेल तर शत्रुही मित्र बनतात. विष अमृत बनते म्हणून मन पवित्र ठेवून संसारात राहावे. परधन तसेच परनारी संबधात पवित्र राहावे असा उपदेश तुकारामांनी केला आहे. त्याचप्रमाणे तुकाराम म्हणतात भिक्षापात्र हातात घेऊन जीवन जगणे अत्यंत लज्जास्पद आहे. कारण की ती स्वार्थासाठी दुसऱ्यांना संकटात टाकते. स्वावलंबी जीवनात सर्व व्यवहार सचोटीने झाले पाहिजेत असा तुकारामांचा अट्टाहास होता.

## समारोप

मराठी सारस्वतात तुकोबांच्या अंभगवाणीचे स्थान सर्वात वरचे असून ती सामान्यांच्या ह्रदयाला जाऊन भिडली आहे. तुकारामांची कविता सुंदर अशा जीवन भाष्याचे रूप धारण करते. शुद्ध अंतरंगाच्या बीजापोटी जन्म घेतल्याने ती रसाळ गोमटी बनली आहे. त्यांची वाणी मेणाहुनी मऊ असली तरी प्रसंगी वज्राहूनही कठीण बनते. संत तुकारामांनी मानवी जीवन, समाज ह्याचा सर्व व्यापक दृष्टीने विचार करून मानवी जीवन सुखी, समृद्ध, शांत करण्याच्या दृष्टीने तसेच सुंदर समाज निर्माण करण्याच्या हेतूने तुकारामांनी सुंदर अभंग रचना करून मानवी जीवन सुखमय करण्याचा प्रयत्न केला आहे.

जनांना स्वहितांच्या खुणा सांगताना तुकोबांची वाणी उदात्त आणि उच्च स्तरावर जाते.
'दया क्षमा शांती । तेथे देवाची वसती, कुणाही जीवाचा न घडो मत्सर, निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेचि फळ, मुंगी आणि राव । आम्हा सारखाच जीव ।' अशा शब्दांतून तुकारामांनी समाज प्रबोधन केले. सत्य, प्रेम, भूतदया, प्रामाणिकता, स्वावलंबन चित्तशुद्धी, समानता, श्रद्धा, ईश्वराचे नामस्मरण आणि कथा, कीर्तन आदी उच्च आदर्शाचा उपदेश त्यांनी जन्मभर दिला आणि समाज स्तर उंच उठविला. धार्मिक, आध्यात्मिक आणि विशेष करून सामाजिक क्षेत्रात समानतेचा संदेश देणारे संतकवी म्हणजे संत तुकाराम होय. त्यांच्या सामाजिक कार्यामुळे ह्या मराठी समाजाला योग्य दिशा प्राप्त झाली एवढे निश्चीत व खरे !

## संदर्भसूची

१) डॉ. विष्णू भिकाजी कोलते (अनुवाद —सौ. सुमती रमाकांत कोलते ) 'मराठी संतांचे सामाजिक कार्य'
२) वै. बाबुराव हरी देवडीकर कृत — 'श्री तुकाराम गाथा', श्री संत गाडगेबाबा गाथागीता संकीर्तन सत्संग प्रतिष्ठान, पंढरपुर
३) ल. रा. नसिराबादकर — 'प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, दुधाळी, कोल्हापुर
४) प्रा. डॉ. रमाकांत कोलते गौरव ग्रंथ — 'ऐसी कळवळयाची जाती,' संयोजक डॉ. रमाकांत कोलते गौरव समिती, यवतमाळ.

❖❖❖

# नव्वदोत्तरी कवितेतील सद्ययुगीन वास्तव : एक शोध प्रतिमा आणि प्रतिकांच्या अनुषंगाने

**(बाळासाहेब लबडे, साहिल शेख, गीतेश शिंदे या कवींच्या कवितांचा अभ्यास)**

**प्रा.डॉ. शोभा इं. रोकडे**
सहयोगी प्राध्यापक (मराठी विभाग)
इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय,
अमरावती, भ्रमणध्वनी 9960937769

## सारांश

मर्ढेकरांच्या कवितेनंतर आधुनिक जीवनातील यंत्रजाणिवेच्या कविता लिहिणाऱ्या कवींनी अचूकपणे नव्या, तांत्रिक आणि ढासळत्या मूल्यांना चिमटीत पकडण्याचा प्रयत्न केला. जागतिकीकरणाच्या रेट्यात गुदमरलेलं माणूसपण या कवितेने निर्भयपणे मांडलं. 'वास्तव' हे या कवितेचं मर्म आहे. प्रत्ययकारिता हा या कवितेचा केंद्रबिंदू आहे. नव्वदोत्तरी कवितेतील धाडसी कविता म्हणून ज्या कवींचा नामनिर्देश करावा लागेल त्यात अजीम नवाज राही, सुनील अवचार, भगवान निळें, प्रशांत असनारे, इरफान शेख, दुर्गेश सोनार, प्रथमेश पाठक याचबरोबर साहिल शेख, बाळासाहेब लबडे, गीतेश शिंदे यांच्या काव्यसंग्रहाचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. नवप्रतिमांचा प्रसव हे या संग्रहाचे खास वैशिष्ट्य आहे. वर्तमानाला शब्दबद्ध करूंन मानवतेची हाक देणाऱ्या या कविता आहेत. भांडवलशाही, भ्रष्टाचार, दहशतवाद, जातीयता, स्वार्थी राजकारण, शेतकऱ्यांच्या व्यथा, असुरक्षितता आणि शेवटी शोषण या अंगाने प्रवास करणाऱ्या या कवितेतून कमालीची अस्वस्थता कवींनी अभिव्यक्त केली आहे. नाविण्यपूर्णता आणि प्रायोगिकता या दृष्टीने हे कवी म्हणूनच महत्त्वाचे ठरतात म्हणूनच या कवींच्या कवितेतील युगप्रतिमा आणि कवितेमध्ये आलेली अनोखी प्रतिक यांचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधातून करण्यात आला आहे.

## प्रस्तावना

नव्वदोत्तरी मराठी कविता ही विविध अंगाने पुष्ट होत असली तरी निखळं वास्तवाचा हात धरून लिहिणारे फार कमी कवी निदर्शनास येतात. जागतिकीकरण आणि भांडवलवाद या गर्तेत सापडलेलं 'माणूसपण' हा धागा पकडून ज्या कवींची कविता अलिकडच्या काळात आली त्यात अनेक कवीच्या कवितांचा उल्लेख करता येईल, पण नेमके दुखरेपण चिमटीत पकडणाऱ्या आणि सद्ययुगीन प्रतिमा प्रतिकांचा योग्य विनियम करणाऱ्या कवींमध्ये जी महत्त्वाची नावं आहेत त्यातील 'मुंबई, बंबई, बॉम्बे' कार डॉ. बाळांसाहेब लबडे, 'फार्मलेस' कार साहिल शेख आणि 'निमित्तमात्र' कार गीतेश शिंदे यांच्या कवितांचा विशेष उल्लेख करावा लागेल. शैलीबंधांचे विविध रूपं जशी या कवितांनी स्वीकारली तशीच वास्तव, नकार व परिवर्तन या पातळीवरही ही कविता अधिक गंभीर होत गेलेली दिसते. महानगरीय जाणिवा आता बोथट होऊ पहात असल्या तरी समाजाला विचारप्रवृत्त करण्याची ताकद घेऊन आलेल्या या कवींच्या कविता सद्ययुगात लक्षणीय ठरतात. माणूसपण उन्नत करण्याची अपेक्षा करणाऱ्या या कविता म्हणूनच महत्त्वपूर्णही वाटतात.

सद्य स्थितीगतीशी प्रामाणिक अशी या कवींची कविता आहे. सहजच्या जगण्यातून आलेलं तत्त्वज्ञान हे या कवितांचे मूळं आहे. मर्ढेकरांनी कवितेचा नवा चेहरा दिला. कारण तेव्हा समाजवास्तव एकाएकी बदललं. नवी प्रतिमासृष्टी मर्ढेकरांनी उभी केली. यंत्रयुगातील प्रतीकं त्यांची काव्य प्रतिभा समृद्ध करती झाली. याच पार्श्वभूमीवर या तीनही कवींचा विचार केल्यास बदलते समाजचित्र, मोबाईल, इंटरनेट, फेसबूक, व्हॉट्सॲप च्या जगतातील भावनिक अनुबंध निर्देशीत करणाऱ्या या कविता आहेत.

जगाच्या वेगवान स्पर्धेमध्ये महानगराची जीवघेणी घोडदौड, माणसांची जगण्यासाठीची दमछाट, दारिद्र्य, दुःख आणि विव्हळं यात गुदमरलेलं माणूसपण आणि यातून बाहेर

पडण्यासाठीची चाललेली जिवघेणी धडपड निदर्शनास येते. हे तीनही कवी वास्तवाच्या पातळीवर या सास्त्रया नोंदी मांडतात. जगाचा खरा चेहरा दाखवतात अन् भन्नाट शब्दसामर्थ्याचे दर्शन घडवितात. भाष्य करतात, खळाळून समाचार घेतात, व्यवस्थेचा विद्रूप चेहरा उघडा पाडतात.

## उद्दिष्टे

- नव्वदोत्तरी काव्य जाणिवा तपासणे.
- काव्यविषयाच्या अनुषंगाने सद्यकालीन वास्तवाचा शोध घेणे.
- कवींच्या काव्य अभिव्यक्तीतील सद्ययुगीन प्रतिमा व प्रतिकांची लक्षणीयता अभ्यासणे.

'मुंबई...बंबई, बॉम्बे' हा बाळासाहेब लबडे यांचा बहूचर्चित संग्रह. संग्रहाच्या शीर्षकावरूनच मुंबईच्या संमिश्र संस्कृतीचं दर्शन हाच या संग्रहाचा मूळ उद्देश आहे हे लक्षात येते. मुंबई महानगराला स्पर्श करताना कवी आपल्याला मर्ढेकरांच्या नवतेचाही फेर फटका मारून आणतात.

भुकेचा मर्मस्थानी असलेला प्रश्न मांडताना कवी म्हणतात 'जगण्याच्या प्रश्नासाठी रोज सोलावी कातडी। फसवून आयुष्याचा। छळतात ही आतडी'. सरसरून अंगावर काटा उभा रहावा अशा हृदय छेदणाऱ्या या ओळी. ही तगमग या संग्रहात पानोपानी दिसते. मुंबईतील अजब गजब दृश्य मांडताना प्रतिमा आणि प्रतिकांची कवीने केलेली उधळण अचंबित करते. 'लोकशाहीचे बिल्डर' 'घारापुरी', 'कबुतरखाना', 'सायन कोळीवाडा', 'तुझ्या मुतास्त्रयांचे ओंगळ संसार" यातून अभिव्यक्त होणारी निर्भय संवेदना लक्षणीय आहे. अत्याधुनिक प्रतिमांचा खजाना म्हणजे या कविता होत.

मुंबईचं आजचं वास्तव तिच्या ठळक वा सूक्ष्म अवस्थांसह शब्दबद्ध करण्याची कवीची धडपड यशस्वी ठरली आहे एवढे मात्र खरे. महानगरीय जाणिवांची एक सहसमर्थ मालिका ही कविता उभी करते. येथील धर्म, पंथ, वंश, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, वसाहती, लुच्चेगिरी, मारामाऱ्या, अपहरण, गुंडगिरी, शोषण या साऱ्यांचा धांडोळा या कवितेतून प्रतिबिंबीत होतो. एक वेगळा डौल आणि आशय–विषयाची वेगळी आब सांभाळत हा संग्रह व त्यातील कविता मनाचा ठाव घेतात. फाटक्या चादरीतले कोंदट जीव, अमर्यादित स्वप्नांचे इच्छाळ दगड, कृपेचे लाल मळवट, हातातोंडाच्या संबळी, श्रमिकांच्या घामाळं माळां, कुस बदलणारे नाले, कष्टाच्या ऋचा, अस्तित्वाच्या भयाण लाटा, नव्या युगाचा आयफेल टॉवर, ग्लोरिफाय कचरा, वांझोटी झोपडी, क्रान्तीस्वप्नात पहुडलेले सूर्य, नखरेल आकांक्षांचा वाङ्मयीन तडका, घोषणांचा पाऊस अशा कितीतरी आधुनिक प्रतिमासह आपल्या कवितेतून वाचकाला कवी अंतर्मुख करतो. 'सांगा कोणत्या दुःखाचा सेल्फी काढू', हा गंभीर प्रश्न विचारतो. तर पेपरवेटच्या पाली, बहिरे झालेले दरवाजे सारख्या अभिनव प्रतिमा कवीच्या काव्यप्रतिभेची उंची सांगतात. 'अन्न दास' या शब्दाची एक अनोखी योजनाही अभंगवृत्तबंधात सुरेख स्थळी आली आहे. अभंग या वृत्तावरही कवीची विशेष पकड आहे.

दंडेलीचा पिटू। सत्तीने डांगोरा
सातबारा कोरा। जगण्याचा (मुंबई, बंबई, बॉम्बे... काळेंगोरे वळू पान नं. 120)

जगण्यातील दांभकतेला कवी अचूक शब्दात पकडतात.

'विकासाची गंगा। माध्यमांचा दंगा
घेऊ आता पंगा। षोषकांशी .... यातील कसबही लक्षणीयच! आतले उफाळते शोषण कवी नाकारू पाहतो, शोषणाच्या ज्वालारसाला तसेच धगधगते ठेवून जगण्याचे सल लिपापोती करून लपवणे कवीला मान्य नाही. म्हणून परिवर्तनाचा हुंकारही या कवितेत तीव्र होतो. बंड करून उठण्याची तुकोबाच्या तत्त्वज्ञानाची शृंखला कवी

चला लिहू सारे। तुकोबाची गाथा
घालोनिया लाथा। शोषकांना... अशा शब्दात व्यक्त करतो.

देशाचं देखणं हसणं गोजीरं रूप हरवल्याची खंत बऱ्याच कवितांमध्ये कवी व्यक्त करतो. जागतिकीकरणाच्या दिवास्वप्नात सर्वत्र घाणीने अधिराज्य जमले अन् स्वच्छंतेचे लखलखते गाव

त्यात होरपळून गेले, संस्कृती छिंन्नविछिंन्न करून तिची लक्तरे देशोधडीला टांगणाऱ्या व्यवस्थेचा कवी निषेध करतात. जातीय सलोख्याच्या अभावाने सर्व शहर पोखरले गेले, माणूसपण भंगले, भांबावले, समतेच्या या शहराला जातीयवादाच्या कलंक लागला. माणसाचा श्वासावरून ताबा निसटला. अशा अस्वस्थ करणाऱ्या संवेदनाही कवी मांडतो.

बालमजुरीचा प्रश्न आपल्याकडे अत्यंत गंभीर आहे. कायदे आणि सुव्यवस्था यासाठी गतिमान झाली असली तरी बालमजुरीच्या भरवष्यावर मुंबई हे शहर कशी मजा मारते हे भीषण सत्य कवी समोर आणतात.

रेड सिग्नलला गाड्या
भर दुपारच्या रणरणत्या ऊन्हात
भांबावलेल्या नजरेने मुले
हातात गजरे, छोंटी मोठी खेळणी घेऊन
विस्कटलेल्या केसांनी...मळंक्या कपड्यांवर
चिंतेत भणंग..गर्भार काचामधून डोकावतात.
(मुंबई, बंबई, बॉम्बे.. रेड सिग्नल.. पेज 102)

'गर्भार काचा या सुरेख प्रतिमेसह ही कविता समस्येवर बोट ठेवते. फुटपाथवरील जगण्यातील दाहकता अन् जीवनाला जाणारा छेद हा या कवितेतील मध्यबिंदू होय. शासकीय पोखरलेपण, रेडलाईट एरियातील वेदना, चिरिमिरीचे चोरटे व्यवहार, धुळखात पडलेली व्यवस्था इत्यादी प्रश्न मुंबईला मध्यवर्ती ठेऊन कवीने ताकदीने मांडले आहेत आणि ग्लोबल जगाच्या जखमांनी सुगंधित होत राहण्याची आशा वक्तवली आहे. एकूणच नव्या करकरीत आणि जगाला आपल्या पाशात अडकवणाऱ्या व्यवस्थेचे चित्रण करणारी ही नव्वदोत्तरी कविता लक्षणीय प्रतिमांनी युक्त अशी नव्या युगातील खरी कविता वाटते.

असाच एक ताकदीचा कवी नव्या युगाची आव्हानं आपल्या कवितेत पेलतांना दिसतो. कोल्हापूर कुरुंदवाड येथील साहिल शेख या कवीच्या कवितेने सद्या एक आकर्षक वलय निर्माण केलेलं आहे. भन्नाट लिहिणारा या दशकातील कवी म्हणून त्याचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. 'फॉर्मलेस' या शीर्षकाच्या नाविण्यातच त्याच्या कवितेचा शोध घ्यावा लागेल. अस्वस्थता, उद्विग्नता अन् व्यवस्थेबाबतची नाराजी 'फॉर्मलेस' मधील कवितेतून डोकावते.

उघड्यानागड्या बसलेल्या, माणसाचं पाठमोरं, आकाशाशी मुका संवाद साधणारं चित्र! काटेरी चौकटीतले व काही आयताकृतीत कैद केलेले आयाती रंग. सफेद, भगवा, निळा, हिरवा जळक्या वर्तमानाला बोलकं करणारी राखाडी पार्श्वभूमी, चिंतेचे दाटून आलेले कासावीस ढग, अन् त्यातून अलगद बाहेर आलेला, फुलं टाकणारा, शांतीचा, आधाराचा, भरवशाचा जणू काही बुद्धाचाच हात आणि मलपृष्ठावर 'दाद नकोच अडाण्यांकडून आणि जाणकारांचे मौन नको' या दोनच ओळी! पुस्तक वाचून संपलं की एक अस्वस्थ समाधान नवा आशयविषय घेऊन येतानाच कवी जीवनाकडे किती संयमाने बघतो याची प्रचिती येते' हा अभिप्राय या कवितेबाबत नोंदविला आहे मराठीचे अभ्यासक जेष्ठ कवी विष्णू थोरे यांनी.

खरंतर अत्यंत विचारशील जीवनदृष्टी आणि ओघवती निवेदन शैली ही या कवितांची खरी वैशिष्ट्ये आहेत. वैश्विक कल्याणाची प्रार्थना करणारा हा कवी धर्माला नकार देतो. त्याला पडणारे प्रश्न विलक्षण आहेत. अंतर्मनाशी त्याची चाललेली जीवघेणी लढाई त्याच्या कवितेतून बोलकेपणाने व्यक्त होते. कवीचे जगाकडे बघण्याचे डोळे निराळेच आहे. त्यात कमालीची निरीक्षण क्षमता आहे, भेदकता आहे. मुलगी जेव्हा प्रतिज्ञा म्हणते 'भारत माझा देश आहे' अन् हे कवी ऐकतो तेव्हा त्याच्या मनात विचार येतो 'आपण सारे पुस्तकी गाढव'. यातून कवीची अस्वस्थता, व्यवस्थेवरील आरोप नकळत व्यक्त होतात. दारिद्र्य आणि अभावग्रस्तता यामुळे कवी अस्वस्थ होतो.

सरणावरचं लाकूड कोणत्याही ऋतूत बहरत नाही
आणि अत्तराच्या चार थेंबांनी
मृताची कबर सुवासत नाही (फॉर्मलेस पेज क्र. 5 शीर्षक नाही)

नैतिकतेची साधी सरळ पायवाट चालत आपल्या मनाने नाकारलेल्या मूल्यांची साथ येथे कवी देतो. टोकदार निषेध नोंदविण्याची शक्ती कवीच्या शब्दात आहे. भाषेवरील कमालीचे, टोकाचे प्रभुत्व, जगण्याचा घेतलेला वास्तव अनुभव आणि जगतानाचे वाट्याला आलेले, टिपलेले ताणतणाव कवीच्या शब्दाशब्दातून उभे राहतात.

दिवसांना फुटलेत पंख
रात्रींना आलेत पाय
बाभळीला येतोय बहर
तू न मी दोनच प्रहर
बाकी शून्य... उद्ध्वस्थ नगर... (फॉर्मलेस 'मी' पेज नं. 16)

एक वेगळीच लकब उपरोक्त कवितेत डोकावून जाते. ढगांचा बर्फ वितळणे, श्रद्धेचा सडा, तिरस्काराची राख, नात्यांची कन्नी, महत्त्वाकांक्षेचा दोर, आठवणीची जळमटं, अफवांचा अफीम, नवतेचा खंजर, अनुलेखाची सुरी, समरसतेचं षंढत्व यासारख्या अनोख्या प्रतिमा या कवितांचं वेगळेपण नोंदवतात. ज्याप्रमाणे कवी बाळासाहेब लबडे शेवटी शोषणाविरुद्ध बंड करण्याची भाषा वापरतात त्याचप्रमाणे कवी साहिल शेख परिवर्तनाचा घोष करतात. इथली जातीवाचक, वर्णवाचक व्यवस्था, माणसाला हताश करणारी षडयंत्र कवीला अस्वस्थ करतात.

कवीची व्यवस्थेबाबतची नाराजी आणि त्यातून परिवर्तनाची साद ही निस्सीम आहे. शेवटी कवी निर्मात्याला मागणी करतो ती फक्त 'माणूसपण जिवंत ठेवण्याची' भांडवलशाही, जागतिकीकरण, लाचारी, दारिद्र्य, शोषण, दांभिकता या सारख्या नकार मुद्रा घेऊन या कवीची कविता सद्यस्थितीतील आव्हानांना सामोरी जाते. या कवितेतील आवाज स्वतंत्र असला तरी तो तेवढा प्रातिनिधीकही आहे.

कवी गीतेश शिंदे यांची कविता ही या काळातील महत्त्वाची कविता आहे. मानसिक गुंतागुंत आणि यासाठी कारणीभूत ठरणारं जागतिक यंत्रयुग यांची सुरेख सांगड कवींनी घातली आहे. नेमके जगण्यावर बोट ठेवल्याने अन् आपली होणारी फसवणूक निदर्शनास आणून देणारे त्यांचे सूक्ष्म निरीक्षण भावणारे अन् चिंतन करावयास लावणारे आहे. ते म्हणतात,

महासत्ता डोकावतेय बेडरुमच्या खिडकीतून
गुगल अर्थवर शोधता येतात गल्लीचे अवशेष
पोलर सॅटेलाईटसच्या मदतीने
होतय पृथ्वीचं स्कॅनिंग
महासंगणकातील अल्गोरियमच्या सहाय्याने
(सीसीटिव्ही सर्व्हेइलन्स... महाराष्ट्र टाईम्स् 2016)

एकूणच कवीच्या आधुनिक यंत्रजाणिवांची पकड या कवितेतून दिसून येते. प्रत्येक डोळ्यात सीसीटिव्ही बसविला आहे अन् माणुसकीचं अंडर सर्व्हेइलन्स सुरू आहे. हे अनोखेपण कवी मांडतो.

सेल्फीचे भयंकर फॅड सध्या ॲनरॉईड मोबाईलमुळे आले आहे. प्रत्येकच जण स्थळ, काळ, वेळ विसरून सेल्फी घेतो आहे. कवी म्हणतो, आपण स्वतः स्वतःला मोबाईलच्या कॅमेऱ्यात अडकवू पाहतो. या शहराला सेल्फीचा रोग जडलाय हेही सत्य ते मांडतात, अंतर्मुख करतात. मोबाईलच्या विविधांगी छटा मांडून सतत स्क्रीनवर राहण्याची, मेगा पिक्सेलमध्ये स्वतःला रंगवणारी माणसं स्वत्वच गहाण ठेवत आहे. स्वतःमधील निरागसता विसरून, स्वतःचे अस्तित्व विसरून पाठविलेल्या सेल्फीला किती कमेंट्स, लाईक मिळालेत ही त्यांची भूक आहे. आभासी जगात स्वतःला गुंतवून ठेवण्याचीच फक्त एक अघोरी महत्त्वाकांक्षा सर्वत्र दिसते. सेल्फी काढण्याच्या वृत्तीवर ताशेरे ओढत वास्तव मांडताना एका कवितेत कवी म्हणतो.

सेल्फी आगीत तेल ओतणारा
अपघाताच्या वेळी बघ्याची भूमिका घेणारा
सेल्फीच्या भाराने माणुसकीचं
झालंय सर्व्हर डाऊन
झालो सेल्फीश

मेलेल्या भावनांना श्रद्धांजली वाहून

('सेल्फीश' – सृंजन दिवाळी... दिवाळी अंक 2016)

एकूणच मराठी साहित्यविश्वात कवितेच्या दालनात नव्या, वास्तव संवेदनांची जीवघेणी, चिंतनपर तर कधी अंतर्मुख करणारी मांडणी करणाऱ्या कवींची एक फळी तयार झाली असून जागतिकीकरण, नवा जीवनवाद आणि गोंधळलेली मानसिकता, यात सापडलेलं मानवी अस्तित्व हे कवी प्रतिभेचा कस लावून शोधताना दिसतात. नव्या प्रतिकांचे व प्रतिमांचे उचीत भान या कवींना आहे हे निर्विवादपणे सत्य आहे.

## .संदर्भ सूची


- लबडे बाळासाहेब, मुंबई, बंबई, बॉम्बे, ग्रंथाली, मुंबई, 05/10/2017
- शेख साहिल, फॉर्मलेस, शब्द प्रकाशन, मिरज 19/02/2016
- अक्षर पेरणी, (नियतकालिक) पुणे, संपादक बाळांसाहेब धोंगडे, मार्च 2018
- दिव्यमराठी (रसिक पुरवणी), एप्रिल 2017
- मिरासे विनय, कुसुमाकर, (नियतकालिक), (ज्वलंत वास्तववादी कविता) डिसेंबर 2018, मुंबई, अंक 12, वर्ष 19 वे.
- काळे दा.गो. मुंबईच्या समग्रतेच्या चित्रणाचे कोलाज, दै. अमृत कलश, ठाणे, दि. 14/03/2018
- शिंदे गीतेश, निमित्तमात्र, 2014 संवेदना प्रकाशन, पुणे


❖❖❖

# ग्रामीण भागातील विद्यार्थी व भाषाविषयाच्या अध्यापनातील समस्या

प्रा.रा.तु. आदे
सहयोगी प्राध्यापक
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि.यवतमाळ
इ मेल rajuade2512@gmail.com भ्रमणध्वनी ९४२२६०८७१५

## प्रास्ताविक

शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. मनुष्याच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण अत्यंत उपयुक्त आहे. शिक्षणामुळेच मानवी जीवनात परिवर्तन झाले आहे. सुसंस्कृत समाजाच्या निर्मितीसाठी शिक्षणाचे मोल अपार आहे. गतिमान समाजाच्या घडणीत शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षणाचा उद्देश केवळ पदवी मिळवणे हा नसून आचार–विचारात बदल घडवणे हा शिक्षणाचा मूलभूत उद्देश आहे. 'विद्येनेच मनुजा श्रेष्ठत्त्व आले या जगामाजी' असे जे म्हटले जाते, त्याचाही अर्थ तोच आहे. पाश्चात्त्य विचारवंत बेकन यांनी 'ज्ञान ही शक्ती आहे' असे म्हणत ज्ञानाची महती विशद केली आहे. शिक्षण हा समाजाला लाभलेला तिसरा डोळा आहे. त्यामुळे मनुष्य सुजाण, सुसंस्कृत व चिकित्सक होण्यास मदत होते. शिक्षणामुळेच समाजाचे चित्र बदलण्यास मदत होते. मानवी जीवन सफल–संपूर्ण, समृद्ध,विकसित होण्यासाठी शिक्षण हाच तरणोपाय आहे.

पदवीचे शिक्षण घेणारा विद्यार्थी हा समंजस, जिज्ञासू, ज्ञानपिपासू, चिकित्सक असणे अभिप्रेत असते. पदवीस्तर हा उच्च शिक्षणातील महत्त्वाचा स्तर असतो. यातूनच अनेक ज्ञानार्थी बाहेर पडत असतात. शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा विविध क्षेत्रात हेच विद्यार्थी मानाचे पान मिळवित असतात. त्यासाठी पदवी स्तरावर दिल्या जाणा–या शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त होते. या स्तरावरील शिक्षणच विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याला वळण लावण्यास उपयुक्त ठरत असते.त्यामुळे यातून दिले जाणारे शिक्षण हे दर्जेदार, सातत्यपूर्ण व विद्यार्थ्यांच्या आयुष्याला गतिशील करणारे ,त्याची सर्वांगीण प्रगती साधणारे असणे गरजेचे असते. देशाची भिस्त तरूण पिढीवरच असल्यामुळे त्यांच्या घडणीवरच देशाचे भवितव्य अवलंबून असते. त्यादृष्टीने विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाची रचना असणे आवश्यक असते.

ग्रामीण, दुर्गम भागात वास्तव्यास असणारा विद्यार्थी हा काहीसा लाजाळू, भीडस्त, न्यूनगंडाने पछाडलेला व परावलंबी असल्यामुळे त्याच्यामध्ये आत्मविश्वासाचा अभाव असतो. विशिष्ट भूभागातून आल्यामुळे त्याच्यावर तेथील सामाजिक पर्यावरणाचा, लोकसंस्कृती, रूढी–प्रथा, परंपरांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रभाव पडलेला असतो. त्यामुळे शहरी संस्कृती लाभलेल्या महाविद्यालयामध्ये प्रवेशित होताना, तेथील वातावरणात मिसळताना त्याची तारांबळ उडते. त्याचा बराचसा कालावधी तेथील वातावरणात समरस होण्यात निघून जातो, तेथील नवनवीन आव्हानांना सामोरे जाताना त्याला अनेक समस्यांचे अडथडे पार करावे लागतात. शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत तो कार्यतत्परता,गतिशीलता व भाषिक संस्कार यादृष्टीने मागे पडतो. विद्यापीठाने अभ्यासक्रमाची निर्मिती करताना शहरी–ग्रामीण अशी वर्गवारी केली नसली तरी ती अध्यापन करताना जाणवतेच!

ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेत अंतर असल्याचे प्रकर्षाने जाणवते. ग्रामीण भागातील उदासीन वातावरण, ग्रंथालयाची अनुपलब्धता, मार्गदर्शनाचा अभाव, नकारात्मक दृष्टिकोण, अशिक्षितपणा, निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीच्या उत्पादनात आलेली घट यामुळे ग्रामीण विद्यार्थी काहीसा निरुत्साही, निराश, देववादी आणि दैववादी झालेला दिसतो. अशी मानसिकता घेऊन आलेल्या विद्यार्थ्याला सकारात्मक, आशावादी, कणखर, बुद्धिवादी घडविणे हे फार मोठे आव्हान प्राध्यापकाला पेलायचे असते. त्यासाठी त्याची भाषा, त्याची आकलनक्षमता, त्याची अभिरुची लक्षात घेऊन अध्यापन केल्यास उपयुक्त ठरू शकते. बोलीभाषेचे रुजलेले घट्ट संस्कार प्रमाणभाषेचा स्वीकार करताना आव्हानात्मक ठरतात. मराठी आणि मराठी वाङ्मय हे विषय शिकविताना यासाठी बरीच कसरत करावी लागते. प्रमाणभाषा हव्या त्या प्रमाणात त्यांनी आत्मसात केली नसल्यामुळे विषय समजण्यास अडचणी निर्माण होतात. अशावेळी प्राध्यापकाचे कौशल्य पणास लागत असते. भाषा विषयाची नीट ओळख त्याला त्याचे इतर विषयही समजण्यास अत्यंत उपयुक्त ठरत असत.

त्यादृष्टीने या विषयाचे किती महत्त्व आहे हे त्याला समजावून सांगावे लागेल, हे करता आले तर त्याची आकलनक्षमता वाढण्यास निश्चितच मदत होउ शकते.

भाषेमधूनच सर्व प्रकारच्या ज्ञानशाखा विकसित झाल्या आहेत. कोणताही विषय अभिव्यक्त होतो तो भाषेतूनच! त्यामुळे भाषिक आकलन जितके संपन्न तितकीच त्याची ज्ञानार्जनाची प्रक्रिया गतिमान होते. भाषिक संपन्नताच विद्यार्थ्याला समृद्ध व सुसंपन्न आयुष्य बहाल करू शकते. ग्रामीण, आदिवासीबहुल, भटक्या–विमुक्त समूहातील विद्यार्थ्यांचे उन्नयन व्हावयाचे असेल तर त्यासाठी त्यांनी मुख्य प्रवाहात सामील होऊन त्यांचे भाषिक दृष्टया अनुकरण करण्याची गरज आहे. त्यासाठी त्यांनी आळशीवृत्ती सोडणे, बेफिकीरपणाचा त्याग करणे व वाणीच्या शुद्धतेसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे अत्यंत जरूरीचे आहे. भाषेविषयीची अनास्था इतर विषयाच्या अध्ययनास मारक ठरू शकते. भाषिकदृष्टया संपन्न व्यक्ती अनेक क्षेत्रात आपली छाप सोडून जात असतो. विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांचा विकास साधण्यासाठी भाषा मोलाचे योगदान देत असते. विद्यार्थ्यांमधील शोधक बुद्धीचा विकास करण्यासाठी भाषेचे माध्यम अत्यंत उपयुक्त ठरत असते.

मराठी वाड्.मय या विषयाच्या अध्ययनाने विद्यार्थी अभिरुचीसंपन्न, सौंदर्यासक्त, रसिक, आस्वादक होत असतो. त्याच्या अंगी कलाकृतीचा आस्वाद, रसग्रहण, मूल्यमापन करण्याची क्षमता या विषयाच्या आकलनाने होत असते. त्यासाठी निश्चितच या विषयाचे मोल आहे. ग्रामीण विद्यार्थ्याला याविषयी सजग करणे ही प्राध्यापकाची फार मोठी जबाबदारी असते. भाषा विषयातील रूची त्याचे व्यक्तिमत्त्व सर्वार्थाने परिपूर्ण करण्यास उपयुक्त ठरू शकते. मात्र त्यासाठी ग्रामीण विद्यार्थ्यापुढील समस्यांचे निराकरण होणे गरजेचे आहे.

## ग्रामीण विद्यार्थ्यापुढील अध्ययनाच्या समस्या

१. ग्रामीण विद्यार्थ्यामध्ये असलेला आत्मविश्वासाचा अभाव.
२. ज्ञानविज्ञान व तंत्रज्ञानापासून दुरावलेला विद्यार्थी.
३. रूढी परंपरांच्या बंधनात व पारंपारिक विचारात अडकलेला विद्यार्थी.
४. ज्ञानार्जनाची अपुरी साधने, ज्ञान प्राप्तीविषयी उदासीनता.
५. सुयोग्य मार्गदर्शनाचा अभाव.
६. दळणवळणाच्या सोयी–सुविधांचा अभाव.
७. योग्य संस्काराअभावी व्यसनाधिनतेकडे वळणारी तरुण पिढी.

अशा अनेकविध समस्यांच्या विळख्यात आजचा ग्रामीण विद्यार्थी सापडला आहे. मार्गदर्शकांच्या अभावी काहीसा सैरभैर झालेला आहे. जगण्याच्या प्राथमिक गरजांची पूर्तता होत नसल्यामुळे त्या विवंचनेत तो सापडला आहे. त्यातून बाहेर पडण्यासाठी त्याला योग्य अशा दिशादर्शनाची आवश्यकता आहे. त्याकरिता बदलत्या सामाजिक व शैक्षणिक वातावरणाशी अपरिचित ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खालील उपाय उपयुक्त ठरू शकतील.

## ग्रामीण विद्यार्थ्यांच्या विकासासाठी उपाययोजना

१. कलागुणांना वाव देणारा आवडीचा विषय निवडीचे स्वातंत्र्य
२. आयुष्याला पूरक ठरणारे व्यावसायिक अभ्यासक्रम शिकण्याची मुभा
३. दूरशिक्षणासारख्या माध्यमांची ओळख
४. श्रमप्रतिष्ठा जोपासणारे शिक्षणाची जरूरी
५. पटकथा लेखन, नाट्यलेखन कार्यशाळेची सोय उपलब्ध करून देणे
६. व्यावसायिक अभ्यासक्रमाची व्यवस्था
७. वृत्तपत्र, दूरदर्शन, रेडिओ यातील संधीची ओळख
८. प्रकाशन व्यवसायातील संधीविषयीची जागरूकता
९. विद्यार्थीभिमुख अभ्यासक्रमाची आवश्यकता
१०. कला–वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध रोजगाराची माहिती देणे
११. स्पर्धा परीक्षा व रोजगार मागदर्शन केंद्राची संधी उपलब्ध करून देणे
१२. अल्प कालावधीतील कोर्सेसकरिता संधी उपलब्ध करून देणे

वरील उपायाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यास निश्चितच मदत होऊ शकते. ग्राम जीवनाशी शहरी संस्कृतीची नाळ बांधल्याशिवाय ग्रामीण विद्यार्थ्यांचा विकास अशक्यप्राय आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांशी मनापासून समरस होऊन त्याच्याकरिता काहीतरी करण्याची मनिषा बाळगल्याशिवाय त्याची प्रगती अशक्य आहे.

## निष्कर्ष

१. ग्रामीण भागातील विद्यार्थी ज्ञानार्जनापेक्षा मनोरंजनाकडे अधिक वळलेला आहे.
२. ग्रामीण भागातील विद्यार्थी कमालीचा बेफिकीर व अल्पसंतुष्ट आहे.
३. भाषिकदृष्टया संपन्न होण्याची व शुद्ध वाणीची महती त्याला पटलेली नाही.
४. प्रगती करण्यासाठी लागणाऱ्या आत्मविश्वासाचा त्याच्यामध्ये अभाव आहे.
५. भाषिक सामर्थ्याविषयी अनभिज्ञ असल्यामुळे तो भाषेविषयी उदासीन आहे.
६. वाचनाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे विविध विषयातील ज्ञानप्राप्ती पासून दुरावला आहे.

❖❖❖

# गझलसम्राट सुरेश भट

प्रा. डॉ. वीरा मांडवकर
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
E mail: pavanmandavkar@yahoo.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## प्रस्तावना

कवी सुरेश भटांची गझल म्हणजे मराठी कवितेला पडलेले एक सुंदर स्वप्न. माधव ज्युलियनांनी ओळख करून दिलेल्या गझलेच्या क्षेत्रात मराठी रसिकाला मुक्तपणे विहार करायला शिकवला तो सुरेश भटांनी. त्यांच्या गझलांनी मराठी मनांवर निर्विवाद राज्य केले. सामाजिक, आत्मचिंतनपर विषय त्यांनी गझलांतून सहजपणे मांडला. पण त्यांच्या प्रेमविषयक आणि श्रृंगारिक गझलांनी प्रत्येक पिढीतील तरूणाईची मने जिंकून घेतली. आजही 'मलमली तारुण्य माझे, तू पहाटे पांघरावे' किंवा 'तरुण आहे रात्र अजुनि' म्हटल्यावर कोणत्याही वयाची व्यक्ती रोमांचित झाल्याशिवाय राहात नाही. म्हणूनच आबालवृद्धांना वेड लावणाऱ्या सुरेश भटांना एकमताने 'गझलसम्राट' ही पदवी बहाल केलेली आहे.

**बीजशब्द** - गझल, अभिव्यक्ती, उर्दू, शेर, भावना, प्रतिभा, भाषा, नजाकत, दर्जा, पूर्वग्रह

## कौटुंबिक पार्श्वभूमी

सुरेश भट यांचे मूळ कुटुंब मध्यप्रदेशातील जबलपूर शहराचे रहिवासी होते. त्यांचे वडील एमबीबीएस डॉक्टर होते. आपल्या व्यवसायानिमित्ताने ते महाराष्ट्रातील अमरावती येथे स्थायिक झाले. 15 एप्रिल 1932 साली सुरेश भटांचा जन्म झाला. ते जन्माने ब्राह्मण जातीचे होते. त्यांचे बालपण वेगवेगळ्या जाती समूहांमध्ये व्यतीत झाले. ज्याला आपण कॉस्मोपॉलिटन म्हणतो, अशा ठिकाणी त्यांचे बालपण गेल्यामुळे ब्राह्मण जातीपेक्षा इतर जाती-जमातींचा संस्कार त्यांच्यावर अधिक झाला. त्यांचे वडील हिंदी व इंग्रजी भाषा बोलत. त्यांच्या मित्रपरिवारात मुस्लीम, पारशी, ख्रिश्चन आदी अमराठी लोकही होते. सुरेश भट घरी मराठी व हिंदी भाषा बोलत. मराठी त्यांची मातृभाषा बनली होती. सुरेश भट आपल्या उर्दू भाषिक मित्रांसोबत बराच वेळ व्यतीत करत. पुस्तकांपेक्षाही आपल्या मित्रांच्या सहवासात, त्यांच्याशी चर्चा करण्यात मुशायराद्वारे सुरेश भटांनी उर्दू ही भाषा आत्मसात केली.

## शिक्षण

सुरेश भटांच्या शालेय जीवनाचा प्रारंभ अमरावती येथे झाला. शाळेत असल्यापासूनच ते कविता करीत. 1949 मध्ये त्यांनी मॅट्रिकची परीक्षा दिली. पुढे विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथे प्रवेश घेतला. येथेच त्यांचे मराठीचे प्रसिद्ध कवी भ.श्री. पंडित यांच्याशी भेट झाली. त्यांच्याकडून काव्य लेखनाबद्दल त्यांना बरेच मार्गदर्शन मिळाले. बी.ए.ची डिग्री मिळवताना अनेकदा नापास झाले. शेवटी कशीतरी 1955 साठी त्यांना बी.ए.ची डिग्री मिळाली. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्रासाठी संघर्ष चालू होता. महाराष्ट्रातील अनेक नेते संयुक्त

महाराष्ट्रासाठी प्रयत्नशील होते. त्यांच्यापासून प्रभावित होत सुरेश भटसुद्धा या संघर्षात सामील झाले. यासाठी त्यांना तीन महिन्यांचा कारावास झाला. त्यामुळे शासकीय नोकरी करणे त्यांना शक्य झाले नाही. नोकरीच्या प्रयत्नात त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाची 7-8 वर्षे निघून गेली.

सुरेश भटांची कौटुंबिक पार्श्वभूमी मध्यमवर्गीय होती. बी.ए. नंतर चांगलीशी नोकरी मिळवण्यात अपयशी ठरले, त्यामुळे त्यांना आर्थिक दु:स्थितीचा सामना करावा लागला. कुठलाच मार्ग त्यांच्याकडे नव्हता. अशा वेळी ते नागपूरला आले आणि 1975 साली एक साप्ताहिक पत्रिका चालवू लागले. तेच त्यांच्या मिळकतीचे साधन ठरले. 1979 पर्यंत हे साप्ताहिक चालू होते. यादरम्यान एका यशस्वी कवीच्या रूपात ते पुढे येऊ लागले होते. शेवटी 3 सप्टेंबर 1980 ला त्यांनी "रंग माझा वेगळा या शीर्षकांतर्गत आपले गझल पठण केले. तिकीट लावून गायन कार्यक्रम केला. संपूर्ण महाराष्ट्रात यासाठी दौरे करणे चालू केले आणि आपल्या प्रतिभेने हळूहळू अर्थप्राप्ती करण्यासही प्रारंभ केला. सुरेश भटांचा विवाह 1965 मध्ये झाला. त्यांच्या पत्नीचे नाव पुष्पा होते. त्यांना दोन मुले व एक मुलगी होती. दुर्दैवाने त्यांच्या एका मुलाचा दुर्घटनेत मृत्यू झाला. आपल्या म्हातारपणीच्या काळात मुलाचा मृत्यू पाहण्याचे दु:ख त्यांच्या वाट्याला आले.

## काव्यक्षेत्रात पदार्पण

1960 नंतर मराठी काव्य जगतात आपल्या वेगळ्या काव्य भावनेने मराठी गझलेत सुरेश भटांनी पदार्पण केले. कवितेबरोबरच मराठी गझलेला मानसन्मान देण्याचे श्रेय पूर्णतः सुरेश भट यांना जाते. ही त्या वेळची गोष्ट आहे जेव्हा कवी माधव ज्युलियन मराठी गझलेला आपल्या स्तरावर प्रस्तुत करीत होते. त्यात अनेक तृटी होत्या. माधव ज्युलियन मराठीचे मोठे जाणकार होते. त्यांनी दाखवलेल्या मार्गावर मराठी गझलेची एक पिढी वाटचाल करीत होती. याच वेळी सुरेश भटांनी आपल्या गझलांद्वारे, विशुद्ध गझल काय असते, याची मराठी रसिकांना ओळख करून दिली. 1940 ते 1965 पर्यंत मराठी गझल काही प्रमाणात मागे पडलेली होती, पण जसे सुरेश भटांचे आगमन मराठी गझलेच्या प्रांगणात झाले, त्याबरोबरच मराठी गझल एक नवीन रंग रूप धारण करून फुलायला लागली. सुरेश भटांनी गझलांबरोबरच अनेक काव्य प्रकारांमध्ये आपल्या रचना प्रस्तुत केल्या. जसे मुक्तक, स्फुट काव्य, गीत अशी वेगवेगळ्या प्रकारची रचना त्यांच्याद्वारे झाली.

सुरेश भटांना प्रकाशझोतात येण्यासाठी मात्र बराच कालावधी जावा लागला. पूर्ण वीस ते बावीस वर्ष प्रसिद्धी त्यांच्यापासून दूर होती. त्यामुळे प्रस्थापित कवींबद्दल सुरेश भटांच्या मनात कुठेतरी पूर्वग्रह निर्माण झालेला होता, जो त्यांनी आपल्या काव्यात जागोजागी प्रकट केला आहे. त्यांच्या काव्यात एकटेपणाची भावना, लोकांकडे साशंक नजरेने पाहण्याची दृष्टी, स्वतःविषयी अतिआत्मविश्वास या गोष्टी दिसून येतात. सुरेश भटांना 'अभिव्यक्तीचे बादशहा' म्हटले जाते. कोणती भावना व्यक्त करता आली नाही, असे त्यांच्याबाबतीत होत नाही, प्रत्येक स्तरातील व्यक्तीच्या हृदयाची स्पंदने त्यांच्या काव्याने उत्कृष्टपणे टिपलेली आहे.

## सुरेश भटांच्या काव्याचे वर्गीकरण

सुरेश भटांचे काव्य विषय तीन विभागात वाटले जाऊ शकतात. एक म्हणजे सामाजिक अभिव्यक्ती. दुसरी प्रेम अभिव्यक्ती. तिसरी आत्मचिंतनात्मक अभिव्यक्ती. सुरेश भट यांनी

अनेक सामाजिक समस्या आपल्या काव्यांमध्ये चर्चिल्या आहेत. हे करताना समाजात प्रचलित भ्रष्टाचार, राजनीतिक अव्यवस्था, सामाजिक उच्चनीचता या विषयांना आपल्या काव्यातून सुरेश भटांनी तोंड फोडले आहे. प्रेम अभिव्यक्तीच्या बाबतीतही सुरेश भट बऱ्याच सशक्ततेने प्रकट होताना दिसतात. प्रेमातील मिलन, सौंदर्याचे गुणगान, विरहाची मार्मिकता, प्रिया स्मृती, मिलनातील साफल्य, आणाभाका, तक्रारी या सगळ्या अंगांची मार्मिक सांगड त्यांच्या प्रेमाभिव्यक्तीत दिसून येते. आत्मचिंतनात्मक अभिव्यक्ती मध्ये सुरेश भट काही सुंदर संवेदना व्यक्त करतात. त्यांचे आत्मचिंतन समष्टी चिंतन होऊन जाते. त्यांनी सांगितलेली अनेक कथने दि:कालापर्यंत शाबूत राहिलेल्या दिसतात.

सुरेश भटांमध्ये एक विद्रोही वृत्ती दिसते. त्यांनी आयुष्यभर प्रस्थापितांच्या विरोधात संघर्ष पुकारला. त्यांचा अतिस्पष्टवक्तेपणा आणि परमोच्च निष्कर्षापर्यंत लवकर पोचण्याची वृत्ती यांमुळे त्यांच्याजवळ राहणारे कमी आणि राग करणारे जास्त निर्माण झाले. आपल्या मस्तीत जगणे. बेफिकीर वृत्ती, आपल्या मनाप्रमाणे फिरणे, परिणामांची चिंता न करणे, विद्रोह करणे या गोष्टी त्यांच्यात प्रामुख्याने दिसून येतात. व्यावहारिक दृष्टीने पाहिले तर हे गुण नाहीत, दुर्गुण आहेत. पण याच दुर्गुणांमुळे सुरेश भटांची गझल अत्यंत प्रभावी बनली. ते म्हणतात, 'गझलेच्या संदर्भात तुम्ही जे सांगता ते खरे नाही, सुरेश भट जे म्हणतो, तेच खरे आहे.' त्यांचा स्वतःबद्दलचा आत्मविश्वास आणि अभिमान कधी कधी अहंकाराचे स्वरूप धारण करतो. "आजच्या घडीला मराठी साहित्यात त्यांच्यासारखी गझल लिहिणारा अजून कोणीही नाही. जे आहेत, त्यांनीसुद्धा सुरेश भटांचा मार्ग स्वीकारला आहे. आज तरी मराठी गझलेच्या क्षेत्रात सुरेश भट हेच अनभिषिक्त सम्राट आहेत."[1]

मराठी भाषा, मराठी गझल, कविता, महाराष्ट्र यांच्याप्रती सुरेश भटांच्या मनात अपार आदर होता. दुसऱ्या भाषेशी मराठीची केलेली तुलना आणि मराठीला दिलेला कमीपणाचा दर्जा त्यांना कधीही आवडत नसे. मराठी भाषेविषयी मराठी लोकांच्या मनात जो पूर्वग्रह दिसून येतो, यामुळे व्यथित होऊन सुरेश भट म्हणतात, "मराठी गझलेचा विचार करताना उर्दू भाषेतील नजाकत मराठीत येऊ शकत नाही, असे म्हणणारे काही लोक आढळतात. वास्तविक मराठी भाषेला नजाकतीची गरजच नाही. ज्यावेळी उर्दूचा जन्मही झाला नव्हता, त्यावेळी मराठीत ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव सारखे ग्रंथ लिहिले गेले. उर्दूच कशाला, जगातील कोणत्याही भाषेत मराठी भाषेला 'नजाकत' देण्याचे सामर्थ्य नाही. आपल्या मायबोलीचे सामर्थ्य आम्हाला ठाऊक नसते. हे आमचे करंटेपण आहे."[2]

## सुरेश भट यांचा साहित्यप्रवास

'रूपगंधा' या काव्यसंग्रहाद्वारे सुरेश भटांनी मराठी काव्य जगतात पदार्पण केले. 'रूपगंधा' हा काव्यसंग्रह 15 मार्च 1961 मध्ये प्रकाशित झाला, जो त्यांनी स्वतः प्रकाशित केला होता. या काव्यसंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला. 1963-64 पासून सुरेश भट गझलेच्या बाबतीत माहीर बनले. 1967 मध्ये भोपाळमध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये त्यांनी आपली गझल सादर केली, जिला भरपूर प्रतिसाद मिळाला. 1970 पासून 'सत्यकथा'चे संपादक श्री भागवत यांच्या विनंतीवरून त्यांनी कविता, गझल सत्यकथा मध्ये देण्यास सुरुवात केली.

मार्च 1974 मध्ये मौज प्रकाशन द्वारा 92 कवितांचा सुरेश भटांचा दुसरा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्याचे नाव होते ‘रंग माझा वेगळा’. या काव्यसंग्रहालासुद्धा केशवसुत पुरस्कार प्राप्त झाला. महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठांत हा काव्यसंग्रह अभ्यासक्रमात सामील केला गेला. 1979 ते 1979 पर्यंत त्यांनी नागपूरला 'बहुमत' नामक साप्ताहिक सुरू केले. त्याचप्रमाणे 1980 पासून ‘रंग माझा वेगळा’ हा स्वतंत्र काव्य तथा गझल गायन कार्यक्रम ते करू लागले. त्यासाठी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात भ्रमण केले. 1983 मध्ये त्यांनी ‘एल्गार’ हा 96 कवितांचा काव्यसंग्रह प्रकाशित केला. ज्याला सोलापूरमध्ये दिला जाणारा ‘दमाणी पुरस्कार’ प्राप्त झाला. 26 डिसेंबर 1986 मध्ये गडचिरोलीतील एकोणविसाव्या ‘विदर्भ साहित्य संमेलना'चे ते अध्यक्ष बनले. कलेद्वारे उर्दू तसेच मराठी भाषा दोघांनाही जवळ आणण्याचे त्यांनी प्रयत्न केले. 1987 मध्ये महाराष्ट्र राज्य अकादमीद्वारे त्यांचा गौरवही केला गेला. जानेवारी 1989 मध्ये अमरावतीमध्ये संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील त्यांचे सादरीकरण सर्वांनाच खूप भावले. 11 एप्रिल 1994 मध्ये त्यांचा ‘झंझावात’ हा चतुर्थ काव्यसंग्रह प्रकाशित झाला. पुढे 24 जुलै 2002 मध्ये त्यांचा पुढचा काव्यसंग्रह ‘सप्तरंग’ प्रकाशित झाला. आपल्या पन्नास ते पंचावन्न वर्षांच्या साहित्यिक जीवनात त्यांनी एकूण पाच काव्यसंग्रह निर्माण केले.

कवी सुरेश भटांनी लिहिलेली ‘मलमली तारुण्य माझे’, ‘पूर्तता माझ्या व्यथेची’, ‘समजावुनी व्यथेला’, ‘रंगुनी रंगात साऱ्या’, ‘आज गोकुळात रंग खेळतो हरी’, ‘तरुण आहे रात्र अजुनि’ अशी अनेक गीते ध्वनिमुद्रित झालेली आहेत. त्यामुळे एक गीतकार म्हणून सुद्धा त्यांची ओळख बनलेली आहे. आपले संपूर्ण जीवन त्यांनी काव्याला समर्पित केले आहे.

## सुरेश भटांचे काव्य संग्रह

### 1. रूपगंधा

15 मार्च 1961 रोजी स्वतः प्रकाशित केलेल्या 'रूपगंधा' या काव्यसंग्रहाद्वारे सुरेश भटांनी मराठी काव्य जगतात पदार्पण केले. या काव्यसंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला. ते म्हणतात, 'मी तेव्हा आपल्या नावे एक छापील काव्यसंग्रह असलेला कवी बनलो.... 1946 साली कोणीही गॉडफादर नसताना व कोणत्याही कळपात सामील न होता सतत काव्यलेखन करीत आहे, पण माझ्या 53 वर्षांच्या खडतर काव्यप्रवास पुस्तकाच्या रूपाने घातलेले पहिले गाव म्हणजे 'रूपगंधा' काव्यसंग्रह.’ या काव्यसंग्रहात 72 कविता आहेत, ज्या गझल वृत्तात लिहिल्या गेल्या आहेत. 'रूपगंधा' नामक प्रेयसी च्या नावाने लिहिल्या गेल्या आहेत, म्हणून याला नाट्य काव्य म्हटले गेले आहे. बाकी गझलांमध्ये ‘मी कसा वेडा’, ‘मीठी’, ‘का मैफिलीत गाऊ’, ‘पहाट’, ‘स्मरण’ या गजला प्रेमभावना अभिव्यक्त करतात. ज्यात ‘मीठी’, ‘पहाट’ या मिलनाचा अनुभव करणाऱ्या शृंगारिक गजरा आहेत, तर बाकी प्रेम, प्रेमाची पिडा व्यक्त करणाऱ्या गजल आहेत. या गझलांमध्ये सुरुवातीपासून शेवटपर्यंत एकच विषय अभिव्यक्त झालेला आहे. सुरेश भटांचा हा पहिला काव्यसंग्रह असल्यामुळे म्हणावा तितका गजलेला त्यांना न्याय देता आला नाही स्वतः सुरेश भट सुद्धा पहिल्या काव्यसंग्रहातील अभिव्यक्तीचे अपयश मान्य करतात. “1954 झाली गझलच्या फॉर्म मधील पहिली कविता ‘का मैफिलीत गाऊ' मी लिहिली, पण त्यामध्ये जशी यमकांची रचना गज़लची असावी, तशी

नव्हती. उदाहरणार्थ 'साहू' या यमकासाठी 'राहू', 'पाहू', 'नाहू' ही यमके हवीत. 'ठेवू' यमक जुळत नाही. पण त्यावेळी ते समजत नव्हते. यमकाचे, काफिया चे नियम माहीत नव्हते मी फक्त लिहीत राहिलो".[3]

असे असले तरीही 'रूपगंधा' हा काव्यसंग्रह सुरेश भटांचा काव्यजगतातील पहीले पाउल असले तरी ते अत्यंत सशक्त पाउल खुणा उमटविण्यास सक्षम होते असे म्हणावयास हरकत नाही.

2. रंग माझा वेगळा

कवी सुरेश भट यांचा दुसरा कवितासंग्रह मार्च 1974 मध्ये प्रकाशित झाला. या काव्यसंग्रहात एकूण 92 कविता होत्या. या काव्यसंग्रहात सुरेश भटांनी अनेक विषय हाताळले. पण सुरेश भट हे मूळात स्वच्छंदतावादी कवी असल्याने प्रेमाभिव्यक्तीच्या अनेक रचना या संग्रहात आहेत. विरहानंतर अचानक प्रेयसीचं मिलन, त्यातील व्याकुळता, विरहाची भीती, विरहातील मनाची तगमग या सर्वांचे विविध अंगाने वर्णन हे सुरेश भटांचे या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्य आहे. आपल्या प्रेमाभिव्यक्तीसाठी कवी अत्यंत सुंदर काव्यप्रतिमा वापरतात. जसे 'आत्म्याच चांदणे', 'कायांचा कापूर', 'स्वप्नफुले', 'डोळ्यांची परडी', 'विरागी रक्त' अशा प्रतिमांमधून अत्यंत तरल अशा प्रेमभावनांचे प्रकटीकरण करण्यात सुरेश भटांचा हातखंडा आहे. यासोबतच सामाजिक विषय व्यक्त करणाऱ्या कविताही या संग्रहात प्रामुख्याने दिसतात. ज्यात उच्च नीच, गरीब-श्रीमंत, स्पृश्य-अस्पृश्य, यांच्यातील भेद, यांच्यातील संघर्ष प्रकर्षाने मांडणे याला सुरेश भट प्राधान्य देतात. स्वातंत्र्यानंतर आजही सामान्य लोकांचे शोषण चालू आहे, याची खंत ते कवितांतून प्रभावीपणे मांडतात.

"अरे, कसे अजून हे कुणी न तख्त फोडले?
लहानशी घरेच ही फुटावयास लागली
अजून विठ्ठलपरी दिसे कुठे न भाकरी;
अजून पालखीपुढे जनावरेच चालली!"

सामाजिकतेसोबतच आत्मचिंतनात्मक कविता हे सुरेश भटांचे वैशिष्ट्य याही काव्यसंग्रहात दिसून येते. जीवनात कधी निराशा येते, कधी मन आशेने भरून येते. आयुष्यातील अनेक चांगल्या वाईट अनुभवांनी जी जीवनदृष्टी विकसित झाली आहे, तिचे दर्शन त्यांच्या कवितात होते.

"जिवंत माझ्या कलेवराला अजून आयुष्य हाक मारी
कशास एक भिकारडयाला अजून पुकारतो हा दुजाभिकारी"

3. एल्गार

हा सुरेश भटांचा तिसरा काव्यसंग्रह, ज्यात 96 कविता आहेत. 1983 मध्ये प्रकाशित झालेल्या या काव्यसंग्रहात अत्यंत दर्जेदार अशा गझलांचा समावेश आहे. 'एल्गार'विषयी बोलताना शिरीष पै म्हणतात, "एल्गारमधील गझलांचा विचार करताना मन आश्चर्याने थक्क होते की, गझल या काव्यप्रकाराच्या निर्मितीत सुरेश भटांनी इतके देदीप्यमान यश प्राप्त करून घेतले तरी कसे? 'एल्गार'मधील एकएक गझल त्यांनी आपल्या प्राणातून पिसून बाहेर काढली आहे. गझल कशी लिहिली जावी, तर 'एल्गार'मध्ये जशी लिहिली गेली तशी, असे

उदगार 'एल्गार' वाचणाऱ्या वाचकांच्या मुखातून उत्स्फूर्तपणे उच्चारले गेले तर त्यात नवल काहीच नाही."[4]

या काव्यसंग्रहात सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या अत्यंत प्रभावी गझला आहेत. उदा. 'एल्गार', 'आम्ही', 'फुटका पेला', 'खुलासे', 'यार हो', 'आवाज बंद यंदा', 'पादुका', 'निष्कर्ष', 'मी नाही' यांचा उल्लेख करावा लागेल. यातून सुरेश भटांनी सामाजिक भ्रष्टता, असमानता, अवडंबर, ढोंगी समाज, भ्रष्ट न्यायव्यवस्था या विषयांवर कडवा प्रहार केला आहे. अनेक प्रतिमा, प्रतिके यांचा वापर करून आपल्या काव्याला कवीने अलंकृत केले आहे.

4. झंझावात

हा सुरेश भटांचा चतुर्थ काव्यसंग्रह 1994 साली प्रकाशित झाला. यात एकूण 89 कविता आहेत. ज्यातील 76 गझला आहेत. या काव्यसंग्रहात कवी म्हणतात, 'गझल म्हणजे माझे व्यसन आहे. ती माझी कमजोरी आहे. 'तू मन शुदी, मन तू शूदम' अशी आमची स्थिती आहे. म्हणजेच तू मी झाली आणि मी तू झालो'[5] मराठी गझलेत विशेष चैतन्य आणण्याचे काम या काव्यसंग्रहाने केले. 76 गझलांचा हा संग्रह म्हणजे एक सुंदर अनुभव आहे. या गझलांतील प्रत्येक शेर हा आपली स्वतंत्र ओळख घेउन येतो. त्यामुळे एका गझलेतून एक अनुभव व्यक्त झाला आहे असे होत नाही तर प्रत्येक गझल अनुभवांचा सुंदर समन्वय साधत आपल्यासमोर अवतरते. यात सामाजिक, शृंगारिक, आत्मचिंतनपर, भावनाप्रधान अशा विविध आशय प्रकट करणाऱ्या गझला आहेत.

## निष्कर्ष

1. सुरेश भटांची कौटुंबिक पार्श्वभूमी कवितेला पोषक नव्हती.
2. त्यांचे बालपण विविध जातीधर्माच्या लोकांमध्ये व्यतित झाल्याने त्यांच्यावर विविध भाषेचे संस्कार झाले.
3. उर्दू सोबत्यांमुळे त्यांची उर्दू भाषा संपन्न झाली आणि त्यांना गझलेची आवड निर्माण झाली.
4. काव्यक्षेत्रात जम बसविण्यासाठी सुरेश भटांना बराच संघर्ष करावा लागला.
5. कोणीही गॉडफादर नसताना सुरेश भटांनी स्वबळावर आपले साम्राज्य प्रस्थपित केले.
6. रूपगंधा, रंग माझा वेगळा, एल्गार, झंझावात आदी अनेक काव्यसंग्रह विविध पुरस्कारांनी सन्मानित झाले आहेत.
7. सुरेश भटांना गझलसम्राट, अभिव्यक्तीचे बादशहा अशा अनेक उपाधींनी गौरविल्या गेले.

## संदर्भ

1. शिरीष पै, सुरेश भट यांच्या निवडक कविता (संपादन), पृ. 20
2. उनि. पृ. 113
3. कांबळे डॉ. अविनाश (सांगोलेकर), मराठी गज़ल 1929 ते 1985, पृ. 156
4. शिरीष पै., उनि. पृ. 136
5. भट, सुरेश, झंझावात, पृ. 6

❖❖❖

# देशीवाद : प्रेरणा, स्वरूप आणि वैशिष्ट्ये

डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
E mail: pavanmandavkar@hotmail.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८

## सारांश

१९६१ पासून भालचंद्र नेमाडे यांच्या लिखाणाने 'देशीवाद' म्हणजे नेमके काय, हे मराठी साहित्यजगताला कळले. त्यांच्या लिखाणाचे समर्थन करणारे आणि विरोध करणारे असे दोन्ही गट नेमाडेंना अनुभवायला मिळाले. देशाची मूळ संस्कृती बाजूला पडून सुरुवातीला संस्कृत, नंतर फारसी आणि त्यानंतर इंग्रजी भाषेचे व संस्कृतीचे परिणाम होत गेल्याने एका विशिष्ट चौकटीत अडकून मराठी साहित्य गटांगळ्या खात राहिले. त्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न जसा समाजातील विविध घटकांनी आणि विचारवंतांनी केला तसा तो देशीवादाच्या समर्थक अभ्यासकांनीही केला. त्याचे पडसाद साठोत्तरी साहित्यात दिसतात. एकविसाव्या शतकातील जागतिकीकरणाच्या प्रवाहात समग्र देशीवाद कितपत टिकेल हे जरी आज निश्चित सांगता येणार नसले तरी या अभ्यासकांच्या भूमिकेतील काही तत्त्वे मराठी साहित्यिकांना अंगीकारता येतील किंवा स्वीकारार्ह अशी आहेत.

**बीजशब्द** : देशीवाद, मार्गी, संस्कृती, समाजसापेक्ष

## प्रस्तावना

जगभरात वाङ्मयामध्ये अनेक प्रवाह आहेत, त्याला 'वाद' ही संज्ञा वापरतात. त्यात वास्तववाद, अस्तित्ववाद, सौंदर्यवाद, कलावाद होतेच आणि आता लढावू वृत्तीचा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशीवादाचीही चर्चा व्यापक झाली आहे. मराठी साहित्यात मार्क्सवाद फारसा प्रभाव पाडू शकला नाही, तसे देशीवादाचेही झाले. मात्र काही अंशी समान धागा असणारे दलित साहित्य, ग्रामीण साहित्य यांनी मात्र चांगली लोकप्रियता मिळवली. बदल हा जगाचा नियम आहे. संस्कृतीची सरमिसळ ही होणारच. याचमुळे भालचंद्र नेमाडे यांची देशीवादाची भूमिका अनेक अभ्यासक नाकारतात. पण नेमाडेंनी देशीवादातही अन्य ठिकाणचे चांगले ते स्वीकारण्याचा मांडलेला दृष्टिकोन दुर्लक्षित झाल्याने त्यांना विरोध अधिक झाला. देशीवादाच्या प्रेरणा आणि देशीवाद्यांच्या समर्थकांची नेमकी भूमिका व वैशिष्ट्ये कोणती, हे थोडक्यात मांडण्याचा हा प्रयत्न.

## पार्श्वभूमी आणि प्रेरणा

'देशीवाद' या संज्ञेचे मूळ वर्णनात्मक भाषाशास्त्राच्या अध्ययनातून उलगडते. 'देशी' म्हणजे प्रादेशिक आणि 'मार्गी' म्हणजे प्रमाण असा आशय स्वीकारला तरी दोन्ही एकमेकांना खेटूनच दिसतात. दहाव्या शतकाच्या अखेरीस दोन्हींमध्ये भेद जाणवू लागला. इस्लामी आक्रमणांसोबतच मार्गीचा प्रवास थोपवला जाऊ लागला. देशीने त्या वेळेपासून आपले सांस्कृतिक स्थान निर्माण करण्याचा व अस्मिता जपण्याचा प्रयत्न केल्याचे जाणवते. तिचा विकास ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत सुरक्षित होता. अगदी चक्रधर, ज्ञानेश्वर, नामदेव जनाबाई, तुकारामांपर्यंत संतांनी मराठीची साहित्यभाषा मेहनतीने आणि चिकाटीने घडविली. ब्रिटिशांच्या आगमनाने मार्गीला चांगले दिवस आले आणि देशीच्या विकासाला खिळ बसली. मार्गी ही परंपरावाद्यांचे प्रतीक मानले जाते आणि तिचे ब्रिटिशांशी चांगले जुळले; परंतु मार्गी, देशी यांच्याबरोबरीने आता विदेशी ही एक तिसरी प्रवृत्ती उभी झाली होती.

ब्रिटिशांचा हेतू हिंदुस्थान लुटणे हा असल्याने त्यातून होत गेलेल्या अन्याय–अत्याचारांना कंटाळून भारतीय जनमानसांत देशीवादाची चळवळ उभी होत गेली. एकोणिसाव्या शतकात ती अधिक व्यापक झाली. महात्मा ज्योतिबा फुले यांनी ती प्रथमतः सामाजिक जीवनात आणि साहित्यात प्रतिबिंबित केली. साहित्यसमीक्षेतील देशीवादाच्या भूमिकेचे मूळ येथे दिसून पडते. पहिले देशीवादी विचारवंत, समीक्षक म्हणून

त्यांना मानावयास हरकत नसावी. तसे देशीवादाचे मूळ ज्ञानेश्वर, बसवेश्वर यांनीही देशीचा पुरस्कार करून काही प्रमाणात जाणवून दिले होते. हा झाला प्रारंभाचा उल्लेख; परंतु साहित्यसमीक्षा प्रांतात ज्यांनी हा वाद मांडला किंवा त्यावर विचार करावयास प्रवृत्त केले त्या दोन व्यक्ती म्हणजे गणेश देवी आणि नेमाडे होत. देश स्वतंत्र होण्यापूर्वी आणि नंतरही नवे वाङ्मयीन प्रवाह अवतरण्यापूर्वी आपण विदेशी परंपरांनाच श्रेष्ठ मानून त्यांचा कित्ता गिरवीत होतो. 'भालचंद्र नेमाडे आणि गणेश देवी यांनी भारतीय साहित्य समीक्षा ही युरो–अमेरिकन वर्चस्वातून मुक्त व्हावी यासाठी प्रयत्न केले.'[१] हे मकरंद परांजपे यांचे विधान चुकीचे ठरत नाही.

स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर काही काळ ब्रिटिशांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून साहित्यनिर्मिती होत होती, हे आता लपून राहिलेले नाही. आपली अवनती ही ब्रिटिशांचे अंधानुकरण करण्यात आहे, हे म. ज्योतिबा फुल्यांना उमगले होते. त्यांची सत्यशोधक चळवळ म्हणजे देशीवादाचा अवतारच होती. 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकात तर त्यांनी संपूर्ण देशीवादाचीच भूमिका मांडलेली दिसते. लोकहित हेच साहित्याचे प्रयोजन असावे, ही त्यांच्या साहित्याची भूमिका होती.

राजाराम शास्त्री भागवत यांनी इतिहास मांडत असताना संस्कृत भाषा, ब्राह्मण यांना टीकेचे लक्ष्य करून देशी असण्यालाच धर्म मानले. विठ्ठल राजमी शिंदे यांचे लेखन किंवा भास्करराव जाधव, दिनेशचंद्र सेन, पेरियार, चंद्रिकाप्रसाद जिज्ञासू, डी.डी. कोसंबी अशा समीक्षकांनी केलेल्या समीक्षा या देशीवादीच असल्याचे जाणवते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारण्यामागे देशीवादाचाच पुरस्कार होता. 'बुद्ध धर्माची त्यांनी जी दीक्षा घेतली, त्यामागे हे एक कारण होते की हा धर्म याच मातीत रुजला होता.'[२] डॉ. आंबेडकरांनी मांडलेले विचार, अर्थनीती ही अस्सल देशीवादाला मानणारी होती.

महात्मा गांधी भारतात आले ते अत्यंत टापटीप पोशाखात आणि जेव्हा त्यांनी येथील गरिबी आणि इंग्रजांनी तसेच येथील जमीनदार व धनदांडग्यांनी चालविलेले शोषण बघितले तेव्हा त्यांनी आयुष्यभर साधे धोतर आणि उपरणे घेऊन सतत देशसेवा केली. ही देशीपणाची जाणीव होती. स्वदेशीचा पुरस्कार करणाऱ्या गांधीजींचे समग्र साहित्य देशीवादाचीच छाप सोडते.

स्वातंत्र्यानंतर राम मनोहर लोहियांनी आंतरराष्ट्रीय पद्धतीची भांडवलशाही आणि पढीक साम्यवादाला विरोध केला आणि आशियायी किंवा भारतीय पद्धतीची साम्यवादावर आधारित राज्यव्यवस्था मांडली होती. लोहियांनी देशीवादी विचार मांडल्याने आणि तरुण पिढीला ते पटल्याने प्रस्थापितांविरुद्ध ती उभी ठाकली होती. अगदी असेच विचार जयप्रकाश नारायण यांचेही होते. त्यांच्या मते, 'नगण्य असा सुशिक्षित मध्यमवर्ग आणि राजकारण धुरंधर एवढेच लोक लोकशाही कारभारात लुडबूड करताना दिसतात.' हे मत त्यांनी 'सोशॅलिझम, सर्वोदय अँड डेमोक्रेसी' या त्यांच्या ग्रंथात मांडले होते. सानेगुरुजींच्या 'श्यामची आई' या पुस्तकातही देशीवादच आढळतो. दलित, ग्रामीण साहित्यातही देशीवादाचे अंश आढळतात. अगदी चक्रधर, ज्ञानदेव आणि फुल्यांपासून ह्या सर्व देशीवादाच्या प्रेरणा ठरतात.

## स्वरूप

देशीवादाची मूळ संकल्पना उत्तर अमेरिकेतील नेटिविझम या संकल्पनेवरून घेतल्या गेली असावी, असे काही अभ्यासक म्हणतात तर काही याला विरोध करतात. अमेरिकन नेटिविझम आणि भारतीय देशीवाद यात कमालीचे वैधर्म्य आहे. इथला देशीवाद हा इथल्याच प्रस्थापितांच्या किंवा शोषणाच्या विरोधात निर्माण झाला होता, हेदेखील लक्षात घ्यावे लागते.

त्या वेळी साहित्यात इंग्रजांचे अनुकरण होत होते. येथील प्रदेश, इथली भाषा, समाजाचे विविध स्तर हे फारसे उमटत नव्हते. मोजक्या प्रदेशाचे, मोजक्या समाजाचे चित्रण होत असूनही त्यांनाच सांस्कृतिक प्रतिष्ठा मिळत होती. भालचंद्र नेमाडे यांनी या संदर्भात सखोल अध्ययन करून 'देशीवाद' मांडला. त्यांच्यासोबत या विचारसरणीची आणि मांडणी करणाऱ्यांमध्ये गणेश देवी, डॉ. चंद्रशेखर जहागिरदार, डॉ. शांतीनाथ देसाई, यू. आर. अनंतमूर्ती, गिरीड्डी गोविंदराज, चंद्रकांत पाटील, मकरंद परांजपे यांचा समावेश होता. कालांतराने देशीवादाची चळवळ भारतभर फोफावली. नंतर गो.मा. पवार, म.सु. पाटील, वासुदेव सावंत, चारुदत्त भागवत, रेखा इनामदार–साने, गो.म. कुलकर्णी असे कितीतरी समीक्षक मराठी भाषेत या विषयाची मांडणी करू लागले.

बा.सी. मर्ढेकर यांनी 'आर्ट अँड मॅन' हे पुस्तक इंग्लंड येथे प्रकाशित केले आणि त्यांचा मराठी साहित्य समीक्षा प्रांतात एक धाक निर्माण झाला होता. मात्र भालचंद्र नेमाडे यांनी 'निरस्तरपादपेदेशे : श्री.के.

क्षीरसागर यांचा वादसंवाद' हा लेख १९६१ साली लिहिला आणि मराठीत देशीवादाची खऱ्या अर्थाने पेरणी झाली. पुढे त्यांनी लिहिलेला 'कादंबरी' हा निबंध म्हणजे मराठी कादंबरीचा देशीवादी इतिहासच ठरला. ते म्हणतात, 'मराठी कादंबरी मराठी कादंबरीकाराने निर्मिली आहे आणि मराठी कादंबरीकार मराठी समाजाने निर्मिलेले आहेत. हे देशीपणाचे भान सतत जागृत ठेवणे नव्या पिढीला आवश्यक आहे. जगभराच्या नाना भाषांतील नाना कलाकृतींना उचलून त्यांची मराठी कलाकृतीच्या मूल्यमापनासाठी तुलना करण्याची 'कलात्मक' मराठी समीक्षेची वृत्ती अडाणीपणाची असल्याने टाळणे आवश्यक झाले आहे. दोन्ही संस्कृतीचा नीट खोल अभ्यास असल्याशिवाय अशी तुलना करणे समीक्षेलाच धोक्याचे असते.'[३] या निबंधात नेमाड्यांनी अत्यंत सखोल अध्ययनातून देशीवादाची जबाबदारीपूर्ण भूमिका मांडली आहे. १९८० नंतर नेमाड्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीत देशीवादाचीच भूमिका जाणवते. त्यांच्या मते, देशी म्हणजे भूमीशी जोडलेले असणे. परक्या, बाहेरून येणाऱ्या अनेक मूल्यांचे, भाषांचे, संस्कृतीचे देशी मूल्यांवर, भाषेवर, संस्कृतीवर जेव्हा आक्रमण होते, तेव्हा स्वतःच्या अस्तित्वासाठी मानवी समूहांना देशीवादी व्हावे लागते.

## वैशिष्ट्ये

देशीवाद हा संस्कृतीशी निगडित असतो. चालीरीती, भाषा, प्रथा, परंपरा, संकेत, श्रद्धा हे सर्व त्यात समाविष्ट असते. संस्कृतीच्या प्रत्येक घटकाचे समर्थन देशीवादात होत नाही; परंतु हरवलेल्या मूळ संस्कृतीला शोधण्याचे कार्य त्यात केले जाते. प्रत्येकाची आपले काहीतरी अस्तित्व सिद्ध करण्याची धडपड असते. त्याच्याजवळ त्याचे मूळ जे देशी असते, ते नाकारता येत नाही. जगभरात काहीसा सारखेपणा असला तरी स्वतःचे जे वेगळेपण आहे, ते देशी संस्कृतीतच गवसते असे देशीवाद्यांचे म्हणणे आहे. दलित, ग्रामीण, आदिवासी अशा साहित्यक्षेत्रातील वेगवेगळ्या चुलींमध्ये धगधगणारा अग्नी देशीवादाचेच समर्थन करीत नाही का? या सर्वातून एक गोष्ट जाणवते ती ही की वैदिक परंपरेला देशीवाद स्वीकारत नाही. ही परंपरा परकी आहे, ही त्यांची ठाम समजूत आहे. सदाशिवपेठी भाषेत बहुजनांनी लिहिण्यावर देशीवाद्यांनी प्रहार केले आहेत. सुरुवातीला संस्कृत, फारसी आणि कालांतराने इंग्रजी भाषेचे आपण गुलाम झालो, यावर ते प्रचंड टीका करतात.अस्सल लोकसाहित्याला आणि लोककलांना देशीवाद स्वीकारतो. हा बहुजनांचा, ग्रामीणांचा, आदिवासींचा अमूल्य ठेवा चिरंतन टिकला पाहिजे, हे देशीवादाच्या समर्थकांचे म्हणणे आहे. तमाशाचे फड आणि शेक्सपियरची नाटके यांच्यात साधर्म्य शोधले जाते. येथे लोकभाषेचा आग्रह आहे.

भालचंद्र नेमाडे यांनी 'यमुना पर्यटन' कांदबरीतला देशी परंपरेचे भान ठेवणारी, कृतीला महत्त्व देणारी प्रवृत्ती असणारी वाङ्मयकृती मानले आहे. कृतिप्रधानता हा एक देशीवादाचा निकष त्यांनी माडला आहे.
साहित्याचे स्वरूप समाजसापेक्ष असावे. समाजाच्या जाणिवा त्यातून व्यक्त व्हाव्यात. याला नेमाडे यांनी नवनैतिकता म्हटले. समाजाच्या जाणिवांसोबत समाजववास्तवही प्रकट व्हावे, ही अपेक्षा केली. नवनैतिकतेला त्यांनी वैयक्तिक मूल्यनिष्ठा असेही मानले. ही नवनैतिकता सापेक्षतावादी भूमिका मान्य करणारी ठरते.

वाईट ते फेकून देणे आणि चांगले ते आत्मसात करणे, हे देशीवादाचे एक वैशिष्ट्य आहे. देशीकरण करताना मार्गी आणि विदेशींमधून काळजीपूर्वक निवडीने परंपरा आणि आधुनिकीकरण यांचा मेळ घालून आपल्या संस्कृतीत जो समावेश केला त्याने आपली संस्कृती भक्कम झाली असे देशीवादाचे समर्थक मानतात. 'कोसला' कादंबरीचे उदाहरण याबाबतीत दिले जाते. अशोक केळकर या कादंबरीचे परीक्षण करताना म्हणतात, 'आधुनिक मानवाच्या विचार–कल्पनाविश्वातली कोसला ही एक महत्त्वाची जाणीव. हिची जातकुळी एकीकडे शेक्सपियरच्या हॅम्लेटपर्यंत पोचते; दुसरीकडे बौद्ध–जैन ह्यांच्यापर्यंत.' असे असले तरी विदेशी व मार्गीतून चांगले काय घ्यायचे आणि नेमकी या बाबतीत देशीवाद्यांची भूमिका अनेकदा संभ्रमित करते.

देशीवादात सत्य ही संकल्पना महत्त्वाची ठरते. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथाचे उदाहरण दिले जाते. नेमाडे यांच्या मते, ज्याप्रमाणे राजकारण्याला मुख्यतः खोटे बोलण्याबद्दल महत्त्व मिळते, त्याप्रमाणे लेखकाला महत्त्व प्राप्त होते तो मुख्यतः खरे बोलणारा असल्यामुळे. ज्योतीराव फुले यांनी सांगितलेला सत्य हा धर्म सार्वजनिकरीत्या पाळला जातो. तेच सामाजिक सत्य किंवा वास्तव आहे.

## निष्कर्ष

भालचंद्र नेमाडे यांनी खऱ्या अर्थाने 'देशीवाद' रूढ केला. देशीवादाची संकल्पना भालचंद्र नेमाडे यांनी जी मांडली त्यात त्यांनी काही महत्त्वाच्या विषयांना हात घातला. त्यांच्या मते, जागतिकीकरणाचा रेटा वाढला

आणि देशीवादाला गती आली. ईशान्येत जंगले टिकून आहेत ती देशवादाने आणि पुण्यामुंबईचा ऱ्हास झाला तो जागतिकीकरणाने. पाश्चात्त्यांच्या नादी लागून त्यांचे अंधानुकरण करण्याऐवजी आहे त्या व्यवस्थेत सुधारणा करून त्या अधिक विकसित कशा करता येतील, हे बघितले पाहिजे. जागतिकीकरणाच्या रेट्यावर नेमाडेंच्या प्रहारामुळे इतर बरेच लेखक अंतर्मुख झाले आणि त्यांनी आपल्या लेखनाची कूस बदलली. नेमाडे यांनी आपल्या साहित्यात बोलीभाषेला अधिक वाव दिला. कोंकणी, गोंयची, हिंदीमिश्रित उर्दू आणि वैदर्भी बोलींमध्ये त्यांनी कविता लिहिल्या.

देशीवादाची चळवळ जितकी वाखाणल्या गेली, तितकीच टीकात्मक आणि आव्हानात्मकही ठरली. देशीवादाची प्रेरणा आणि परंपरा ज्ञानेश्वर, नामदेव, बसवेश्वरांपासून तुकारामांपर्यंत आणि पुढे आंबेडकर–फुल्यांपर्यंत नेता येते. म. फुले यांच्या वैचारिक साहित्यात आढळणारा देशीवाद आणि बाबा पद्मनजींच्या 'यमुनापर्यटन'सारख्या कांदबरीतून आढळणारा देशीवाद थेट आजच्या राजन गवसांच्या 'कळप' कादंबरीपर्यंत समृद्ध होत गेलेला दिसतो. देशीवादावर अनेक वादही झाले आणि होतातही. पण एक चळवळ त्यानिमित्ताने सुरू झाली.

जगातल्या प्रत्येक देशाची संस्कृती असते, तसा देशीवादही असतो. प्रत्येक देशाच्या या चळवळीतील कार्यकर्त्यांची एकच विचारप्रणाली असते आणि ती म्हणजे त्यांच्या त्यांच्या देशातील नागरिक सुखी, संपन्न, सुनीतीमान, सुसंस्कारित व्हावा. परकीयांच्या आश्रयाखाली जगण्याची कोणालाच इच्छा नसते. जागतिकीकरणाच्या लाटेतही आपले अस्तित्व टिकविण्याची धडपड प्रत्येक देशाची असते. देशीयता टिकवली तरच देश वाचेल, हे सूत्र आता प्रत्येकाला उमगले आहे. उपरोक्त नमूद देशीवादाची वैशिष्ट्ये बघितली की त्या प्रवाहाकडे वळण्याची खरी गरज राजकीय क्षेत्राप्रमाणेच साहित्यक्षेत्रालाही आहे, ही देशीवादाच्या समर्थकांची भूमिका काही अंशी तरी मान्य करावी लागते.

## संदर्भ

१. परांजपे, मकरंद, नेटिव्हिजम : एसेज इन क्रिटिसिझम, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती, १९९७, पृ. ११

२. लोखंडे, अरुणा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच सांस्कृतिक वारसा आणि आधुनिक समाज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, संपा. दया पवार व इतर, म.रा.सा. आणि सं. मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९३ पृ. १०१

३. नेमाडे, भालचंद्र, कादंबरी, मराठी साहित्य: प्रेरणा व स्वरूप, संपा. गो.मा. पवार, म.द. हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८६, पृ. १३

❖❖❖

# मथुरा लभाण बोलीतील 'प्रभाती गीते' : एक आकलन

प्रा.डॉ. भगवान जे. साबळे
सहाय्यक प्राध्यापक, मराठी
भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि. अमरावती
ईमेल : bhagwan.j.sable@gmail.com भ्रमणध्वनी : ९५४५६४३१५३

## प्रस्तावना

मराठी लोकसाहित्यातील भटक्या विमुक्तांच्या लोकगीतांमधून लोकजीवन व लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. लोकसाहित्याचा आंतरात्मा गणल्या जाणाऱ्या 'लोकगीता'च्या निर्मितीमागे व्यक्तिगत, सामाजिक व धार्मिक अशी बहुविध प्रेरणा दिसून येतात. वाङ्मयीन दृष्टीनेही लोकगीते मौलिक आहे. भटक्या विमुक्तांच्या लोकगीतांच्या संदर्भात डॉ. नागनाथ कदम म्हणतात की, 'लोकगीत भटक्या विमुक्तांच्या संस्कृतीचे एक अविभाज्य अंग आहे. त्यातून त्यांच्या जीवनाचे भावाविष्कार प्रतिबिंबित झाल्याचे दिसून येतात. जाती–जमातीचे सांस्कृतिक उन्मेष आढळतात. वर्षानुवर्षे लोकगीत म्हटली जात असली तरी आजही ती ताजीतवानीच वाटतात. यातच त्यांच्या लोकगीतांचे जिवंतपण आहे.'[१] याप्रमाणे ही लोकगीते त्यांच्या भावजीवनाशी जुळलेली आहे.

महाराष्ट्रात ज्या अनेक भटक्या व विमुक्त जाती–जमाती आहेत. त्यामधील विमुक्त जातीमध्ये ज्या १४ तत्सम जातींचा समावेश होतो. त्यातील 'बंजारा' (अ.क्र. ७) जातीमध्ये तत्सम जाती म्हणून 'मथुरा लभाण' (अ. क्र. ७, फ) या जातीचा समावेश करण्यात आलेला आहे. मथुरा लभाण गणाच्या बोलीला 'मथुरा लभाण' बोली म्हणून संबोधल्या जाते. लिपीबद्ध नसलेली पण मौखिक परंपरेने बोलल्या जाणाऱ्या व्यावहारिक भाषेच्या जोडीनेच प्रासंगिक गीते या बोलीचा एक स्वतंत्र भाग आहे. शिवाय मथुरा लभाण गणाच्या सामाजिक व सांस्कृतिक जडण–घडणीमध्ये या लोकगीतांची मोलाची भूमिका आहे. जीवनाच्या वेगवेगळया प्रसंगी अंत:करणातून उमललेली ही लोकगीते प्रासंगिक स्वरूपाची आहेत. विविध विधी व सण–उत्सवाप्रसंगी स्त्री–पुरुषांकडून गायिल्या जाणारी ही गीते मथुरा लभाण गणाच्या आंतरिक भावविश्वाशी विशेषत: स्त्रियांच्या भावजिवीनाशी आजतागायत जुळलेली आहेत.

## शोधनिबंध लेखनाचा हेतू

सदर शोधनिबंधामध्ये धार्मिक उत्सवाप्रसंगी पुरुषांकडून गायिल्या जाणाऱ्या 'प्रभाती गीतां'चा अभ्यास करण्यात आलेला आहे. मराठी साहत्यामध्ये संतानी रचलेली अभंग वा भूपाळी या काव्यरचनेप्रमाणे मथुरा लभाण बोलीतील 'प्रभाती गीतां'चे पुरूषांकडून विविध सण, उत्सव वा गुरूनानक व बालाजीचा भंडारा (महाप्रसाद) तसेच पाऊस पडावा म्हणून वरून देवतेला आर्जव करताना नगारा व मंजिज्याच्या सहाय्याने रामनाव, साकी, सबद, प्रभाती, झांवरा, कन्हाई व लाछा आदी गीतांचे गायन केल्या जाते. या बैठक गीतांमुळेच सण, उत्सव व विधींना साजरेपण येते नव्हे, याच हेतूने सदर गीतांचे श्रद्धा भावनेने गायन केल्या जाते. या गीतांपैकी 'प्रभाती गीतां'मधील मांगलय अभिव्यक्त करून परमेश्वराप्रती असणारी आस्था व श्रद्धा भावना तसेच जीवनाच्या उद्धाराचे असणारे सामर्थ्य अभिव्यक्त करण्याच्या हेतूनेच सदर शोधनिबंधाचे लेखन केले आहे.

## प्रभाती गीते

'प्रभाती' ही बैठक गीते नगारा व टाळ यांच्या सहाय्याने पहाटेला गायिल्या जाते. प्रभात म्हणजे पहाट तर 'प्रभाती म्हणजे पहाटेला गायिल्या जाणारे ईश्वराचे नामस्मरणपर भक्तीगीत होय'. पहाटेला उठून 'अभ्यंगस्नान' उरकून पुरूषांकडून 'प्रभाती' या गीतांचे गायन केल्या जाते. दिवसाची सुरूवात मांगल्याने करून या मंगलप्रसंगी ईश्वराचे नामस्मरण करणे व परमेश्वराप्रती असणारा श्रद्धा भाव व्यक्त करणे हा हेतू प्रभाती या गीतांच्या गायनामागे दिसून येतो. या प्रभाती लोकगीतामध्ये रामकी प्रभाती, सीताकी प्रभाती, मिराकी प्रभाती, कृष्णकी प्रभाती, आखियाकी प्रभाती, नेरोकी आखियाकी प्रभाती, मालणकी प्रभाती, मक्णी बजातण्की प्रभाती व काळुबाबाकी प्रभाती अशी एकुण पस्तीस ते चाळीस प्रभाती गीते आहेत.

## प्रभातीकी साकी

कोणत्याही प्रभाती गीताचे गायन करण्याआधी 'प्रभातीकी साकी' गीताचे गायन करण्याची प्रथा आहे. पुरुषांकडून गायिल्या जाणारे 'प्रभातीकी साकी' हे गीत पुढीलप्रमाणे—

### प्रभाती की साकी

उठो लोक मने ऽऽती भजो ऽऽऽऽऽऽ रेहवा ऽऽऽऽऽ
हर उठकन भजोरे पूरा मनेतीरे ऽऽऽऽ हे जी ऽऽ
हे उररसानपे छांडदे ऽऽऽ रेहवा ऽऽऽऽऽ
भजले रामको ऽऽऽ नांवरे ऽऽऽऽऽ जी ऽऽऽऽ या राम ।।धृ।।
ये सोंणो सोंणो ऽऽ काव करे ऽऽऽऽऽ रेहवा ऽऽऽऽऽ
ये सोंणो एखी बाररे ऽऽऽऽऽऽ जी ऽऽऽऽऽऽ
एक दन आसो होसीरे रेहवा ऽऽऽऽऽ
हर सोजा पांवपे शानरे ऽऽऽऽऽऽ जी ऽऽऽऽ या राम ।।१।।
ये सुतो सुतो ऽऽ कांव करे ऽऽऽऽऽ रेहवा ऽऽऽऽऽ
ये सुतो सुतो होयो उठे ऽऽऽ जागरे ऽऽऽऽऽ जी ऽऽऽऽ
ये उररसानपे छांडदे ऽऽऽ रेहवा ऽऽऽऽऽ
जले रामको ऽऽऽ नांवरे ऽऽऽऽऽ जी ऽऽऽऽ या राम ।।२।।
हे आगे बछडा दोहरहे ऽऽऽऽऽऽ रेहवा ऽऽऽऽ
बिच थाडीछे रातरे ऽऽऽऽऽ जी ऽऽऽऽऽ
हे काव जाणू काव होयंगो ऽऽऽ रेहवा ऽऽऽऽ
यो गंथा परेमासरे ऽऽऽऽऽ जी ऽऽऽऽऽ या राम ।।३।।
ये चार पेरकी ऽऽ रातहे ऽऽऽऽऽ रेहवा ऽऽऽऽऽ
दो सोबे दो ऽऽ जागेरे ऽऽऽऽऽ जी ऽऽऽऽऽ
हे काव जाणू काव होयंगो ऽऽऽ रेहवा ऽऽऽऽ
यो गंथा परेमासरे ऽऽऽऽऽऽ जी ऽऽऽऽऽ या राम ।।४।।
ये उची बन्सी ऽऽ रणघणहे ऽऽऽऽऽ रेहवा ऽऽऽऽऽ
ये बेरीन सरखो ऽऽ बांसरे ऽऽऽऽऽ जी ऽऽऽऽऽ
हे नंदी कन्हाटे ऽऽ रूखडो ऽऽऽ रेहवा ऽऽऽऽ
हे कब थम होशी बे ऽऽ नासरे ऽऽऽऽऽ जी ऽऽऽऽ या राम ।।५।।

शब्दार्थ : मनेती भजो = मनापासून नामस्मरण करा, उररस छांडदे = देहातील वाईट प्रवृत्तींचा त्याग करणे, सोंणो = झोपणे, सुतो = झोपलेला, बछडा दोहरहे = गायीचे दुध काढणे, गंथा = गत / परिस्थिती, दो घडी = दोन दिवस, नंदी क न्हाटे = नदी किनारी, रूखडो = रोपटं इत्यादी.

भावार्थ : या गीतामध्ये मानवाला उद्देशून म्हटले की, पहाट झाली आहे. आता जागा हो व या मंगलप्रसंगी आपल्या मनातील सर्व वाईट प्रवृत्तींचा त्याग करून शुद्ध अंत:करणाने ईश्वराचे नामस्मरण करा असा भाव धृपदामधून व्यक्त होतो.

हे मानवा, केवळ झोपणे तुझा धर्म नाही. एक दिवस तर कायमचे झोपावेच लागणार आहे. तेव्हा तर कोणीच तुला जागे करणार नाही परंतु आज मानवाचा देह तुला मिळाला आहे. या देहाचे हित नेमके कशात आहे ते जाणून घे. केवळ आळस करून व्यर्थ वेळ वाया दवडू नकोस. आपल्या मनातील सर्व वाईट प्रवृत्तींचा त्याग करून ईश्वराचे व आपल्या कर्तव्याचे कायम स्मरण असूदे. कारण या अंधकारमय जीवनात पुढे कशी बिकट परिस्थिती येईल हे सांगता येत नाही. म्हणून वेळीच जागा होऊन स्वत:चे हित व कर्तव्याची जाणीव ठेवून कर्माला, कार्याला महत्त्व असले पाहिजे, असा भाव व्यक्त होतो.

सदर गीतामध्ये शेवटी असेही म्हटले की, रात्रीचे चार प्रहार आहे. यामध्ये दोन प्रहर झोप व दोन प्रहर जागा राहा म्हणजेच चार दिवासांचे हे जीवन आहे. यात दोन दिवस सुख तर दोन दिवस दु:ख आहे हे जाणून घे व केवळ आपले सत्कार्यच करीत राहा असा सल्ला दिला आहे. जसे बासरीचा बांबू जोपर्यंत सुस्थितीत आहे तोपर्यंत सुस्वर आळविता येईल किंवा नदी किनारी वाढणारं रोपटं केवळ नदीत पाणी असेपर्यंत जगू शकते

असेच मानवाचे जीवन आहे. चांगल्या विचारांची कास धरली नाही तर या देहाचाही एक दिवस नाश होणार आहे. म्हणून वेळेचा सदुपयोग करून देह सार्थकी लाव व सत्कार्य करण्याचा आशय सदर गीतामधून व्यक्त होतो. अशाप्रकारे प्रभाती की साकी या गीतामधून मानवी जीवनाचा उद्धार केवळ आपल्या सत्कार्यानेच होऊ शकतो असा भाव व्यक्त होतो.

'प्रभातीकी साकी' या बैठक गीताच्या गायनानंतर पुरुषांकडून 'प्रभाती' या गीताचे गायन केल्या जाते. सदर शोधनिबंधामध्ये शब्द मर्यादेअभावी 'सीताकी प्रभाती' या प्रभाती बैठक गीताचा उदाहरणादाखल अध्ययन करण्यात आले आहे.

## सीता की प्रभाती

'प्रभातीकी साकी' हे गीत गायिल्यानंतर पुरुष मंडळीकडून 'प्रभाती' या गीतांचे गायन केल्या जाते. राम, लक्ष्मण व सीता वनवासात असताना सीतेला होणारा जाच व याप्रसंगी सीतेची सेवा करण्यास तत्पर असलेल्या लक्ष्मणाचा कर्तव्यदक्षपणा तसेच सीतेचा स्वाभिमान अधोरेखित करणारे 'सीताकी प्रभाती' हे गीत पुढीलप्रमाणे—

सीता की प्रभाती

खडे ऽऽ रहो ऽऽऽ बेलहारी सीता प्यारीये लछमणे ऽऽऽ
खडे ऽऽ रहो ऽऽऽ बेलहारी ऽऽऽऽऽ या रा ऽऽ म ।।धृ।।
चेत मासका लछमेण तपणा तापेतहेरे ऽऽ
दुजोही आंग सेक भारीर लछमणे ऽऽऽ हो
खडे ऽऽ रहो ऽऽऽ बेलहारी ऽऽऽऽऽ या रा ऽऽ म ।।१।।
माई सीताकू लछमेण घोडले चेढायदेरे
के खांदेपे अबे धेरीरे लछमणे ऽऽऽ हो
खडे ऽऽ रहो ऽऽऽ बेलहारी ऽऽऽऽऽ या रा ऽऽ म।।२।।
चलतातो चलता लछमेण पांवे जलतये ऽऽ
को ऽऽ कर चालू आल्हाणी ये लछमणे ऽऽऽ हो
खडे ऽऽ रहो ऽऽऽ बेलहारी ऽऽऽऽऽ या रा ऽऽ म ।।३।।
चलता तो चलता लछमण त्यासतो लागतये ऽऽ
को ऽऽ कर चालू अब त्यासीरे ये लछमणे ऽऽऽ हो
खडे ऽऽ रहो ऽऽऽ बेलहारी ऽऽऽऽऽऽ या रा ऽऽ म ।।४।।
पाने तो तोड्य लछमेण डाके पळेसकाये ऽऽ
दोना ऽऽ सियारे बा त्यासीरे ये लछमणे ऽऽऽ हो
खडे ऽऽ रहो ऽऽऽ बेलहारी ऽऽऽऽऽ या रा ऽऽ म ।।५।।
पाणी भर लायो लछमेण तालसागेरकोय ऽऽ
नेही पिबे ऽऽ सीता प्यारी ऽऽ ये लछमणे ऽऽऽ हो
खडे ऽऽ रहो ऽऽ बेलहारी ऽऽ ऽऽऽ या रा ऽऽ म ।।६।।
पेल्हो मरदरा लछमण डाके पळेसहे ऽऽऽ
दुजो मरद रेतवासीये सीता प्यारीये लछमणे ऽऽऽ हो
खडे ऽऽ रहो ऽऽ बेलहारी ऽऽऽऽऽ या रा ऽऽ म।।७।।
तिजो मरदरा तालसागेर हे ऽऽऽ
चौथो मरदे लछमण देवर सीता प्यारीये लछमणे ऽऽऽ हो
खडे ऽऽ रहो ऽऽ बेलहारी ऽऽऽऽऽ या रा ऽऽ म ।।८।।
पानेतो तोड्य लछमणे बागे केळीन्काये ऽऽ
दोना सियारे बा त्यासीरे ये लछमणे ऽऽऽ हो
खडे ऽऽ रहो ऽऽ बेलहारी ऽऽऽऽऽ या रा ऽऽ म।।९।।
पाणी भरलायो लछमणे गंगा जमनाकोये ऽऽ
जाय खडो सीताके पासये सीता प्यारीये लछमणे ऽऽऽ हो
खडे ऽऽ रहो ऽऽ बेलहारी ऽऽऽऽऽ या रा ऽऽ म ।।१०।।

पाणीको दोना लछमणे सीसेभी धेज्याये ऽऽ
छोड चाल्यो बनुवास सीता प्यारीये लछमणे ऽऽऽ हो
खडे ऽऽ रहो ऽऽ बेलहारी ऽऽऽऽऽ या रा ऽऽम।।११।।

शब्दार्थ : लछमणे = लक्ष्मण, चेत मास = चैत्र महिना, आल्हाणी पांवे = अनवाणी पायाने, त्यास = तहान, डाके पळस = पळसाचे झाड, दोना = द्रोण, मरदरा = पुरूष, रतवासी = द्रोणाला लावल्या जाणारी बांबूची काडी, सिसेभी = उशी जवळ इत्यादी.

भावार्थ : वनवासात असताना सीतेला अनेक गोष्टींचा त्रास सहन करावा लागला. राम व लक्ष्मण पुढे–पुढे जात असताना त्यांच्या पाठीमागे चालणारी सीता मध्येच थांबते व लक्ष्मणला म्हणते की, चैत्र महिन्याचे उन्ह तापत असून या उन्हाचे मला चटके बसत आहेत.अनवाणी पायाने चालावे लागत असल्यामुळे पायही जळत आहे व तहानही लागली आहे. तेव्हा लक्ष्मणाने पळसाच्या पानाचे द्रोण बनविले व त्यात समुद्रातून पाणी घेऊन सीतेजवळ आला. पण सीतेने ते पाणी पिण्यास नकार दिला. कारण ज्या पळसाच्या द्रोणामध्ये पाणी आणले ते पळसाचे झाड पुरूष वर्गात मोडते. तसेच त्या द्रोणाला लावलेली बांबूची काडी व समुद्र हेही पुरूष वर्गात मोडतात. त्यामुळे मी हे पाणी पिणार नाही. नंतर लक्ष्मणाने केळीच्या पानाचे द्रोण बनवून गंगा–यमुना नदीचे पाणी आणले. असा भाव सदर गीतामधून व्यक्त होतो.

अशाप्रकारे पुरुषांकडून विशिष्ट चालीवर नगारा व मंजिऱ्याच्या सहाय्याने प्रभाती या गीतांचे गायन केल्या जाते. या गीतांमुळे पहाटेच्या शांत वातावरणात मन प्रसन्न व प्रफुल्लीत होते.

## निष्कर्ष

मथुरा लभाण बोलीतील मौखिक परंपरेने गायिल्या जाणाऱ्या या गीतांमधून लोकजीवनाचे व लोकसंस्कृतीचे वेगळेपण अधोरेखित होते. 'प्रभाती गीतां'च्या अध्ययनाने ही गीते मथुरा लभाण गणाच्या भावविश्वाशी जुळलेली असून मांगल्य, पवित्रता व ईश्वराप्रती असणारा श्रद्धाभाव व्यक्त करणारी आहेत. म्हणूनच तर 'लोकगीत आमच्या जीवनविकासचा इतिहास आहे.'[२] या डॉ. तेजनारायण लाल यांनी लोकगीताच्या व्याख्येसंदर्भात अभिव्यक्त केलेल्या मताचा प्रयत्न येतो. ज्ञानापासून कोसा मैल दूर असलेल्या या लभाण समुदायाला जगण्यासाठी धीर व बळ देणारी ही प्रभाती गीते अभंग वा भूपाळीप्रमाणे जीवनोद्धार करणारी आहेत. याशिवाय सदर गीतांची तालबद्ध व गेयता असलेली रचना आणि मानवाला उद्धाराकरिता दिलेला संदेश बघता ही गीते वाङ्मयीन मूल्यांनी संपन्न आहेत असे दिसून येते. विशिष्ट सण, उत्सव वा धार्मिक कार्याप्रसंगी गायन करण्याची प्रथा या गीतांचे वेगळेपण तर अधोरेखित करतेच याशिवाय मथुरा लभाण संस्कृतीचे वैशिष्ट्यही अधोरेखित करते. मानवी जीवनोद्धाराचा आशय लाभलेल्या या गीतांच्या गायनाने मानवाच्या जीवनातील दु:ख निवारण करण्याचे सामर्थ्य अधोरेखित होते. यादृष्टीने 'प्रभाती गीते' मौलिक आहेत.

## संदर्भग्रंथ


१) डॉ. कदम नागनाथ, 'महाराष्ट्रातील भटका समाज : संस्कृती आणि साहित्य', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९५, पृष्ठ क्र.२०६

२) डॉ. लाल तेजनारायण, व्यवहारे शरद यांच्या 'लोकसाहित्य उद्‌गम आणि विकास', विश्वभारती प्रकाशन, नागपूर, आवृत्ती १९८९, पृष्ठ क्र. ३४ वरून उद्‌धृत.


❖❖❖

# स्त्रीवादी साहित्य

डॉ. राखी मं. जाधव
व्ही.एम.व्ही. कॉमर्स, जे.एम.टी. आर्टस् ॲण्ड जे.जे.पी. सायन्स महाविद्यालय, नागपूर
भ्रमणध्वनी ९८८१७१३५६३

आधुनिक साहित्यातून समाजजीवन प्रतिबिंबित होत असते असे ढोबळपणाने म्हटले जाते. अर्थात मराठी साहित्याचा आजपर्यंतचा प्रवास बघितला म्हणजे समाजकारण, राजकारण आणि संस्कृतीतील विरोधाभास साहित्यातून मांडले गेलेले आहेत. समाजजीवनात झालेले बदल साहित्याची दिशा बदलवताना दिसतात. विशेषकरून १९६० नंतरच्या ज्या विविध चळवळी महाराष्ट्रात निर्माण झाल्या, त्या चळवळींच्या प्रभावातून मराठी साहित्यात महत्त्वपूर्ण स्थित्यंतरे झाली. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य त्यातून निर्माण झाले, असे सकृतदर्शनी लक्षात येते. १९७५ नंतर आदिवासी, मुस्लिम, ख्रिश्चन, भटक्या विमुक्तांचे साहित्य निर्माण झालेले दिसते. या विविध प्रवाहांनी मराठी साहित्य समृद्ध केलेले असले तरी विविध धर्म आणि जातीपातींचे प्रश्न अजूनही संपलेले नाहीत, हे या साहित्य प्रवाहावरून तीव्रतेने निदर्शनास येते. या प्रवाहातील एक प्रवाह म्हणून स्त्रीवादी साहित्याला मान्यता असली तरी स्त्रीवादाची पाळेमुळे शोधत मध्यकाळापर्यंत मागे जाता येते. जनाबाईच्या अभंगामधून स्त्री म्हणून भोगाव्या लागणाऱ्या वेदनांची मुक्तपणे अभिव्यक्ती झाली आहे.

डोईचा पदर आला खांद्यावरी। भरत्या बाजारी जाईन मी।
.... जनी म्हणे देवा मी झाले वेसवा। निघाले केशवा घर तुझे।

असा प्रखर विद्रोही स्वर जनाबाईंनी मांडलेला आहे. हा अभंग जरी वरवर आध्यात्मिक वाटत असला तरी स्त्री म्हणून जनाबाईंनी आपल्या मुक्ततेची लागलेली आस किती तीव्र होती हे लक्षात येते. तत्कालीन साहित्य आणि समाजाची धारणा आध्यात्मिक होती. या काळातील अत्यंत प्रतिकुल परिस्थितीतही काही मोजक्या स्त्रियांनी आपले स्वतंत्र स्थान निर्माण करण्याचा निकराचा प्रयत्न केला आहे. माणूस म्हणून जगायची आस त्यांनी आपल्या अभंगातून मांडलेली दिसते. जनाबाई, कान्होपात्रा आणि सोयराबाईच्या अभंगातून याचा प्रत्यय येतो. समाजाने दिलेले दु:ख, उपेक्षितपणाचे दु:ख आणि जातीय दु:खाची मांडणी या कवयित्रींनी आपल्या अभंगातून केलेली दिसते. आधुनिक काळात सावित्रीबाई फुले यांनी आपल्या क्रांतीकार्याने आधुनिक स्त्रीमुक्तीचळवळीची मुहूर्तमेढ रोवली. जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी खऱ्या अर्थाने भारतातील स्त्री—शूद्रांचे समग्र प्रश्न लक्षात घेऊन समग्र परिवर्तनासाठी लढा सुरू केला. तत्कालीन प्रश्नांचे अचूक भान महात्मा फुले यांना होते. त्यामुळेच स्त्री आणि शूद्रांच्या मानवी अधिकारांचा पुरस्कार करत त्यांनी आणि सावित्रीबाईंनी समतेची चळवळ गतिशील केली. स्त्री—शूद्रांना शिक्षण देण्यापासून ते संस्कृतीची परखड समीक्षा करण्यापर्यंतचे जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कार्य बघितले म्हणजे अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत त्यांनी त्या काळात केलेल्या पर्यायी संस्कृती निर्मितीच्या प्रयत्नांचा प्रत्यय येतो. सावित्रीबाई फुले या आधुनिक काळातील आद्य कवयित्री आहेत. पण त्यांच्या साहित्याची नोंद घेतल्या गेलेली दिसत नाही. आधुनिक परिवर्तनवादी काव्य आणि साहित्य निर्मितीची सुरुवात निर्विवादणे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केली. एवढेच नव्हे तर साहित्य आणि संस्कृतीच्या परखड चिकित्सेची पर्यायाने संस्कृती समीक्षेची सुरुवात महात्मा फुले यांनी केली हीच खऱ्या अर्थाने भारतीय आधुनिक स्त्रीवादाची सुरुवात आहे. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रभावातून लिहिणाऱ्या मुक्ता साळवे आणि ताराबाई शिंदे यांच्या लेखनात यांचे प्रभावी प्रतिबिंब उमटलेले दिसते. दलित बहुजन स्त्रीवादाची सुरुवात येथूनच झालेली दिसते हे लक्षात घेतले पाहिजे.

ताराबाई शिंदे यांचा स्त्री—पुरुष तुलना हा ग्रंथ १८८२ मध्ये प्रकाशित झाला. तत्कालीन स्त्री—प्रश्नांची अत्यंत परखड चिकित्सा या ग्रंथात आहेच पण त्याचबरोबर नारो सदाशिव रिसबुड्यांच्या 'मंजुघोषा' या कादंबरीतची चिकित्सा तसेच रामायण, महाभारत, पांडवप्रताप, विजयप्रताप या तत्कालीन कथा कादंबऱ्यांची चिकित्सा ताराबाईंनी केलेली आहे. हिंदू समाजाची शास्त्रे पुरुषप्रधान असून ती स्त्रीविरोधी आहेत अशी स्पष्ट मांडणी ताराबाईंनी केलेली आहे. हीच खऱ्या अर्थाने भारतीय स्त्रीवादाची आणि स्त्रीवादी समीक्षेची सुरुवात आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ही पूर्वपरंपरा नीट लक्षात घेतल्याशिवाय भारतीय स्त्रीवादाची मांडणी नीट करता येत नाही. मराठीतल्या स्त्रीवादी साहित्याची चिकित्साही करता येत नाही.

१९६० नंतर स्त्रियांनी निर्माण केलेले साहित्यदेखील या सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक परिस्थितीतील पुरुषसत्ताक प्रभावातून निर्माण होत राहील. १९९० नंतरचे स्त्रीवादी साहित्य म्हणजे नेमके कोणते

साहित्य असा प्रश्न निर्माण होता. स्त्रियांना आपल्या माणूसपणाचे यथार्थ भान असणे महत्त्वाचे आहे. या भानातून निर्माण झालेले साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य असे ढोबळपणाने म्हणता येईल. आपोआपच धर्मापासून जातीय प्रश्नांपर्यंत चिकित्सात्मक दृष्टिकोन स्वीकारून पुरुषसत्ताक व्यवस्थेची चिरफाड आणि त्यातून नव्या मानवी मूल्यांचा शोध स्त्रीवादी साहित्यात अभिप्रेत आहे. ब्रिटिश भारतात आले तेव्हा पाश्चात्य देशांमध्ये स्त्रीवादी चळवळ भरात होती. याचा परिणाम आणि प्रभाव येथल्या सुधारणावादी आणि परिवर्तनवाद्यांवरही होता. १९९० नंतरच्या स्त्रीलिखित साहित्याचा विचार करताना १९७५ ते १९८५ या युनोने जाहीर केलेल्या स्त्रीदशकाच्या निमित्ताने झालेल्या जाणीव–जागृतीचाही विचार करावा लागतो. त्यामुळे १९८० नंतर निर्माण झालेल्या स्त्रीलिखित साहित्यातून स्त्रियांच्या प्रश्नांचे एक प्रगल्भ भान निदर्शनास येते. अर्थात आजही फार मोजक्या लेखिका या दिशेने लिहिताना दिसतात. एकंदरीत स्त्रीवादी साहित्याचा विचार करताना प्रत्यक्षातील स्त्रीवादी चळवळ, स्त्रीवादातील विविध प्रवाह, स्त्रीवादाचे सामर्थ्य आणि मर्यादा यातील कोणत्या सूत्रांचा स्वीकार स्त्रीवादी लेखिकांनी केला आहे याचा विचार करावा लागतो.

समाजात घडणाऱ्या घडामोडींचा अपरिहार्य परिणाम साहित्यावर होत असतो. मराठी साहित्यात काळानुरूप झालेले बदल हे त्या त्या काळातील सामाजिक स्थित्यंतरानुसार घडत गेलेले दिसतात. समाज बदलत गेला त्यानुसार साहित्यदेखील बदलत गेले. वसाहतीक काळातील घडामोडींमुळे आधुनिकतेचा परिस्पर्श मराठी साहित्याला झाला. भाषांतरीत साहित्यामुळे पाश्चात्य संस्कृतीशी आणि साहित्याशी झालेला परिचय मराठी साहित्याला आधुनिकतेच्या दिशेने गतिशील करणारा ठरला. या काळात सामाजिक प्रश्नांचा वेध साहित्यातून घेतला गेला. या सगळ्या पार्श्वभूमीवर स्त्रियांच्या साहित्याचा वेध घेतला. तर सुरुवातीच्या कालखंडात स्त्रिया बाळबोध स्वरुपाचे लेखन करताना दिसतात. १९२० नंतर मात्र स्त्रिया अधिक सहजपर्ण लिहू लागल्या. वसाहतीक काळात स्त्रियांच्या प्रश्नांविषयी जे विचारमंथन झाले. त्याचाच हा परिपाक होता असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

आधुनिक शिक्षणाच्या प्रभावातून स्त्रिया लिहायला लागल्या आणि त्यातूनच स्त्रिया आपल्या आत्मभानाचा आणि सामाजिक स्थानाचा शोध घेऊ लागल्या. स्त्रियांच्या वास्तव प्रश्नांचा समग्रतेने वेध घेणाऱ्या या कालखंडातील एक समर्थ लेखिका म्हणून विभावरी शिरुरकर यांच्याकडे पाहता येईल. आपल्या कथा–कादंबऱ्यांतून तत्कालीन सुशिक्षित स्त्रियांच्या विविध प्रश्नांचा आढावा त्यांनी घेतला. एकंदरीत सामाजिक परिस्थितीत आणि त्याचा स्त्रियांच्या आयुष्यावर होणारा विघातक परिणाम, त्यामुळे स्त्रीमनात निर्माण होणारी भावनिक आंदोलने याचा अत्यंत वास्तव व प्रखर वेध त्यांनी घेतला. विभावरी शिरुरकर या टोपणनावाने लेखन करणाऱ्या मालती बेडेकर यांना बारा वर्षे आपली ओळख लपवून ठेवावी लागली. कारण तत्कालीन समाजात जरी शिक्षणाचा प्रसार झाला, स्त्रिया शिकायला लागल्या, अल्प प्रमाणात का होईना पण नोकरी व्यवसायात प्रविष्ट झाल्या. तरी स्त्रियांकडे बघण्याचा पारंपरिक दृष्टिकोन अजिबात बदलला नव्हता. त्यामुळे विभावरींचे साहित्य समाजाच्या पचनी पडणे अशक्य होते.

विभावरी शिरुरकरांनंतर कमल देसाई यांनी आपल्या आतल्या स्वरांना साहित्यातून मुक्तपणे अभिव्यक्त केले. पारंपरिक बाईपणाचा साचा मोडून त्यांच्या कथेतील आणि लघुकादंबरीतील स्त्रिया माणूस म्हणून मुक्तपणे उभ्या राहिल्या. बाईपणाचा पारंपरिक साचा झुगारून देऊन स्वतंत्र माणूस म्हणून नैसर्गिक जगण्यावर भर दिला. कमल देसाईच्या काळापर्यंत म्हणजे १९४५ नंतर सामाजिक परिस्थितीत बराच फरक पडला होता. हा फरक वरवरचा असला तरी विरोधाची धार मात्र बरीच बोथट झालेली दिसते. घटनेने स्वीकारलेल्या लिंगभेदातील दृष्टिकोनामुळे कायद्याने का होईना पण स्त्रीपुरुष समतेचा पुरस्कार केला गेला. पण हा पुरस्कार प्रत्यक्षात उतरवणे किती कठीण आहे हे लवकरच लक्षात आले.

स्वातंत्र्यापासून १९६० पर्यंतचा काळ हा सामाजिक आणि साहित्यिकदृष्ट्यादेखील स्थितीशील कालखंड आहे. १९६० नंतर परत सामाजिक आणि साहित्यिक घडामोडींना वेग आलेला दिसतो. १९७५ नंतर युनोने जाहीर केलेल्या स्त्री दशकाच्या निमित्ताने झालेली जनजागृती जगभरातल्या स्त्रियांसाठी महत्त्वपूर्ण ठरली. स्त्रियांमध्ये माणूसपणाचे सजग भान १९७५ नंतर विशेषत्वाने जागृत झाले. त्यातून साहित्यविषयक जाणिवादेखील बदलत गेल्या; पण त्या काही बोटावर मोजण्याइतक्याच स्त्रियांच्या स्त्रीचळवळीही सुरुवातीपासून ते आजपर्यंत एकसंघ चळवळ नाही. जे दलित चळवळीत किंवा इतर सामाजिक चळवळीत एकसंघ प्रयत्न झाले, तसे प्रयत्न स्त्रीचळवळीत झाले नाहीत.

१९५७ नंतर विविध स्वायत्त संघटनांची निर्मिती ही चळवळीसाठी एक महत्त्वपूर्ण जमेची बाजू होती. स्त्रीमुक्ती संघटनेपासून स्त्रीउवाचपर्यंत अनेक भगिनींनी चळवळीत महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. १९२० ते १९४५

या कालखंडात कादंबरी वाङ्मयाचा विकास झाला. विशेष म्हणजे यातील बऱ्याच कादंबऱ्या सामाजिक प्रश्नांची चर्चा करणाऱ्या वास्तववादी कादंबऱ्या होत्या. तत्कालीन सगळ्याच कादंबरीकारांनी स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा केली. परंपरा आणि नवता यांचा संघर्ष जसा समाजमनात चालू होता, तसा तो लेखक कवींच्या मनातही चालू होता. त्याचे प्रतिबिंब तत्कालीन साहित्यात उमटलेले दिसते.

समाजव्यवस्थेतील उणिवांवर बोट ठेवण्याचे काम पुरुषांनी केले. त्याच पद्धतीने त्यांना आकलन झालेले स्त्रीप्रश्न त्यांनी त्यांच्या प्रकृती धर्मानुसार चित्रित करण्याचा प्रयत्न केला. गांधीवाद, मार्क्सवाद, आंबेडकरवादाच्या प्रभावातून अनुक्रमे राजकीय चळवळ आणि दलित चळवळ १९२० नंतर गतिशील झालेली दिसते. याच काळात सत्यशोधक चळवळीचे पुनरुज्जीवन झालेले दिसते. पण त्या चळवळीला ब्राह्मण—ब्राह्मणेत्तर असे संकुचित रूप मिळालेले दिसते. या काळात राजकीय स्वातंत्र्याने प्रेरित असलेली गांधीजींची स्वातंत्र्य चळवळ जितकी प्रभावशाली ठरली तितकीच येथल्या दीनदलित उपेक्षितांचा कैवार घेणारी आंबेडकरांची स्वातंत्र्य चळवळदेखील प्रभावी ठरली. १९१८ पासून १९६० पर्यंतचा कालखंड लक्षात घेतला म्हणजे स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार झाला; पण तो आनुषंगिक स्वरूपाचा होता असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. १९६० नंतर सुशिक्षित स्त्रियांचे प्रमाण बरेच वाढले. नोकरी व्यवसायात स्त्रिया सक्रीय झाल्या; पण समाजव्यवस्थेतील त्यांचे दुय्यमत्व संपू शकले नाही. घराबाहेरच्या विश्वात वावरणाऱ्या स्त्रियांचे अनेक नवे प्रश्न निर्माण झाले आणि ज्या पद्धतीने समाजाच्या केंद्रस्थानी पुरुष होता, त्याच पद्धतीने साहित्याच्या केंद्रस्थानीदेखील पुरुषच राहिला.

१९७५ नंतर स्त्रीवादी चळवळ गतिशील झाली. याच कालखंडात स्त्रिया खऱ्या अर्थाने आपल्या अधिकारासाठी आक्रमक झालेल्या दिसतात. ज्या प्रश्नांच्या विरोधात स्त्रियांनी चळवळ उभी केली, ते सगळे प्रश्न मूलभूत स्वरुपाचे होते. स्त्रीच्या अस्तित्वाचीच ती लढाई होती. हुंडाबळीच्या विरोधात आंदोलनाची उभारणी या काळात झाली. कुटुंबात स्त्रियांना मिळणारी दुय्यम दर्जाची वागणूक, हुंड्यासाठी होणारा छळ इ. प्रश्नांवर स्त्रीमुक्ती चळवळीने भर दिला.

मराठी साहित्यविश्वात १९६० नंतर विशेषकरून १९७५ नंतर ज्या लेखिका लिहित्या झाल्या, त्यातील काही लेखिकांवर स्त्रीवादी चळवळीचा परिणाम अपरिहार्यपणे जाणवतो. पण यातील बऱ्याच स्त्रिया उच्चवर्णीय आहेत. उच्चवर्गात वावरताना स्त्री म्हणून असलेल्या समस्या आणि या वर्गात स्त्रियांना मिळणारे दिखाऊ स्थान, त्यांच्याकडे बघण्याचा भोगवादी दृष्टिकोन याची चर्चा गौरी देशपांडेच्या साहित्यात प्रमुख्याने झालेली दिसते. स्त्रीच्या माणूसपणाचा शोध, हे त्यांच्या लघुकादंबऱ्यांचे वैशिष्ट्य आहे. लैंगिक प्रश्नांपासून स्त्रियांच्या सगळ्याच प्रश्नांकडे त्या निखळ मानवतावादी दृष्टिकोनातनूच बघतात आणि निर्भयपणे त्या प्रश्नांची मांडणी करतात. अर्थात त्यासाठी परदेशी अवकाशाचा त्या वापर करतात. गौरी देशपांडे यांच्या कुटुंबाला लाभलेली व्यक्तिस्वातंत्र्यवादी परंपरा यामागे निश्चित आहे. उपेक्षित स्त्रियांचे प्रश्न गौरी देशपांडेच्या साहित्यात येत नाहीत. गौरी देशपांडे यांनी एक स्त्री म्हणून स्वत: जे काही अनुभवलं, भोगलं त्याची मांडणी त्या आपल्या साहित्यातून करतात.

जागतिकीकरण आणि खाजगीकरण यामुळे लघु उद्योगावर संक्रांत आली. विस्थापितांचे प्रश्न निर्माण झाले. दूरदर्शनच्या माध्यमातून सादरीकरणाला अवाजवी महत्त्व प्राप्त झाले. जीवघेण्या स्पर्धेच्या या कालखंडात एकीकडे स्त्री चळवळ गतिशील झाली, तर दुसरीकडे स्त्रिया अधिक खालच्या दर्जाकडे फेकल्या गेल्या. स्त्रीकडे भोगवस्तू म्हणून बघण्याच्या दृष्टिकोनात वाढ झाली. स्त्रियांवरील अत्याचार, बलात्कार, हिंसा यांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली. स्त्रीभृणहत्येचे प्रमाण प्रचंड वाढले. एकीकडे नोकरी व्यवसायात स्त्रिया प्रविष्ट झाल्या. सातत्य, चिकाटी आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर या क्षेत्रात स्त्रीला स्वत:ला सिद्ध केले. पण प्रत्येक ठिकाणी स्त्री म्हणून त्यांना दुय्यम वागणूक मिळत गेली. प्रसार माध्यमांनी स्त्रियांच्या दुय्यम स्थानाला खतपाणी घातले.

१९७५ नंतर झालेल्या या बदलांचे सूचन गौरी देशपांडे यांच्याबरोबरच मेघना पेठे, सानिया, प्रिया तेडूलकर, कविता महाजन, कवयित्री निरजा, मलिका अमर शेख, रजनी परुळेकर, प्रज्ञा पवार, कल्पना दुधाळ, बालिका ज्ञानदेव अशा लेखिका—कवयित्रींच्या साहित्यातून प्रकर्षाने जाणवते.

आधुनिक कालखंडात ब्रिटिशांच्या आगमनामुळे झालेल्या वैचारिक क्रांतीचे फलित म्हणून सुरु झालेल्या प्रबोधन चळवळीच्या निमित्ताने स्त्रियांच्या प्रश्नांविषयी जागृती निर्माण झाली. इतिहासाच्या ज्ञात कालखंडापासून भारतीय स्त्रियांचा विचार केल्यास स्त्रियांच्या पदरी कायमच परवशतेचे दुय्यम आयुष्य आले आणि स्त्रियांनी ते मुकाटपणे स्वीकारलेदेखील, काही मोजक्या स्त्रियांनी याला विरोध करण्याचा प्रयत्न केला. पण असे प्रयत्न दडपण्यावर समाजाचा भर होता, त्यामुळे स्त्रियांना मनमोकळी अभिव्यक्ती कधीच करता आली नाही. पुरुषसत्ताक व्यवस्थेने स्त्रियांचे माणुसपण हिरावून व्यवस्थेच्या साच्यात ओतलेले आयुष्य स्त्रिया जगू लागल्या. तेच आपले खरे आयुष्य आहे असा बहुसंख्य स्त्रियांचा समज होता. मध्ययुगीन कालखंडात काही मोजक्या स्त्रियांनी मुक्तीचे

स्वर आळवले पण तो प्रयत्न केवळ आध्यात्मिक क्षेत्रापुरताच मर्यादित राहीला. गौरी देशपांडेपासून कविता महाजनपर्यंत धाडसी लेखिका म्हणून ओळखल्या–जाणल्या लेखिकांनाही स्त्रीचं स्वतंत्र होणं म्हणजे नेमकं काय याचे उत्तर सापडत नाही, पण निदान विरोधाच्या संघर्षाच्या अनेक दिया या स्त्रीवादी साहित्यातून अवतरताना आपल्याला दिसतात.

## संदर्भग्रंथ

१) नवे साहित्यशास्त्र – डॉ. यशवंत मनोहर
२) साहित्य समीक्षा बदलेले मापदंड – डॉ. प्रकाश खरात
३) स्त्रीवाद आणि मराठी साहित्य – डॉ. वंदना महाजन

❖❖❖

# वृत्तपत्रीय मथळ्यांची भाषा–एक चिकित्सा

डॉ. संजय नीळकंठ पाटील
सहयोगी प्राध्यापक
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, वाशीम
Email : snpatilwashim@gmail.com, भ्रमणध्वनी ९२७२७७१७००, ७८८७९६३११८

## सारांश

काही मान्यवर वृत्तपत्रांमधील बातम्या, लेख यांचे मथळे (शीर्षक) मोठे मार्मिक, आलंकारिक असतात. अशा शीर्षकांमुळे त्या त्या वृत्तपत्राचा भाषिकदृष्ट्या वाङ्.मयीन तसेच वैचारिक दर्जा जाणकाराच्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. अर्थात अशा प्रकारचे मथळे मोठे आकर्षक, मनोरंजक, आशयगर्भ आणि वैचारिक स्वरूपाचेसुद्धा असल्याचे वाचकाला नकळत जाणवत असते. कधी कधी विनोदी शैलीने देखील ह्या मथळ्यांची योजना केलेली आपल्याला दिसून येते. अशा काही मासलेवाईक मथळ्यांचा ऊहापोह प्रस्तुत शोधनिबंधातून केलेला आहे. निश्चितपणे वाचकाला हा प्रयत्न गमतीचा, गंभीर तसेच वैचारिक स्वरूपाचासुद्धा जाणवेल.

बीजशब्द – आविष्कार, लोकशाही, वृत्तपत्र, मथळा, शीर्षक, माहिती चौकट (Info.Box)

## प्रस्तावना

भाषेची अनेकानेक आविष्कार रूपे आपल्याला दिसतात. जसे की, व्यावहारिक भाषा, साहित्याची भाषा त्यातही काव्याची भाषा, नाटकाची भाषा, कादंबरीची भाषा, ललित गद्याची भाषा, स्वकथनांची भाषा, तसेच नागर भाषा, ग्रामीण भाषा, पुरुषांची भाषा, स्त्रियांची भाषा, लहान मुलांची भाषा (Baby Talk); तरुणतरुणींची भाषा, व्यापारी लोकांची भाषा, शेअर बाजारातील दलालांची भाषा, इत्यादी इत्यादी. आणि ह्या सर्व आविष्कार रूपांची त्यांची त्यांची अशी खास वैशिष्ट्ये, वेगळेपण आहेत. त्याचप्रमाणे वृत्तपत्रीय मथळ्यांचीसुद्धा भाषा मोठी वैशिष्ट्यपूर्ण दिसून येते. या भाषेचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपच प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे उलगडवायचे आहे. भाषेकडे बघण्याची एक वेगळी दृष्टी यामधून आपल्या लक्षात येईल. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये साधारणपणे डिसेंबर २०१४ पासूनच्या काही वृत्तपत्रांमधील काही विशिष्ट मथळ्यांचा विचार केलेला आहे.

३१ डिसेंबर २०१४ च्या दैनिक लोकसत्ता मध्ये ''गिर्यारोहणाची 'लाईफलाईन' अशा प्रकारचा मथळा आलेला असून त्यासोबत दिलेला Info.Box (माहिती चौकट) मध्ये असे दिलेल आहे – 'गिर्यारोहण हा केवळ शब्द जरी उच्चारला तरी डोळ्यांपुढे ती अवघड चढाई आणि ही चढाई करणारे साहसी गिर्यारोहक येतात, या साऱ्यांमध्ये हे सारे साहस ज्याच्या आधारे बांधले जाते तो दोर तर सर्वप्रथम दिसू लागतो. गिर्यारोहण या शब्दाशीच नाही तर या खेळाचेच या दोराशी एवढे घट्ट नाते तयार झाले आहे.' म्हणजे माहिती चौकटीतील एवढ्या मोठ्या आशयाचा बोध आपल्याला मथळ्यातील केवळ दोनच शब्दांनी होतो.

४ डिसेंबर २०१४ च्या लोकसत्ताच्याच एका बातमीचा मथळा होता 'ह्यूज' लॉस. दुसऱ्याच दिवशी सकाळमध्ये दै. सकाळने 'भान जागे करणारा 'चेंडू' अशा मथळ्याची बातमी दिली. ही बातमी होती ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू फिलीप ह्यूज याचा चेंडू लागून मृत्यू झाल्याची. ऑस्ट्रेलियन क्रिकेटचे त्यामुळे बरेच नुकसान झाले, हे आपणा सर्वांना माहितीच आहे. साखरेच्या भावात घसरण झाली तेव्हा लोकसत्तानेच 'उसाच्या गोडीला दराचा लगाम' अशा शीर्षकाची ३ मार्च २०१५ ला बातमी छापली. निश्चितच आलंकारिक स्वरूपाचे हे शीर्षक आहे. आणि हा शोधनिंबंध जेव्हा जेव्हा भविष्यामध्ये वाचला जाईल तेव्हा वाचकाला ह्या काळात साखरेच्या भावात घसरण झाल्याचे कळेल. म्हणजेच आलंकारिकतेसोबतच माहितीपूर्ण ही बाब ठरते.

दिल्लीमध्ये 'न भूतो न भविष्यति' अशा स्वरूपात आम आदमी पक्षाने (आप) बाजी मारली. परंतु थोड्या अवधीमध्येच ह्या पक्षामध्ये सुंदोपसुंदी सुरू होऊन काही सदस्य बाहेरसुद्धा पडलेत. लोकसत्ता ३ मार्च २०१५ रोजी संदर्भात लिहितो – 'आप'लाचि वाद 'आप'णासी.

मोदी सरकारचा अर्थसंकल्प मार्च २०१५ ला सादर झाला त्यावेळी 'अर्थमागचा संकल्प' व 'अर्थ'पूर्ण अर्थकल्लोळ अशा स्वरूपाची शीर्षके २ मार्च २०१५ रोजी झळकलीत. 'कामा'च्या अधीक्षकांना हटवा! रुग्णालयातील परिचारकांचे 'कामबंद आंदोलन' हा मथळा ३ डिसेंबर २०१४ च्या लोकसत्तामधील कामा

रुग्णालयातील अधीक्षकांच्या कार्यशैलीविरुद्ध परिचारिकांनी कामबंद आंदोलन केले होते. याच दिवशी दुसरा मथळा होता. मुंबईत 'गृह'वर्षा. सर्वसामान्यांघरासाठी जागा उपलब्ध होणार! झोपू कायद्यान्वये ह्या जागा मिळणार परंतु हे सर्व वादग्रस्त ठरले. अभिनेत्री रेखा हिने पनवेल जवळील आदिवासींच्या परिसरामध्ये पाणीपुरवठा आणि ग्रामस्वच्छतेसाठी पुढाकार घेतल्याचे हेच वृत्तपत्र लिहिते – 'पनवेल जवळील आदिवासी गावाची जीवन 'रेखा' बदलणार!' किती समर्पक आणि काव्यात्म शीर्षक आहे हे!

९ मार्च २०१५ च्या संपादकीयामध्ये लोकसत्ता लिहिते – 'आप' तो ऐसे न थे. आणि माहिती चौकटीमध्ये देते– केजरीवाल यांनी कितीही लोकशाहीचा आव आणला तरी त्यांच्यातही 'हम करेसो कायदा' प्रवृत्ती वास करीत आहे तेव्हा 'आप' हा पक्ष इतरांपेक्षा वेगळा पक्ष आहे, असा दावा केजरीवाल यांनी करू नये' याच दिवशी टेकचंद सोनवणे यांनी लेख लिहिलेला आहे –'' 'आप'ले कॉंग्रेसीकरण'' आणि माहिती चौकटीमध्ये (Info.Box) दिलेले आहे – 'आपल्याकडे कोणत्याही राजकीय पक्षाचे कधी ना कधी कॉंग्रेसीकरण होतच असते! एकीकडे भाजपही त्याच वाटेवर जात असताना नवनवोन्मेषशाळी 'आप'लाही त्या वाटेची इतक्यातच भुरळ पडणे दुर्दैवी म्हणावे लागेल. अर्थात याला केजरीवाल यांची महत्वाकांक्षा व हेकेखोरपणा कारणीभूत आहे'. याच संदर्भात मूलनिवासी संघटक हे पाक्षिक लिहिते – 'आप' साप सारखाच. (१–१५मार्च २०१५)

भारत पाकीस्तान क्रिकेटची मॅच हा तसा अतिशय संवेदनशील असा विषय जेव्हा चुरशीचा सामना असतो तेव्हा साधारण रस्त्यांवर गर्दी नसते. सर्व लोक टीव्हीसमोर बसलेले असतात. ९ मार्च २०१५ च्या सकाळच्या यासंदर्भातील बातमीचा मथळा असा– 'इतना सन्नाटा क्यो है भाई?' वास्तविक हा संवाद शोले चित्रपटातील! परंतु येथे त्याचा चपखल असा वापर केलेला दिसून येतो.

आऊटलुक या नियतकालिकाचे एक माजी संपादक श्री. विनोद मेहता त्यांनी पाळलेल्या त्यांच्या कुत्र्याचे नाव होते 'एडिटर'. मेहतांचा मृत्यू झाल्यानंतर ९ मार्च २०१५ च्या संपादकीयामध्ये लोकसत्ताने मथळा दिलेला आहे – 'संपादक' पाळणारा संपादक.

२०१५ च्या क्रिकेटच्या विश्वचषक सामन्यांमध्ये सलग चार सामने जिंकले आणि पाचव्या सामन्यासाठी आपला संघ उत्सुक होता तेव्हा ह्यावेळी १० मार्च २०१५ ला दै. लोकसत्ता लिहिते– 'आता' पंच' पक्वान्न!' आणि सुदैवाने हा सामना भारतानेच जिंकला आणि ह्या पाच सामन्यांमध्ये भारतीय संघाने ५० विकेट्स घेण्याचा विक्रम नोंदविला तेव्हा दुसऱ्या दिवशी हेच वृत्तपत्र लिहिते – 'भारतीय विजय पंचमी.' किती आनंददायी आणि सुखद आहेत हे मथळे!

८ मार्च २०१५ च्या अंकामध्ये लोकसत्ताने मथळा घेतलेला आहे – महाराष्ट्र 'स्वच्छता' मोहीम. आणि माहिती चौकटीमध्ये दिलेले आहे. 'फडणवीस सरकार सत्तेवर आल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील मरगळ आणि उदासिनता दूर झाली आहे. भ्रष्ट अधिकाऱ्यांची फाईलबंद प्रकरणे बाहेर निघत असून अनेक बड्या अधिकाऱ्यांवर कारवाईची कुऱ्हाड चालविली आहे. एकप्रकारे ही महाराष्ट्र 'स्वच्छता' मोहीमच!' मोदी सरकारच्या स्वच्छ भारत ह्या मोहिमेप्रमाणेच ही वेगळ्या अर्थाने महाराष्ट्र स्वच्छता मोहिम, याठिकाणी वृत्तपत्रवाल्यांचे कल्पनाविलास कसबच दिसून येते.

आरोग्यविषयक बातम्यांमध्ये सुद्धा हेच चित्र आपल्याला दिसते. 'दरवर्षी स्वाइन फ्लूचा उद्रेक होतो हे माहीत असतानाही आरोग्य सुविधांबाबत हलगर्जीपणा केला जातो. शेकडो निरपराध नागरिकांच्या जीवाशी हा खेळच आहे.' हे माहिती चौकटीत देऊन लोकसत्ताने दि. १२ मार्च २०१५ रोजी उद्रेकाचा 'ताप' ह्या मथळ्याखाली बातमी दिलेली आहे. त्याच दिवशी 'आरोग्याच्या लठ्ठ समस्या!' ह्या मथळ्याखाली लठ्ठपणा, वजनाबरोबर अनेक आजार, दम लागणे, अवयव लोंबणे, लवकर म्हातारपण, अपत्ये स्थूल होणे इ. ह्या बाबी माहिती चौकटीमध्ये दिलेली आहे. याच दिवशी आणखी एक बातमी आलेली आहे. महिलांच्या आरोग्याकडे अर्थार्जनामुळे होणारे दुर्लक्ष कथन करण्यासाठी 'अर्ध्या जगा' ची हेळसांड ह्या मथळ्याखाली आलेली आहे. क्रिडा क्षेत्रातील काही बातम्यांचे मथळेसुद्धा बघण्यासारखे आहेत. सायना नेहवाल ही बॅडमिंटनपटू जागतिक क्रमवारीमध्ये अव्वल स्थानी हे वर्णन करताना २९ मार्च २०१५ रोजी 'फुलराणी शिखरावर' हा मथळा लोकसत्ताने योजलेला आहे. (फुलराणी– बॅडमिंटनच्या फुलासोबत खेळणारी.)

'चॅट' पटीत हे लोकसत्ता दि. २८ मार्च २०१५ चे शीर्षक येथे माहिती चौकटीमध्ये 'व्हॉट्सॲप'ट्वीटर या मध्यमावरील झटपट इंग्रजी भाषा वापरून ही कादंबरी लिहिण्यात आली आहे. कथा चटपटीत पण नेहमीचीच. ....मात्र ह्या कथेला आजच्या काळतल्या संवाद भाषेचं रूप असल्यामुळे ती 'चॅट' पटीत नक्कीच झाली आहे.' अशा स्वरूपाची माहिती आलेली आहे. संत नामदेवाच्या लोकसंग्रहासंदर्भात लोकसत्ताच्या चतुरंग पुरवणीमध्ये

(२९ मार्च२०१५) 'नामयाचे नेटवर्किंग' असे शीर्षक योजलेले आहे. आपले ऑनलाईन धडे देशाच्या कान्याकोपऱ्यातील होतकरू विद्यार्थ्यांपर्यंत पोचावेत हा रोशनीचा हेतू. त्यासाठी त्याचे प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतर केले जाणार असून सध्या कन्नड, तामिळ, बंगाली भाषांतर काम सुरू असल्याचे ती सांगते. गरजू विद्यार्थ्यांसाठी इंटरनेटवर मोफत धडे.'' अशा स्वरूपाचे माहिती चौकटीत नोंदवून महाराष्ट्र टाईम्स 'ऑनलाइन शिक्षणाची 'रोशनी'अशा स्वरूपाचे शीर्षक योजते (११ जुलै २०१५). अशा स्वरूपाची शीर्षके (मथळे) इंटरनेट/ऑनलाईन क्षेत्रातील बातम्यांसाठी विविध वृत्तपत्रांनी योजलेली दिसतात. वरील उदाहरणामध्ये 'चॅट' हा शब्द मोठा खुबीने वापरलेला दिसतो. तर 'रोशनी' हा शब्द श्लेषात्मक पद्धतीने वापरलेला आहे. हे मोठे वैशिष्ट्यपूर्ण दिसून येते.

काही शीर्षके मनाला, बुद्धीला, भावनांना आवाहन आणि आव्हान देणारी दिसतात. याचीही अनेकानेक उदाहरणे आपल्याला दिसतात. उदा. 'अवकाळी'ची अवकळा (अवकाळी पावसाने झालेले शेतकऱ्यांचे नुकसान–लोकसत्ता, ३ मार्च २०१५), वाशीम जिल्ह्यातील 'लोकशाही दीन' (सकाळ–९ मार्च २०१५), मुख्यमंत्र्यांची 'साखरपेरणी' (लोकसत्ता ८ मार्च २०१५), यंदा कापसाच्या भावाला 'हमी' नाहीच! (लोकसत्ता ८ मार्च २०१५), 'आप' मध्ये यादवी! (लोकसत्ता ८ मार्च २०१५), महाराष्ट्राचे 'नवे' निर्माण (मनसेच्या नवव्या वर्धाप दिना निमित्ताने– लोकसत्ता ८ मार्च २०१५), राज्य मंत्रीमंडळाच्या उपसमितीची बॅक बंद करण्याची शिफारशीच्या पार्श्वभूमीवर 'बळीराजा' च्या भूविकास बॅकेचा 'बळी' (सकाळ, १५.०४.२०१५), मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा लवकरच मिळेल असा शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या आशावादावर – 'मराठी पैठणी नेसून मंत्रालयाच्या दारात' (लोकसत्ता ०९.०४.२०१५) इत्यादी.

## समारोप आणि निष्कर्ष

वरीलप्रमाणे वर्तमानपत्रातील, वृतपत्रातील जी मथळे बातम्यांसाठी लेखांसाठी, संपादकीयांसाठी वापरलेली असतात. त्यामध्ये त्या त्या व्यक्तींची बुद्धीची झेप आपल्याला निश्चितपणे जाणवते. यामध्ये काव्यात्म शीर्षके, आलंकारिक शीर्षके, काही विनोदी तर काही उपहासगर्भ अशा स्वरूपाची दिसून येतात. भाषेसोबतसुद्धा आपल्याला वाचकाच्या पातळीवर अशा प्रकारे खेळता येऊ शकते, आस्वादन करता येऊ शकते. अशा प्रकारचा हा भाषिक खेळ मोठा मनोरंजक, उद्‌बोधक तसेच आवाहन व आव्हानात्मक असतो. काही मथळे हे खरोखरच 'गागर मे सागर' अशा स्वरूपाची असतात. म्हणजेच मोजक्याच शब्दांमधून संपूर्ण बातमीचा आशय आपल्या लक्षात येतो. काही ठिकाणी चित्रपटातील संवाद, काही संतांची उद्धरणे ही शीर्षकाच्या स्वरूपातदेखील वापरलेली दिसतात. सध्या 'इ' चा काळ (डिजीटल, इंटरनेट वगैरे) आहे. त्यामुळी ही भाषा सुद्धा काही मथळ्यांमध्ये दिसून येते. भाषेकडे बघण्याचा अशाप्रकारचा हा एक वेगळा दृष्टीकोन आपल्याला दिसतो. मनोरंजक नाही का हा?

## संदर्भ


- दै. लोकसत्ता, नागपूर.
- दै. सकाळ, नागपूर.
- दै. महाराष्ट्र टाईम्स, नागपूर.
- पाक्षिक मुलनिवासी संघटक.


❖❖❖

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

## Form IV

(See Rule 8)

**Statement about ownership and other particular about the Journal**

**मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | **Dr. Bhau Mandavkar Research Centre**, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | **Annual** |
| 3. Printer's Name | - | **Seva Prakashan**, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | **Dr. Mrs. Veera Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | **Dr. Pavan Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

**We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.**


Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401
☎ 07201-226170, 226147, 226129 (Fax)
Web.: www.indiramahavidylaya.com
e mail for Govt. & General : imvkalamb@yahoo.co.in
For University : indiram414@sgbau.ac.in
For Research centre : marathipradhyapak@gmail.com
Permanently Affiliated to
SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI
RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B
NAAC ACCREDITED WITH 'B' GRADE
Multi-Faculty College Estd. in 1983








स्व. डॉ. भाऊ मांडवकर


ISSN
2454-7409